

# मराठी कादंबरीतील प्रादेशिकता

डॉ. भास्कर शेळके

AGASTI COLLEGE, AKOLE
LIBRARY
26354

पंडित विठ्ठलराव विखे पाटील पुरस्कार
बोरा ग्रामीण साहित्य पुरस्कार प्राप्त

# मराठी कादंबरीतील प्रादेशिकता

LIBRARY
AKOLE
422601
DIST AHMEDNAGAR

डॉ. भास्कर शेळके

स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस
पुणे

Agasti Arts, Commerce & Dadasaheb
Rupwate Science College, Akole
POST GRADUATE LIBRARY
Acc.No. 26354
Price ______ Dt. ______
891.46309
SHE
26354

❖ स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस क्र. : ६७

❖ मराठी कादंबरीतील प्रादेशिकता

❖ प्रकाशक आणि मुद्रक
श्री. एल.व्ही. तावरे
स्नेहवर्धन, ८६३ सदाशिव पेठ,
म. फुले सभागृहामागे, ज्ञानप्रबोधिनीजवळ, पुणे - ४११ ०३०
दूरभाष : (०२०) २४४७ २५ ४९
ई मेल : snehavardhan@vsnl.net

❖ चित्रकार - डॉ. वि. मा. बाचल

❖ © सर्व हक्क सुरक्षित

❖ प्रथमावृत्ती : २५ एप्रिल १९९७
द्वितीयावृत्ती : १५ ऑगस्ट २००४


❖ मुद्रणस्थळ
बसंत प्रिंटिंग प्रेस, पुणे

❖ ISBN 81-7265-066-3

❖ पृष्ठसंख्या - १३२

❖ मूल्य : १००/-

पुस्तक जपून वापरावे.



जिची सदैव स्मृती होते,
त्या माझ्या चिमुकलीस .........
कै. शब्दश्री ऊर्फ तेजश्रीस ........

❖ ❖ ❖

"अशी पाखरे येती आणि
स्मृती ठेवूनी जाती"......

# अ नु क्र म णि का


| | | |
|---|---|---|
| **पुरस्कार** | : डॉ. आनंद यादव | ५ |
| **मनोगत** | | ७ |
| **प्रास्ताविक** | | ९ |
| **प्रकरण एक** | : प्रादेशिकतेचे स्वरूप | ११ |
| **प्रकरण दोन** | : पश्चिम महाराष्ट्रीय जीवनातील प्रादेशिकतेचे स्वरूप | ३८ |
| **प्रकरण तीन** | : कोकणी (गोव्यासह) जीवनातील प्रादेशिकतेचे स्वरूप | ६१ |
| **प्रकरण चार** | : मराठवाड्याच्या जीवनातील प्रादेशिकतेचे स्वरूप | ७१ |
| **प्रकरण पाच** | : वैदर्भीय जीवनातील प्रादेशिकतेचे स्वरूप | ७८ |
| **प्रकरण सहा** | : उपसंहार | ८६ |
| **परिशिष्ट आणि संदर्भसूची** | : १) अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांची कालक्रमानुसार सूची | ११८ |
| | २) संदर्भ ग्रंथ आणि नियतकालिक लेखसूची | १२२ |

# पुरस्कार

मराठी साहित्याचा एक अभ्यासक म्हणून मराठी साहित्यातून गोचर झालेले देशीपण प्रा. शेळके यांनी टिपले आहे. आपला देश हा प्रामुख्याने खेड्यांचा देश आहे आणि तो कृषिप्रधान आहे. ही कृषिप्रधानता विशेषत्वाने खेड्यातच असते. म्हणून कृषिप्रधान जीवनाचे दर्शन घडवणाऱ्या मराठी साहित्याकडे त्यांचे लक्ष वेधले. कादंबरी या साहित्यप्रकाराचा अनुभवपट कविता, कथा, नाटक या प्रकारांपेक्षा अधिक व्यापक आणि प्रदीर्घ असू शकतो. कादंबरीतून उमटणारे प्रादेशिक जीवन हे तुलनेने अधिक अंगोपांगानिशी येण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे मराठी कादंबरीची निवड त्यांनी केली आणि या मराठी कादंबऱ्यांमधून प्रकट होणाऱ्या प्रादेशिकतेचे स्वरूप सर्वांगांनी शोधण्याचा प्रयत्न त्यांनी चिकाटीने केला.

मराठीमध्ये अजूनही प्रादेशिक कादंबरीचा एखाद-दुसरा अपवाद सोडला तर फारसा अभ्यास झालेला नाही. समीक्षकांनीही या विषयाची स्फुटस्वरूपातही फारशी दखल घेतली नाही. प्रा. शेळके यांनी संशोधनासाठी १९२५ ते १९९० हा पासष्ट वर्षांचा कालखंड निवडलेला आहे. या कालखंडात प्रसिद्ध झालेल्या एकूण ४४ प्रादेशिक निवडक कादंबऱ्यांचा त्यांनी या ग्रंथात विचार केलेला आहे. या कादंबऱ्या निवडताना महाराष्ट्राच्या भौगोलिक आणि सांस्कृतिक चार प्रमुख विभागांचा विचारही त्यांनी केलेला आहे. महाराष्ट्राचे पश्चिम महाराष्ट्र, कोकण, मराठवाडा आणि विदर्भ असे चार प्रमुख विभाग आपण मानतो. या चार विभागांतील प्रादेशिक जीवनाचे दर्शन घडवणाऱ्या या कादंबऱ्या आहेत. या प्रदेशाचे स्वरूप निसर्ग, समाज, संस्कृती या दृष्टींनी काहीसे वेगवेगळे आहे. त्यांचे वेगळेपण लक्षात घेऊन एकूण मराठी प्रादेशिक जीवनाचे स्वरूप मराठी कादंबरीमधून कसे दिसते हे न्याहळण्याचा प्रयत्न आहे.

प्रा. शेळके यांनी संशोधनासाठी निवडलेल्या पासष्ट वर्षाच्या काळात प्रादेशिक जीवनात खूपच फरक पडत गेलेला आहे. पारतंत्र्यांतील समाज आणि स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामीण, प्रादेशिक पातळीवरील समाज, परिसर यामध्ये भौतिकदृट्या जशा सुधारणा झाल्या आहेत, तसेच या सुधारणांच्यामुळे या प्रदेशांत राहणाऱ्या माणसांच्या मानसिकतेमध्येही बदल झालेला आहे. त्यामुळे काही नवे प्रश्न, नव्या समस्या स्वातंत्र्योत्तर काळामध्ये निर्माण झाल्या. या दृष्टीने ही त्यांनी विचार केलेला आहे. प्रादेशिकतेचे घटक म्हणून निसर्ग, भू-वैशिष्ट्ये, समाजजीवन आणि समाजजीवनाच्या अनुषंगाने त्या समाजातील सांस्कृतिकता, आर्थिकता, शैक्षणिक प्रगती, राजकारण, भाषा इत्यादींचा विचार करावा लागतो. या घटकांच्या शोधासाठी कादंबरी-लेखकाने ज्या घटना आणि प्रसंग उभे केले, ज्या व्यक्तींचे रेखाटन केले आणि त्यांच्या कुटुंबाचे विशेष कादंबऱ्यांमधून

आले यांचाही विचार केलेला आहे. आणखी महत्त्वाचा मुद्दा म्हणजे मराठी कादंबरीमधील प्रादेशिकता तपासताना ग्रामीण आणि प्रादेशिक असे वर्गीकरण केलेले नाही. सर्वसाधारणपणे नागर जीवनापासून दूर ग्रामात राहणाऱ्या कृषिनिष्ठ जीवनाचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या, तसेच उपेक्षित जनजातींचे जीवनचित्रण करणाऱ्या कादंबऱ्या यांचा समावेश आहे.

त्या त्या प्रदेशाच्या वैशिष्ट्यांचा विचार करीत असताना असे लक्षात येते की, या कादंबऱ्यांमधून प्रकट झालेली प्रादेशिकता ही त्या त्या लेखकांनी जाणीवपूर्वक प्रकट केली आहे असे नाही. ती अनुषंगाने आणि साहित्य कृतीतील जीवनाला आवश्यक तेवढीच आलेली आहे. कारण कादंबरीकार हा एक ललित लेखक असतो आणि तो आपली साहित्यकृती निर्माण करीत असताना त्याला आकलन झालेल्या मर्यादित जीवनानुभावांचे स्वरूप त्याच्या अंगी असलेल्या कल्पना-सामर्थ्यासह प्रकट करीत असतो. या मर्यादित जीवनानुभवात जेवढी वैशिष्ट्ये अनुषंगाने येतील तेवढीच तो रेखाटू शकतो. हे करीत असताना काही ठिकाणी वास्तवानुभवापेक्षा कल्पनासामर्थ्य, रंजकता, अद्भुतता, चमत्कृतिजन्यता, कल्पनारम्यता, स्वप्नरंजकता यांचाही लेखकाच्या लेखन-प्रकृतीनुसार आविष्कार झालेला असू शकतो.

कोकण, पश्चिममहाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा यांची प्राकृतिक रचना वैशिष्ट्यपूर्ण आहे. प्रदेशाचा आणि निसर्गाचा त्या त्या प्रदेशातील लोकजीवनावर झालेला परिणाम प्रस्तुत अभ्यासविषयासाठी घेतलेल्या कादंबऱ्यांतून स्पष्ट जाणवतो. लोकांच्या वेगवेगळ्या स्वभावप्रकृतींची मानसिकता घडलेली दिसते. प्रदेशातील राजवटीचा प्रभावही लोकजीवनावर असलेला दिसतो. एकूणच महाराष्ट्रीय माणूस, श्रद्धाळू, सोशिक, कष्टाळू, संस्कृती जपणारा तसाच अन्यायाविरूद्ध आवाज उठविणारा आहे. पुरुष बेफिकीर, भाबडे, तापट, मवाळ, मुजोर, नशीबावर हवाला ठेवणारे, रागीट अशा विविध स्वभावप्रवृत्तीचे दिसतात. स्त्री-व्यक्तिमत्त्व मात्र नियतीला मानणारे, प्रसंगी धडाडीने पुढे येणारे असे चित्रित झाले आहे. एकूणच प्रादेशिक जीवनाची ओळख पटविणारी 'कादंबरी' ही वैशिष्ट्यपूर्ण आहे. मराठी कादंबरी प्रदेश चित्रणामुळे आशयदृष्ट्या समृद्ध झाली आहे, हे मान्य करावे लागते.

प्रा. भास्कर शेळके यांनी प्रस्तुतचा ग्रंथ अतिशय साक्षेपाने अभ्यास करून, विद्यापीठीय संशोधन शिस्तीला धरून लिहिलेला आहे. त्यामुळे तो मराठी साहित्याच्या अभ्यासकांना उपयुक्त ठरणारा आहे. एरवी मराठीत घाई गडबडीने समीक्षा लिहून पुस्तके प्रसिद्ध करण्याच्या सध्याच्या बाजारी स्पर्धेत हा ग्रंथ आपल्या वेगळेपणामुळे आणि साधार विवेचनामुळे उठून दिसतो हे त्यांचे विश्वसनीयतेचे मूल्य विशेष आहे.

**आनंद यादव**

२०।२।९७

५ कलानगर, धनकवडी, पुणे ४३.



# मनोगत

मराठी साहित्याचा एक अभ्यासक म्हणून मला मराठी साहित्यातून गोचर झालेले देशीपण टिपावे असे बरेच दिवसांपासून वाटत होते. आपला देश हा प्रामुख्याने खेड्यांचा देश आहे आणि तो कृषिप्रधान आहे. ही कृषिप्रधानता विशेषत्वाने खेड्यातच असते, म्हणून कृषिप्रधान जीवनाचे दर्शन घडविणाऱ्या मराठी साहित्याकडे माझे लक्ष वेधले. परंतु विषयाच्या व्याप्तीच्या दृष्टीने मी माझा अभ्यास एखाद्या साहित्यप्रकारापुरताच मर्यादित करावयाचे ठरवले. कादंबरी या साहित्यप्रकाराचा अनुभवपट इतर कोणत्याही प्रकारांपेक्षा अधिक व्यापक आणि प्रदीर्घ असू शकतो. या प्रकारातून उमटणारे प्रादेशिक जीवन हे तुलनेने अधिक अंगोपांगानिशी येण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे मी मराठी कादंबरीची निवड केली आणि या मराठी कादंबऱ्यांमधून प्रकट होणारी प्रादेशिकता अभ्यासावी असे मला वाटले आणि मी याद्दष्टीने पुणे विद्यापीठातील मराठी विभागाचे विभाग-प्रमुख डॉ. आनंद यादव यांच्याकडे माझी इच्छा प्रदर्शित केली. डॉ. आनंद यादव हे स्वतः ग्रामीण जीवन चित्रित करणारे मराठीतील प्रथितयश लेखक व देशी साहित्याचा पुरस्कार करणारे चिकित्सक समीक्षकही आहेत. यादृष्टीने माझ्या विषयासाठी त्यांचे मार्गदर्शन लाभावे असे मला वाटले आणि यातूनच मी पुणे विद्यापीठाच्या पीएच.डी. या पदवीसाठी लिहावयाच्या प्रबंधाची सिद्धता करण्याचे ठरविले. त्यानुसार प्रबंधाचा विषय '**मराठी कादंबरीतील प्रादेशिकता**' (निवडक कादंबऱ्यांच्या आधारे चिकित्सक अभ्यास) हा विषय ठरविला. या विषयाच्या अनुषंगाने विशिष्ट असा १९२५ ते १९९० असा कालावधी ठरविला. या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या प्रादेशिक जीवन चित्रण करणाऱ्या सर्वच कादंबऱ्यांचा प्रबंधाच्या स्वरूप आणि व्याप्तीच्या दृष्टीने अभ्यास शक्य नसल्यामुळे वाङ्मयीन गुणवत्तेचा विचार करून निवडक कादंबऱ्यांचा अभ्यास करू लागलो.

प्रस्तुत प्रबंधाच्या सिद्धतेसाठी माझे मार्गदर्शक डॉ. आनंद यादव यांच्याशी वेळोवेळी झालेल्या चर्चेमुळे माझा आत्मविश्वास वाढला. मी केलेले लेखन त्यांनी न कंटाळता तपासले. मौलिक सूचना केल्या. स्वतंत्र विवेचन करण्यास परवानगी दिली. लेखनाची फेरतपासणी केली, म्हणूनच माझे संशोधन पूर्णत्वास आले. त्यांच्या ऋणातून मुक्त होणे केवळ अशक्य.

मी निवडलेल्या काही कादंबरी लेखकांच्या प्रत्यक्ष भेटी घेतल्या. काहींशी पत्रव्यवहार करून त्यांच्या कादंबऱ्यांच्या अनुषंगाने चर्चा केली. या सर्व लेखकांच्या भेटीमधून, चर्चेमधून मला मोलाची माहिती मिळाली. त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचा ऋणनिर्देश करणे मी

माझे कर्तव्य समजतो. मराठी विभागातील सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले त्यांचे आभार.

विद्यापीठ अनुदान आयोग आणि पुणे विद्यापीठ, पुणे यांनी संशोधनासाठी मला एक वर्षाची 'टीचर फेलोशिप' दिल्याने आणि माझे श्री शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नरचे संस्थाचालक, शिवाजीराव काळे, मा. खासदार निवृत्तिशेठ शेरकर, ॲड. ग. सा. रोकडे, ॲड. पुरवंत तसेच प्राचार्य एस्. एन्. तोत्रे, सहकारी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांच्या सहकार्याने संशोधनास सलग वेळ मिळू शकला, त्यांचा ऋणनिर्देश केलाच पाहिजे.

श्री. ल. ना. थोरात (जुन्नर कॉलेज), श्री. दातेमामा (मंचर कॉलेज), श्री. माधवराव घुले (राजगुरुनगर कॉलेज), रा. प. सबनीस, विद्यामंदिर, नारायणगाव, नगर वाचनालय जुन्नर येथील ग्रंथपाल-मित्रांनी संदर्भसेवा दिल्याबद्दल त्यांचे आणि समृद्ध ग्रंथालय, पुणे विद्यापीठ, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे ग्रंथालय, पुणे, डॉ. आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे ग्रंथालय, औरंगाबाद या सर्वच सेवकांनी केलेल्या सहकार्याची ही फलश्रुती. त्यांचे आभार.

असंख्य हितचिंतक - स्नेही, वेळोवेळी प्रोत्साहन देत गेले. विशेषतः डॉ. गं. ना. जोगळेकर, डॉ. द. दि. पुंडे, डॉ. अ. रा. तोरो, डॉ. प्रवीण सप्तर्षी, डॉ. रवींद्र ठाकूर, डॉ. रामभाऊ राठोड, श्री. बबनराव नलावडे, शिवाजी वाव्हळ, डॉ. वासुदेव मुलाटे, डॉ. अ. वा. कुलकर्णी, प्रा. घोगरे, श्री. मलगे, माजी खासदार मा. बाळासाहेब विखे पाटील तसेच जुन्नरमधील दानशूर बच्चुभाई गांधी, रुपेश शहा, नंदकुमार महाबरे, धनराज खोत, प्राचार्य विजयराव कसबेकर, मराठी अभ्यासमंडळ, पुणे विद्यापीठ यांच्या प्रेरणेतून हा ग्रंथ साकार झाला आहे. त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल सर्वांचे आभार. खेड लोकसभा मतदार संघातील खासदार मा. निवृत्तीशेठ शेरकर यांनी सदर ग्रंथ प्रकाशनास प्रोत्साहन दिले.

माझे कुटुंबीय - चि. अविनाश, सौ. तारादेवी, आई-वडील आणि गणगोत यांचे प्रेम-आशीर्वाद पाठीशी होतेच, त्यांचा ऋणनिर्देश करावाच लागेल. स्नेहवर्धन प्रकाशनाच्या डॉ. स्नेहल तावरे यांचे आभार.

संशोधनाचे काम चालू असताना संशोधन विषयात कादंबऱ्यांचा समावेश केलेल्या शंकर पाटील आणि जयवंत दळवी यांचे दुःखद निधन झाले, तसेच माझी चिमुकली चि. 'तेजश्री'चे अपघाती निधन झाले, त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

— **प्रा. डॉ. भास्कर शेळके**

'शब्दश्री', मु. बारव, ता. जुन्नर, (पुणे)

DADASAHEB RUPWATE SCIENCE COLLEGE LIBRARY AKOLE 422601 DIST. AHMEDNAGAR

# प्रास्ताविक

मराठीमध्ये अजूनही प्रादेशिक कादंबरीचा फारसा अभ्यास झालेला नाही किंवा समीक्षकांनीही या विषयाची फारशी दखल घेतलेली आहे असे दिसत नाही. अर्थात यापूर्वी मराठी प्रादेशिक कादंबरीचा अभ्यास झालेलाच नाही असे नाही, परंतु तो अत्यंत मर्यादित स्वरूपात झालेला आहे. एखाद्या साहित्यिकाच्या साहित्याचा किंवा नियतकालिकांतील लेखांपुरताच अभ्यास मर्यादित स्वरुपाचा झालेला दिसून येतो. समीक्षकांनी अपवादानेच प्रादेशिक कादंबरी आणि कादंबरीकार यांच्यासंबंधी चिकित्सकपणे लिहिले आहे. विशिष्ट कालखंडातील मराठी प्रादेशिक कादंबरीचा अभ्यासही साकल्याने झालेला दिसत नाही, यासाठी काही निवडक प्रादेशिक कादंबऱ्यांचा विगमनात्मक (Inductive) पद्धतीने आशयनिष्ठ दृष्टिकोणातून अभ्यास करून त्यांची विविधांगे स्पष्ट करावीत असे मला वाटले.

मी माझ्या संशोधनासाठी १९२५ ते १९९० हा पासष्ट वर्षांचा कालखंड निवडला. या कालखंडात प्रसिद्ध झालेल्या निवडक प्रादेशिक कादंबऱ्यांचा अभ्यास करावा असे मला वाटले. अर्थात या कादंबऱ्या म्हणजे प्रादेशिक कादंबऱ्यांमधील प्रातिनिधिक स्वरूपाच्या कादंबऱ्यांची मी निवड केली आहे. याशिवाय या कादंबऱ्या निवडताना महाराष्ट्राच्या भौगोलिकदृष्ट्या चार प्रमुख विभागांचा विचार मी केला आहे. पश्चिम महाराष्ट्र, कोकण, मराठवाडा आणि विदर्भ असे चार विभाग आपण मानतो. प्रत्यक्षातील या प्रदेशांचे स्वरूप, निसर्ग, समाज, संस्कृती या दृष्टीने काहीसे वेगवेगळे आहे. त्यांचे वेगळेपण लक्षात घेऊन एकूण मराठी प्रादेशिक जीवनाचे स्वरूप मराठी कादंबरीमधून कसे दिसते हे न्याहळण्याचा प्रयत्न मी केला आहे.

१९२५ ते १९९० या पासष्ट वर्षांच्या प्रादेशिक जीवनात खूपच फरक पडत गेलेला आहे. पारतंत्र्यातील समाज आणि स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामीण पातळीवरील समाज यांमध्ये भौतिकदृष्ट्याही जशा सुधारणा झाल्या आहेत तसेच या सुधारणांमुळे

या प्रदेशात राहणाऱ्या माणसांच्या मानसिकतेत बदल झालेला आहे. त्यामुळे काही नवे प्रश्न, नव्या समस्या स्वातंत्र्योत्तर काळामध्ये निर्माण झालेल्या दिसतात. यादृष्टीने माझ्या या ग्रंथात मी विचार केला आहे. याचे कारण प्रादेशिक भू-वैशिष्ट्यांबरोबरच प्रामुख्याने प्रादेशिक समाज- वास्तवाचा शोध घेणे हा हेतू आहे. मराठी कादंबरीतील प्रादेशिकता तपासताना ग्रामीण आणि प्रादेशिक असे वर्गीकरण मी करणार नाही तर सर्वसाधारण नागर जीवनापासून दूर ग्रामात राहणाऱ्या कृषिनिष्ठ जीवनाचे चित्रण करणाऱ्या निवडक कादंबऱ्या मी अभ्यासासाठी विचारात घेतल्या आहेत.

या ग्रंथ-लेखनाचा हेतू मराठीतील १९२५ ते १९९० या काळात लिहिल्या गेलेल्या कादंबऱ्यांमधून प्रत्ययाला येणारी प्रादेशिकता शोधणे हा आहे. त्यामुळे विषयाच्या मांडणीसाठी या ग्रंथाची सहा प्रकरणांत विभागणी केली आहे. त्यांपैकी पहिल्या प्रकरणामध्ये प्रादेशिकता म्हणजे काय ? आणि प्रादेशिकतेचे स्वरूप यांविषयी तात्त्विक चर्चा केली आहे. प्रादेशिकतेचे काही घटक निश्चित केले आहेत. त्या घटकांच्या आधारे प्रकरण दोन ते पाचमधून त्या त्या प्रदेशाचे स्वरूप न्याहळण्याचा प्रयत्न केला आहे. यांपैकी दुसऱ्या प्रकरणात पश्चिम महाराष्ट्रीय जीवनातील प्रादेशिकतेच्या स्वरूपाचा शोध घेण्याचा प्रयत्न आहे. तिसऱ्या प्रकरणात कोकणी प्रादेशिक कादंबरीतून या प्रदेशाची प्रादेशिक वैशिष्ट्ये स्पष्ट केली आहेत. चौथ्या प्रकरणात मराठवाड्याच्या लोकजीवनातील प्रादेशिकता शोधली आहे, तर पाचव्या प्रकरणामध्ये वैदर्भीय जीवनाचे स्वरूप टिपले आहे. उपसंहाराच्या सहाव्या प्रकरणामध्ये प्रादेशिक मराठी कादंबरी-लेखनाच्या निर्मिति-प्रेरणांचा विचार केला आहे. तसेच प्रादेशिक कादंबरीचे 'कादंबरी' म्हणून वाङ्मयीन मूल्याधारे मूल्यमापन केले आहे आणि शेवटी या सर्वांच्या पूर्ततेसाठी उपयुक्त संदर्भाची परिशिष्टे जोडली आहेत. हा ग्रंथ म्हणजे केवळ माझा पीएच्.डी. चा प्रबंध नसून या विषयासंबंधी केलेले प्रदीर्घ चिंतन आणि प्रबंधाचा संक्षिप्त आढावा आहे.

– प्रा. डॉ. भास्कर शेळके
मराठी विभाग प्रमुख
श्री. शिवछत्रपती महाविद्यालय
जुन्नर ४१० ५०२

**

प्र
क
र
ण
एक

# प्रादेशिकतेचे स्वरूप

**प्रास्ताविक :**

महाराष्ट्राचे भौगोलिकदृष्ट्या चार प्रमुख विभाग पडतात. हे चार विभाग पुढीलप्रमाणे आहेत: १) विदर्भ, २) मराठवाडा, ३) प. महाराष्ट्र, ४) कोकण (गोव्यासह). या चारही विभागांचे प्रादेशिक - ग्रामीण जीवन भिन्न स्वरूपाचे आहे. हे भिन्न स्वरूप त्या त्या प्रदेशांच्या भौगोलिक वैशिष्ट्यांमुळे निर्माण झाले आहे. त्यामुळे तेथील निसर्ग, समाज, संस्कृती, शेती भिन्न भिन्न झाली आहे. या भिन्नतेचे दर्शन त्या त्या प्रदेशामधील ग्रामीण प्रादेशिक कादंबऱ्यांतून दिसून येते.

१९२५ ते १९९० या पासष्ट एक वर्षांच्या काळात स्वातंत्र्यपूर्व प्रादेशिक ग्रामीण जीवन आणि स्वातंत्र्योत्तर प्रादेशिक ग्रामीण जीवन यात खूप फरक पडत गेला आहे. विशेषत: स्वातंत्र्योत्तर ग्रामीण परिसर खूप बदलला गेला आहे. ग्रामीण परिसरात विविध सुधारणा झाल्या आहेत. त्यामुळे प्रादेशिकतेच्या पुढील घटकांच्या आधारे प्रादेशिकता तपासता येईल : अ) भू-वैशिष्ट्ये, ब) निसर्ग, क) समाजजीवन. हे प्रमुख तीन घटक आहेत. समाजजीवन पुढील विविध उपघटकांनी तपासता येईल १) राजकीय जीवन २) घटना, प्रसंग, व्यक्ती कुटुंबविशेष ३) सांस्कृतिक जीवन ४) आर्थिक जीवन ५) शैक्षणिक जीवन ६) भाषाविशेष. अर्थात हे प्रादेशिकतेचे घटक संदर्भानुसार बदलणे शक्य आहेत. तरीही या घटकांच्या आधारे निवडक प्रातिनिधिक कादंबऱ्यांमधील प्रादेशिकता तपासणे शक्य आहे.

मराठी कादंबऱ्यांमधील प्रादेशिकता कालक्रमनिष्ठ संशोधन पद्धतीने अभ्यासणे अधिक सोयीचे ठरेल, म्हणून प्रादेशिकतेविषयी अभ्यासकांनी जे विचार आरंभीच्या अवस्थेत मांडले त्यांचा क्रमाने विचार करणे गरजेचे आहे. कारण आरंभीच्या विचारात नंतर काही बदल झाले किंवा नवविचार मांडले गेले ते समजू शकते. मराठी कादंबरीच्या विकासाबरोबर प्रादेशिकतेविषयीच्या विचारातील बदलही विचारात घेता

येतील. मराठी कादंबरीतील प्रादेशिकतेला बाळसे आले. प्रादेशिकता केवळ कादंबरीचा साज म्हणून नव्हे तर अविभाज्य अंग म्हणून मराठी कादंबरीत अपरिहार्यपणे आशयानुसार येऊ लागली. त्यानंतर सुखटणकरांनी 'प्रादेशिक' हा शब्द रूढ केला. प्रथम साहित्य आणि नंतर संकल्पना रूढ झाली. साहजिकच प्रादेशिकतेचे मूळ शोधणे अत्यावश्यक आणि अपरिहार्य झाले. त्यामुळे मी प्रादेशिकतेचे स्वरूप निश्चित करण्याचा प्रयत्न केला आहे.

मराठी समीक्षकांच्या किंवा अभ्यासकांच्या विचारांच्या आधारे प्रादेशिक कादंबरीच्या स्वरूपाविषयी प्रथम विचार केल्यानंतर हिंदी समीक्षकांच्या विचारांचा आढावा घेऊन निष्कर्ष काढणे सोपे होईल असे वाटते. म्हणून बापट - गोडबोले, ल. ग. जोग, डॉ. अ. रा. तोरो, डॉ. द. भि. कुलकर्णी, डॉ. आनंद यादव, स. शि. भावे, म. सु. पाटील, डॉ. मदन कुलकर्णी, डॉ. कोत्तापल्ले, डॉ. द. ता. भोसले, डॉ. रवींद्र ठाकूर, डॉ. रवींद्र शोभणे, पंडित शेटे, शरद घाटे, फ. मुं. शिंदे, गो. म. कुलकर्णी, म. पां. कुलकर्णी, पुरुषोत्तम कलाभूत आणि इतर यांची प्रादेशिकतेच्या स्वरूपाविषयीची मते विषद करून उत्तरार्धात अधिकमान्य मतांच्या आधारे मराठी कादंबरीतील प्रादेशिकतेचे स्वरूप निश्चित करू.

सर्वप्रथम बापट - गोडबोले यांच्या मतांचा आढावा घेऊ. ते लिहितात, "ज्या भू - भागाची निवड कथानकाच्या पार्श्वभूमीसाठी करावयाची त्या भू-भागाच्या नैसर्गिक सृष्टीचे यथावत चित्रण करीत असतानाच तेथील समाजजीवनाचे, चालीरीतींचे, संस्कृतीचे व प्रसंगी तेथील विशिष्ट बोलीभाषेचे प्रतिबिंब कादंबरीत उमटल्यानेच ती कादंबरी प्रादेशिक कादंबरी या नावाला सार्थ ठरते." [१] बापट - गोडबोले यांनी भू-भाग, निसर्ग, समाजजीवन, चालीरीती, संस्कृती आणि बोलीभाषा या घटकांना प्रादेशिकतेचा विचार करताना अधिक महत्त्व दिले आहे. प्रा. ल. ग. जोग यांनी प्रादेशिकतेचे वेगळेपण 'कादंबरी' या ग्रंथात स्पष्ट केले आहे. प्रा. जोग म्हणतात, "हे प्रदेश सुधारलेल्या जीवनापासून अलग असतात. ते मागासलेले असतात. शहरे पुढारतात, खेडी मागासतात, केव्हा केव्हा खेडीच कायापालट करतात ...... गतिमान जिवंत समाजात नेहमी बदल होत असतात. विवक्षित समाजाच्या उन्नत्यवनतीची ही चक्रे वरखाली होत असतात. त्या त्या समाजात वेळोवेळी मागासलेले समाज बदलत जातात .... व्यक्तीपेक्षा साऱ्या समूहाचेच चित्रण करू लागले. नावीन्याची हौस असल्यामुळे लेखक नवेनवे जीवन हेरीत जातात. ह्या आजवर दुर्लक्षित बंधनांच्या

पलीकडच्या जानपद जीवनाने नव्या लेखकांचे लक्ष वेधून घेतले.. मुक्त जीवनाच्या सोन्याची ही खाणच उपलब्ध झाली. त्या त्या समाजाच्या, जातिजमातींच्या चित्रणाने मराठी कादंबरी सजली. लेखकाच्या अनुकंपेतून ह्या जीवनचित्रणाला रंग भरला. हे जीवन रंगविणारे बहुतेक सर्वजण ते 'भोगून', 'अनुभवून' जाणिते झाले होते. त्यामुळे प्रचीतीचे बोल सहानुभूतीच्या जीवनात भिजून आले व प्रादेशिक साहित्यातले नवे जीवन शब्दगत झाले ... पिढ्यान्‌पिढ्या बोलत असलेल्या भाषेतून आविष्कारास आरंभ झाला ...... आता ही भाषा मोकळी झाली. ही मोकळी भाषा शब्दांच्या अवगुंठनामागचे असभ्य चित्रण मोकळेपणाने करू लागली ....... या भाषेत, एक प्रकारचा जोर होता, भावनादर्शन तीव्र होत होते ..... ही भाषा रांगडी, जोरदार, सांकेतिकतेच्या, सभ्यतेच्या मर्यादांना न जुमानणारी होती. पहिल्यापहिल्याने ह्या नव्या भाषेनेही प्रादेशिक कादंबरीचा वेगळेपणा जाणवायला मदत झाली." [२] प्रा. ल. ग. जोगांच्या सविस्तर विवेचनाचा अर्थ थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येईल. भौगोलिकतेत काही वेगळे घटक असतात. प्रादेशिक वेगळेपण महत्त्वाचे असते. प्रदेशात काही बदल होतात. त्याबरोबर प्रश्न-समस्या बदलतात. प्रादेशिक वाङ्मयात समूहाला विशेष महत्त्व असते. नव्या जीवनाचे दर्शन प्रादेशिकतेमुळे घडते. बोलीभाषेच्या वेगळेपणामुळे प्रादेशिक कादंबरी वैशिष्ट्यपूर्ण ठरली. म्हणजे प्रादेशिक कादंबरीत नवे यंत्रदूर जीवन, भौगोलिकता, मागासलेपण, जमातचित्रण, सामूहिकता, नवे रांगडे जीवन, वेगळी भाषा ही सर्व वैशिष्ट्ये येतात. प्रा. जोगांनी बापट-गोडबोले यांच्यापेक्षा प्रादेशिकतेचे वेगळे घटक सांगितले आहेत, तसेच काही समान घटकही सांगितले आहेत.

डॉ. अ. रा. तोरो यांनी आपल्या अप्रकाशित प्रबंधात प्रादेशिकतेचे स्वरूप निश्चित करण्याचा प्रयत्न केला आहे. 'प्रादेशिकतेचा नवा प्रवाह' डॉ. तोरो यांनी साधार स्पष्ट केला आहे. [३] १९२५ पासून मराठी ललित वाङ्मयात ग्रामीण किंवा प्रादेशिक या नावाने नवे वर्गीकरण करण्यात येऊ लागले. मराठी ललित वाङ्मयात प्रामुख्याने कादंबरीत ही प्रादेशिकता व्यक्त झाल्याचे दिसते. मानवी मनाला आकार देणाऱ्या विशिष्ट प्रदेशाचे जिवंत चित्रण मराठीत प्रामुख्याने कादंबरीत आढळते ...... विशिष्ट भूप्रदेशातील विशिष्ट बोलीभाषेने माणसाचे वेगळेपण व्यक्त होते. त्यामुळे बोलीभाषा हा प्रादेशिक कादंबरीचा एक महत्त्वाचा घटक आहे. प्रादेशिक साहित्य असा शब्दप्रयोग व कथानक यांना सौंदर्याचे एक वेगळे परिमाण लागते......व्यक्ती

आणि कृती यांच्याशी मातीचे उत्कट नाते प्रदेशाच्या जिवंत चित्रणानेच व्यक्त होते....म्हणून त्या 'प्रादेशिक'तेचे एक घटकमूल्य मानून प्रादेशिक कादंबरीचे एक वेगळे परिशीलन करणे अपरिहार्य झाले आहे. प्रादेशिक साहित्याची आरंभीची प्रेरणा ही जीवनातील वास्तववादी अनुभूतीतूनच निर्माण झालेली आहे असे म्हणता येईल. प्रादेशिक ही वर्तमानयुगाची प्रमुख प्रेरणा असली तरी प्रादेशिकतेचे तत्त्व वा प्रवृत्ती प्राचीनच होय. मानवी जीवनाच्या प्रारंभकाळापासून ही प्रवृत्ती आहे व परिस्थितीनुरूप ती बदलत राहते. प्रादेशिक साहित्यातील प्रादेशिकता ही विश्वव्यापी रोमँटिक चळवळीची अभिव्यक्तीच होय. रोमँटिक तत्त्वज्ञानात 'व्यक्ती'ला महत्त्व असूनही ते व्यक्तिवादी नाही. प्रादेशिक साहित्यात सामान्य माणसाला अग्रस्थान मिळाले त्याचे हेच कारण होय. सामान्य माणसाचे अवगुण व अज्ञान हा टीकेचा विषय न बनता नवे कलावंत या सामान्य माणसाच्या अंधश्रद्धांना, रीतिरिवाजांना कलात्मक अभिव्यक्ती देऊ लागले. सामान्य माणूस आपल्या निसर्गसिद्ध प्रदेशात फुलतो, नव्हे त्याच्या संपूर्ण जीवनाला निसर्गच आकार कोरीत असतो. प्रकृती हीच त्याच्या जीवनाची अंतिम नियंत्रक शक्ती ठरते. त्यामुळे निसर्ग, वातावरण, भूमी हे प्रादेशिक साहित्याचे अंगभूत असे महत्त्वाचे घटक होत. 'भाषे'च्या संदर्भातही या नव्या रोमँटिक आंदोलनाने स्पर्श केला. डॉ. अ. रा. तोरो यांनी प्रादेशिक साहित्याची काही गुणवैशिष्ट्ये वरील विवेचनात स्पष्ट केलेली दिसतात. प्रामुख्याने भू-प्रदेश, बोलीभाषा, प्रदेशाचे कलात्मक चित्रण, वास्तववादी अनुभूती, सामान्य माणसाला अग्रस्थान, त्याच्या अवगुण व अज्ञानाचे चित्रण, अंधश्रद्धा, रीतिरिवाज, निसर्ग, वातावरण आणि भूमी हे प्रादेशिक साहित्याचे अंगभूत घटक डॉ. तोरो यांनी सांगितले आहेत, आणि प्रादेशिक वाङ्मयाच्या निर्मितीमागील प्रेरणा सांगितल्या आहेत. तसेच प्रादेशिकतेचे तत्त्व, स्वरूप व वैशिष्ट्ये स्पष्ट केली आहेत. 'निर्णायकी वर्तमानकाळानेच नवा नायक शोधण्याची प्रेरणा वाङ्मयाला दिली. आजच्या ऐतिहासिक व प्रादेशिक वाङ्मयाच्या निर्मिती– मागील प्रेरणा अशा रीतीने वर्तमान युगाशीच निगडित आहे हे ध्यानात येते. स्वातंत्र्योत्तर भारतात सांस्कृतिक पुनरुज्जीवनाचे नवे प्रयत्न सुरू झाले. प्रादेशिक वाङ्मयनिर्मितीमागेही ही सांस्कृतिक पुनरुज्जीवनवादाची प्रेरणा निःसंशय आहे. प्रादेशिक साहित्य हे प्रादेशिक संस्कृतीच्या इतिहासाचे साहित्य आहे.'[४]

प्रादेशिक वाङ्मयाच्या प्रेरणा स्पष्ट केल्यानंतर डॉ. तोरो यांनी 'प्रदेश' म्हणजे काय? हे स्पष्ट केले आहे. 'प्रदेश म्हणजे भू-भाग, एका भू-भागाचे जीवन

म्हणजे 'प्रादेशिकता' आणि हे जीवन ज्यात चित्रित झाले आहे ते 'प्रादेशिक साहित्य'. व्यवहारातील प्रदेश हा भौगोलिक आणि राजनैतिक क्षेत्रांनी व्यापलेला एक घटक आहे; तर साहित्यातील प्रदेश हा प्रामुख्याने सामाजिक आणि सांस्कृतिक धाग्यांनी विणलेला एक घटक आहे. प्रादेशिक साहित्यातील 'प्रदेश' हा यंत्रयुगापासून दूर, परंपरेपासून तुटलेला असतो.' [५] त्याचप्रमाणे प्रादेशिक साहित्याच्या स्वरूपाबद्दल डॉ. तोरो यांनी संक्षिप्त विवेचन केले आहे, 'प्रादेशिक साहित्यासंबंधी असे म्हणता येईल की, प्रादेशिक कलाकृती एका विशिष्ट प्रादेशिक जीवनातून साकार होते. त्या प्रदेशातील जीवनाचा वैशिष्ट्यपूर्ण 'स्वाद' त्या साहित्याला असतो. त्या प्रदेशातील लोकांचे आचारविचार, त्यांच्या भावभावना, त्यांच्या श्रद्धा-समजुती, त्यांचे सणउत्सव, त्यांचे रागद्वेष या सर्वांचे मिळून एक अपूर्व रसायन तयार होते. त्या प्रदेशातील लोकांची मनोरचना या रसायनाने घडविलेली असते. त्यांचा एक वैशिष्ट्यपूर्ण जातिस्वभाव बनतो. या स्वभावाचे जिवंत चित्र प्रादेशिक कलाकृती उभी करते. [६] थोडक्यात प्रत्येक भू-प्रदेशाचे व्यक्तिमत्त्व, निसर्गसौंदर्य आणि मानवी जीवनही स्वतंत्र असते. सांस्कृतिक आणि सामाजिक जीवन अजोड असते. ह्या वेगळेपणाचे निरीक्षण करून प्रतिभावंत नवनिर्मिती करतो. डॉ. तोरो यांनी प्रादेशिक साहित्याची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. "भौगोलिकदृष्ट्या अस्तित्वात असलेला एक वैशिष्ट्यपूर्ण भूप्रदेश तेथील मानवसमूह, त्याची वैशिष्ट्यपूर्ण बोली, निसर्ग, संस्कृती यांचे समुचित व संघटित असे भावमय चित्रण जे ललित साहित्य करते ते 'प्रादेशिक' होय." [७] डॉ. तोरो यांनी वरील व्याख्येतून प्रादेशिकतेचे महत्त्वाचे पाच घटक सांगितले आहेत. वैशिष्ट्यपूर्ण भू-प्रदेश, मानवसमूह, बोली, निसर्ग आणि संस्कृती हे मुख्य पाच घटक आहेत.

डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी आपल्या 'तिसऱ्यांदा रणांगण' या ग्रंथात 'सध्याची मराठी कादंबरी' या लेखात प्रादेशिक कादंबरीच्या स्वरूपाविषयी पुढीलप्रमाणे विवेचन केले आहे. 'वास्तविक कादंबरी या वाङ्मयप्रकाराचा उदय मुळी एका सामाजिक जाणिवेतून झाला आहे. मानवाला स्वतःच्या समाजसापेक्ष सुखदुःखांबद्दल जेव्हा उत्कट आणि स्वान्त आस्था निर्माण झाली, त्यानंतरच्या काळात त्यामागोमाग कादंबरी प्रकाराचा उदय झाला. कादंबरीतील या समाजिकतेचे एक खास वैशिष्ट्य म्हणजे तिचे समकालीन जीवनाशी असलेले अचूक, अतूट नाते ...... प्रादेशिक कादंबरीत असाच एक अर्धपरिचित वैशिष्ट्यपूर्ण प्रदेश तपशीलवारीने साकार होतो. पौराणिक--ऐतिहासिक कादंबरीतील जीवनानुभवाचा वरचा थर असाच रोमँटिक निसर्गवर्णनाने

घडविलेला असतो. सध्याची पौराणिक–ऐतिहासिक कादंबरी वाचकाला अर्धपरिचित आणि ऐश्वर्यशाली, स्थलकालाच्या मुखवट्यात, तर ही सध्याची प्रादेशिक कादंबरी वाचकाला अर्धपरिचित, निगर्समग्न स्थळांच्या मुखवट्यात रंगविते. झोपडपट्टी कादंबरी हीदेखील एका अर्थाने प्रादेशिक कादंबरीच आहे. परंतु रूढ प्रादेशिक कादंबरी आणि झोपडपट्टी कादंबरी यांच्यातील एक महत्त्वाचा फरक म्हणजे निसर्गमग्न व बहुधा रोमँटिक, रम्य वातावरणाचा झोपडपट्टी कादंबरीतील अभाव. ऐश्वर्यशाली वातावरण आणि निसर्गधुंद वातावरण या आकर्षणांची कसर ही झोपडपट्टी कादंबरी बेताल लैंगिक संबंधाच्या तपशीलनिष्ठ चित्रणाने भरून काढते !" ८.

प्रा. जोग, बापट–गोडबोले, डॉ. तोरो यांच्यापेक्षा डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी प्रादेशिकतेच्या काही नवीन घटकांचा विचार केला आहे असे दिसते. कादंबरीच्या उदयामागे सामाजिक जाणिवेचा भाग अधिक आहे. आत्मनिष्ठ भावनेतून कादंबरी जन्माला आली. प्रादेशिक कादंबरीतून वाचकाला नवीन असलेल्या प्रादेशिक भागाचे दर्शन घडते. निसर्गवर्णनाने वेगळी छाप वाचकांवर पडते. डॉ. कुलकर्णी यांना झोपडपट्टी कादंबरी प्रथम प्रादेशिक वाटते, त्याचेच पुढे ते खंडन करतात, कारण शहरापासून दूर ग्रामातीलच निसर्गाच्छादित कादंबरी ते प्रादेशिक कादंबरी मानतात. भू-प्रदेश आणि रोमँटिक निसर्ग हे दोन घटक डॉ. द. भि. कुलकर्णी यांना महत्त्वाचे वाटतात.

'गारंबी आणि बापू' ९. या लेखात डॉ. द. भि. कुलकर्णी म्हणतात, 'प्रादेशिक कादंबरी हा ग्रामीण कादंबरीचा अधिक वास्तवपूर्ण आविष्कार होय, असे आपण मानतो आणि म्हणूनच भौगोलिकदृष्ट्या अस्तित्वात असलेला एक वैशिष्ट्यपूर्ण भूप्रदेश, तेथील मानवसमूह, त्याची वैशिष्ट्यपूर्ण बोली, तेथील वैशिष्ट्यपूर्ण निसर्ग यांची अपेक्षा आपण प्रादेशिक कादंबरीकडून करीत असतो. या अपेक्षेला धरूनच प्रादेशिक कादंबरीत निसर्गसृष्टी हवी, ते एक महत्त्वाचे पात्र व्हावे असे आपण समजतो. या आपल्या अपेक्षा रास्तच असतात. परंतु प्रादेशिक कादंबरीचे - कादंबरीचेच एवढ्याने भागत नाही. प्रादेशिक कादंबरीत प्रादेशिक मनाचा सामुदायिक गजर ऐकू यावा लागतो.'...... थोडक्यात भू-प्रदेश, मानवसमूह, बोली आणि निसर्ग या घटकांना डॉ. द. भि. कुलकर्णी महत्त्व देतात आणि सामुदायिक गजराला विशेष महत्त्व देतात.

डॉ. आनंद यादव यांनी 'प्रादेशिक कादंबरी म्हणजे काय ?' हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. प्रा. ल. ग. जोग, बापट–गोडबोले, डॉ. तोरो किंवा

डॉ. द. भि. कुलकर्णी यांच्यापेक्षा डॉ. यादवांनी प्रादेशिकतेच्या वेगळ्या घटकांचा विचार केलेला दिसतो. 'एखाद्या विशिष्ट प्रदेशातील लोकजीवन, संस्कृती, परंपरा, जीवन-संकेत, रीती, समूह-जीवनातील भावभावना आणि या सर्वांतून निर्माण झालेल्या समस्या आणि जीवननाट्य यांचे दर्शन घडविण्याच्या उद्देशाने ज्या कादंबऱ्या लिहिल्या जातात, त्यांना प्रादेशिक कादंबऱ्या म्हणता येईल. प्रादेशिक कादंबरीतील लोकजीवन वास्तवाच्या पातळीवरचे, काहीसे प्रातिनिधिक स्वरूपाचे असावे अशी अपेक्षा असते. [१०] वरीलप्रमाणे व्याख्या सांगून डॉ. यादव शहरी जीवनचित्रविरहित, निसर्गाच्या सान्निध्यातील, उद्योगप्रधान संस्कृतीपासून दूर असलेल्या कादंबरीला प्रादेशिक मानतात. म्हणजे ग्रामीण स्वरूपाच्या लोकजीवनाची अपेक्षा प्रादेशिक कादंबरीकडून ते करतात. प्रादेशिक कादंबरी 'ग्रामीण कादंबरी'च मानवी लागते असेही ते म्हणतात. डॉ. यादव प्रादेशिक कादंबरीचे घटक स्पष्ट करताना निसर्गाला सर्वाधिक महत्त्व देतात. एक अंगभूत अवयव मानतात. मातीची ओढ असणाऱ्या व्यक्तिरेखाटनाची ते अपेक्षा करतात. तसेच मानवी मनाचा तळ गाठण्याचे सामर्थ्यावर भर देतात. तसेच प्रदेशातील बोली ही लोकजीवनाचाच एक भाग असतो असे मानतात. म्हणजेच भू-प्रदेशातील निसर्ग, भूप्रदेशाने प्रभावित व्यक्ती किंवा पात्र, मानवी अंतरंगाचे दर्शन घडविणे आणि या सर्वांबरोबर बोली– भाषेचा माध्यम म्हणून स्वीकार करणे आणि वापर करणे या घटकांवर डॉ. यादव भर देतात.

डॉ. यादव यांच्या 'ग्रामीण साहित्य आणि वास्तव' ग्रंथाच्या प्रस्तावनेत स. शि. भावे म्हणतात, [११] "प्रादेशिकतेसाठी स्थळकाळाचा निकष अपूर्ण ठरतो. त्यानंतर वातावरणाचा विचारही सहजच पुढे येतो. 'वातावरण' म्हणजे वातावरणाचा जिवंतपणा, वेगळेपणा. हा जिवंत वेगळेपणा आणि त्याचा स्पंदनशील कोश हाच खरा कोणत्याही कलाकृतीचा संदर्भ. विशेषणे लागायची तर ती या 'जिवंत वातावरणा'ला लागणे योग्य होईल. हे जिवंत वातावरण आनुवंशिक पिंडावर सांस्कृतिक परंपरेचे संस्कार होता होता तयार होते. तसेच धर्म, जात, गाव, आर्थिक वर्ग, व्यवसाय इ. सामाजिक संस्थांच्या प्रभावातून तयार होते." म्हणजेच स. शि. भावे निसर्ग, वातावरण, पात्र, सामाजिकता, आनुवंशिकता या घटकांना विशेष महत्त्व देतात.

म. सु. पाटील यांनी 'अक्षरवाटा' [१२] या ग्रंथात 'बनगरवाडी' कादंबरीच्या संदर्भात विवेचन करताना प्रादेशिक कादंबरीच्या स्वरूपाविषयी विचार मांडले आहेत,

त्याचा संक्षेपाने पुढीलप्रमाणे विचार करता येईल 'प्रादेशिक कादंबरी ही खरी म्हणजे ग्रामीण, अनागर जीवनावरील कादंबरी होय. प्रादेशिक हा शब्द प्रचारात येण्यापूर्वी या जीवनाचे चित्रण करणाऱ्या वाङ्मयप्रकारामागे ग्रामीण अथवा जानपद हे विशेषण लावले जाई. कादंबरीच्या क्षेत्रात १९४० च्या पूर्वकाळात या प्रकारचे लेखन अत्यल्प झाले. तेही फारसे समाधानकारक नाही. त्यातून ग्रामीण जीवनाचे खरेखुरे दर्शन होण्याऐवजी ग्रामीण पार्श्वभूमीवर मध्यमवर्गीयांच्याच प्रेमकथा रंगविलेल्या आढळतात. हे लिखाण करणारे लेखक बरेचसे मध्यमवर्गातले होते. त्यांचे जीवन बहुतांशी शहरात व्यतीत झालेले होते. त्यांनी या जीवनाकडे जे थोडेबहुत पाहिले ते मध्यमवर्गीयांच्या चष्म्यातून, त्यामुळे त्यांच्या चित्रणात समरसता येण्याऐवजी कळवळाच अधिक होता. काहींनी तर ग्रामीण पार्श्वभूमीच्या भांडवलावर स्वप्नरंजनाचा उत्तम व्यापार केला.' ग्रामीणतेचे हे स्वरूप उपरे, ग्रामीणतेचा नक्षीसारखा उपयोग करणारे होते, असे म. सु. पाटलांना वाटले, म्हणून सविस्तर विवेचन करताना ते लिहितात, "१९३५-४० या काळात सर्वच साहित्य एक प्रकारच्या आवर्तात सापडले होते. कृत्रिमता पराकोटीस पोहोचली होती. याबद्दलच्या असंतोषाने कलावंतांनाही अस्वस्थ करून सोडले होते. मर्ढेकरांच्या 'वाङ्मयीन महात्मता' या निबंधाचा परिणाम साहित्यिक जगतावर झाला. लेखकवर्ग आपल्या अनुभवाचे आणि अवलोकनाचे क्षेत्र धांडोळून पाहू लागला. काहींना आपले स्वत्व गवसले, आणि त्या आनंदात ते एक प्रकारच्या बेहोशीत लिहू लागले. बोरकरांनी 'भावीण', दिघ्यांची 'सराई', पेंडशांची 'गारंबीचा बापू' आणि माडगूळकरांची 'बनगरवाडी' या अशा बेहोशीत लिहिलेल्या कादंबऱ्या होत. यात आलेल्या अनुभवविश्वाचे चित्रण करणारे लेखक त्या त्या प्रदेशात जन्मले होते, वाढले होते. त्यांचे संस्कारक्षम वय त्या ठिकाणीच व्यतीत झालेले होते. त्यामुळे त्यांच्या अनुभवात आपोआपच अस्सलपणा आला, सकसपणा आला. खऱ्याखुऱ्या ग्रामीण किंवा प्रादेशिक कादंबरीचा जन्म झाला.

या कादंबरीतील जीवन विशिष्ट भौगोलिक प्रदेशाशी संबद्ध झाले, तेथील हवा, पाणी, निसर्ग यांच्याशी संवादी होऊन अवतरले. माणसाची स्थूल स्वभाववैशिष्ट्ये त्या त्या प्रदेशानेच जणू निश्चित केली. कद्रूपणा, अतिथ्यशीलता, रूक्षपणा, आळशीपणा, बेफिकिरी हे जणू त्या मातीचेच गुण म्हणून प्रकट होऊ लागले.

नागर जीवनापासून दूर असलेली, शहरी सुधारणांचे आणि शिक्षणांचे संस्कार न लाभलेली, दारिद्र्य, अज्ञान, परंपरा आणि रूढी यांच्या गुंतवळ्यात सापडलेली ही

माणसे शेती, बागायती, मोलमजुरी, मेंढ्यागुरे वळणे यांसारख्या व्यवसायात सारे आयुष्य काढणारी आहेत. आपले स्वयंकेंद्रित छोटेसे जग स्वयंपूर्ण समजून जगणारी आहेत. त्यांच्या सभ्यतेच्या कल्पना वेगळ्या आहेत. हे जीवन एक प्रकारे मुक्त आहे. तेथील माणसांच्या वागण्याबोलण्यात एक प्रकारचा रासवटपणा आहे....हे जीवन अनेकदा सामान्यांचे असते. सामान्य माणसे ज्या पातळीवरून जीवन जगतात, त्याच पातळीवरून बहुधा हे चित्रित केले जाते. या सामान्यांच्या खिजगणतीत नसलेली एखादी स्त्री किंवा एखादा नगण्य पुरुष या कादंबरीच्या केंद्रवर्ती असू शकतो. कधी कधी ते लोकसमूहाचे चित्रण असते. बहुधा निसर्गाच्या कुशीत या जीवनाचा जन्म होतो. म्हणून की काय ते ऋतुचक्राच्या फेऱ्यात सापडल्यासारखे दिसते. अशा कादंबरीत मग निसर्ग एक पात्र म्हणून येतो. त्याची नादरूपगंधमय विस्तृत आणि विपुल चित्रे येतात. मात्र ती निसर्गवर्णनांसाठी हपापलेल्या वाचकवर्गाला तृप्त करण्यासाठी येत नाहीत किंवा गाव सोडून नोकरीसाठी शहरात आलेल्या वाचकाला पुनःप्रत्ययाचा आनंद देण्यासाठीही ती अवतरत नाहीत. येथील अनुभवविश्वाचा एक अपरिहार्य घटक म्हणूनच त्यांना या कादंबरीत स्थान लाभते.

या जीवनाचे चित्रण करणारा आजचा लेखक या जीवनाकडे बऱ्याचशा प्रमाणात निर्मळ डोळ्यांनी पाहाणारा आहे. जानपद माणूस म्हणजे भोळाभाबडा माणूस हे समीकरण त्याने पार खोडून काढले आहे. येथेही राजकारण, लबाडी, टगेगिरी इ. गोष्टींना अवसर आहे हे त्याने ओळखले आहे. या साऱ्या गोष्टींचा समरसतेने अनुभव घेऊन कलात्मक अलिप्तपणाने त्यांना आकार देण्याचा तो प्रयत्न करीत आहे. त्यामुळे वास्तववादी संप्रदायात सामील न होताही त्याची कादंबरी निखळ वास्तवाचे चित्रण करू लागलेली आहे. ते करीत असताना त्या अनुभवाच्या भाषेतही प्रादेशिक शब्द अटळपणे अवतरत आहेत.''

म. सु. पाटील यांनी केलेल्या विवेचनाचा अर्थ पुढीलप्रमाणे थोडक्यात सांगता येईल- प्रसंगचित्रण, व्यक्तिदर्शन, समरसता, निसर्गवर्णन, वातावरण आणि बोलीभाषा हे प्रादेशिक कादंबरीचे घटक म. सु. पाटलांना महत्त्वाचे वाटतात. प्रादेशिक कादंबरी ग्रामीण, अनागर जीवनावरील कादंबरी आहे. भूप्रदेशानुसार माणसाची स्वभाववैशिष्ट्ये घडत जातात. हे जीवन शहरी संस्कृतीपासून दूरचे असते. स्वतंत्र संस्कृती असून त्यांचे जग स्वयंपूर्ण असते. त्यांचे जीवन मुक्त असते. त्यात रासवटपणाही असतो. सामान्य स्त्री-पुरुष किंवा समाज किंवा निसर्ग हेच या कादंबरीचे नायक असतात.

भूप्रदेशातील संस्कृतीचे, सामाजिक जीवनाचे सूक्ष्म निरीक्षण करून कलात्मक अलिप्ततेने अटळ प्रादेशिक शब्दांत चित्रण करण्यावर म. सु. पाटील विशेष भर देताना दिसतात; तर डॉ. मदन कुलकर्णी यांनी प्रादेशिकतेची संकल्पना, 'प्रदेश' शब्दाची व्याख्या, प्रादेशिकता म्हणजे काय ? प्रादेशिकतेची तत्त्वे, प्रादेशिकता आणि नागर पार्श्वभूमी, प्रादेशिकतेशी संबंधित संज्ञाचा विचार, प्रादेशिक कादंबरी : व्याख्या व स्पष्टीकरण, प्रादेशिकता आणि नागर कादंबरी : काही मतमतांतरे इ. मुद्द्यांचे स्पष्टीकरण केले आहे.

प्रादेशिकता हे वाङ्मयीन मूल्य नव्हे तर ती एक प्रवृत्ती आहे. वाङ्मयीन अपरिहार्यतेतून प्रादेशिक साहित्याची निर्मिती झालेली आहे. 'प्रदेश' म्हणजे विशिष्ट भू-भागावरील विशिष्ट निसर्ग असलेला व मानवी जनजीवनावर प्रभाव गाजविणारा प्रभावी घटक होय. प्रादेशिकता हे साहित्याला प्राप्त झालेले एक वैशिष्ट्य आहे. नैसर्गिक व सांस्कृतिक वातावरणाला महत्त्व देणारी ती एक प्रवृत्ती आहे. औद्योगिक जीवनापासून दूर असलेल्या भागाचा समावेश प्रादेशिकतेत होतो. विशिष्ट प्रदेशातील ज्वलंत समस्या, त्यांच्यातील अंतर्विरोध, तेथे होणारे आर्थिक, सामाजिक व राजकीय बदल, जुळणारे–बिघडणारे मनुष्या-मनुष्यांतील संबंध, नीतिमूल्ये यांबरोबरच तेथील भौगोलिक व नैसर्गिक स्थिती, तिचा जनमनावरील होणारा परिणाम व तेथले मागासलेपण, अर्धमागासलेपण यांतून ही प्रादेशिकता आविर्भूत होत असते. एखाद्या साहित्य प्रकाराच्या लेखनासाठी पार्श्वभूमी म्हणून एखाद्या प्रदेशाची निवड करून त्या प्रदेशातील नैसर्गिक सृष्टीचे यथावत चित्रण करीत असतानाच तेथील समाजजीवन, चालीरीती, परंपरा-श्रद्धा इत्यादींचे तसेच तेथील बोलीभाषेचे प्रतिबिंब साहित्यात उमटल्याने प्रादेशिकतेचे तत्त्व निर्माण होत असते. प्रादेशिकतेत विशिष्ट प्रदेशाच्या सांस्कृतिक, पारंपरिक व भाषिक वैशिष्ट्यांचा आढळ होतो.

डॉ. मदन कुलकर्णी यांनी प्रादेशिकतेची तत्त्वे सांगितलेली आहेत- १) भौगोलिकता, २) मागासलेपण आणि समस्या, ३) निसर्ग, ४) लोकसंस्कृती, ५) सामूहिकता, ६) भाषा. 'प्रादेशिकता' ही 'वास्तवतेचे प्रगटीकरण' आणि 'नावीन्य' या दोन कारणांनी वाङ्मयात आली असे सांगून डॉ. मदन कुलकर्णी जाती-जमातीवरील कादंबऱ्यांचाही प्रादेशिक कादंबरीत समावेश करतात. परंतु, नागर जीवन किंवा त्यानिमित्ताने वाढणारी झोपडपट्टी यांवरील कादंबऱ्यांचा समावेश प्रादेशिक कादंबरी प्रकारात करण्यास ते विरोध करतात. या उलट प्रादेशिक जीवन शतकानुशतके

चालत आलेले सांस्कृतिक जीवन असते. ते नैसर्गिक व स्वाभाविक असते. प्रगत जीवनाचा त्या जीवनावर प्रभाव जेव्हा होतो, तेव्हा तर प्रदेश संस्कृतीचे प्राचीनत्व अधिकच उजळून निघते. प्रगतीतही आपले स्वरूप जपण्याचा प्रयत्न ग्रामीणजीवन करीत असते. त्यात भूत-प्रेत, ईर्षा-प्रतिहिंसा, न्याय-अन्याय-पाप, दुःख व वेदना इ. गोष्टी असतात. पण त्याबरोबर त्यात गोडवाही असतो. सणवार, उत्सव करण्याच्या विशिष्ट पद्धती असतात. त्या वेळी लोकगीते गायली जातात. लोकसंगीताच्या तालावर नृत्ये केली जातात. या सर्वांचे चित्रण प्रादेशिक कथा-कादंबऱ्यांतून येते, जे नागर जीवनाच्या तुलनेत एकदम वेगळे असते. म्हणूनच शहरी-नागर पार्श्वभूमीचा प्रादेशिकतेत समावेश करणे ही गोष्ट चुकीची ठरते असे स्पष्टीकरण डॉ. मदन कुलकर्णी यांनी केले आहे. [१३] तसेच प्रादेशिकतेची संज्ञा त्यांनी पुढीलप्रमाणे मांडली आहे- "प्रदेश म्हणजे विशिष्ट भू-भाग. प्रदेशास नैसर्गिक वैशिष्ट्ये असतात. नद्या, पर्वत, वातावरण, भू-पृष्ठ, खनिजपदार्थ, अरण्य, अन्नधान्य यांमुळे ही वैशिष्ट्ये प्राप्त होऊ शकतात. आर्थिक, सांस्कृतिक, प्राकृतिक अशा काही वैशिष्ट्यांनुसार प्रदेश विभागला जाऊ शकतो. संयोगी व पूरक अभिरुचीतूनही प्रदेशाला पाहता येते. एखाद्या देशातील प्रांतभाग 'प्रदेश' म्हणून संबोधला जाऊ शकतो. हे प्रदेश विशिष्ट दृष्टीने पूर्णपणे स्वतंत्र असे घटक मानता येतात. पुष्कळदा असे प्रदेश उपेक्षित राहिलेले असतात. या प्रदेशांचे नावीन्यपूर्ण सौंदर्य, तेथील लोकसंस्कृती, भाषा, प्रश्न इत्यादी गोष्टींचे दर्शन जेव्हा साहित्यिक घडवू लागतात तेव्हा त्या साहित्याला प्रादेशिक हे विशेषण लावले जात असे. प्रादेशिक साहित्य चित्रण लेखकाच्या कलात्मक प्रवृत्तीचा आविष्कारच मानावा लागतो." [१४] सारांश - जानपद ग्रामीण आणि इतर संज्ञाचा समावेश 'प्रादेशिक' मध्येच करावा असे डॉ. मदन कुलकर्णी म्हणतात. कारण सर्व संज्ञांचा कल हा प्रादेशिकतेकडेच असतो.

विषय-विस्ताराची जाणीव ठेवूनच पुनरावृत्ती टाळून फक्त डॉ. मदन कुलकर्णी यांनी प्रादेशिक कादंबरीची सांगितलेली व्याख्या पाहू. 'विशिष्ट भू-प्रदेशाचे अथवा ग्रामाचे तेथे वास्तव्य करणाऱ्या लोकजीवनाचे भूगोल व निसर्ग यांसह सामाजिक व सांस्कृतिक वैशिष्ट्यांचे सामूहिक रूपाने चित्रण करणारी, तेथील लोकसमाजाच्या समस्या, चालीरीती, रूढी, परंपरा, सणवार व उत्सव, जत्रा-मेळे, अंधश्रद्धा, भूतप्रेतविषयक कल्पना, देवदेवस्की आणि अन्य लोकतत्त्वे इत्यादींचे तसेच नवजागृतीचे, स्थानिक बोलभाषेद्वारे अथवा प्रमाण भाषेद्वारे सामग्र्याने वास्तवपूर्ण चित्रण करणाऱ्या

कादंबरीला प्रादेशिक कादंबरी म्हणता येईल." [१५] थोडक्यात ग्रामीण स्वरूपाचे लोकजीवन अभिव्यक्त करणाऱ्या कादंबऱ्यांना 'प्रादेशिक' हे विशेषण लावावे लागते. प्रदेश जीवनाचे सखोल चित्रण करणाऱ्या कादंबरीला सामान्यतः 'प्रादेशिक कादंबरी' संबोधता येईल, तसेच विशिष्ट मागासलेल्या जाती–जमातींची चित्रणे करणाऱ्या कादंबऱ्यांचाही समावेश प्रादेशिक कादंबरीत करता येतो. या कादंबऱ्यांमधील प्रादेशिकता, जीवनपद्धतीशी संबंद्ध आहे. प्रादेशिक कादंबऱ्यांमध्ये प्रादेशिक पार्श्वभूमी, निसर्ग व लोकजीवनाच्या चित्रणाला फार महत्त्व असते.

डॉ. नागनाथ कोत्तापल्ले [१६] यांनी 'प्रादेशिक'ते विषयी विचार मांडले ते पुढीलप्रमाणेः 'प्रादेशिकते'चे ग्रामीणत्वाशी निश्चितच काही बाबतींत साम्य असते. प्रादेशिक साहित्य ग्रामजीवनाला, ग्रामसंस्कृतीला फारसे महत्त्व देत नाही तर ते महत्त्व देते ते एका विशिष्ट प्रदेशाच्या समग्र टप्प्याला. कधी ग्रामजीवन आलेच तर ते स्वतंत्रपणे येत नाही. ते येते ते त्या प्रदेशातील समग्र संस्कृतीचा एक भाग म्हणून. येथे ग्रामसंस्कृतीपेक्षा त्या प्रदेशाचा टापू अधिक महत्त्वाचा असतो. त्या दृष्टीने प्रादेशिक साहित्यातून व्यक्तिकेंद्रितता दिसत नाही. तर समूहकेंद्रितता हे या साहित्याचे वैशिष्ट्य असते. या साहित्यातून एखादी व्यक्ती प्रमुख असली तरी, तिच्यातून ध्वनीत होत असताना ती व्यक्ती स्वतंत्रपणे नजरेत भरेलही, परंतु शेवटी ती त्या प्रदेशाशीच बांधलेली आहे हेच अधिक नजरेत भरते. एक सबंध प्रदेशच्या प्रदेश लेखकाच्या व्यक्तिमत्त्वात मुरून गेलेला असतो. प्रदेशाचे स्वतःचे असे एक व्यक्तिमत्व असते. डॉ. स. रा. गाडगीळ आणि प्राचार्य बोराडे यांच्या मतांच्या आधारे डॉ. कोत्तापल्ले यांनी स्पष्ट केले आहे, तर नामदेव व्हटकरांच्या मताचा हवाला देऊन डॉ. कोत्तापल्ले म्हणतात की, सृष्टीचा लोकसमुदायावर परिणाम होतो. निसर्गाशी माणूस आपले नाते प्रस्थापित करीत असतो किंवा निसर्ग त्याच्यावर सर्वार्थाने परिणाम करीत असतो. एक विशिष्ट असा भौगोलिक पट्टा एखाद्या लेखकाला घडवू शकतो. त्यामुळे त्याच्या साहित्यातून तो भौगोलिक पट्टा एक प्रदेश म्हणून अवतरू शकतो. म्हणजेच प्रादेशिक साहित्याच्या दृष्टीने भौगोलिक असा एक संपूर्ण प्रदेशच्या प्रदेश महत्त्वाचा ठरतो. त्या संबंध प्रदेशाचे मिळून जे लोकजीवन झालेले असते ते महत्त्वाचे असते. ही संस्कृती नागर संस्कृतीपेक्षा वेगळी असते. प्रादेशिकतेमध्ये एका भौगोलिक प्रदेशात, तेथील सांस्कृतिक वेगळेपणाला जसे महत्त्व असते, तसे सामुदायिकतेला, निसर्ग आणि बोलीलाही महत्त्व असते. प्रादेशिक वाङ्मय व्यक्तिकेंद्रित न राहता, समूहकेंद्रित

असते. एक सबंधच्या सबंध असा भौगोलिक पट्टा तेथील सामग्र्याने संस्कृती आणि समूहमनाचा गजर हे प्रमुख घटक डॉ. कोत्तापल्ले यांनी साधार स्पष्ट केले आहेत.

'साहित्यातील प्रादेशिकता - सामाजिक दृष्टिकोणातून विचार' [१७] लेखनातून डॉ. द. ता. भोसले यांनी आपले विचार मांडले आहेत. ग्रामीण आणि प्रादेशिक साहित्याचे साम्य आणि वेगळेपण त्यांनी दाखविले आहे. 'प्रादेशिक साहित्यात विशिष्ट प्रदेशातील लोकजीवन, संस्कृती, परंपरा, शेती, समूहभावना, त्या विशिष्ट प्रदेशातला निसर्ग या सर्वांतून निर्माण झालेले प्रश्न आणि जीवननाट्य यांचे दर्शन घडविण्यावर भर दिलेला असतो. प्रादेशिक साहित्य हे ग्रामीण साहित्याप्रमाणे वास्तव असले तरी ते काहीसे प्रातिनिधिक पातळीवरचे असते. 'थोडक्यात, प्रादेशिक साहित्य म्हणजे प्रदेशाचे चैतन्यरूप आणि त्या प्रदेशातून साकार झालेल्या समाजमनाचे चैतन्य जिथे एकात्म स्वरूपात व्यक्त झालेले आहे ते साहित्य. विशिष्ट प्रदेश, समाजमन, पात्रांच्या वृत्तीप्रवृत्तींवरील प्रदेशाचे संस्कार, समाजजीवन, प्रदेश केवळ पार्श्वभूमी नसतो तर साहित्यानुभवांशी आणि घाटाशी एकरूप असतो, संस्कृती, समूहमनाचा आविष्कार, निसर्ग यांशिवाय प्रादेशिकता अपूर्ण राहते. डॉ. द. भि. कुलकर्णी प्रमाणे डॉ. द. ता. भोसले नागर जीवनातील प्रादेशिकतेस विरोध करतात. साहित्यकृतीवर परिणाम होत असतो. प्रादेशिकतेचा लेखकाच्या संवेदनशीलतेवर परिणाम होत असतो आणि त्यातून कलावंत आपल्या साहित्यकृतीतील पात्रांना त्या विशिष्ट प्रदेशाचे, निसर्गाचे रंग बहाल करतो. त्या मातीचे विशिष्ट गुणधर्म तो आपल्या पात्रांच्या व्यक्तिमत्त्वाला बहाल करीत असतो, असे डॉ. द. ता. भोसले म्हणतात.

प्रादेशिकता म्हणजे केवळ एखादा विशिष्ट असा भौगोलिक पट्टा नव्हे, प्रादेशिकता म्हणजे केवळ निसर्ग नव्हे, तर प्रादेशिकता म्हणजे त्या प्रदेशातला माणूस, त्या माणसाची संस्कृती, त्याचे उपजीविकेचे साधन, त्या माणसाची भाषा आणि या साऱ्यांना कवेत घेणारा निसर्ग या साऱ्यांच्या परिपाकातून साहित्यातही प्रादेशिकता निर्माण होत असते. त्यातून एक सामाजिक मन तयार होत असते. सामाजिक रीतिरिवाज, सणसोहळे, अन्नपदार्थ, प्रावर्ण, मानसिकता तयार होत असते. त्यातून सांस्कृतिक आणि सामाजिक वातावरण तयार होत असते व हे वातावरण प्रादेशिकतेला आकार देते.' थोडक्यात, प्रादेशिकता म्हणजेच निसर्ग आणि तज्जन्य परिस्थितीतून साकार झालेली सामाजिकता होय. त्या विशिष्ट प्रदेशातील माणसाने प्राप्त परिस्थितीला शरण जाऊन स्वतःच्या सोयीसाठी आणि सुखासाठी जे जीवनव्यवहार व जीवनमूल्ये

स्वीकारली असतील, त्या साऱ्यांचे कलात्मक पातळीवर 'युनिक' दर्शन म्हणजे प्रादेशिकता होय. ज्या प्रदेशाच्या मातीत वाढलेल्या लोकसमूहाचे स्पंदन, त्याचे निसर्गाशी असलेले संवाद–विसंवाद अन् त्यातून त्याला लागणारे वेगळेपण यातच प्रादेशिकतेचे रहस्य सामावलेले आहे. प्रादेशिकतेमध्ये सामूहिकता, प्रातिनिधिकता व सांस्कृतिक जीवन यालाही महत्त्वाचे स्थान असते. या तीन बाबींशिवाय साहित्यातील प्रादेशिकता पूर्ण स्वरूपात अवतीर्ण होत नाही. प्रादेशिकतेविषयीचे प्रा. स. शि. भावे यांच्या मताचा हवाला देऊन डॉ. द. ता. भोसले यांनी सविस्तर विवेचन करताना म्हटले आहे. प्रादेशिकतेच्या निकषांमध्ये सामाजिकतेला महत्त्वाचे स्थान आहे आणि ही सामाजिकता निसर्ग, समाज आणि व्यक्ती यांच्या परस्पर देवाणघेवाणीतून साकार होते व ती पात्राद्वारे साहित्यात जिवंत बनते.

डॉ. भोसले यांनी बोलीभाषेलाही महत्त्वाचे स्थान दिले आहे, कारण भाषा एक सामाजिक संस्था असल्यामुळे समाजाचे अनेक गुणधर्म नकळत भाषेमध्ये संक्रांत होत असतात. म्हणून प्रादेशिकतेला बोलीभाषा महत्त्वाची ठरते.

डॉ. द. ता. भोसले यांनी अस्सल आणि खोट्या, कृत्रिम, उपऱ्या प्रादेशिकतेविषयी विवेचन केले आहे. अनुभवाशी एकरूप न झालेली, सजावटीसाठी, पार्श्वभूमी म्हणून आलेली प्रादेशिकता कृत्रिम होय. लेखक त्या प्रदेशाशी, तिथल्या माणसाशी, तेथील संवेदनांशी आणि मानसिकतेशी कितपत प्रामाणिक आहे यावर त्यातली प्रादेशिकततेची अस्सलता अवलंबून असते. ती खरीखुरी प्रादेशिकता म्हणता येईल. त्या प्रदेशाच्या चित्रणाबरोबरच त्या प्रदेशात वाढलेल्या माणसांचे स्पंदन, संवाद–विसंवाद आणि त्यातून निर्माण झालेली जीवनदृष्टी व्यक्त होण्यात प्रादेशिकतेचे यश सामावले आहे. [१८] प्रादेशिकतेच्या अस्सलपणाचा एक विशेष आहे की, 'विशिष्ट कलाकृतीतील व्यक्तित्त्वदर्शन सहज शक्य व्हावे इतकी ती प्रादेशिकता जिवंत हवी आणि त्याचबरोबर त्यातील पात्रांचे व्यक्तित्व आस्वादताना ती प्रादेशिकता आपोआप पुसली गेलेली असावी. ते व्यक्तिमत्त्व आस्वादताना प्रादेशिकतेचा ठसा आपल्या मनावर उमटता कामा नये. शिवाय लेखकाच्या निर्मितिप्रक्रियेवर जर या प्रादेशिकतेची काही बंधने पडत असतील तर तीदेखील पडणार नाहीत असे तिचे चित्रण झालेले असावे.' [१९] ही खरीखुरी प्रादेशिकता होय, असे भाव्यांना वाटते. ती एका अंगाने जिवंतही असली पाहिजे अन् दुसऱ्या अंगाने आस्वादनावेळी ती मनावरून पुसलीही गेलेली असावी असा वरील विवेचनाचा अर्थ होतो. डॉ. द. ता. भोसले यांना मान्य असलेली व्याख्या

अशी, [२०] 'जे चित्रण आपणाला त्या विशिष्ट प्रदेशातील लोकजीवन, संस्कृती, सणसोहळे, जीवनधारणा, तेथील लोकांचे रीतिरिवाज, त्यांचे निसर्गस्थित आयुष्य, कपडेलत्ते, भाषा इ. बाबींचा जिवंत, स्वाभाविक, वास्तव आणि कलात्मक स्वरूपांत प्रत्यय आणून देते आणि तद्नंतर या वास्तवाच्या पलीकडे झेप घेऊन मानवी मनाची मूलभूत स्पंदने आणि गाभा गाठण्याचा प्रयत्न करते, ती प्रादेशिकता अस्सल प्रादेशिकता मानता येईल. व्यापक, सनातन आणि मूलभूत असे मानवी संबंध सूचित करणारी प्रादेशिकता ही खरीखुरी मानता येईल यांत शंका नाही."

डॉ. द. ता. भोसले यांच्या प्रादेशिकतेच्या स्वरूपाविषयी विस्तृत विवेचनाचा अर्थ असा की, नागर जीवनातील प्रादेशिकता त्यांना मान्य नाही. विशिष्ट भूप्रदेशातील निसर्ग, सांस्कृतिक आणि सामाजिक जीवन, बोलीभाषा, उपजीविकेची साधने, शेती, परंपरा, समूहभावाचे स्पंदन, तेथील प्रश्न आणि जीवननाट्य, आचार–विचार, चालीरीती, समाजमनाचा आविष्कार, मानसिकता, अन्नपदार्थ, रीतिरिवाज, सणसोहळे, वस्त्रप्रावर्ण, मानवी मनाची स्पंदने आणि गाभा गाठण्याचा प्रयत्न इ. प्रादेशिकतेच्या घटकांना महत्त्व दिले आहे. प्रादेशिकतेचा लेखकाच्या संवेदनशीलतेवर परिणाम होतो आणि कलावंत आपल्या साहित्यकृतीतील पात्रांना त्या विशिष्ट प्रदेशाचे - निसर्गाचे रंग बहाल करतो, त्या मातीचे विशिष्ट गुणधर्म तो आपल्या पात्रांच्या व्यक्तिमत्त्वाला बहाल करीत असतो. प्रादेशिकता म्हणजे स्थळकाळातून निर्माण झालेल्या जिवंत वातावरणाचा वाचकांना येणारा प्रत्यय होय. अस्सल, खरीखुरी आणि कृत्रिम-उपरी प्रादेशिकता यांविषयी विवेचन करून व्यापक, सनातन आणि मूलभूत असे मानवी संबंध सूचित करणारी प्रादेशिकता त्यांना महत्त्वाची वाटते.

डॉ. रवींद्र ठाकूर यांनीही प्रादेशिक साहित्यकृतीविषयी काही विचार मांडलेले आहेत. जसे (१) प्रादेशिकता म्हणजे विशिष्ट भौगोलिक परिसीमांनी नियत झालेल्या ग्रामीण परिसरांची अनेकांगांनी युक्त अशी अनन्यसाधारण विशेषता होय. ही विशेषता तेथील लोकजीवन काही तत्त्वांच्या रूपाने अस्तित्वात असते. अशा प्रदेशाचे जीवन जेव्हा एखाद्या साहित्यकृतीत साक्षात होत असेल तेव्हा त्या साहित्यकृतीस प्रादेशिक साहित्यकृती म्हणता येईल." [२१] (२) एखाद्या विशिष्ट भूप्रदेशाच्या व्यक्तिमत्त्वाला प्राधान्य देऊन जेव्हा एखादी साहित्यकृती निर्मिली जाते, तेव्हा त्या साहित्यकृतीला आपण प्रादेशिक साहित्यकृती म्हणतो.' [२२] (३) "जेव्हा एखाद्या साहित्यकृतीतून एखादा विस्तीर्ण भूप्रदेश तेथील निसर्ग, समाजजीवन आदी सर्व वैशिष्ट्यांसह साक्षात

होत असेल तेव्हाच त्या कलाकृतीस प्रादेशिक साहित्यकृती म्हणता येईल." [२३]
डॉ. ठाकूर यांच्या वरील तीन व्याख्यांतून असे दिसते की, प्रादेशिक साहित्यकृतीतून विस्तीर्ण भूप्रदेश, निसर्ग, समाजजीवन, लोकजीवन यांच्या चित्रणाची ते अपेक्षा करतात, तर डॉ. रवींद्र शोभणे यांनीही 'प्रादेशिक कादंबरी : स्वरूप व संकल्पना' या लेखातून प्रादेशिक कादंबरीचे व्यवच्छेदक लक्षण व व्याख्या स्पष्ट केली आहे. जसे, "प्रादेशिक कादंबरीत कुठला तरी भूप्रदेश प्रामुख्याने चित्रण होणे आवश्यक असते. केवळ भूप्रदेशाचे वर्णन म्हणजे प्रादेशिकता ठरत नाही, तर त्या प्रदेशाचा तेथील लोकजीवनावर झालेला अमीट परिणाम, त्या प्रदेशामुळे निर्माण झालेली तिथली संस्कृती, रीती यांचेही चित्रण होणे आवश्यक ठरते. तेथील माणसांच्या जगण्याच्या प्रेरणा तिथल्या प्रदेशाशी संबद्ध झालेल्या असतात.' [२४] प्रादेशिक कादंबरीविषयीच्या डॉ. आनंद यादवांच्या मताचा हवाला देऊन डॉ. शोभणे म्हणतात, "मानवी जीवनाचा अन्वयार्थ प्रादेशिक लोकसंस्कृतीच्या व परंपरांच्या पातळीवर लावणे प्रादेशिक कादंबरीच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे ठरते." शहरी संस्कृतीतील जीवनापासून दूर असलेल्या कादंबरीस डॉ. शोभणे प्रादेशिक मानतात आणि म्हणतात, "प्रादेशिक कादंबरीचा मुख्य स्थायीभाव म्हणजे कुठला तरी विशिष्ट प्रदेश. प्रादेशिक कादंबरीत प्रदेश हा जरी महत्त्वाचा घटक असला तरी फक्त प्रदेश हाच एकमेव घटक ठरू शकत नाही. तेथील भूप्रदेश किंवा निसर्ग म्हणजे ही प्रादेशिक कादंबरी होत नाही, तर या कादंबरीत चित्रित होणाऱ्या माणसाचे विश्व, इथल्या प्रादेशिक आणि निसर्गाचे अमीट संस्कार झालेले असावेत. तसेच प्रादेशिक कादंबरीला येणारे जीवनचित्र हे समूहात्मक स्वरूपाचे असावे. विवक्षित किंवा व्यक्तिवादी जीवनदर्शन हे प्रादेशिक कादंबरीत वावडे ठरते." [२५] थोडक्यात भूप्रदेश, त्याचा लोकजीवनावरील परिणाम, संस्कृती आणि शेती हे घटक डॉ. शोभणे यांनी महत्त्वाचे मानले असून प्रदेशातील माणसाचे भावविश्व, निसर्गाशी असलेले नाते, दैनंदिन व्यवहार यांनाही महत्व दिले आहे. समूहात्मक स्वरूपाच्या जीवनचित्रणाला अनन्यसाधारण महत्त्व दिले आहे.

मराठी अभ्यासकांच्या विवेचनाचा आतापर्यंत विचार केला. अशाच आशयाचे विचार हिंदी अभ्यासकांनी मांडलेले दिसतात. आरंभीच्या विवेचनापेक्षा नंतरचे विवेचन अधिक परिपूर्ण वाटते, म्हणून आरंभीचे विचार आणि या विचारांमध्ये झालेला बदल विचारात घेऊन उत्तरार्धात हिंदी - मराठी अभ्यासकांच्या विवेचनाच्या आधारे प्रादेशिक-कादंबरीचे स्वरूप निश्चित करू.

हिंदी भाषेत 'अंचल - विशेष' वर्णन करणाऱ्या कादंबऱ्या लिहिल्या गेल्या, त्यानंतर अभ्यासकांनी 'आंचलिक' कादंबरीविषयी विचार मांडलेले दिसतात. डॉ. मखनलाल शर्मा यांनी 'आंचलिक' [३६] कादंबरीतील सांस्कृतिक तत्त्वाविषयी विवेचन केले आहे. ते म्हणतात त्याप्रमाणे प्रादेशिक कादंबरीत कोणत्यातरी विशिष्ट भू-प्रदेशाचे समग्र आणि परंपरायुक्त जनजीवन चित्रण केलेले असते. विशिष्ट प्रदेशातील जन-जीवन, त्यांची भाषा, वेशभूषा, उत्पादनाची साधने, विनिमय, जात, धर्म, धार्मिक विश्वास, जन्मापासून मृत्यूपर्यंतचे आचार, शिष्टाचार, मनोरंजनाची साधने, व्यसने, कला, आहार, जादूटोणा, श्रद्धा-विश्वास, उत्सव यांशिवाय त्या विशिष्ट प्रदेशाचे विशेष, भौगोलिक, राजकीय स्थिती, निसर्ग यांचे चित्रणही असते. व्यक्ती आणि प्रदेशानुसार त्या विशिष्ट भू-भागातील जन-जीवनाचे अंतरंगासह केलेले ते चित्रण असते. प्रादेशिक कादंबरीत एक व्यक्ती नायक असत नाही. उलट प्रदेश-विशेष हाच नायक असतो. डॉ. शर्मा यांनी प्रादेशिक कादंबरीसंबंधी अधिक विवेचन केले आहे आणि प्रादेशिकतेचे घटकही सांगितले आहेत. ते थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येतील. प्रादेशिक कादंबरीकार एखाद्या प्रदेशविशेषांचा स्वीकार करून त्याचे वास्तववादी चित्रण करतो. त्या प्रदेशातील लोकांचे राहणीमान, वेशभूषा, आहार, रीतिरिवाज, चेटूक, राजनीतिक आणि धार्मिक स्थिती इत्यादींचे प्रतिबिंब प्रादेशिक कादंबरीत दिसते. केवळ त्या प्रदेशातील भाषेत रीति-रिवाजांचे वर्णन करणारी कादंबरी सामान्य ठरते, तर ज्या कादंबरीमधून 'प्रादेशिकता' हेच प्रमुख तत्त्व असते, ती श्रेष्ठ दर्जाची प्रादेशिक कादंबरी ठरते. प्रादेशिक कादंबरीचे कथानक व्यापक असते. राजकीय किंवा ऐतिहासिक प्रश्नांकडे विशेष लक्ष पुरविण्याची आवश्यकता नसते. आशयानुसार राजकीय व ऐतिहासिक प्रश्नांकडे लक्ष दिले जाते. प्रादेशिक कादंबरीत लोकसंस्कृतीच्या अधिक जवळ आणि प्रातिनिधिक असणाऱ्या पात्रांना स्थान दिले जाते. सामान्य पात्रांकडे विशेष ध्यान दिले जाते. सामान्य व्यक्तीमध्ये सामान्य जीवनाची तत्त्वे मिळतात म्हणून या प्रतिनिधित्व करणाऱ्या पात्रांचे चित्रण करणे प्रादेशिक कादंबरीचा उद्देश आहे. प्रादेशिक कादंबरीस प्रदेशविशेषाच्या संस्कृतीचे सरस आणि सुखद चित्रण मानता येईल. परंतु प्रादेशिक कादंबरीतून प्रादेशिकतेच्या नावावर वरवरची सामान्य आणि असाधारण परिस्थिती, गीते आणि काही काल्पनिक कथा इ. आधारे पात्ररेखाटन केले जाते हे चुकीचे आहे. प्रादेशिक कादंबरी लिहिण्यासाठी लेखक त्या प्रदेशाच्या भाषेशी आणि समग्र-जीवन परंपरेशी पूर्णपणे परिचित असला

पाहिजे. [२७] डॉ. सुषमा प्रियदर्शिनी यांनी 'आंचलिक उपन्यास' [२८] या प्रकरणात प्रादेशिक शब्दाचा अर्थ स्पष्ट करून म्हटले आहे, "अंग्रेजी - साहित्य में 'रीजनल नावेल' (आंचलिक उपन्यास) हिन्दी से बहुत पहले ही उपलब्ध थे, उनके सम्बन्ध में जो आलोचको ने अपने विचार अभिव्यक्त किये हैं, वे भी हिंदी के आलोचकों के समानार्थी हैं। विभिन्न विचारों और परिभाषाओं से आंचलिक उपन्यास का स्वरूप अत्यन्त स्पष्ट हो जाता है। आंचलिक उपन्यास अंचल-विशेष के समग्र जीवन को प्रस्तुत करनेवाला उपन्यास है, जिसमें उसका अंतस और बाह्य जीवन सम्पूर्णता तथा अनेक कोनोंसे उभारा जाता है। अंचल ग्राम और नगर दोनों के सम्बद्ध हो सकता है, बशर्ते कि वह अचीन्हा अपरिचित हो, अति-परिचित अथवा अतिज्ञात न हो।"

डॉ. प्रियदर्शिनी यांनी 'प्रादेशिक' शब्दाचा अर्थ आणि प्रादेशिक कादंबरीचे घटक स्पष्ट केले आहेत. देशाचा एक भाग किंवा प्रांत म्हणजे प्रदेश तर प्रादेशिक कादंबरीचा ध्वनित अर्थ, भूमिप्रदेशाशी निगडित कादंबरी. प्रादेशिक कादंबरीच्या प्रकाशनाबरोबर हिंदी विचारवंत-समीक्षकांनी या संदर्भात काही विचार मांडले. त्यांचा हवाला देऊन डॉ. प्रियदर्शिनी यांनी प्रादेशिक कादंबरीची व्याख्या केली आहे. 'प्रदेशाच्या समग्र जीवन चित्रणाला त्यांनी अधिक महत्त्व दिले आहे. प्रादेशिक कादंबरीत अंतरबाह्य जीवन पूर्णपणे किंवा अनेक अंगांनी चित्रित केलेले असते. प्रदेश खेडे आणि शहर या दोहोंशी निगडित असू शकतो. परंतु वाचकांना तो प्रदेश पूर्णपणे अपरिचित असावा, अतिपरिचित किंवा माहितीतील नसावा' असे त्यांना वाटते. डॉ. प्रियदर्शिनी यांनी शहरी जीवनाचाही समावेश प्रादेशिकतेत केलेला दिसतो. त्यांचा हा विचार मात्र मान्य करणे अशक्य आहे; तरीही त्यांनी सांगितलेले प्रादेशिक कादंबरीचे मूळ तत्त्व संक्षेपाने समजून घेणे प्रादेशिकतेच्या स्वरूपनिश्चितीसाठी अपरिहार्य आहे.

**(१) आंचलिक देशकाल या वातावरण :** प्रादेशिक कादंबरीचे मूलतत्त्व प्रादेशिकता आहे. इतर कांदबऱ्यांप्रमाणे कथा, चरित्र, उद्देश्य, देशकाल, वातावरण, उपकथानक आणि भाषाशैली हे घटक आहेतच. मुख्यतः प्राणतत्त्व प्रदेशाचे वातावरण आहे. कथा विशिष्ट प्रदेशातच आकाराला येते. पात्रेही त्याच परिसरातील सामान्य व्यक्ती असतात. प्रामुख्याने प्रदेश केवळ वातावरणनिर्मितीसाठी नसून पूर्णपणे विषयाला स्वतंत्र अस्तित्व बहाल करतो. देश प्रमुख असतो. काल गौण असतो. म्हणजेच जिवंत, स्थिर प्रदेशकाळाचे गतिशील अवस्थेत चित्रण केलेले असते. जनसामान्याच्या जीवनाचे समग्र परिपूर्ण दर्शन घडविते. भौगोलिक वैशिष्ट्यामुळे वेगळा रंग अनुभवाला

प्राप्त होतो. त्या प्रदेशातील लोकांच्या भावानुभूतीचे चित्रण त्यामध्ये असते. प्रादेशिक जीवनाचे अनेक घटक कादंबरीत चित्रित केले जातात; जसे, क्षेत्र, भौगोलिक स्थिती, पाऊसपाणी, जीवनमान, सणवार, उत्सव, वेशभूषा, आहार, राहणीमान, व्यवसाय, व्यसन, मनोरंजन, मानसशास्त्र, श्रद्धा, उत्सव, रीति-रिवाज, भाषाशैली, मनोरंजनाची साधने, धर्मकल्पना, अंधश्रद्धा, भूत, शकुन, अपशकुन, जादूटोणा इ.ची कळतनकळत छाप कादंबरीवर पडलेली असते.

**(२) वस्तु और क्षेत्र :** प्रादेशिक कादंबरी केवळ ग्रामीण, अपरिचित, अज्ञात क्षेत्रापुरती मर्यादित न रहाता तिच्या कक्षा विशाल आहेत. त्यामध्ये नगर, उपनगर, मागासलेल्या जाती, आदिवासी क्षेत्र, जंगलप्रदेश, पठार, पर्वतीय प्रदेश, मैदानी भूखंडाचाही समावेश होतो, असे डॉ. प्रियदर्शिनी यांचे मत आहे. अविकसित भागाला प्रादेशिक कादंबरीत अधिक महत्त्व आहे. भूप्रदेशाची स्वतःची स्वतंत्र ठेवण, संस्कृती, एकात्मता असते. प्रादेशिक कादंबरीत एकच कथा असत नाही तर जीवनाच्या अनेक अंगांचे दर्शन घडविलेले असते. भौगोलिकतेमुळे कादंबरीत विविधता येते. प्रादेशिक कादंबरीचे स्वरूप अधिक वस्तुनिष्ठ असते. वस्तुवर्णन वातावरणनिर्मितीसाठी अत्यावश्यक असते.

**(३) पात्र - चरित्र - चित्रण :** प्रदेशानुसार पात्र चित्रण केलेले असते किंवा प्रदेशाच्या प्रभावातूनच पात्राचे वैशिष्ट्यपूर्ण रूप दिसत असते. व्यक्तीपेक्षा समाजजीवन चित्रण अधिक महत्त्वाचे असते. असंख्य पात्रे प्रादेशिक कादंबरीत अनिवार्यपणे येतात. त्यातून सामूहिकता प्रगट होते. त्यांची स्वतंत्र समान संस्कृती असते. या व्यक्तिसमूहात प्रदेशाची अनेक तत्त्वे मिळतात. सर्व पात्रांना समान महत्त्व असते. म्हणून 'नायकशून्यता' किंवा 'नायकाचा अभाव' प्रादेशिक कादंबरीतून दिसतो. प्रादेशिक कादंबरीत 'व्यक्ति' नायक नसून 'प्रदेश' नायक मानला जातो. प्रदेश महानायक असतो. प्रदेशानुरूप पात्राचे चरित्र कादंबरीकार घडवत असतो. परंतु समूहातीलच एक-एक व्यक्ती इतरांहून वेगळी असू शकते, ती व्यक्ती कादंबरीतील नायकही होऊ शकते.

**(४) उद्देश्य :** वास्तववादी दृष्टिकोणावर आधारित वस्तुनिष्ठ दृष्टिक्षेप अपरिहार्य असतो. आत्मीयता प्रादेशिक कादंबरीकाराजवळ असणे अत्यावश्यक आहे, कारण जगलेल्या जीवनाचा प्रामाणिकपणा येथे अभिप्रेत आहे. ऐकीव अनुभव-चित्रणाला महत्त्व नाही. स्वतः जीवन जगणे किंवा जवळून पाहणे आवश्यक आहे.

कादंबरीकार आणि कादंबरी यांच्याकडे स्वतंत्रपणे पाहाताच येत नाही, म्हणून वस्तुनिष्ठता आणि आत्मीयता कादंबरीकाराजवळ आवश्यकच आहे. प्रदेशाच्या सर्वांगांना महत्त्व दिले गेले पाहिजे, अन्यथा कादंबरी एकांगी होऊ शकते. प्रादेशिक कादंबरी राष्ट्रीय एकात्मतेला विरोध करत नाही आणि कलामूल्यांबद्दलही शंका घेण्याचे काही कारण नाही.

**(५) भाषा** : प्रादेशिक कादंबरीत सर्वांत अधिक भाषेला महत्त्व आहे. स्थानीय रंग, आधार आणि साधन भाषा आहे. संवाद आणि निवेदन यांसाठी भाषा कशी वापरायची याचे स्वातंत्र्य कादंबरीकाराला आहे. त्यातून बोलीविशेष प्रगट होतात. केवळ संवादासाठीच नव्हे तर अभिव्यक्तीसाठीही बोलीभाषाच वापरली जाते. त्यामुळे अभिव्यक्ती जिवंत होऊ शकते.

**(६) शैली - शिल्प** : प्रादेशिक कादंबरीत लोकगीत, कथा, नृत्य, सण-उत्सव, लोकाचार, रीतिरिवाज, लोकरंगमंच इ. द्वारा प्रादेशिकता सिद्ध होते. प्रादेशिक कादंबरीचे हे अपरिहार्य घटक आहेत. कथात्मकतेमुळे लेखक बाजूला राहू शकतो. शैलीच्या वर्णनात्मकतेलाही कथात्मकतेप्रमाणे महत्त्व प्राप्त झाले आहे. अलंकारामुळे विविधता आली आहे. मातीचा गंध शैलीमुळे अनुभवाला प्राप्त झाला आहे.

डॉ. प्रियदर्शिनी यांनी प्रादेशिक कादंबरीचे घटक सांगितले आहेत, त्याचप्रमाणे कु. शैला बाला आँचलिक कादंबरी संदर्भात लिहितात, "इस प्रकार के उपन्यासों का कथा क्षेत्र सीमित है । इनमें कथाकार अपने प्रदेशांचल के व्यावहारिक जीवन का जीता-जागता स्वरूप प्रस्तुत करता है । इनमें पात्रों की संख्या अधिक होने के कारण चरित्र-चित्रण की दृष्टि से कथात्मकता नहीं आ पाती । पात्रां के व्यवहार भाषा तथा चरित्र आदि में प्रादेशिकता का समावेश रहता हैं । ये उपन्यास अधिकता वर्णनात्मक शैली में लिखे हुऐ होते हैं । यही कारण है जिनसे आँचलिक उपन्यास अपना विशिष्ट स्वरूप रखते हैं ।[२१] थोडक्यात कु. शैला बाला यांनी प्रादेशिक कादंबरीतील कथानक, पात्रयोजना, संवादयोजना, भाषा-तत्त्व, शैलीतत्त्व, वातावरण, चित्रण आणि कादंबरीचा उद्देश्य या घटकांचा प्रामुख्याने विचार केलेला दिसतो. विशिष्ट भूप्रदेशाला विशेष महत्त्व प्रादेशिक कादंबरीत दिलेले दिसते.

डॉ. ज्ञानचन्द्र गुप्त यांनी थोडे वेगळे विचार मांडले आहेत. प्रादेशिक कादंबरी लेखनाच्या संदर्भात ते म्हणतात, सामाजिक कादंबरीत नागरी जीवन चित्रण करताकरता कांदबरीकार थकले आणि त्याच त्याच नागरी जीवन चित्रण करणाऱ्या कादंबऱ्यांचा

वाचकांना कंटाळा आला तेव्हा नव्या अज्ञात आणि दूरवरच्या प्रदेशांच्या अपरिचित क्षेत्रांशी निगडित जीवनावर कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. त्यामुळे या कादंबऱ्या नागरी जीवनाच्या सावलीला वाढू इच्छित नाही. थोडक्यात, प्रादेशिक कादंबरी सामाजिक कादंबरीशी विद्रोह करून निर्माण झाली. "....आँचलिक उपन्यास को स्वातंत्र्योत्तर भारत की प्रमुख विधा के रूपमें देखा जाय, जिनसे ग्राम एवं दूरस्थ आँचलो की संस्कृतियों के समग्र उद्घाटन को वरियता प्रदान की है। इनमें एक नवीन चेतना की लहर है। कुछ कलात्मक एक सपना देखकर उन नगर - पटक उपन्यासों को जो मोहल्ले और कस्बे का रूप उजागर करते हैं इन उपन्यासों के मध्य नहीं गिना जा सकता, क्योंकि ये उपन्यास अपने कलात्मक वैभव एवं वस्तुन्मुखी दृष्टिसे नगर - पटक उपन्यासों से बिल्कुल भिन्न हैं। अतः हमारी यह स्पष्ट धारणा है कि आँचलिक उपन्यासों का विषय क्षेत्र ग्राम एवं भारत के वही अज्ञात और उपेक्षित अंचल है, जिनकी सुधबुध हिंदी उपन्यासकार को स्वतंत्रता परवर्तीकाल में अपनी संस्कृति एवं गौरव के पुनःस्थापनाई हुई। आँचलिक उपन्यासों का प्रादुर्भाव पश्चिमी सभ्यता एवं आधुनिकता के कारण हुआ, क्योंकि तत्कालीन उपन्यासों में अनुभूतियों की नग्न एवं अर्थहीन अभिव्यक्ति, मूल्यहीनता, समास, कुंठा, अर्थशून्य बेईमानी, नपुंसक आर्तक आदि सभी का दबदबा बढ गया था। यह सत्य है कि कला का व्यापक तथा सम्भावनापूर्ण रूप हमें एसे (आंचलिक) उपन्यासों में ही मिलता है, जो विशुद्ध रूपसे ग्रामीण है।" [१०] म्हणजेच प्रादेशिक कादंबरीच्या विषय क्षेत्राच्या बाबतीत मतभेदही आहेत, जसे एक वर्ग शहरात रहाणाऱ्या लोकांचे जीवनचित्रण करणाऱ्या कादंबरीला प्रादेशिक कादंबरी म्हणावे असा आग्रह धरतो तर दुसरा वर्ग खेडे किंवा विशिष्ट अज्ञात प्रदेश जीवनचित्रण हाच प्रादेशिक कादंबरीचे विषयक्षेत्र मानणाऱ्यांचा आहे. परंतु प्रादेशिकतेमध्ये शहरी जीवनचित्रणाचा समावेश करणे चुकीचे आहे. कारण प्रादेशिक जीवन प्रामुख्याने ग्रामीण असते आणि प्रादेशिक कादंबरी क्षेत्रीय वास्तव आणि अनुभवाचा प्रामाणिकपणा घेऊन आकाराला आली आहे, नव्हे विद्रोहाच्या भावनेतूनच निर्माण झाली आहे. प्रादेशिक कादंबरी स्वतंत्र भारताची स्वतंत्र निर्मिती आहे. तिने खेड्यांची किंवा प्रदेशाची संस्कृती समग्रपणे चित्रित केली आहे. एक नवजागृतीची लहर तिच्यात आहे. नागर कादंबरी आणि प्रादेशिक कादंबरी यांच्यातील कलात्मक एकरूपता पाहून त्यांना एकच मानता येत नाही. कारण प्रादेशिक कादंबरीचे आपले स्वतःचे कलात्मक वैभव किंवा वस्तुन्मुखी दृष्टी नागर कादंबरीपेक्षा भिन्न

आहे. म्हणून प्रादेशिक कादंबरीचे विषयक्षेत्र खेडे किंवा भारताचे अज्ञात आणि उपेक्षित प्रदेश आहे. कलेचे व्यापक किंवा संभाव्य रूप प्रादेशिक कांदबरीतच मिळू शकते की जी शुद्ध स्वरूपात ग्रामीण आहे.

डॉ. गुप्त यांच्याप्रमाणे डॉ. शिवकुमार शर्मा यांनीही 'आँचलिक' कादंबरीसंबंधी विचार मांडले आहेत. वेगळेपण आणि दोषांचाही विचार डॉ. शर्मा यांनी केला आहे. प्रादेशिक किंवा स्थानीय रंग आणि त्याच्याशी निगडित जीवनचित्रण हे प्रादेशिक कादंबरीचे प्रमुख लक्ष्य आहे, तर स्थानिक बोलीभाषेचा वापर हा दोषही आहे. कारण सर्वच वाचक आस्वाद घेऊ शकत नाहीत. विघटनवादी प्रवृत्तींना प्रोत्साहन मिळते. म्हणून प्रादेशिक कादंबरीची सफलता कशात आहे तर वास्तववादी गहरी अभिव्यक्तीला प्रादेशिकतेच्या मर्यादेच्या बाहेर जाऊन सार्वभौम जीवन चित्रण करणे." [३१] डॉ. जयकिशन प्रसाद खण्डेलवाल यांनी आपल्या विवेचनात प्रादेशिकतेच्या पुढील घटकांना महत्त्व दिलेले दिसते. या कादंबरीत कुठल्यातरी जनपद किंवा प्रदेशाच्या ग्रामीण प्रादेशिक तत्त्वांचे चित्रण असते. त्याद्वारा कादंबरीकार त्या प्रदेशातील जनतेच्या रीति-रिवाज, परंपरा, धार्मिक किंवा नैतिक आचार-विचार, विश्वास (लोकभ्रम/श्रद्धा) आस्था यांच्याबरोबर लोक-संस्कृतीचे शब्दचित्र बोलीभाषेत काढतो. मानवीजीवन विकासाची व जागृतीची प्रेरणा या लेखनामागे आहे. प्रादेशिक कादंबरीत विशिष्टतेसाठी कादंबरीकार इतिहास, भूगोल व इतर सामाजिक शास्त्रांना अधिक महत्त्व देतात ते अनावश्यक आहे. प्रादेशिक कादंबरी सर्वप्रथम कादंबरी असली पाहिजे, त्यासाठी सर्वाधिक महत्त्वाची गोष्ट कथानक आहे, आणि त्यापेक्षा महत्त्वपूर्ण आहे, मूलभूत मानवी भावनांचे चित्रण, की जे काल्पनिक पात्रांना सजीव, वास्तव आणि मार्मिक, विश्वसनीयता बहाल करू शकते. अश्लील किंवा भावुकतापूर्ण चित्रणही प्रादेशिक कादंबरीत येऊ लागले. सामान्य माणसाचे समग्र जीवनचित्रण प्रादेशिक कादंबरीने केले. म्हणून प्रादेशिक कादंबरीचे भविष्य उज्वल आहे. एक गतिहीन समाज आणि सामाजिक जीवनाला बदलत्या - नव्या दिशांची ओळख करून देण्यामुळेच प्रादेशिक कादंबरीला अधिक प्रगतीशील आणि मूल्यवान म्हटले जाऊ शकते. [३२]

हिंदीतील समीक्षकांच्या मतांचा विचार केल्यानंतर प्रादेशिकतेचे स्वरूप सहज स्पष्ट होते. प्रादेशिक कादंबरीतील 'प्रादेशिक' हे विशेषण नाही, तर प्रादेशिकता मूलभूत घटक आहे. प्रदेशच या कादंबरीत नायक असतो. प्रादेशिकतेचे विविध घटक आहेत. सर्वच घटकांचे दर्शन प्रत्येक कादंबरीत होईल असे नाही तर देशकाल

चित्रणाबरोबर काही घटक कळत-न-कळत चित्रित होतात.त्यातील वेगळेपण वाचकांना जाणवते.

मराठी व हिंदी समीक्षकांच्या विविध मतांच्या आधारे प्रादेशिक साहित्य आणि प्रादेशिक कादंबरीच्या संदर्भातील अनेक अनुत्तरीत आणि वादयुक्त प्रश्नांची उत्तरे मिळतात. यांतील काही प्रश्नांबद्दल अनेक समीक्षकांचे एकमत दिसते तर काही प्रश्नांबद्दल मतभेदही दिसतात. हे प्रश्न पुढीलप्रमाणे सांगता येतील आणि त्याचे साधार विवेचनही करता येईल. निष्कर्ष काढता येतील (१) प्रदेश म्हणजे काय ? (२) प्रादेशिकता म्हणजे काय ? (३) प्रादेशिक कादंबरी म्हणजे काय? (४) प्रादेशिकतेचे कृत्रिम आणि अस्सल असे दोन प्रकार करता येतील का ? (५) प्रादेशिक कादंबरी म्हणजे प्रदेश चित्रण की आणखी काही घटकांचा समावेश त्यात होतो ? (६) प्रादेशिक कादंबरीचे मुख्य घटक कोणते ? (७) प्रादेशिक कादंबरीच्या प्रेरणा कोणत्या ? (८) प्रादेशिक कादंबरी शेवटी कादंबरीच आहे का ? (९) शहरी पार्श्वभूमीवरील कादंबरीचा समावेश प्रादेशिक कांदबरीत करणे उचित होईल काय ? (१०) प्रादेशिक कादंबरीत निसर्ग, भू-प्रदेश आणि बोलीभाषेला महत्त्व का दिले जाते ? (११) जाती-जमातीचे जीवनचित्रण करणाऱ्या कादंबऱ्यांचा समावेश प्रादेशिक कादंबरीत करणे शक्य आहे का ? (१२) प्रादेशिक कादंबरीची वैशिष्ट्ये आणि लक्षणे कोणती ? (१३) प्रादेशिक कादंबरी प्रातिनिधिकतेला, व्यक्तीपेक्षा समाजजीवन चित्रणाला आणि लोकसंस्कृतीला का महत्त्व देते ? (१४) प्रादेशिक कादंबरीच्या मर्यादा आणि तिच्या भविष्यकाळाविषयी काय सांगता येईल ? या सर्व प्रश्नांची उत्तरे देऊन प्रादेशिक कादंबरीची व्याख्या करणे सोयीस्कर होईल, यातून प्रादेशिकतेचे स्वरूपही स्पष्ट होण्यास मदत होईल.

'प्रदेश' संज्ञेविषयी समीक्षकांनी अनेक मते मांडली. जसे डॉ. ज्ञानचंद्र गुप्त यांनी 'प्रदेश म्हणजे प्रांत, जनपद किंवा क्षेत्र असे म्हटले आहे; तर डॉ. सुषमा प्रियदर्शिनी यांनी 'प्रदेश म्हणजे देशाचा एक भाग किंवा प्रांत' असे म्हटले आहे. त्यांना खेडे आणि शहर दोन्हीही प्रदेशच वाटतात, हे अर्धसत्य आहे. डॉ. अ. रा. तोरो 'प्रदेश म्हणजे भू-भाग मानतात, तर प्रा. ल. ग. जोग, "सुधारलेल्या जीवनापासून दूर मागासलेल्या भागास प्रदेश' म्हणतात. "म. सु. पाटील 'प्रदेश' म्हणजे स्वयंपूर्ण



AGASTI COLLEGE AKOLE
LIBRARY
26354
26354

जग, निसर्ग ाचा जन्म होतो असे म्हणतात." तर डॉ. मदन कुलकर्णी म भागावरील विशिष्ट निसर्ग असलेला व मानवी जनजीवनाव प्रभावी घटक म्हणजे प्रदेश होय." डॉ. द. ता. भोसले म्हण या संवेदनशीलतेवर परिणाम करतो, ते ग्रामीण जीवन चित्रण ारांश, शहरी संस्कृतीपासून, औद्योगिकीकरणापासून दूर असलेल्या प्रदेश म्हणता येईल. पेठ, कसबा किंवा शहराच्या जवळ वाढणाऱ्य देश मानता येत नाही. कारण तेथे विशिष्ट निसर्गाची पार्श्वभूमी लाभलेल. ।कसंस्कृतीही एक असणे अशक्य असते. निसर्ग पात्र, सजीव, जिवंत करण्यासाठी अपरिहार्य घटक म्हणून अवतरतो. नागर प्रदेशातील कादंबरीत वास्तववादी सामाजिक कादंबरी होऊ शकेल. परंतु प्रादेशिक होऊ शकणार नाही.

'प्रदेश' संज्ञेचा विचार केल्यानंतर ओघानेच "प्रादेशिकता" म्हणजे काय हे तपासणे क्रमप्राप्त ठरते. 'प्रादेशिक' हे विशेषण नाही. प्रदेश मूलभूत घटक किंवा नायक असतो. प्रादेशिकतेत विविध घटकांचा समावेश होतो. डॉ. तोरो म्हणतात, "एका भूभागाचे जीवन ज्यात चित्रित झाले आहे ते प्रादेशिक साहित्य होय." तर डॉ. मदन कुलकर्णी म्हणतात, 'प्रादेशिकता' हे वाङ्मयीन मूल्य नव्हे तर नैसर्गिक आणि सांस्कृतिक वातावरणाला महत्त्व देणारी एक प्रवृत्ती आहे. "प्रादेशिकता" हे साहित्याला प्राप्त झालेले एक वैशिष्ट्य आहे, तर डॉ. द. ता. भोसले यांच्या मतानुसार, "संस्कृती, समूहमनाचा आविष्कार आणि निसर्ग यांशिवाय प्रादेशिकता अपूर्ण रहाते. सामूहिकता, प्रातिनिधिकता आणि सांस्कृतिक जीवन यांना प्रादेशिकतेत महत्त्वाचे स्थान आहे. प्रादेशिक बोलीभाषा, निसर्ग, व्यक्ती व समाज यांच्या परिमलातून प्रादेशिकता आकार घेते." थोडक्यात, विशिष्ट प्रदेशातील निसर्गचित्रण म्हणजे प्रादेशिकता नव्हे तर इतरही घटकांचा अंतर्भाव प्रादेशिकतेत होतो, त्या घटकांचा आपण विचार करू. सर्वच अभ्यासकांनी काही प्रमुख घटकांचे स्पष्टीकरण केले आहे.
(१) भू-प्रदेशाच्या निसर्गाचे, सृष्टीचे चित्रण, (२) समूहमनाचा गजर, (३) सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक वातावरण, (४) समग्र व परंपरायुक्त जनजीवन, (५) लोकसंस्कृतीच्या अधिक जवळ आणि प्रातिनिधिक पात्रांना स्थान, (६) विशिष्ट

बोलीभाषा, (७) अनुभवाचा अस्सलपणा, कसदारपणा, (८) उपजीविकेचे साधन व शेती, (९) समान मानसिकता, (१०) दैनंदिन व्यवहार, (११) भौगोलिक एकता, (१२) अधिक पात्रयोजना, (१३) संवाद योजना, (१४) भौगोलिक पार्श्वभूमीवरील कथानक, (१५) रीति-रिवाज, (१६) सुख - दुःख, (१७) जीवनप्रणाली, (१८) सजीव वातावरण व प्रदेशाचे स्थानिक रंग, (१९) धार्मिक - नैतिक आचार विचार, श्रद्धा, विश्वास, आस्था, शिष्टाचार, मनोरंजनाची साधने, व्यसन, कला, वेशभूषा, जाति-धर्म, विनिमय, आहार, जादूटोणा, चेटूक, उत्सव, रागद्वेष इ. (२०) शैली-शिल्प-लोकगीत, कथा, नृत्य, लोकाचार, लोकरंगमंच इ. (२१) समस्या आणि जीवननाट्य, (२२) सामाजिकता, (२३) आनुवंशिकता, (२४) समरसता, (२५) समूह केंद्रितता. हे सर्वच घटक एकाचवेळी प्रादेशिक कादंबरीत येतीलच असे नाही, आशयाच्या अपरिहार्यतेतून त्यांचा नकळत वावर होत असतो. प्रादेशिक कादंबरी म्हणजे केवळ प्रदेश चित्रण नव्हे तर वर उल्लेख केलेल्या घटकांचे रसायन होय. शहरी पार्श्वभूमीवरील कादंबरीला प्रादेशिक कादंबरी मानणे योग्य होणार नाही, किंवा पार्श्वभूमी म्हणून येणाऱ्या निसर्गप्रदेशाचे चित्रण करणाऱ्या कादंबरीलाही प्रादेशिक कादंबरी मानता येणार नाही. उलट विशिष्ट यंत्रयुगापासून दूर असलेल्या जीवन चित्रणाला किंवा जातीजमातीच्या चित्रणाला प्रादेशिक कादंबरीत समाविष्ट करता येईल.

प्रादेशिक कादंबरी प्रातिनिधिकतेला, समूह मनाच्या गजराला, अपरिहार्य निसर्गाला, लोकभाषेला, सामान्य माणसांच्या भावभावनांच्या चित्रणाला आणि ग्रामीण लोकजीवनाच्या पार्श्वभूमीला विशेष महत्त्व देते. लोकसंस्कृतीच्या चित्रणाशिवाय प्रादेशिक कादंबरी अपूर्ण राहू शकते. प्रदेश किंवा निसर्ग उपरा न ठरता अंगभूत घटक पात्र म्हणून येतो. या साहित्याच्या प्रेरणाही पुढीलप्रमाणे सांगता येतील. प्रादेशिकता वर्तमान वास्तववादी प्रेरणा आहे, विश्वव्यापी रोमँटिक चळवळीची अभिव्यक्ती आणि सामान्य माणसाला अग्रस्थान या प्रकारच्या कादंबरीची प्रेरणा आहे.

थोडक्यात, वरील विवेचनाच्या आधारे प्रादेशिक कादंबरीची व्याख्या करता येईल. "उद्योगप्रधान संस्कृतीपासून दूर असलेली विशिष्ट भू-प्रदेशातील निसर्ग, परंपरा, सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक समस्यांचे आणि लोकसंस्कृतीचे बोलीभाषेतील वास्तव, अस्सल कलात्मक चित्रणास प्रादेशिक कादंबरी म्हणता येईल."

प्रादेशिक कादंबरीच्या स्वरूपनिश्चितीनंतर प्रकरण दोन ते पाचमध्ये निवडक कादंबऱ्यांच्या आधारे विगमनात्मक पद्धतीने आशयनिष्ठ दृष्टिकोनातून अनुक्रमे पश्चिम महाराष्ट्र, कोकण, मराठवाडा आणि वैदर्भीय जीवनातील विविधांगांचा आणि समाजवास्तवाचा शोध घेण्याचा प्रयत्न आहे. उपसंहाराच्या सहाव्या प्रकरणामध्ये प्रादेशिक कादंबरीच्या निर्मिती प्रेरणा, प्रादेशिक कादंबरीतून महाराष्ट्रीय जीवनाचे घडणाऱ्या दर्शनाचा शोध घेऊन प्रादेशिक कादंबरीचे 'कादंबरी' म्हणून वाङ्मयीन मूल्यांधारे मूल्यमापन करावयाचे आहे.

**॥ संदर्भ टीपा ॥**

**प्रकरण १ ले**

१. बापट-गोडबोले, 'मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास'

२. जोग ल. ग. 'कादंबरी'

३. तोरो अ. रा. 'आधुनिक मराठी ललित वाङ्मयातील प्रादेशिकता, उद्‌गम आणि विकास'

४. तत्रैव

५. तत्रैव

६. तत्रैव

७. तत्रैव

८. कुलकर्णी द. भि. 'तिसऱ्यांदा रणांगण'

९. तत्रैव

१०. यादव आनंद 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या'

११. भावे स. शि. 'साहित्य आणि प्रादेशिकता' (ग्रामीण साहित्य आणि वास्तव - प्रस्तावना - आनंद यादव)

१२. पाटील म. सु. 'अक्षरवाटा'

१३. कुलकर्णी मदन - 'मराठी प्रादेशिक कादंबरी : तंत्र आणि स्वरूप'

LIBRARY AKOLE 422601 DIST AHMEDNAGAR

१४. तत्रैव

१५. तत्रैव

१६. कोत्तापल्ले नागनाथ - 'ग्रामीण साहित्य, स्वरूप आणि शोध'

१७. भोसले द. ता. 'ग्रामीण साहित्य - एक चिंतन'

१८. तत्रैव

१९. तत्रैव

२०. तत्रैव

२१. ठाकूर रवींद्र - ''र. वा. दिघे यांच्या कादंबरीचा चिकित्सक अभ्यास'

२२. तत्रैव

२३. तत्रैव

२४. शोभणे रवीन्द्र, 'म. सा. पत्रिका - पुणे'

२५. तत्रैव

२६. शर्मा मखनलाल, 'हिंदी उपन्यास : सिद्धान्त और समीक्षा'

२७. तत्रैव

२८. प्रियदर्शिनी सुषमा 'हिंदी उपन्यास'

२९. शैल बाला 'हिंदी उपन्यास का प्रारम्भिक विकास'

३०. गुप्त ज्ञानचंद्र 'स्वातंत्र्योत्तर हिंदी उपन्यास और ग्रामचेतना'

३१. शर्मा शिवकुमार, 'हिंदी साहित्य युग और प्रवृत्तियाँ'

३२. खण्डेलवाल जयकिसन प्रसाद 'हिंदी साहित्य की प्रवृत्तियाँ'

* * *

प्र
क
र
ण
दोन

# पश्चिम महाराष्ट्रीय जीवनातील प्रादेशिकतेचे स्वरूप

**प्रस्तावना :**

प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये पश्चिम महाराष्ट्रीय जीवनचित्रण करणाऱ्या खालील प्रादेशिक कादंबऱ्यांच्या आधारे समाजवास्तवाचा शोध घेण्याचा प्रयत्न आहे.

| | |
|---|---|
| १. कसे दिवस जातील | ना. वि. कुलकर्णी |
| २. शिपाई | ना. वि. कुलकर्णी |
| ३. पाणकळा | र. वा. दिघे |
| ४. गावगुंड | ग. ल. ठोकळ |
| ५. उघड्या जगात | म. भा. भोसले |
| ६. बळी | विभावरी शिरूरकर |
| ७. पवनाकाठचा धोंडी | गो. नी. दांडेकर |
| ८. माचीवरला बुधा | गो. नी. दांडेकर |
| ९. बनगरवाडी | व्यंकटेश माडगूळकर |
| १०. फकिरा | अण्णाभाऊ साठे |
| ११. माकडीचा माळ | अण्णाभाऊ साठे |
| १२. वारणेचा वाघ | अण्णाभाऊ साठे |
| १३. बारी | रणजित देसाई |
| १४. माझा गाव | रणजित देसाई |
| १५. टारफुला | शंकर पाटील |
| १६. देव चालले | दि. बा. मोकाशी |
| १७. गोतावळा | आनंद यादव |
| १८. इजाळं | उत्तम बंडू तुपे |
| १९. कुणाच्या खांद्यावर | बा. ग. केसकर |
| २०. चौंडकं | राजन गवस |

२१. कागूद आणि सावली आनंद पाटील

२२. पाचर रामचंद्र पाठारे

घाटमाथ्यावरील मावळ आणि माणदेशासह प. महाराष्ट्रीय जीवनाचे स्वरूप कादंबऱ्यांमधील घटनाप्रसंग आणि व्यक्तींच्या कृतीउक्तींतून न्याहाळता येईल म्हणून उपरोल्लेखित कादंबऱ्यांचे विगमनात्मक पद्धतीने विश्लेषण करून निष्कर्ष नोंदविण्याचा येथे प्रयत्न आहे.

**स्वातंत्र्यपूर्व काळातील पश्चिम महाराष्ट्रीय जीवनातील प्रादेशिकतेचे स्वरूपः**

प्रकरणामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील प्रादेशिक जीवनाचे चित्रण करणाऱ्या कादंबंऱ्याचा विचार केलेला आहे. या कादंबऱ्यांचे लेखक हेही सामान्यपणे पश्चिम महाराष्ट्रामध्ये राहणारे आहेत आणि म्हणून त्यांच्या जीवनानुभवांचा प्रदेश त्यांनी लिहिलेल्या कादंबऱ्यांमधून रेखाटलेला आहे. र. वा. दिघे आणि गो. नी. दांडेकरांनीही हा प्रदेश रेखाटला आहे. अर्थातच या कादंबऱ्यांमधून एकूण पश्चिम महाराष्टाचा प्रदेश गोचर होत असला तरी तो या प्रदेशातील विविध ठिकाणांचा आहे असेही प्रत्ययाला येते. या प्रदेशातील प्रादेशिकतेचे स्वरूप ठरविण्यासाठी या प्रदेशाच्या अनुषंगाने किंवा या प्रदेशाचे चित्रण ज्या कादंबऱ्यांमधून झाले आहे अशा सर्वच कादंबऱ्यांचा विषय व व्याप्ती याद्दष्टीने साकल्याने विचार करणे या ठिकाणी शक्य झालेले नाही. यासाठी 'कसे दिवस जातील' आणि 'शिपाई' (ना. वि. कुलकर्णी), 'पाणकळा' (र. वा. दिघे), 'गावगुंड' (ग. ल. ठोकळ), 'उघड्या जगात' (म. भा. भोसले) या स्वातंत्र्यपूर्व काळात प्रसिद्ध झालेल्या पाच कादंबऱ्यांचा विचार केलेला आहे. त्याचबरोबर 'बळी' (विभावरी शिरूरकर), 'पवनाकाठचा धोंडी' 'माचीवरला बुधा' (गो. नी. दांडेकर), 'बनगरवाडी' (व्यंकटेश माडगूळकर), 'फकिरा, 'माकडीचा माळ', 'वारणेचा वाघ' (अण्णाभाऊ साठे), 'बारी', 'माझा गाव' (रणजित देसाई), 'देव चालले' (दि. बा. मोकाशी) आणि 'टारफुला' (शंकर पाटील) या स्वातंत्र्योत्तर काळात प्रसिद्ध झालेल्या परंतु स्वातंत्र्यपूर्व काळातील जीवनसंघर्ष रेखाटणाऱ्या अकरा कादंबऱ्यांचाही विचार केला आहे. अर्थात उपरोक्त कादंबऱ्यांमधून घडणारे पश्चिम-महाराष्ट्रातील प्रादेशिक जीवनाचे चित्रण हे प्रातिनिधिक स्वरूपाचे आहे, म्हणजेच या कादंबऱ्यांमधून घडणारे पश्चिम-महाराष्ट्रातील प्रादेशिक जीवनाचे चित्रण हे प्रातिनिधिक स्वरूपाचे आहे, म्हणजेच या कादंबऱ्यांच्या आधारे पश्चिम महाराष्ट्रातील प्रादेशिकतेचे स्वरूप सांगण्याचा प्रयत्न या ठिकाणी करण्यात आलेला आहे. हे स्वरूप सांगत असताना

कादंबरीचा विषय, कादंबरी लेखनाचा काळ आणि तत्कालीन जीवन, लेखकाच्या आकलनाच्या मर्यादा आणि लेखननिर्मितीच्या मर्यादा इत्यादींचाही विचार गृहीत धरणे क्रमप्राप्त झालेले आहे. प्रत्यक्षातील या प्रदेशातील जीवनाचे स्वरूप लक्षात घेऊन त्या त्या लेखकाच्या कादंबरीमध्ये ते कसे आले हे सांगण्याचाही प्रयत्न या ठिकाणी आहे.

पश्चिम महाराष्ट्र म्हणत असताना पुणे, अहमदनगर, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर या जिल्ह्यांतील प्रादेशिक वैशिष्ट्यांचा विचार या प्रकरणात अभिप्रेत आहे. हा प्रदेश तसा डोंगराळ आणि पठारी आहे. सह्याद्रीच्या रांगा आणि दऱ्याखोऱ्यांनी भरलेला आहे. याशिवाय माणदेश म्हणून ओळखला जाणारा या प्रदेशाचा काही भाग हा सतत अवर्षणग्रस्त, पाऊसमान कमी, जमिनीची प्रत हलकी, यामुळे केवळ जमिनीच्या मशागतीवर किंवा उत्पादनावर या ठिकाणच्या लोकांचा उदरनिर्वाह होणे अवघड आहे. यामुळे दारिद्य-बकालपणा आणि पोट भरण्यासाठी मुंबईसारख्या शहरांमध्ये जाणाऱ्यांची संख्या बरीच आहे. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये या भागामध्ये संस्थानिकांची आणि इंग्रजांची राजवट होती. त्यामुळे काही ठिकाणी इंग्रज अधिकाऱ्यांची वर्दळही होती. स्वातंत्र्यपूर्व काळात एकूणच शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प होते. तरी इतर प्रदेशांच्या तुलनेत शैक्षणिकदृष्ट्या हा भाग काहीसा जागृत असा दिसतो. नाना पाटलासारख्या क्रांतिकारकांचा या प्रदेशातला उदय आणि एकूण राजकीय जागृती या दृष्टीनेही महाराष्ट्राच्या इतर प्रदेशांच्या तुलनेत हा भाग अधिक जागृत वाटतो. सरंजामशाही आणि धनिकांचा मुजोरपणा हाही त्या काळामध्ये प्रकर्षाने जाणवणारा भाग होता. या दृष्टीने या ठिकाणी निर्देशित केलेल्या कादंबऱ्यांचा विचार करावा लागतो.

या ठिकाणी ना. वि. कुलकर्णी यांच्या १९२५ साली प्रसिद्ध झालेल्या 'कसे दिवस जातील' आणि 'शिपाई' या दोन कादंबऱ्यांचा विचार प्रथम केलेला आहे. यांपैकी 'कसे दिवस जातील' या कादंबरीमध्ये देशावरील ग्रामीण जीवनाचे चित्रण आलेले आहे. अर्थातच वर म्हटल्याप्रमाणे हा भाग कमी पावसाचा व निकृष्ट जमिनीचा आहे. अशा या भागातील शिवधडीच्या आबा आणि रखमा या जोडप्याची शोकांतिका सांगत असताना हा प्रदेश चित्रित झालेला आहे. 'दोन एकर जमिनीचा मालक असलेला आबा, सावकाराचे कर्ज न फेडल्यामुळे शेतजमीन, घर आणि गुरेढोरे गमावून बसतो आणि गावात पोट भरणे अशक्य झाल्याने मुंबईला कुटुंबासह जाऊन पोट भरण्याचा प्रयत्न करतो. परंतु निरक्षरता, भाबडेपणा, व्यसन यांमुळे संकटात सापडतो. संसाराचा गाडा सांभाळण्यासाठी आबाची बायको रखमा आटोकाट

प्रयत्न करते, परंतु शेवटी मुंबईमध्ये त्यांचा निभाव लागत नाही आणि अत्यंत विपन्न अवस्थेत ते गावी परततात. हे सांगण्याच्या निमित्ताने ना. वि. कुलकर्णी यांनी हा प्रदेश रेखाटला आहे. दुष्काळ, पोट भरण्यासाठी मुंबईला जाणे, यामधून या कादंबरीला देशावरच्या गावांची पार्श्वभूमी लाभलेली आहे. या परिसरातील पिके, निसर्ग, घाट, माळरान, नद्या, तेथील जत्रा, देव-देवता, धनगरांचे गजांचे खेळ आणि चक्रे आंबेकरी यांचे खेळ यांचा उल्लेख या कादंबरीत येऊन जातो. स्वातंत्र्यपूर्वकाळात ऊस आणि हळद या पिकांसाठी हा प्रदेश अधिक प्रसिद्ध होता. त्यामुळे या कादंबरीतील ऊस, हळद, शाळू इ. पिकांचा उल्लेख तो प्रदेश स्पष्ट करण्यासाठी आलेला आहे. या प्रदेशातील गुरेढोरे माळरानावर चरतात. आणि गावी पोट भरले नाही की तेथील माणसे मुंबईत जाऊन हमालीसारखी हलकी कामे करतात असे दिसून येते. या कादंबरीमध्ये निसर्गवर्णने आली आहेत. त्यातूनही या दुष्काळी प्रदेशाचे चित्रण येते.

या ठिकाणी ना. वि. कुलकर्णी यांच्या 'शिपाई' या कादंबरीचाही विचार केलेला आहे. 'कसे दिवस जातील' या कादंबरीच्या तुलनेत 'शिपाई' कादंबरीमधून येणारे प्रादेशिक चित्रण काहीसे धूसर असे आहे. याला कारण या कादंबरीचा विषय हाच आहे. कृष्णाकाकासारखा एक मुजोर धनिक निराबाईसारख्या विधवा स्त्रीची इस्टेट हडप करण्यासाठी जे कुटिल डाव खेळतो व त्याला शह देण्यासाठी खंबीरपणे निराबाईच्या पाठीशी उभा राहणारा मल्हारी यांच्या संघर्षातून ही कादंबरी घडली आहे. खरेतर कृष्णाकाकासारखे कुटिल नीतीचे मुजोर धनिक कमीअधिक प्रमाणात सर्वच गावांतून असतात. परंतु या कादंबरीमध्ये सक्तीने सैन्यामध्ये शिपाई म्हणून भरती करण्याचे जसे वर्णन आहे, त्याचप्रमाणे जंगलामधून फिरणाऱ्या रानडुकरांचे आणि त्यांनी केलेल्या पिकांच्या नासाडीचे वर्णन आहे. यातून हा प्रदेश सातारा जिल्ह्याचा आहे हे लक्षात येते. या प्रदेशाचा डोंगराळपणा, दऱ्याखोऱ्या, उसासारखे पीक आणि लेखकाने केलेले निसर्गाचे वर्णन यातून हा प्रदेश सिद्ध होतो. याशिवाय या कादंबरीतील संवाद आणि संवादासाठी वापरलेली भाषा, म्हणी, वाक्‌प्रचार आणि वैशिष्ट्यपूर्ण शब्दकळा यांमधूनही हा प्रदेश ओळखता येतो. याशिवाय लग्नकार्यासारख्या प्रसंगामध्ये आढळणारे रीतिरिवाज यांच्यामुळेही तो ओळखता येतो.

या दोन्ही कादंबऱ्यांच्या संदर्भात आपल्या असे लक्षात येईल की, एक वैशिष्ट्यपूर्ण प्रदेश हेतुतः चित्रित करणे असा लेखकाचा हेतू दिसत नाही, तर ग्रामीण जीवनातील वैशिष्ट्यपूर्ण अशा काही घटनांचा व तत्कालीन परिस्थितीच्या आधारे कादंबरीचे

कथानक सांगणे हाच हेतू दिसून येतो. त्यामुळे जी वैशिष्ट्ये हाती येतात ती उपरोक्त म्हटल्याप्रमाणे विखुरलेल्या लेखन-घटकांच्या आधारेच.

ग्रामीण व आदिवासी जीवनाचे रोमँटिक चित्रण करणाऱ्या र. वा. दिघे यांच्या कादंबरीतून निसर्ग-प्रणयाला पार्श्वभूमी म्हणून आला आहे. शृंगाराची भावना चित्ताकर्षक आणि भडक रीतीने साकार करण्यासाठी ग्रामीण परिसराचा पार्श्वभूमीसारखा वापर केला आहे. त्यांच्या 'पाणकळा' या स्वप्नरंजनात्मक कादंबरीत पश्चिम महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील पावसावलंबी लोकजीवनाचे चित्र रेखाटले आहे. लेखक कोकणातील असूनही मोठ्या सामर्थ्याने देशावरील प्रदेश त्यांनी साकार केला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील पारंपरिक गावगाड्याची पडझड हा कादंबरीचा प्रमुख विषय असला तरी येथे राया-सोनी आणि रैना-पहाडजीच्या प्रणयालाच अधिक महत्त्व प्राप्त झालेले दिसते. तसेच सुष्ट-दुष्टांच्या संघर्षावर भर दिलेला दिसतो. ही कादंबरी ग्रामसुधारणावादी विचारांमुळे बोधवादी झाली आहे. लेखकाच्या लेखननिर्मितीच्या मर्यादा स्पष्ट जाणवतात. स्वप्नरंजन, रहस्य, कल्पनाविलास, अद्‌भुतरम्यता, नाट्यात्मकता यांमुळे वास्तव शबलित झाले आहे. प्रादेशिकता धूसर झाल्यासारखी वाटते. तरीही तुटक घटना-प्रसंग आणि व्यक्तींच्या कृतिउक्ती तसेच सांस्कृतिक विशेष, संवादासाठी केलेला बोलीचा वापर आणि भू-प्रदेश-निसर्गवर्णनातून 'प्रदेश' टिपता येतो.

प्रदेशाचा लोकजीवन आणि प्राणीजीवनावर परिणाम होतो. जसे दुष्काळामुळे जनावरांच्या बरगड्या उघड्या पडल्या, लोक मुंबईकडे निघाले यातून प्रदेश सिद्ध होतो. कर्परानदी, आकाशगड, चंद्रनगर, सजलपूर या पूर्वीच्या दंडकारण्य किंवा दक्षिणापथाची पार्श्वभूमी कथानकाला लाभली आहे. काळीजमीन, नदीकाठची चुनखडी, पावसावलंबी शेती, विहिरीवरील मोट, संत्री, मोसंबी, बोर, गहू, बाजरी, शाळू, तीळ, कांदे, गाजरे ही पिके, तसेच आकाशगड परिसरातील सायळी, कळंब, मोह, पळस, पांगारा, सारी या वृक्षवेली; सायाळ, सांबर, भेकर हे प्राणी व नाचणी हे धान्य यातून प्रदेश चित्रित झाला आहे. दृकप्रत्ययी-रेखीव निसर्ग, श्रद्धा-समजुती लोककथादी संस्कृती विशेष आणि संवादासाठी वापरलेल्या बोलीभाषेतून म्हणी-वाक्प्रचारांतून प्रदेश गोचर होतो. निसर्ग आणि मानवी जीवनातील भावपूर्ण एकतानतेची ही कथा आहे.

या प्रकरणामध्ये जी चौथी कादंबरी आधारभूत मानली आहे ती म्हणजे

१९४६ साली प्रसिद्ध झालेली ग. ल. ठोकळांची 'गावगुंड' ही कादंबरी होय. या कादंबरीमधून दृगोचर झालेला परिसर हा सातारा जिल्ह्यातील विटा-खानापूर-तासगाव या गावांचा परिसर आहे. सातारा जिल्ह्याच्या स्वातंत्र्यपूर्व काळातील राजकीय आणि सामाजिक परिस्थितीचा विचार केला तर त्याला क्रांतिसिंह नाना पाटलांच्या राजकीय चळवळीची पार्श्वभूमी आहे. या दृष्टीनेच ग. ल. ठोकळ यांनी या कादंबरीचे कथानक घेतलेले आहे. राजकीय क्रांतीसाठी हिंसक कारवायांचा अवलंब करणारे क्रांतिसिंह नाना पाटील आणि त्यांचे सहकारी यांचा आदर्श असणारा गुणाजी म्हणूनच या कादंबरीत येतो. खाऊनपिऊन सुखी असणारे कुटुंब आपल्या मुलाला पुण्यासारख्या शहरामध्ये शिकण्यासाठी त्या काळात पाठवीत असत, त्याचप्रमाणे फौजदार, वकील यांसारख्या पांढरपेशा घरातील मुलींना शिक्षण घेण्याची एक फॅशन त्या काळात होती. या कादंबरीतील मुसळगावच्या कुशाबा चव्हाणाचा मुलगा जयवंत हा पुण्याच्या शेतकी कॉलेजमध्ये शिकतो, तर पिसाळ फौजदाराची मुलगी लीला साताऱ्याच्या शाळेत शिकते असे दाखविले आहे. ग. ल. ठोकळांच्या या लेखनावर ना. सी. फडक्यांच्या लेखनातील रंजकतेचा आणि कल्पनारम्यतेचा खूपच प्रभाव आहे. त्यामुळे जयवंत आणि लीला यांचे प्रेम आणि त्याची सफलता सांगणे हाच मुख्य हेतू या कांदबरीचा दिसून येतो. यानिमित्ताने धार्मिक वृत्तीचा अवळोजी पाटील आणि आपल्या घराण्याचे हुद्द्याचे मोठेपण सांभाळणारा पिसाळ फौजदार इत्यादींचे दर्शन या ठिकाणी घडते. दरोडेखोर बनलेला गुणाजी, त्याच्या साथीदारांसह श्रीमंतावर हल्ले चढवितो, दरोडे घालतो, गरीबांना पैसा वाटून टाकतो. हे सर्व त्या परिसराचे त्या काळातील वैशिष्ट्य आहे. याशिवाय या कादंबरीमध्येही वर्णन केलेले चढउताराचे रस्ते, डोंगराचा काळाकभिन्न सुळका, गुहा, करवंदीच्या जाळ्या, कांडीसांभर, जांभळ, शेरताटी, तरवड इ. झाडाझुडपांमधूनही आणि ज्वारी, हरभरा, गहू, भुईमूग इ. पिके, वाघ, रानडुक्कर आणि दरोडेखोर यांचा उपद्रव या सर्वांमधून हा प्रदेश चित्रित झाला आहे. अर्थातच या ठिकाणी सह्याद्री पर्वताच्या डोंगररांगा, घनदाट जंगलामध्ये आश्रय घेणारे दरोडेखोर यांच्या आधारे हा प्रदेश निश्चित करता येतो. म्हणजे स्वराज्यासाठी क्रांतिकारक कृत्य करून स्वराज्य मिळवावे, आपल्या एखाद्या तरी मुलाने शहरात जाऊन शिकावे, मुलीने शिकावे ही जागृती असलेला हा प्रदेश आहे. या कादंबरीमधूनही लग्नविधी, सण-उत्सव, लोकसमज यांचे उल्लेख येतात. आचार-रीतीभातींचीही वर्णने येतात. त्यातूनही हा प्रदेश निवडता येतो. मात्र या कादंबरीमधून विशेषतः संवादाच्या

माध्यमातून आलेली भाषा त्या प्रदेशाला न्याय देणारी आहे असे वाटत नाही.

'उघड्या जगात' ही म. भा. भोसले यांची कादंबरी सातारा-सांगलीच्या परिसराचे दर्शन घडविणारी कादंबरी आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात ग्रामीण भागामध्ये असणारी खाजगी सावकारी आणि त्यातून गरिबांचे होणारे शोषण हा या कादंबरीचा मुख्यतः विषय आहे. म. भा. भोसले यांच्या लेखनावरही ना. सी. फडक्यांचा मोठा प्रभाव असल्याचे जाणवते. कारण ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्र रेखाटण्यापेक्षा ग्रामीण जीवनातील रंजककथा सांगणे हाच त्यांच्या लेखनाचा हेतू दिसतो. त्यामुळे ग्रामीण जीवनातील खाजगी सावकारी आणि त्यातून होणारे शोषण यांचे वास्तवपूर्ण चित्रण करण्यापेक्षा रंजकतेला त्यांच्या लेखनात अधिक वाव दिलेला आहे. त्यामुळे विशिष्ट अशा प्रदेशाचे आणि त्या प्रदेशातील लोकजीवनाचे निखळ दर्शन घडणे शक्य झालेले दिसत नाही. ग्रामीण जीवनाविषयी त्यांना प्रत्यक्ष अनुभव असला, त्या जीवनाविषयी जिव्हाळा असला, तरीसुद्धा ज्या तटस्थतेने, संयमित वृत्तीने त्यांच्या कथानकाला पार्श्वभूमी असलेल्या प्रदेशाचे दर्शन घडवायला हवे होते ते घडत नाही आणि म्हणून काही गावांची नावे, हरबरा, शाळू, मका इत्यादींसारखी पिके, झाडेझुडपे आणि निसर्गवर्णने यांतूनच हा प्रदेश निश्चित करावा लागतो. उन्मत्त काकासाहेब सावकार गरीब आणि निष्ठावंत कुळ असलेल्या जोती पवाराच्या मुलीवर - हौसावर - बलात्कार करतो आणि तिला रखेली म्हणून ठेवण्याचे मान्य करतो. कॉलऱ्याच्या साथीत जोती मेल्यानंतर हौसा मुंबईला निघून जाते. जोतीचा मुलगा सखाराम वडिलांच्या उपदेशाप्रमाणे इमाने-इतबारे काकासाहेब सावकाराची चाकरी करतो. परंतु काकासाहेब मात्र सतत अन्यायच करीत जातात. त्यांची मुलगी चंद्रा हिचे सखारामवर प्रेम असते. परंतु काकासाहेब त्यांचे लग्न करीत नाहीत आणि चंद्राही घर सोडून निघून जाते असे नाट्यपूर्ण कथानक या कादंबरीला लाभले आहे. या कादंबरीमध्ये उपरोक्त म्हटल्याप्रमाणे आलेली निसर्गाची, झाडाझुडपांची, पिकांची वर्णने त्या प्रदेशाला चित्रित करतातच, परंतु संवादाच्या माध्यमातून येणारी भाषा तो प्रदेश साकार करते. याशिवाय कॉलऱ्यासारखी साथ आणि ती कमी व्हावी म्हणून केले जाणारे नवससायास आणि तमाशे, जलसे इत्यादींच्या वर्णनांमधूनही हा प्रदेश साकार होतो. स्वातंत्र्यपूर्व काळातील गावाचा कारभार पाहणारी पंचमंडळी आणि त्यांच्या आज्ञेत राहणारा गाव यांचे दर्शनही येथे घडते. या कादंबरीमध्ये स्वातंत्र्यपूर्वकाळातील पं. नेहरूंच्या एका सभेचेही वर्णन आलेले आहे. परंतु त्यामुळे

कादंबरीत चित्रित झालेल्या प्रदेशवैशिष्ट्यांमध्ये काही भर पडलेली आहे असे दिसत नाही. ग्रामीण भागातील धनदांडग्यांचा मुजोरपणा आणि गरीब कष्टाळू माणसांवर होणारा अन्याय, जुलूम-जबरदस्ती, निष्ठा यांवरच लेखकाने अधिक भर दिलेला आहे. या कादंबरीत बापूराव याने पुण्यात बी.ए. पर्यंतचे शिक्षण घेतले अशा प्रकारचा उल्लेख आहे. किंवा जोती हा शेवटच्या क्षणी 'सखा शाळेत गेला का ?' म्हणून विचारतो, यावरून त्या काळात त्या भागात शिक्षणविषयक जागृती कशी सुरू होती याचेही दर्शन घडते. गरिबी आणि श्रीमंती दोन्हीही किती टोकाच्या अवस्थेत होत्या हेही लक्षात येते. म. भा. भोसले यांना ग्रामीण जीवनाचे वास्तवपूर्ण चित्र आपणास रेखाटावयाचे असून, ग्रामीण जीवनातील काही प्रश्नांकडे लक्ष वेधावयाचे आहे हा हेतू नसल्यामुळे त्यांच्या लेखनातून एकूणच प्रदेशदर्शनाला मर्यादा पडलेली आहे.

या ठिकाणी ज्या कादंबऱ्यांचा अभ्यास केला त्या सर्व कादंबऱ्यांच्या तुलनेमध्ये स्वातंत्र्योत्तर काळामध्ये म्हणजेच १९५० साली प्रसिद्ध झालेल्या विभावरी शिरूरकर यांच्या 'बळी' या कादंबरीची विशेष नोंद घ्यावी लागते. अर्थात जरी ही कादंबरी १९५० मध्ये म्हणजे स्वातंत्र्योत्तर काळात प्रकाशित झाली असली तरी या कादंबरीमधून चित्रित झालेले जीवन स्वातंत्र्यपूर्व काळातीलच आहे. या कादंबरीमधून साकार झालेला प्रदेश सोलापूर जिल्ह्याच्या आसपासचा आहे. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये गुन्हेगार म्हणून समजल्या जाणाऱ्या जातीच्या लोकांच्या खास अशा वसाहती असत. काटेरी तारांचे कुंपण या वसाहतीभोवती असे. सेटलमेंट असे त्याला म्हटले जाई. मांगगारूडी ही जमात मुख्यतः चोऱ्या करणाऱ्यांची जमात म्हणून ओळखली जात असे. त्यांच्या या चोरी करून जगण्याच्या प्रवृत्तीला दूर करून, त्यांच्यावर काही संस्कार करून, सुशिक्षित करून बदल घडविण्याचा प्रयत्न त्या काळामध्ये शासन करीत होते. परंतु शासनाचे धोरण असे चांगले असले तरी इंग्रज सरकारचे अधिकारी किंवा ख्रिश्चन मिशनरी त्यांच्यावर अन्याय व अत्याचार कसे करीत असत हे सांगण्याचा विभावरी शिरूरकरांचा प्रयत्न आहे. खोऱ्यातील चोरवस्ती एका बाजूला तर स्पृश्य धनिकांची गगनवाडी दुसऱ्या बाजूला असे चित्र उभे केले आहे. गगनवाडीतील स्पृश्यांना चोरवाडी काहीही घेणे-देणे नाही. त्यांच्या सुख-दुःखाची त्यांना कल्पना असण्याचे कारणही नाही. परंतु, कुंपणातील गुन्हेगार समजल्या जाणाऱ्या लोकांच्या मुलांना सक्तीने शिक्षण दिले जात असे. यासाठी गांधी बोर्डिंग स्वतंत्रपणे मुलांच्या निवास-भोजनाची

व्यवस्था करीत असे. श्रीमंत मुलांचे बारशाचे जेवण जेवल्यानंतर त्याने उकिरड्यावर फेकून दिलेल्या पत्रावळीवर कुत्र्यांप्रमाणेच माणसांचीही झुंबड पडते. एवढी या दोन समाजांमध्ये दरी आहे. या कादंबरीत बारा वर्षे गांधी बोर्डिंगमध्ये शिक्षण घेतलेल्या मांगगारूडी आबाने आपल्या जमातीला सुधारण्याचा केलेला प्रयत्न आणि त्याला शत्रू समजून त्याच्याच जमातीने त्याचा केलेला वध या कादंबरीत चित्रित केलेला आहे. अज्ञानी, परंपरेने बदनाम झालेल्या, अन्याय, अत्याचाराने पिळल्या गेलेल्या समाजाला स्पृश्य-समाजाविषयी एक अविश्वासाची भावना वाटणे साहजिक आहे. त्यामधूनच आबाचा खून ही घटना घडते.

या कादंबरीमध्ये सेटलमेंट, मांगगारुड्याचा उल्लेख, संवादातून आलेली भाषा, फासेपारधी, त्यांचा फासे टाकण्याचा खेळ, दारू पिऊन बेफामपणे हाणामारी करणारी माणसे, भाटांच्या पोरीचा नाच इत्यादींमधून या प्रदेशातील तात्कालीन राजकीय जीवन चित्रित झाले आहे. परंतु विभावरी शिरूरकर यांनी हे सर्व लेखन एक सामाजिक समस्या नजरेस आणून देण्याच्या हेतूनेच केलेले आहे. समाजजागृती हा या लेखनाचा प्रमुख हेतू आहे आणि त्यामुळे त्यांच्या लेखनाला आपोआपच मर्यादा पडलेल्या आहेत. ज्या जीवनाचे चित्रण त्यांना करावयाचे होते ते चित्रण करण्यामागे जीवनातील दाहकता हीच प्रामुख्याने स्पष्ट करावयाची होती. त्यामुळेसुद्धा त्यांच्या लेखनाला प्रादेशिक वैशिष्ट्ये स्पष्ट करण्याच्या दृष्टीने मर्यादा पडल्या असल्यास नवल नाही. परंतु त्या काळातील इंग्रज अधिकाऱ्यांचे अत्याचार, ख्रिश्चनधर्मप्रसारकांची धर्मप्रसाराची वृत्ती, अन्याय आणि अत्याचारांमध्ये पिचून निघणारा गुन्हेगार म्हणून समजला गेलेला समाज यांचे अत्यंत पोटतिडकीने लेखिकेने दर्शन घडविले आहे.

'पवनाकाठचा धोंडी' आणि 'माचीवरला बुधा' या दोन कादंबऱ्यांमधून गो. नी. दांडेकरांनी पठारी प्रदेशातील लोकजीवनाचे आणि मानव-निसर्ग यांच्या नात्याचे सम्यक् दर्शन घडविले आहे. बदलत्या परिस्थितीबरोबर बदलण्याचे नाकारणारा, पूर्वजांबद्दल अभिमान बाळगणारा धोंडी हवालदार आणि त्याच्या विरोधात उभा असलेला त्याचा धाकटा भाऊ कोंडी यांच्या संघर्षातून मावळप्रदेशातील लोकजीवन दर्शन घडविणे हा 'पावनाकाठचा धोंडी' या कादंबरीचा उद्देश आहे. ऋतुचक्राप्रमाणे रंग बदलणारा, मानवी जीवनावर परिणाम करणारा निसर्ग, घाटमाथ्यावरील पावसावलंबी शेती, त्यामुळे दारिद्र्य, बकालपणा आहेच. पोटासाठी मुंबईसारख्या उद्योगनगरीकडे धावण्यातून 'प्रदेश' साकार होतो. सांस्कृतिक विशेष, लोकगीत, समजुती, देवदेवतांवरील

श्रद्धा, सणउत्सव, गावचा वाघोबा, तुंगी गडावरील महादेव, घराण्यातील वीराबद्दलचा अभिमान, बैलपोळा, इर्जिक, जत्रेतील कुस्त्या इत्यादींतून सामाजिकता प्रकट होते. 'बलुतेदारीच नव्हे तर पारंपरिक गावगाडा मोडकळीस आला' हा या कादंबरीचा विषय आहे. भावामधील विसंवादामुळे सामाजिकता अधिक ठळक झाली आहे. घाटमाथ्यावरील मावळप्रदेश, पवना खोरे, लोणावळा, वडगाव मावळ, चाकण, पडझड झालेला तुंगी किल्ला, डोंगर आणि झुंझार माची तसेच भात, नाचणी, ज्वारी, बाजरी, हरभरा, खुरासणी, कांदा, लसूण, मेथी, शेपू, वांगी, मुळा, मिरच्या इ. पिके आणि सायाळ, कोल्ही, डुक्कर इत्यादी जंगली प्राणी, बाभूळ, हिवर, पिंपरी, आंबा, जांभुळ, करवंदाच्या जाळ्या इत्यादींतून घाटमाथ्यावरील मावळच्या पठारी प्रदेशाला स्वतंत्र व्यक्तित्व लाभले आहे. तसेच मावळी बोलीतील निवेदन-संवाद, नावीन्यपूर्ण शब्द, म्हणी-वाक्प्रचारादीतून 'प्रदेश' साकार होतो.

'माचीवरला बुधा' मध्ये त्यांनी राजमाचीच्या टेंबराईल पठारावरील संवेदनाक्षम, सहृदय, मातृभूमीवर प्रेम करणारा, निसर्गवेडा, बुधा चव्हाटे मानव आणि निसर्ग संबंधाच्या पार्श्वभूमीवर जिवंत केला आहे. ठाकरांचे आणि मावळ पठारी प्रदेशातील लोकजीवन चित्रणही प्रसंगानुरूप केले आहे. बुधाचा अलौकिक गोतावळा, शेती, विमान, घार, न्हावी, बुलबुल, भोरड्या, चिमण्या, सातबाया, मैना, खारूताई, कुत्र्याचे पिलू, आवळीचे रोपटे, सरडा, बकरी, म्हैस असा आहे. सावा, नाचणी, भात, खुरासनी, वाल ही पिके; खैर, सौंदड, अडुळसा, मोह, हिरडा, आईन, पिंपळ, पिंपरी, जांभूळ, उंबर, पांगारा, निगडी, आवळी, आंबे, करंजी, किंजळ, येकळी, टेंभूर्णी, पळस, हिरणबेट, बांबूचे बेट, नांदुर्खी हे वृक्ष तर वाघ्या, कवंढाळ, जांभुळकी, रानजुई, रामेटा, घाणेरी, कारवी, सोनकी, तेरडा, चवेणी, नागपुष्पी इत्यादी वेली; वटवाघूळ, घार, खार, चिमण्या, कोल्हे, लांडगे हे पशुपक्षी तसेच राजमाचीचे टेंबराईल पठार, श्रीवर्धन, मनरंजन किल्ले, डोंगर, जंगल, एका बाजूला तळ कोकणची दरी, खंडाळा, लोणावळा रेल्वेमार्ग, ऋतुचक्र, पर्वतकडे, दऱ्या, तळी, भातखाचरे आणि वृक्षवेली यांनाही येथे व्यक्तित्व लाभले आहे. ज्ञानोबा-तुकोबांचे अभंग, गौळणी, वासुदेव, भूपाळ्या आणि बहिरोबावरील श्रद्धा, लोकसमज तसेच बोलीतील शब्द, शिव्या, म्हणी, वाक्प्रचारातून प्रदेश साकार होतो. मानव-निसर्ग एकरूपतेचे पठारी प्रदेशाच्या पार्श्वभूमीवर लोकजीवनदर्शन घडविणारी ही कलात्मक प्रादेशिक कादंबरी आहे.

व्यंकटेश माडगूळकरांच्या १९५५ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'बनगरवाडी' चा विचार येथे केला आहे. या कादंबरीत अवर्षणग्रस्त माणदेशातील धनगरांचे जीवनचित्रण आलेले आहे. हा प्रदेश कमी पावसाचा आणि निकृष्ट जमिनीचा आहे. धनगरांचे जीवनचित्रण करताना हा प्रदेश चित्रित झाला आहे.

दशम्यांचे पेंडके घेऊन राजाराम सौंदणीकर मास्तर माळरानावर वसलेल्या उजाड वाडीत येतो. गावच्या धनगरांच्या पोरांना शिकविण्याचा प्रयत्न करतो आणि त्याबरोबर धनगरांच्या जीवनाशी समरस होतो. दुष्काळामुळे जगण्यासाठी मेंढरांबरोबर गाव सोडून लोक परगावी जातात. मास्तरही 'बनगरवाडी' सोडून परत जातो. लेखकाच्या स्वानुभवाचा हा प्रदेश आहे. माणनदीच्या काठच्या माणदेशातील विटे-आटपाडी या औंध संस्थानातील पंतसरकारच्या राजवटीतील अवर्षणग्रस्त प्रदेशातील 'धनगरवाडी'तील उपेक्षित धनगरांचे स्वातंत्र्यपूर्व काळातील खडतर लोकजीवनाचे चित्रण लेखकाने केले आहे. उजाड माळरान, बाभभीची झाडे, मुरमाट्यावरील हिरवे भुंगे, तरवड-नेपती, बोराटीची झुडपे, टोळ, सरडे, कीटक, मुंग्या, गुंडीकिडे, घोरपड, बेडूक, कावळे, साळुंक्या, चिमण्या, वाणी, आणि बाजरीची तांबडी राने, हुलगे, तूर, मटकी, ज्वारी, करडई, हरबरा इ. पिके, धनगरांच्या लोकजीवनावर परिणाम करणारे उन्हाळा, पावसाळा, हिवाळा हे ऋतुचक्र आणि निसर्गवर्णनातून 'प्रदेश' सिद्ध होतो.

निरक्षरता, अज्ञान, दारिद्र्य या समाजामध्ये असून औंध संस्थानच्या 'पंतसरकार' या राजाबद्दलच्या आदरातूनही प्रादेशिकता दृगोचर होते. त्यांचे सण, उत्सव, लोककथा, रूढी, परंपरा, माउली आईवरील श्रद्धा, गावपंचायतीने भांडण मिटविण्याची किंवा न्यायदानासाठी धनगरांचे महादैवत बोलाविणे, सामुदायिक विवाह पद्धती, नवीन मेंडक्याला बेण्यासाठी शेलक मेंढरू देणे या सर्वांमधून प्रदेश निवडता येतो. या सर्वांवरून 'बनगरवाडी'चा आत्माच प्रादेशिक असल्याचे स्पष्ट होते.

वारणेच्या खोऱ्यातील मानवसमूहाचे जीवनदर्शन घडविणारा कादंबरीकार 'अण्णाभाऊ साठे' यांनी 'फकिरा' (१९५९), 'माकडीचा माळ' (१९६३), 'वारणेचा वाघ' (१९६८ या तीन कादंबऱ्यांमधून स्वातंत्र्यपूर्व काळातील प. महाराष्ट्रातील प्रादेशिक जीवनाचे चित्रण केले आहे. परंतु नाट्यावर भर, रोमहर्षक प्रसंगाची रेलचेल, कुणाचातरी कुणाविरुद्ध लढा, त्यामागे गृहीत धरलेले एक सनातन न्यायतत्त्व ही अण्णाभाऊंच्या लेखणीची बलस्थाने आहेत. त्यामुळे पूर्णांशाने प्रादेशिकता प्रकट होत नाही. तिला धूसर, अस्पष्ट व साधनाचे स्वरूप प्राप्त होते.

'फकिरा' कादंबरीचा विषय हा राणोजीचा मुलगा फकिराने अन्याय-अत्याचार करणाऱ्या इंग्रज सरकारविरुद्ध दिलेला अयशस्वी लढा हा आहे. 'जोगणी' विषयीच्या लोकसमजांचा सांस्कृतिक धागाही गुंफला आहे. गावात 'जोगणी'ची जत्रा भरली तर संकटे येत नाहीत, समृद्धी येते; या लोकसमजापोटी वाटेगावचा राणोजी मांग शिगावच्या जोगणी पळविताना गावासाठी प्राणांचे बलीदान करतो. गावात 'जोगणी'ची जत्रा भरते. ह्या जोगणी विषयीच्या लोकसमजातून 'प्रादेशिकता' टिपता येते.

सनदशीर शिपाई म्हणून पारंपरिक गावगाड्यांमध्ये मानकरी असलेल्या झुंझार वृत्तीच्या मांग जातीला कायद्याने गुन्हेगार ठरविले जाते. त्यांची झुंझार वृत्ती नष्ट करणे, त्यांना लाचार बनविणे हा इंग्रज शासनाचा उद्देश असतो, म्हणून त्यांच्यासाठी सक्तीची हजेरी केली जाते. विनाचौकशी हद्दपार केले जाते. त्यामुळे 'फकिरा' मांग जातीला जगविण्याचा प्रयत्न करतो. हजेरीच्या निमित्ताने अन्याय, अत्याचार करणाऱ्या रावसाहेब पाटलाला शासन करून पंताच्या सांगण्यावरून गाव सोडतो. डोंगरदऱ्यांत लपतछपत राहून दरोडे घालतो. इंग्रज सरकारशी लढा देतो. पण इंग्रजांनी सर्व मांगांना 'दारकोंडं' करून नेल्यांच्या छावणीत ओलीस ठेवल्यानंतर आप्तेष्टांच्या प्रेमाखातर व पाठबळाअभावी सरकारला शरण जातो, यातूनही प्रदेश निवडता येतो.

सांगली जिल्ह्यातील वारणेपासून कृष्णेपर्यंतच्या सुपीक प्रदेशाची आणि सह्याद्रीच्या डोंगररांगा, तांबखडी, सातदरे, घनदाट जंगलातील सागवान, पांगीरा, निवडुंग, वेगाने धावणारा वारा यातून डोंगराळ 'प्रदेश' निश्चित करता येतो. ऋतुचक्राप्रमाणे रंग बदलणारा निसर्ग आणि बोलीतील संवाद तसेच लोकसमजातून प्रादेशिकता स्पष्ट होते. 'जोगणी' खास प्रादेशिक आहे; परंतु भडक, अतिशयोक्त, रोमहर्षक प्रसंग आणि नाट्यात्मकतेमुळे प्रस्तुत कादंबरीतील 'प्रादेशिकता' शबलित झाली आहे.

उपेक्षित भटक्या-विमुक्तांचे जीवनचित्रण करण्याच्या प्रेरणेतून 'माकडीचा माळ' या कादंबरीचे लेखन झाले आहे. यंकू माकडवाला आणि पर्वती डवरी यांच्यातील सूडभावना आणि येमू-दुर्गाच्या प्रेमाचे चित्रण हा या कादंबरीचा विषय आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळातील समाजजीवन चित्रण येथे केले आहे. कारण पारंपरिक गावगाड्यातील कामगार पोलिस पाटलाचा दरारा, पंच आणि पाटील यांनी न्यायदान करणे यांतून 'काळ' स्पष्ट होतो. तसेच सांगली जिल्ह्यातील वारणा-कासारी नदीच्या खोऱ्यातील काळगाव-चांदोली राधानगरी या 'प्रदेशाची' पार्श्वभूमी या जीवनदर्शनास लाभली आहे. फोंड्यामाळ, सह्याद्रीच्या डोंगररांगा, घनदाट जंगल, भाताचे पीक तसेच

कुकुड कोंबडे, मोर, ससेमोरंगी, ससे, वानर, गिधाडे, कावळे इ. पशुपक्षी आणि निसर्गवर्णन, चोर-दरोडेखोरांच्या दहशतीचे वर्णन आणि वैशिष्ट्यपूर्ण शब्दकळा यांतून 'प्रदेश' टिपता येतो. तसेच उपेक्षितांचे धर्म, कर्म, जगण्याची रीत, दैवतं आणि दैवतांच्या पताका वेगवेगळ्या असतात. पापपुण्याच्या कल्पना-परंपरा, चालीरीती, दैवकाशी किंवा जातकाशीने न्यायदान करणे, वीरपूजन यांतून भटक्यांच्या जीवनातील 'प्रादेशिकता' दृग्गोचर होते. याप्रमाणेच प्राथमिक पातळीवरचे जीवन ते जगतात. भिक्षा मागून, शिकार करून ते उपजीविका करतात. अन्न, वस्त्र, निवारा या प्राथमिक गरजा ते पूर्ण करू शकत नाहीत. त्यांची शक्ती 'अन्न' मिळविण्यासाठी खर्च होते. ही उपेक्षितांच्या जीवनातील 'प्रादेशिकता' निवडता येते. परंतु या कादंबरीत प्रादेशिकतेचे सगळे घटक बघावयास मिळत नाहीत. प्रादेशिकता धूसर झाली आहे. याचे कारण विषयाच्या अंगभूत मर्यादेत आणि भटक्या विमुक्तांच्या जीवनातच शोधावे लागते. त्यांचे जीवनचित्रण करणे हा लेखकाचा मुख्य उद्देश आहे. त्या अनुषंगाने 'प्रदेश' चित्रण आले आहे.

'वारणेचा वाघ' ही अण्णाभाऊ साठे यांची कादंबरी येथे आधारभूत म्हणून निवडली आहे. सातारा-सांगली-कोल्हापूर परिसरातील स्वातंत्र्यपूर्व काळातील शेतकरी, शेतमजूर आणि दलित तसेच सावकारांच्या परस्पर संबंधाचे चित्रण करून त्यातून प्रदेश जिवंत केला आहे. "माणुसकीने वागणारा परोपकारी, चारित्र्यवान व गरीबांचा वाली असणारा एखादा साधा माणूस ग्रामीण जनतेला कसा देवासारखा वाटतो," हा या कादंबरीचा विषय आहे. या कादंबरीत राजसत्ता, धर्मसत्ता, न्यायसत्ता, शासन आणि सामान्य माणूस आणि निसर्ग- विरुद्ध परिस्थिती यांच्यातील नाट्य चित्रित करून त्याद्वारे स्वातंत्र्यपूर्व काळातील ग्रामीण जनतेची मानसिकता व्यक्त केली आहे. येथे जुलमी-बलाढ्य शासनाशी प्रतिकार करण्यायोग्य भौगोलिक वातावरणनिर्मिती लेखकाने केली आहे. वारणा नदी, सह्याद्रीच्या डोंगररांगा, घनदाट जंगल, अजिंक्यतारा किल्ला व वाघदरा, वाघजाईचं देऊळ, चिरेबंदी झरा, दऱ्या-भुयार शिखर यांसारख्या भौगोलिक परिसराचा बंडखोर आश्रय घेऊन स्व-संरक्षण करीत आणि गनिमी काव्याने सरकारशी लढा देत. कुमज, पाडळी, नांदगाव, कुंडलवाडी, बागणी, बहादूरवाडी, भेडसगाव, नेर्ले इ. खेड्यांचा उल्लेख या सर्वांतून हा 'प्रदेश' निवडता येतो.

स्वातंत्र्यपूर्व काळातील सावकारी पद्धती, सावकार आणि शासनाकडून जनतेचे होणारे शोषण, जातिभेद, अस्पृश्यता, विटाळ, बाटणे या कल्पना, दारिद्र्याला कंटाळून

तरुण दलितांनी धर्मांतर केले, त्यामुळे दलितांच्या नव्या-जुन्या पिढींत निर्माण झालेला संघर्ष, जुलमी शासनाला विरोध करण्यासाठी पुढे आलेले बंडखोर तरुण आणि सातारच्या भूमीवरील बंडखोर चिरडून काढण्याचे शासनाचे धोरण, निसर्गवर्णन, सण-उत्सवादींतून 'प्रदेश' गोचर होतो. भडक, अतिशयोक्ततेमुळे प्रस्तुत कादंबरीतील 'प्रादेशिकता' धूसर शबलित झाली असे दिसत असले तरी सामाजिकतेमुळे परिणामकारक 'प्रादेशिकता' दृगोचर होते हे मान्य करता येण्यासारखे आहे.

अण्णाभाऊ साठे यांच्या या तिन्ही कादंबऱ्यांच्या संदर्भात आपल्या असे लक्षात येईल की एक वैशिष्ट्यपूर्ण प्रदेश हेतूतः चित्रित करणे असा लेखकाचा हेतु दिसत नाही, तर ग्रामीण जीवनातील वैशिष्ट्यपूर्ण अशा काही घटनांच्या आणि तत्कालीन परिस्थितीच्या आधारे कादंबरीचे कथानक सांगणे हाच उद्देश दिसून येतो. त्यामुळे विखुरलेल्या लेखन- घटकांच्या आधारेच प्रादेशिक वैशिष्ट्ये टिपता येतात.

रणजित देसाई यांच्या 'बारी' (१९५९) आणि 'माझा गाव' (१९६०) या दोन कादंबऱ्या येथे आधारभूत म्हणून निवडल्या आहेत. 'बारी' आधुनिकीकरणामुळे नष्ट होऊ घातलेल्या बेरडांच्या संस्कृती विनाशाची कथा आहे. तेग्या आणि अन्य बेरड पारंपरिक जीवन जगले, परंतु परिवर्तन काळामध्ये नवी पिढी प्रवाहात सामील झाली. त्यांनी परंपरा नाकारली. त्यामुळे दोन पिढ्यांमध्ये विसंवाद निर्माण झाला. स्वातंत्र्यपूर्व तीसचाळीस आणि स्वातंत्र्योत्तर तीन वर्षांचा हा काळ आहे. कोल्हापूर-बेळगाव रस्त्यावरील सुतगट्टी गाव ते काकतीपर्यंतचा जंगलाने वेढलेल्या परिसरातील बेरडांच्या लोकजीवनावरील प्रभावाचे चित्रण लेखकाने केले आहे. कोकणच्या सीमेवरील सुतगट्टी, चनट्टी, नडगट्ट, दड्डी, भूतरामहट्टी, जड्डी, अलितग्या, हत्तिरगे, नरसिंगपूर आणि सारोळे या प. महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या कड्यालगतच्या गावांची भौगोलिक पार्श्वभूमी 'बारी'तील बेरडांच्या जीवनाला लाभली आहे. तांबडी माती, आंबा, ऐन, सागवान, किंडळ, चंदन, मोहाची उंच झाडी, डोंगररांगा, नदी, घनदाट जंगलातील बेरडांची वस्ती, या भू-प्रदेशाचा बेरडांच्या लोकजीवनावर परिणाम झाला आहे. ते शिकार, मासेमारी, पशुपालन, लाकूडफाटा-विक्री, दरोडे घालून जंगलाचा आश्रय घेणे, स्व-संरक्षण करणे, शेतात नाचणी पिकविणे असे निसर्गाश्रित आणि स्वावलंबी जीवन जगत होते. परंतु परिवर्तन काळात जंगलतोडीमुळे त्यांची जीवनशैलीच नष्ट झाली. उपजीविकेसाठी त्यांना स्थलांतर करावे लागले. नवीन रोजगारातून नव्या समस्या निर्माण झाल्या. यातून 'प्रदेश' निवडता येतो. देवीला कौल लावून उजवी

मिळताच 'चांगभलं' म्हणत 'कामगिरी'वर जाणे, किंवा लग्नातील 'ईरा'ला शांत करण्यासाठी लिंबू-कोंबडं-बकरू कापणे हे बेरडांच्या संस्कृतीचे खास वेगळेपण आहे. बेरडांना स्वातंत्र्य म्हणजे काय ? म. गांधी कोण ? सत्याग्रह म्हणजे काय ? हे माहीत नाही. देशावर कुणाची सत्ता आहे हे त्यांना माहीत नाही. या सामाजिकतेचे चित्रण केल्यामुळेच 'बारी'तील प्रादेशिकता ठळक दिसते.

ऋतुचक्राप्रमाणे रंग बदलणाऱ्या, लोकजीवनावर परिणाम करणाऱ्या निसर्गाचे एक पात्र म्हणून, बेरडांच्या मानसिकतेनुरूप केलेले चित्रण आणि कोल्हापूर–बेळगाव परिसरातील कर्नाटक-महाराष्ट्र सीमेवरील कोल्हापुरी बोलीचा संवादासाठी केलेला वापर. त्यात आलेले काही कानडी शब्द, हे त्या प्रदेशातील सांस्कृतिक देवाणघेवाण सूचित करतात. यातून 'प्रदेश' सिद्ध होतो. तात्पर्य, प्रादेशिक कादंबरी म्हणून 'बारी' सर्वार्थाने उत्तम आहे. पात्र म्हणून निसर्गाचे केलेले चित्रण, त्यातून निर्माण झालेले समाजजीवन, त्यातून साकारलेले मानवी व्यवहार, त्याचा माणसांच्या व्यक्तिमत्त्वावर व विचारसरणीवर होणारा परिणाम यांचा एकात्म आविष्कार या कादंबरीत झालेला आहे. कथानक, भौगोलिक परिसर, व्यक्तिदर्शन, समाजदर्शन, सांस्कृतिक जीवन आणि मानवी व्यवहार या सर्वांत प्रादेशिकतेचा अर्क उतरला आहे.

'माझा गाव' या त्यांच्या दुसऱ्या कादंबरीत प्रदेश-चित्रणाच्या दृष्टीचे विषयाच्या मर्यादा जाणवतात. प्रादेशिकतेच्या प्रभावातून साकारलेले जीवनचित्रण तुलनेने कमी जाणवते. येथे ग्रामीण समाजाच्या वरिष्ठ वर्गाच्या जीवनाचे, रीतिभातीचे, विलासाचे, शौर्याचे, औदार्याचे, नीतिमत्तेचे अधिक दर्शन घडते. त्यास प्रादेशिकतेचा स्पर्श फारसा नाही. उमाच्या रूपाने त्या काळातील 'गृहिणी'चे दर्शन घडते. एकेक पात्र हे एकेका गुणावगुणांना साकार करण्यासाठी दाखविले असावे असे वाटते. स्वातंत्र्यपूर्व काळातील नष्ट होऊ घातलेल्या पारंपरिक खेड्याचे वास्तव चित्र रेखाटण्याच्या प्रेरणेतून कादंबरीचे लेखन झाले आहे. महाराष्ट्रातील कोणत्याही खेड्यात असे घडू शकते, त्यामुळे प्रादेशिकता धूसर झाली आहे; तरीही सण-उत्सव आणि आरगल, सस्तर यांसारख्या प्रथांतून आणि भू-प्रदेश निसर्गाच्या वर्णनातून 'प्रादेशिकता' टिपता येते. जसे, बेळगावजवळचे ताम्रपर्णी नदीकाठचे देवगाव आणि होसूर, बेरडवाडी, मोहोनगे, काजेवाडीचा डोंगर, घाटमाथा, खडीचा बोडका माळ, खडकाळ गाडीवाट, सह्याद्रीच्या डोंगररांगा, ऋतुचक्र यांबरोबरच 'जकडं....तकडं' ही बोलीतील लकब आणि बोलीतील शब्दसंपदा यातूनही 'प्रदेश' जिवंत होतो. महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील

बेळगावच्या जवळच्या खेड्याचे हे लोकजीवन चित्रण आहे. यातून प्रदेश सिद्ध होत असला तरी 'बारी'च्या तुलनेत 'माझा गाव' मधील प्रादेशिकता फिकी पडल्याचे जाणवते.

स्वातंत्र्योत्तर काळातील मावळी जीवनाचे स्वरूप काही कांदबऱ्यांतून प्रकट झाले आहे. दि. बा. मोकाशींची 'देव चालले' ही ग्रामीण संस्कृतीच्या ऱ्हासाची किंवा व्यक्ती आणि परमेश्वर यांच्यातील अतूट नात्याची - श्रद्धेची ही कथा आहे. तीनशेहून अधिक वर्षे नरहरी देवाची मूर्ती उराशी कवटाळून बसलेल्या पळस गावातल्या श्रद्धाळू माणसांच्या भावभावनांचे चित्रण लेखकाने येथे केले आहे. विषयांतर्गत मर्यादेमुळे प्रादेशिकता धूसर-अस्पष्ट झाली आहे. कारण भूप्रदेशाचा लोकजीवनावरील परिणाम, अवर्षण, कुळकायदादी गोष्टींमुळे अन्य प्रदेशांतील लोकही शहरात जातात. देवादिकांबद्दल त्यांनाही श्रद्धा नसते; तरीही विखुरलेल्या काही घटनांप्रसंगांतून 'प्रदेश' टिपता येतो.

पुणे जिल्ह्यातील घाटमाथ्यावरील मावळ प्रदेशातील पळस गावची भौगोलिक पार्श्वभूमी कादंबरीला लाभली आहे. श्रद्धा-निष्ठा-प्रेरणा भिन्न असलेले चार भाऊ आणि काकी येथे जिवंत केले आहेत. जांभळे, आंबा, करवंदे, पळस, नदीतील कातळ, मंगलोरी कौलांचे किंवा नळाच्या कौलांची घरे, भातखाचरे, डोंगररांगा, झाडंझुडपं, कावळा, पोपट, कोकिळा, इत्यादींतून 'प्रदेश' चित्रित झाला आहे. संस्कृती विशेष स्थानिक देवदेवतांवरील श्रद्धा, समजुती आणि उपजीविकेसाठी शहरात जाणे, शहरीकरणाचा प्रभाव, पैशाला प्राप्त झालेले महत्त्व, धंदेवाईक वृत्ती, प्रेम-जिव्हाळा-आपुलकी नष्ट होण्यातून प्रदेश निश्चित करावा लागतो. तसेच 'आपले देव कोकणातून वर आले' (पृ. ३५) हे आबाचे वाक्य किंवा (आबाची बायको) ती स्वतः देशावरची होती (पृ. ७१) यावरून कादंबरीतील प्रदेश कोकण किंवा देशावरचा नाही तर घाटमाथ्यावरील मावळप्रदेश आहे हे स्पष्ट होते.

शंकर पाटलांनी 'टारफुला'(१९६४) मधून कोल्हापूर करवीर संस्थानातील स्वातंत्र्यपूर्व काळातील पारंपरिक खेड्यातील सत्ता-संघर्षाचे चित्र रेखाटले आहे. प्रादेशिक कादंबरी म्हणून 'टारफुला' ही अर्धीअधिक यशस्वी म्हणता येईल. कारण पूर्णतः प्रादेशिकतेचा रंग त्यात मिसळलेला जाणवत नाही. याचे कारण कादंबरीच्या विषयातच शोधावे लागते. पारंपरिक गावगाड्यातील दोन पिढ्यांच्या काळातील सत्तासंघर्षाचे चित्रण करणे हाच या कादंबरीचा उद्देश आहे. पाटील व पाटीलकी यांना या लोकजीवनात विशेष महत्त्व आहे. ही पदे मिळविण्यासाठी सत्ता-स्पर्धा होते. तसेच

पद मिळाल्यानंतर ते टिकविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते, हे या कादंबरीचे प्रमुख सूत्र आहे. जसे सुभानराव पाटलाच्या मृत्यूनंतर दत्तक पुत्रासाठी गायकवाड आणि पवार या दोन बड्या धनिकांमध्ये संघर्ष होतो, तर करवीर संस्थानाकडून आलेले दादा चव्हाण हे नवे पाटील दरारा निर्माण करून गावातील परिस्थिती पूर्ववत करतात. त्यांना विरोध होतो, पण तो कुठल्याही मार्गाने मोडून काढण्याचा ते प्रयत्न करीत असतानाच सत्तस्पर्धेतील नवीन काटवान किंवा टारफुला हिंदुराव हा तरुण दादा पाटलांची मानहानी करतो. ही सत्तास्पर्धा सतत चालत असते हे लेखकाला सुचवायचे आहे. त्यामुळे या प्रकारचे लोकजीवन कोणत्याही समृद्ध खेड्यात अनुभवता येते, म्हणून येथे प्रादेशिकता धूसर झाल्यासारखी वाटते; तरीही तरुणांना सक्तीने सैन्यात भरती करणे किंवा त्या लोकजीवनातील सण-उत्सव, रूढीपरंपरांचे लेखकाने केलेले चित्रण आणि संवादातून आलेल्या बोलीतील वैशिष्ट्यपूर्ण शब्दकळा यातून प्रादेशिकता गोचर होते. तसेच निसर्गवर्णन किंवा पुढीलप्रमाणे आलेली भौगोलिक पार्श्वभूमी यांतूनही 'प्रदेश' निवडता येतो. कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यातील पारंपरिक खेडे, सह्याद्रीचा कडा, बाहुबलीचा डोंगर, आळत्याची खिंड, घनदाट जंगलाचा आश्रय घेणारे फरारी, दरोडेखोर यांच्या आधारे हा प्रदेश निश्चित करता येतो. रामलिंग, धुळोबाची दैवतं, जैन मंदिर व उसाचे फड, हळद, पानमळे, भुईमूग, जोंधळा, तूर, मिरची, तंबाखू, खपली, हरभरा इत्यादी पिके, तसेच आंबा, पळस, करंजी, खैर, हिरडा, साग, अंजन, कांचन, करवंदी, जांभूळ, निरगुडी, घाणेरी, लिंब, कौठ, पिंपळ इत्यादी वृक्ष हरण, डुक्कर आणि मोर हे प्राणिपक्षी आणि काळी जमीन यांतून 'प्रदेश' दृगोचर होतो. तरीही 'टारफुला' संदर्भात आपल्या असे लक्षात येते की, एक वैशिष्ट्यपूर्ण प्रदेश हेतुतः चित्रित करणे असा लेखकाचा उद्देश नाही, तर पारंपरिक गावगाड्यातील सत्तासंघर्ष उभा करणे हा उद्देश आहे. त्यामुळे विखुरलेल्या लेखन घटकांच्या आधारेच प्रदेश वैशिष्ट्ये शोधावी लागतात.

सारांश, म्हणजे आपल्या या ठिकाणी असे लक्षात येईल की, या प्रकरणामधून उपरोल्लेखित सोळा कादंबऱ्यांचे लेखन हे नावीन्यापोटी, ग्रामसुधारणेपोटी, सहानुभूतिपोटी, पारंपरिक गावगाड्याचे दर्शन घडविण्यापोटी किंवा रंजकतेपोटी जसे केलेले आहे, तसेच समाजजागृतीसाठीही केलेले आहे. या कादंबऱ्यांचा लेखनकाल आणि मराठीतील मुख्य कादंबरीप्रवाह, लेखनप्रवृत्ती यांच्या मर्यादा पश्चिम महाराष्ट्रातील त्यांनी आपल्या लेखनातून व्यक्त केलेल्या जीवनस्वरूपावर मर्यादा पडलेल्या आहेत, हे लक्षात घ्यावे

लागते. ठोकळ, म. भा. भोसले, या लेखकांनी त्यांना असलेल्या ग्रामीण जीवनानुभवाचा उपयोग आपल्या कादंबऱ्यांमधून रंजकतेच्या अंगाने केलेला आहे; तर ना. वि. कुलकर्णी, र. वा. दिघे यांनी ग्रामीण जीवनातील गरीब-कष्टकरी माणसांच्या कणवेपोटी हे लेखन केलेले आहे. विभावरी शिरूरकर यांनी मात्र एका वैशिष्ट्यपूर्ण सामाजिक समस्येकडे मराठी सारस्वतांचे, बुद्धिवंतांचे आणि समाजसुधारकांचे लक्ष वेधण्याच्या हेतूने लेखन केलेले आहे. रणजित देसाई (माझा गाव), शंकर पाटील (टारफुला) यांनी पारंपरिक गावगाडा साकार केला आहे. गरीब कष्टकरी, अज्ञानी, साध्याभोळ्या धनगरांचे खडतर जीवनचित्रण व्यंकटेश माडगूळकरांनी 'बनगरवाडी'तून कणवेपोटी केले आहे, तर 'माकडीचा माळ', 'फकिरा' (अण्णाभाऊ साठे) आणि 'बारी' (रणजित देसाई) या कादंबऱ्यांमधून उपेक्षितांचे जीवनचित्रण करण्याची प्रेरणा दिसते. 'वारणेचा वाघ' या अण्णाभाऊ साठ्यांच्या कादंबरीतून राजकीय शक्तीविरुद्धचा लढा चित्रित होतो. र. वा. दिघे यांनी अहमदनगर जिल्ह्यातील पावसावलंबी लोकजीवन चित्रित केले आहे. त्यामागे ग्रामसुधारणेची प्रेरणा असलेली दिसते. गो.नी. दांडेकर यांनी 'पवनाकाठचा धोंडी' मध्ये पारंपरिक गावगाड्याची पडझड आणि संस्कृतिऱ्हासावर लक्ष केंद्रित केले आहे. तसेच 'माचीवरला बुधा' मधून निसर्ग आणि मानव यांचे नाते चित्रित केले आहे. दि. बा. मोकाशी यांनी 'देव चालले' मधून देवदेवतांबद्दलच्या बदलत्या कल्पनांकडे वाचकांचे लक्ष वेधले आहे. गो. नी. दांडेकर आणि दि. बा. मोकाशी यांनी मावळ-पठारी प्रदेश चित्रित केला आहे. मुख्य म्हणजे कादंबरी हा एक ललित लेखनप्रकार आहे आणि म्हणून मानवी भावभावना, जीवन, जीवनदृष्टिकोण, समस्या यांचे लेखनातून दर्शन घडविणे हाच प्रधान हेतू असतो. अनुषंगाने एखाद्या प्रदेशाचे, त्या प्रदेशातील लोकजीवनाचे दर्शन त्यातून घडते. हेच उपरोल्लेखित बारा कादंबऱ्यांमधून घडले आहे हे लक्षात घेणे महत्त्वाचे ठरते.

**स्वातंत्र्योत्तर काळातील पश्चिम महाराष्ट्रीय जीवनातील प्रादेशिकतेचे स्वरूप :**

प्रस्तुत प्रकरणाच्या दुसऱ्या भागात पश्चिम महाराष्ट्रातील प्रादेशिक जीवनाचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्यांचाच विचार केला आहे. या प्रदेशातील प्रादेशिकतेचे स्वरूप ठरविण्यासाठी या प्रदेशाच्या अनुषंगाने किंवा या प्रदेशाचे चित्रण ज्या कादंबऱ्यांमधून झाले आहे अशा सर्वच कादंबऱ्यांचा, ग्रंथाचा विषय व व्याप्ती या दृष्टीने साकल्याने विचार करणे या ठिकाणी शक्य झालेले नाही. यासाठी आनंद यादवांची 'गोतावळा' (१९७१), उत्तम बंडू तुपे यांचे 'इजाळं' (१९८४), बा. ग.

केसकर यांची 'कुणाच्या खांद्यावर' (१९८४), राजन गवस यांची 'चौंडक' (१९८५), आनंद पाटील यांच्या 'कागूद आणि सावली' (१९८६), आणि रामचंद्र पठारे यांची 'पाचर' (१९८९) या सहा कादंबऱ्यांमधून घडणारे पश्चिम महाराष्ट्रातील प्रादेशिक जीवनाचे चित्रण हे प्रातिनिधिक स्वरूपाचे आहे. म्हणजेच या सहा कादंबऱ्यांच्या आधारे स्वातंत्र्योत्तर काळातील पश्चिम महाराष्ट्रातील प्रादेशिकतेचे स्वरूप सांगण्याचा प्रयत्न या ठिकाणी करण्यात आला आहे. येथे स्वातंत्र्योत्तर काळात परिवर्तन चळवळीमुळे आणि हरितक्रांतीमुळे काही नवीन समस्या निर्माण झाल्या असे दिसते.

या ठिकाणी आनंद यादवांच्या 'गोतावळा' कादंबरीचा विचार प्रथम केलेला आहे. पारंपरिक ग्रामीण जीवन उपयोगितावादी यंत्रसंस्कृतीच्या प्रभावाने हळूहळू उद्‌ध्वस्त होत आहे, हा प्रस्तुतच्या कादंबरीचा विषय आहे. येथे प्रादेशिकतेच्या दृष्टीने विषयांतर्गत मर्यादा आहेत याचे कारण कादंबरीच्या विषयातच मिळते. कृषिसंस्कृतीच्या ऱ्हासाला बळी पडलेले नारबासारखे सालगडी अन्य प्रदेशांत आहेत. यंत्रयुगाच्या प्रभावाने मानव आणि निसर्गाच्या संबंधावर आघात होऊन शेतमजुरांची आणि बलुतेदारांची कशी वाताहत होते, हे सांगण्याच्या उद्देशाने लेखन झाले आहे. त्यामुळे प्रादेशिकता धूसर झाल्यासारखी वाटली तरी कोल्हापूर जिल्ह्यातील जीवनचित्रण, भू-प्रदेश, निसर्गाच्या वर्णनातून तसेच बोलीभाषा आणि संस्कृती विशेषांतून प्रदेश टिपता येतो. कागल-कोल्हापूर परिसरातील एक खेडेगाव लेखकाने चित्रित केले आहे. ऊस, ज्वारी, तूर, भात, हे पिके, दोडके, वांगी, वाळकं, भेंड्या हे माळव, लिंबाची झुडपं, घाणीरड, करंजी, उंबर, चिंच, पिंपळ इत्यादी वृक्ष आणि घुबड, कोल्ही, वांदर, मुंगूस, चित्तूर, मोर, टिटवी हे पशुपक्षी तसेच माळरान, डोंगर, तळे नदी, वांझ ढग, दुष्काळ आणि ऋतुचक्राप्रमाणे रंग बदलणारा प्रतीकात्मक निसर्ग व्यक्तीच्या मानसिकतेनुरूप पात्रातून आला आहे. यातून प्रदेश निवडता येतो. तसेच लोकरूढी, लोकसमज, लोकभ्रम व सण-उत्सवाच्या वर्णनातून प्रदेश गोचर होतो. तसेच अस्सल कोल्हापुरी बोलीतील शब्दवैभवामुळे 'प्रदेश' टिपता येतो. मराठी कादंबरी वाङ्मयात नवा प्रवाह निर्माण करणारी वैशिष्ट्यपूर्ण केवळ प्रादेशिक म्हणून नव्हे तर कादंबरी म्हणूनही 'गोतावळा' सर्वोत्कृष्टच आहे.

उत्तम बंडू तुपे यांची १९८४ साली प्रसिद्ध झालेली 'इजाळं' या कादंबरीतून सातारा जिल्ह्यातील फलटण, वडूज, दहीवडी, गोंदवले परिसरातील पिंपळी गावाची भौगोलिक पार्श्वभूमी रेखाटली असली तरी 'प्रादेशिकता' धूसर झाली आहे. याचे

कारण विषयांतर्गत मर्यादा हेच स्पष्ट आहे. स्वातंत्र्योत्तर काळात आधुनिकीकरणामुळे ग्रामीण जीवनात निर्माण झालेल्या समस्यांचे चित्रण करणे हा या कादंबरी लेखनाचा प्रमुख उद्देश आहे. "ग्रामीण भागात पसरलेले विजेचे जाळे आणि त्यात गुरफटलेला शेतकरी" हा या कादंबरीचा विषय आहे. शामाच्या जीवनातील संघर्षाधारे हा विषय चित्रित झाला आहे. यांत्रिक शेतीमुळे बलुतेदार पद्धती नष्ट झाली. माणसातली माणुसकी नष्ट होऊन तो यंत्रवत बनला. पैसा सर्वस्व मानला जाऊ लागला. नगदी पिके घेऊन शेतकरी पैशाच्या पाठीमागे लागले. बँका-सोसायट्यांच्या कर्जाचा बोजा वाढला. लोकांचा प्रामाणिकपणा आणि इमानी वृत्ती नष्ट झाली. भाऊबंदकीचा शाप, हेवेदावे यांतून संघर्ष होऊ लागला. नीतिमत्ता नष्ट झाली. वशिलेबाजी, भ्रष्टाचार, गटबाजीचे राजकारण सुरू झाले. या समस्या आजच्या खेड्यात सर्वत्र दिसतात. तरीही उपजीविकेसाठी लोकांनी मुंबईला जाणे, तसेच ऊस, कापूस इत्यादी पिके, टेकाड, मांजरखिळ्याचा डोंगर, व्हरलाची खोरी, तलाव, दुष्काळ आणि संस्कृती विशेष आणि सातारा जिल्ह्यातील शिक्षणप्रसार याप्रमाणेच कादंबरीची भाषा, म्हणी, वाक्प्रचार, बोलीतील शब्दसंपदा यातून 'प्रदेश' दृग्गोचार होतो. पश्चिम महाराष्ट्रातील पारंपरिक गावगाडा कसा मोडकळीस आला हेच 'इजाळं'तून स्पष्ट होते.

'कुणाच्या खांद्यावर' या बा. ग. केसकरांच्या कादंबरीतून अहमदनगर जिल्ह्यातील दुष्काळी जामखेड तालुक्यातील लोकजीवन चित्रित झाले आहे. सहकारी साखर कारखानदारीच्या निमित्ताने ऊस-तोडणी मजुरांचे विविध मार्गांनी होणारे शोषण' हा प्रस्तुत कादंबरीचा विषय आहे. ही ऊस-तोडणी मजूर मल्हारी-सुरवंताची शोकांतिका आहे. आपल्या मुलाबाळांना पारंपरिक ऊस-तोडणीचे खडतर कष्टाचे काम करण्याची वेळ येऊ नये म्हणून त्यांनी जिवाचा केलेला आटापिटा प्रस्तुत कादंबरीत रेखाटला आहे. सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक जीवनचित्रणातून ही प्रादेशिकता दृग्गोचर होते. नगर जिल्ह्यातील मराठवाड्याला जवळ असलेल्या जामखेडच्या डोंगराळ दुष्काळी प्रदेशातील एका वाडीची आणि सुजला-सुफला साखर कारखाना परिसराची भौगोलिक पार्श्वभूमी कादंबरीत चित्रित झाली आहे. हरण, मोर, पोपट, कोल्हे, भेकरं, मेंढरं, चिमण्या, होरल, कोळसा, पिंगळा, टिटवी, घारी, ससाणे, पावशा हे पशुपक्षी, तसेच बाजरी, मुग, मटकी, तिळ, कारळे, मेसूर ही पिके, करवंदीच्या जाळ्या, वड, लिंब, कार, हेक्कळ, यहळा, पांढरकळी, चार टेंबरून, वासनील, काळा मोगरा, पिवळवेल, हरणदोडी, कांडीवेल

इत्यादी वेली-झाडेझुडपे आणि घरांची विशिष्ट रचना तसेच वघळी नाले, डोंगर, दुष्काळी भाग, वादळवारा-पाऊस आणि हलकी मुरमाड जमीन इत्यादींच्या वर्णनातून 'प्रदेश' साकार होतो. तसेच प्रत्ययकारी निसर्गवर्णने आणि निवेदन-संवादासाठी वापरलेली नगरीबोली, त्या बोलीतील लकबी आणि म्हणी, वाक्प्रचार, आशयघन शब्द यांतून 'प्रदेश' गोचर होतो. ऊस-तोडणी करणाऱ्या उपेक्षित मजुरांचा जीवनसंघर्ष चित्रित करणारी ही एक उत्कृष्ट प्रादेशिक कादंबरी आहे.

'चौंडकं' ही राजन गवस यांनी 'जोगतिणी'च्या जीवनावरील कादंबरी आहे. यल्लमाच्या 'देवदासी' हा प्रकार कर्नाटक-महाराष्ट्राच्या सीमाभागावरील प्रदेशात आहे. देवदासीचे यल्लमाशी लग्न लावले जाते. गळ्यामध्ये 'दर्शन' बांधून ती गावामध्ये 'जोगवा' मागते. तिला लग्न करता येत नाही. 'झुलवा' लावता येतो. समाजाच्या अज्ञानाची आणि स्त्रियांवरील अन्यायाची 'चौंडकं' ही कथा आहे. 'देवदासी' ही एक सामाजिक संस्था आणि समस्या आहे. देवीच्या दर्शनाला निघालेल्या लोकांना निरोप देण्याची आणि मुलीला देवदासी करण्याच्या सांस्कृतिक पद्धतीतून 'प्रदेश' दृग्गोचर होतो. समाजातील एका उपेक्षित स्तरातील स्त्रियांच्या निरर्थक, भोगवस्तू जीवनाविषयी वाचकाला चिंतनप्रवृत्त करण्याचे सामर्थ्य प्रस्तुत कादंबरीत आहे. निवेदन आणि संवादासाठी वापरलेली बोली आणि त्या बोलीतील शब्दकळेतून 'प्रदेश' साकार होतो. केवळ प्रादेशिक किंवा उपेक्षित देवदासींच्या समस्यांचे चित्रण करणारी म्हणून नव्हे तर 'कादंबरी' म्हणून ती श्रेष्ठच आहे.

आनंद पाटलांच्या 'कागूद' आणि 'सावली' या १९८६ मध्ये प्रसिद्ध झालेल्या लघुकादंबऱ्यांचा येथे पश्चिम महाराष्ट्रातील जीवनाचे स्वरूप स्पष्ट करण्यासाठी आधार घेतला आहे. 'कागूद' म्हणजे जमिनीचे खरेदीखत करणे. या खरेदी-विक्री व्यवहाराच्या निमित्ताने परिवर्तनकाळातील भ्रष्टाचारासारख्या समस्यांकडे लेखकाने आपले लक्ष वेधले आहे. शैक्षणिकदृष्ट्या जागृत असलेल्या प्रदेशामध्येही निरक्षर शेतकरी आणि साक्षरांचीदेखील फसवणूक होते, हे कोल्हापूर-मलकापूरजवळील निमकोकणातील 'शित्तूर' गाव आणि प्रदेशाच्या पार्श्वभूमीवर रेखाटले आहे. 'परिवर्तन काळात ग्रामीण समाजव्यवस्थेला बसलेला हादरा' हा या कादंबरीचा विषय आहे. विषयांतर्गत मर्यादेमुळे कादंबरीतील प्रादेशिकता धूसर झाली आहे. याचे कारण महाराष्ट्राच्या अन्य प्रदेशातही याप्रमाणे अनुभव येतो; तरीही काही घटनाप्रसंगांतून 'प्रदेश' टिपता येतो. कोल्हापूर-मलकापूरच्या निमकोकणातील 'शित्तूर', चांदोली, नावली, बांबवडे, पन्हाळा ही गावे

आणि सह्याद्रीच्या कड्यालगतच्या घनदाट जंगलाचा हा प्रदेश आहे. चिव्याची बेट, आईन यातून आणि कादंबरीत चित्रित झालेल्या लोकजीवनातील संस्कृतिविशेषातून 'प्रदेश' गोचर होतो. तेथील सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय जागृतीतून प्रदेश दृग्गोचर होतो. त्याचप्रमाणे बोलीभाषेतील संवाद, शब्द, म्हणी, बोलीतील लकबी यांतून 'प्रदेश' साकार होतो.

'सावली' मधून आनंद पाटलांनी परिवर्तन काळातील 'घर बांधण्याची समस्या' रेखाटली आहे. धोंडीबासारखा सामान्य गिरणीकामगार संपाच्या काळामध्ये घर बांधून पूर्ण करण्याचा संकल्प करतो. बांधकाम पूर्ण करण्यापूर्वी येणाऱ्या असंख्य अडचणी सोडविताना तो कर्जबाजारी होतो आणि शेवटी नाइलाजाने जमीन विकण्याची वेळ येते. घर बांधूनही तो उन्हातच असतो. अशी धोंडीबा भोरच्या जीवनसंघर्षाची ही शोकात्मिका आहे. निमकोकणातील या प्रदेशात भरपूर पाऊस होऊनही उन्हाळ्यात पिण्यासदेखील पाणी शिल्लक नसते. या प्रदेशातचा लोकजीवनावर परिणाम होतो. म्हणूनच त्यांना मुंबईतील गिरण्यांमधून काम करून उपजीविका करावी लागते. यातून हा प्रदेश गोचर होतो. तसेच सह्याद्रीच्या कड्यालगतचा प्रदेश, पावनखिंड, विशाळगड, नागफणी डोंगर, नरसाळीचा सुळका, पाडवंदरा, जंगल, दऱ्या, सुळके, झरे, ओढे, कावांच्या खाणींनी युक्त आहे. करवंदी, जांभळ, हिरडा, आंबा, चिकनी आणि साग, करंज, कळक, चिव्याचे बेट इत्यादी वृक्ष, भात, नाचणी, भुईग, गिडबाक ही पिके यांच्या वर्णनातून तसेच संस्कृतिविशेषांतून आणि बोलीतील शब्द, म्हणी आणि संवादातून 'प्रदेश' गोचर होतो.

रामचंद्र पाठारे यांची 'पाचर' ही अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील लोकजीवन संघर्षाचे चित्रण करणारी वैशिष्ट्यपूर्ण कादंबरी. परंतु येथे लेखकाच्या आकलनाच्या आणि निर्मितीच्या मर्यादांमुळे 'प्रदेश' धूसर-अस्पष्ट झाला आहे; तरीही परिवर्तनकाळातील समस्यांच्या वास्तव चित्रणामुळे ती वैशिष्ट्यपूर्ण झाली आहे. या काळातील पुढाऱ्यांनी मागासवर्गीयांच्या एकगठ्ठा मतावर डोळा ठेवून त्यांचा कैवार घेण्याचा आणि स्वतःचे पुरोगामीत्व सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. परंतु अद्यापही समाज प्रतिगामीच आहे, हे सुचविण्याच्या उद्देशाने प्रस्तुत कादंबरीचे लेखन झाले आहे. राजकारण्यांची ढोंगी वृत्ती, भ्रष्टाचार, बेकारी, व्यसनाधीनता, बुवाबाजी, समाजसेवा आणि राजकारणाचा धंदा या समस्यांकडे लेखकाने लक्ष वेधले आहे. अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील परिवर्तनकाळात आतून पोखरलेल्या

सावरगावातील समूहजीवनाची ही कथा आहे. पारंपरिक जीवनशैलीला धक्का बसल्याने निर्माण झालेल्या समस्या आणि संघर्षाचे हे चित्रण आहे. येडोबाच्या जत्रेच्या निमित्ताने वर्णन केलेल्या रूढी-परंपरा तसेच बोलीतील संवाद, अर्थघन शब्द, म्हणी यांतून प्रदेश सिद्ध होतो.

सारांश, आनंद यादवांनी 'गोतावळा'तून कोल्हापूर-कागल प्रदेशातील तर उत्तम बंडू तुपे यांनी 'इजाळं' मधून सातारा या पश्चिम महाराष्ट्रातील पारंपरिक गावगाडा नष्ट होत असल्याची समस्या रेखाटली आहे. बा. ग. केसकरांनी 'कुणाच्या खांद्यावर' मधून अहमदनगर-जामखेड या दुष्काळी प्रदेशातील ऊस-तोडणी मजुरांची तर 'राजन गवस' यांनी 'चौंडकं' मधून कर्नाटक-महाराष्ट्र सीमेवरील प्रदेशातील उपेक्षित 'देवदासींच्या समस्येकडे लक्ष वेधले आहे. आनंद पाटलांनी 'कागूद' आणि 'सावली'तून कोल्हापूर-निमकोकणप्रदेशातील भ्रष्टाचाराच्या उग्र स्वरूप-समस्येचे चित्रण केले आहे. 'पाचर' मधून रामचंद्र पाठारे यांनी सनातनी राजकारण्यांच्या ढोंगी प्रवृत्तीवर आणि वाढत्या बुआबाजीवर प्रकाशझोत टाकला आहे.

प. महाराष्ट्र शैक्षणिकदृष्ट्या जागृत असूनही येथे आधुनिकीकरणाबरोबर निर्माण झालेल्या नव्या समस्यांकडे सर्वच लेखकांनी लक्ष वेधले आहे. पारंपरिक जीवनशैलीला हादरा बसला असे स्वातंत्र्योत्तर काळातील पश्चिम महाराष्ट्रीय जीवनाचे स्वरूप आहे कादंबरी वा ललित लेखन प्रकारातून मानवी भावभावना, जीवन, जीवनदृष्टिकोण, समस्या यांचे दर्शन घडविणे हा मुख्य हेतू असतो. त्या अनुषंगाने प्रदेश आणि लोकजीवनाचे दर्शन त्यातून घडते, हेच स्वातंत्र्योत्तर काळातील प्रातिनिधिक कादंबऱ्यांमधून घडले आहे, हे लक्षात घेणे महत्त्वाचे ठरते.

* * *

प्र
क
र
ण
तीन

# कोकणी (गोव्यासह) जीवनातील प्रादेशिकतेचे स्वरूप

**प्रस्तावना :**

कोकणी (गोव्यासह) जीवनातील प्रादेशिकतेचे स्वरूप शोधण्यासाठी आधारभूत म्हणून पुढील कादंबऱ्यांचा विगमनात्मक पद्धतीने अभ्यास करून काही निष्कर्ष नोंदविण्याचा प्रयत्न आहे.

| | |
|---|---|
| १. सराई | र. वा. दिघे |
| २. आई आहे शेतात | र. वा. दिघे |
| ३. अन्नदाता उपाशी | वि. वा. हडप |
| ४. मांडवी ! तू आटलीस ? | लक्ष्मणराव सरदेसाई |
| ५. भावीण | बा. भ. बोरकर |
| ६. हद्दपार | श्री. ना. पेंडसे |
| ७. गारंबीचा बापू | श्री. ना. पेंडसे |
| ८. पडघवली | गो. नी. दांडेकर |
| ९. सारे प्रवासी घडीचे | जयवंत दळवी |
| १०. इंधन | हमीद दलवाई |
| ११. भाकरी आणि फूल | मधु मंगेश कर्णिक |

येथे एक गोष्ट अगोदरच स्पष्ट केली पाहिजे की, उपरोल्लेखित कादंबऱ्या प्रदेश चित्रणाच्या हेतूने लिहिल्या आहेत असेच नाही. याद्दष्टीने हा शोध घेत असताना या कादंबऱ्यांमधून प्रकट झालेली प्रादेशिकता ही त्या त्या लेखकांनी जाणीवपूर्वक प्रकट केली आहे किंवा काय ? याचाही शोध घेण्याचा प्रयत्न आहे. कारण कादंबरीकार हा एक ललित लेखक असतो आणि तो आपली साहित्यकृती निर्माण करीत असताना त्याला आकलन झालेल्या जीवनानुभवांचे स्वरूप त्याच्या अंगी असलेल्या कल्पनासामर्थ्यासह प्रकट करीत असतो. हे करीत असताना काही ठिकाणी

वास्तवानुभवापेक्षा कल्पनासामर्थ्य, रंजकता, अतिरंजकता, अद्भुतता, चमत्कृतिजन्यता, कल्पनारम्यता, स्वप्नरंजकता यांचाही लेखकाच्या लेखन-प्रकृतीनुसार आविष्कार झालेला असू शकतो, त्यामुळे कादंबरी किती वास्तवदर्शी आहे किंवा नाही हे या ठिकाणी गौण असले तरी त्या अनुषंगाने त्या लेखकाच्या लेखनात प्रकट झालेले कोकणी प्रादेशिक जीवनाचे वैशिष्ट्य शोधण्याचा प्रयत्न उपरोल्लेखित कादंबऱ्यांच्या आधारे करून, निष्कर्ष नोंदवता येतील.

**कोकणी (गोव्यासह) जीवनातील प्रादेशिकतेचे स्वरूप :**

तिसऱ्या प्रकरणामध्ये कोकणातील प्रादेशिक जीवनाचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्यांचा विचार केलेला आहे. या कादंबऱ्यांचे लेखक हेही सामान्यपणे कोकणात राहणारे आहेत आणि म्हणून त्यांच्या जीवनानुभवाचा प्रदेश त्यांनी लिहिलेल्या कादंबऱ्यांतून रेखाटलेला आहे असे गृहीत धरले आहे. अर्थातच या कादंबऱ्यांमधून एकूण कोकणचा (गोव्यासह) प्रदेश गोचर होत असला तरी तो या प्रदेशातील विविध ठिकाणांचा आहे, असेही प्रत्ययाला येते. या प्रदेशातील प्रादेशिकतेचे स्वरूप ठरविण्यासाठी पुढील कादंबऱ्यांचा आधार घेतला आहे. 'सराई', 'आई आहे शेतात' (र. वा. दिघे), 'अन्नदाता उपाशी' (वि. वा. हडप), 'मांडवी ! तू आटलीस ?' (लक्ष्मणराव सरदेसाई), 'भावीण' (बा. भ. बोरकर), 'हद्दपार' आणि 'गारंबीचा बापू' (श्री. ना. पेंडसे), 'पडघवली' (गो. नी. दांडेकर), 'सारे प्रवासी घडीचे' (जयंत दळवी), 'इंधन' (हमीद दलवाई) आणि 'भाकरी आणि फूल' (मधु मंगेश कर्णिक) या अकरा कादंबऱ्यांचा विचार केलेला आहे. अर्थात यापैकी 'मांडवी ! तू आटलीस?' आणि 'भावीण' या दोनच कादंबऱ्या गोमंतकीय समाजजीवन आणि राजकीय जीवनाचे दर्शन घडवितात. हे प्रादेशिक जीवनाचे चित्रण प्रातिनिधिक स्वरूपाचे आहे. या कादंबऱ्यांच्या आधारे कोकणातील प्रादेशितकेचे स्वरूप सांगण्याचा प्रयत्न या ठिकाणी करण्यात आलेला आहे. हे सांगत असताना कादंबरीचा विषय, कादंबरी लेखनाचा काळ आणि तत्कालीन जीवन, लेखकाच्या आकलनाच्या मर्यादा, लेखकाच्या लेखन-निर्मितीच्या मर्यादा इत्यादींचाही विचार गृहीत धरणे क्रमप्राप्त झालेले आहे. प्रत्यक्षातील या प्रदेशातील जीवनाचे स्वरूप लक्षात घेऊन त्या त्या लेखकांच्या कादंबरीमध्ये ते कसे आले हे सांगण्याचाही प्रयत्न या ठिकाणी केला आहे.

कोकण म्हणत असताना ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांचा आणि गोव्यातील प्रादेशिक वैशिष्ट्यांचा विचार या प्रकरणात अभिप्रेत आहे. या प्रदेशाच्या

पश्चिमेला अरबी समुद्र आहे, तर पूर्वेला सह्याद्रीच्या पर्वतरांगा आहेत. अरबी समुद्र आणि सह्याद्रीच्या मधील कोकणपट्टी पर्शुराम भूमी म्हणून ओळखतात. प्रदेशाचा आणि निसर्गाचा लोकजीवनावर परिणाम होतो. प्रचंड पाऊस पडूनही येथील लाल मातीच्या शेतीवर त्यांचा उदरनिर्वाह होत नाही म्हणून मुंबईकडे धावतात. त्यामुळे गावे ओस पडू लागली. जीवनावश्यक साधनांची अपूर्णता, विकासांच्या योजनांचा अभाव, प्रचंड दारिद्य, बकालपणा, आळशी तितकीच कष्टाळू वृत्तीही येथे दिसते. कोकण प्रदेशातील समर्थ नेतृत्वाच्या अभावामुळे विकास कामासाठी शासनाने उपलब्ध करून दिलेला पैसा अन्य प्रदेशांच्या विकास-सुधारणांसाठी उपयोगात आणला जातो. गाव ओस पडले तरी लोक अजूनही स्वातंत्र्योत्तर काळात कोकणात येतात किंवा दहिकाल्यात एकत्र येतात. दशावतार-भजन स्पर्धांमध्ये रमतात. डोंगराळ नापीक मुलखाचा दरिद्री प्रदेश दऱ्या, डोंगर, ओढे, करवंदीच्या जाळ्या, वृक्षवेलींनी समृद्ध आहे. रेल्वेमार्गाचा किंवा बंदरनिर्मितीच्या अभावामुळे औद्योगिकीकरण नाही आणि म्हणून रोजगार नाही. प्रचंड दारिद्र्याचा जणू शापच या लोकजीवनाला लाभला आहे. आधुनिक साधन-सुविधा-सेवांचा अभाव, विपुल खनिज संपत्ती असूनही औद्योगिकदृष्ट्या रत्नागिरी-सिंधुदुर्ग आणि एकूणच कोकण प्रदेश मागासलेला आहे. या प्रदेशवैशिष्ट्यांचा लोकजीवनावर परिणाम होतो. र. वा. दिघ्यांनी 'सराई' या स्वप्नरंजनात्मक कादंबरीतून कोकणाचाच एक भाग असलेल्या मावळाचे जीवनदर्शन घडविले आहे. 'पाणकळा'च्या तुलनेत हे अधिक वास्तव उतरण्याचे कारण लेखकाचा स्वानुभव हेच सांगता येईल. मावळी खेड्यातील 'सावकारी संस्कृती' हा या कादंबरीचा विषय आहे. 'रानसई' हे सराईवर अवलंबून असलेले गावच येथे 'नायक' म्हणून साकार केले आहे. सामान्य कुणबी - कातोडी, ठाकूर यांच्याशी इनामदार-सावकारांच्या संबंधातून हे चित्रण झाले आहे. सह्याद्रीच्या कुशीतील खोपोली परिसरातील 'रानसई' गाव निळे आकाश, कर्वतकडा, सारंगखिंड, भैरव धबधबा, काळाकडा आणि दऱ्याखोऱ्यात पसरलेली भातशेती आणि ठाकरांची नाचणी-वरीची शेती, घनदाट जंगल, सागवान, हेदू, कोसम, ऐन, आंबे, हिरडा, बेहडा, शिकेकाई, निवडुंग, अंजन, धावडा हे वृक्ष, करवंदाच्या जाळ्या, तेरडा, सोनटक्की, विष्णुकांत, मोरंग, झेंडू, कारव, सायली या वेली, मोर, सकोची, कीटरावे, हरेल, आर, रानगवे, सांभर, डुक्कर हे प्राणिपक्षी तसेच जंगलाश्रयाने राहणाऱ्या, चोरी धर्म मानणाऱ्या कातोड्यांची इमानी, अव्यवहारी, शिकारप्रिय आणि स्वातंत्र्यप्रिय वृत्ती, त्यांचे प्राथमिक पातळीवरचे जीवन याबरोबर

मवाळ, गरीब, कष्टाळू, प्रामाणिक, भित्रे, निरुपद्रवी आणि इमानी ठाकरांचे जीवनचित्रण यातून 'प्रदेश' सिद्ध होतो. दृकप्रत्ययी रेखीव निसर्गवर्णने, कुणबी, कातोडी-ठाकूर यांचे सण-उत्सव, लोकगीत, श्रद्धा-समजुतीचे त्यांच्या बोलीभाषेतून केलेले वर्णन यातून प्रदेश गोचर होतो.

'आई आहे शेतात' या त्यांच्या कादंबरीत मावळातील 'राई' या खेड्यातील सातपुते घराण्याच्या तीन पिढ्यांचा इतिहास आला आहे. त्यातून स्वातंत्र्यपूर्व काळातील मावळी जीवनदर्शन घडते. 'कुळकायद्यामुळे ग्रामजीवनात आलेले परिवर्तन हा या कादंबरीचा विषय आहे. कुळ आणि जमीनदारांमधील जिव्हाळा-प्रेमाचे संबंध नष्ट होऊन पारंपरिक ग्रामव्यवस्था आणि कुटुंबव्यवस्था मोडकळीस आली. सरंजामशाही डबघाईला आली. विषयांतर्गत मर्यादेमुळे प्रादेशिकता धूसर झाली, याचे कारण कुळकायद्याचा विपरीत परिणाम अन्य प्रदेशातील लोकजीवनावरही झाला हे नाकारता येत नाही. तरीही सह्याद्री पर्वताची उंच शिखरे, कडे आणि फात्र्या डोंगराने केलेल्या 'राई' गावातील 'साखरपट्टी' हे शेत या कादंबरीचा केंद्रबिंदू आहे. 'सराई' हे कोकणचे वैशिष्ट्य आहे. पोपटीची प्रथा, कातोड्यांचे जीवनचित्रण आणि संस्कृतीविशेष तसेच बोलीभाषेतील संवाद, म्हणी, वाक्प्रचारातून पनवेल-खोपोली हा उत्तर कोकणातील 'प्रदेश' साकार होतो.

र. वा. दिघ्यांनी 'आई आहे शेतात' मधून कुळकायद्याच्या निमित्ताने खोतांची समस्या चित्रित केली आहे. तर या उलट कुळांच्या समस्येचे चित्रण वि. वा. हडपांनी 'अन्नदाता उपाशी'त केले आहे. इंग्रज राजवटीत पारंपरिक ग्रामव्यवस्था आणि कुटुंबव्यवस्था मोडकळीस आली. म. गांधींच्या विचारसरणीचा पराभव आणि मार्क्सवादी विचारसरणीचा विजय दाखविण्याचा आणि मध्यमवर्गीय जीवनचित्रणापेक्षा ग्रामीण समस्यांकडे लक्ष वेधण्याच्या प्रेरणेतून हडपांनी लेखन केले आहे. रत्नागिरी-देवगड परिसरातील 'काजरोळी' (कोटकामते) खेड्यातील कुळ-खोत संघर्ष हा या कादंबरीचा विषय आहे. अत्याचार-जुलूम असह्य झाल्यावर गरीब शेतकरी संघटित होऊन जमीनदारांचा खून करतात, हे बाबा देसाई खोत यांचा रघुनाथ राणेने खून करण्यातून दाखविले आहे. एकमेकांचे वैरी असणारे खोत झटपट संघटित होतात; पण गरीब शेतकरी संघटित व्हायला उशीर लागतो आणि संघटित झाल्यावर ते खोतांविरुद्ध आवाज उठवू शकतात हेच लेखकाने येथे चित्रित केले आहे. मध्यमवर्गीय जीवनचित्रणात रमलेल्या वाचकांचे लेखकाने कुळांच्या दयनीय परिस्थितीकडे लक्ष वेधले आहे.

लेखकाच्या निर्मितीच्या आणि विषयांतर्गत मर्यादेमुळे प्रादेशिकता धूसर झाली आहे. याचे कारण कुळकायद्यामुळे अन्य प्रदेशातही कुळ-जमीनदार संघर्ष झाल्याचे दिसते; तरीही कोकणी माणसांचे दारिद्र्य, किरकोळ गोष्टीसही कोर्टकचेरी करण्याची वृत्ती, भावीण ही सामाजिक संस्था यातून प्रदेश दृग्गोचर होतो. तसेच स्थानिक देवदेवतांवरील श्रद्धा-समजुती, परंपरा, गोकुळाष्टमीचा सप्ताह, कोकणी बोलीतील काही शब्द, म्हणी, वाक्प्रचारादीतून आणि संगमनाथाचे देवस्थान, काजरादेवी, काजरघाटी, काजऱ्याची राई, आंबे-फणस-माड-पोफळी ही फळझाडे आणि भात, वरी, नाचणी, सावा इ. पिकांच्या उल्लेखातून 'प्रदेश' टिपता येतो. येथे प्रदेशचित्रण करणे हा उद्देश नाही, तर जमीनदार आणि कुळांमधील विषमतेवर अधिक लक्ष केंद्रित केले आहे.

लक्ष्मणराव सरदेसाई यांची 'मांडवी ! तू आटलीस ?' ही गोव्यातील पोर्तुगीज राजवटीतील सामाजिक आणि राजकीय पार्श्वभूमीवरील कादंबरी आहे. गोवामुक्ती चळवळीपूर्वी लिहिलेली ही हिंदू-ख्रिश्चन संघर्षाची आणि अशोक-लीना यांच्या उत्कट प्रीतीची कथा आहे. भाटकरांचे स्वार्थी, मतलबी, देशद्रोही आणि सरकारधार्जिणे वर्तन तसेच हिंदूंची दुर्बलता, निष्क्रियता, व्यसनाधीनता, स्वाभिमानशून्यता, लाचारी, स्वधर्म-स्वदेशाबद्दलची उदासीनता आणि दारिद्र्याचे चित्रण, देशात ब्रिटिश राजवट असताना गोव्यात पोर्तुगीज फिरंग्यांची जुलमी राजवट होती. यातून 'प्रदेश' सिद्ध होतो. गोमंतकीय लोकांचे तांदुळ-मासळी हे मुख्य अन्न, बाजरी खावी लागल्याने त्यांच्या प्रकृतीवर विपरीत परिणाम होतो; यातूनही प्रदेश टिपता येतो. नारळ-पोफळी-आंबा ही फळझाडे आणि माडी हे गोव्याचे खास वैशिष्ट्य, पणजी-मडगाव घाटमाथ्यावरील कॅसलरॉक, लोंढा, सावर्डे, सुपे, हल्ल्याळ, दूधसागर धबधबा, चंद्रशेखर पर्वत, बांबूच्या भिंती आणि झावळ्यांचे छप्पर अशी घरांची रचना, शांता दुर्गेचा परिसर, समुद्र-खाडी, गलबत, शंखशिंपले, मांडवी नदी, भात खाचरं, दृकप्रत्ययी निसर्गवर्णने आणि कोकणी बोलीतील शब्द, आणि लोकगीतातून प्रदेश साकार होतो. स्वातंत्र्यपूर्व काळातील गोमंतकीय लोकजीवनाचे चित्रण करून कोकणी जीवनचित्राच्या शक्यता प्रस्तुत कादंबरीने निर्माण केल्या.

बा. भ. बोरकरांनी 'भावीण' मधून गोव्यातील लोकजीवन चित्रण केले आहे. गोमंतकीय भौगोलिक आणि सामाजिक पार्श्वभूमीवरील भाविणीच्या आत्मबलिदानाची ही कथा आहे. गोव्यातील भाविणीची समस्या हाच या कादंबरीचा विषय आहे. समाजामध्ये त्यांना प्रतिष्ठा नाही. ही सामाजिक संस्था नष्ट झाली पाहिजे, या

उद्देशाने लेखकाने लेखन केले आहे. त्यामुळे हृषी-शेवंतीच्या प्रेमाचा धागा, हरिजन उद्धाराचे किंवा मातृभाषेतून शिक्षणाचे केशवकमलीचे कार्य हे धागे गौण ठरतात. भाविणीच्या जीवनचित्रणाप्रमाणे गोमंतकीय लोकजीवनातील विषमता, जातिभेद, श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या कल्पना, रोटी-बेटी व्यवहारांचे चित्रणही प्रसंगानुरूप येते. ख्रिश्चनांचा धर्मप्रसार, कोकणीला स्वतंत्र भाषेचा दर्जा. म. गांधींच्या विचारांचा प्रभाव, व्यसनमुक्ती, मद्यनिर्मितीस मुक्त परवाना, मद्यपान विरोधी चळवळ आणि सोयरोबा अंबियांच्या अभंगाबद्दल अभिमान आणि गोमंतकीय भाविणींची समस्या यातून 'प्रदेश' गोचर होतो. केवळ, सावर्डे, दुर्भाट, पर्तगाळ, मडकई ही गावे, शांतादुर्गा व शाळीग्राम ही कुलदैवते, अघनाशिनी नदी, तांबडी माती, मंगलुरी कौलांची चुनेरी घरे, बंदर, खाडी, वाफर, मँडोलिनवर कोकणी गीत गाणारे स्त्री-पुरुष, आंबे, पोफळी, माड, नारळाची हिरवी गर्द झाडी, तसेच काचोळीचा लोकसमज-श्रद्धा-परंपरा, लोकगीत-पेणी, पालखीची मिरवणूक आणि हकप्रत्ययी पात्ररूपाने आलेला निसर्ग यातून प्रदेश साकार होतो. गोव्यातील लोकजीवन वास्तव आणि उपेक्षित भाविणी या सामाजिक संस्थेशी निगडित अशी दुहेरी प्रादेशिकता गोचर होते.

श्री. ना. पेंडशांनी उत्तर रत्नागिरी जिल्ह्यातील बंदरपट्ट्याचा साखरपेंडी (आंजर्ले), दुर्गेश्वर (मुरुड), गारंबी (आसूद), दापोली, मुर्डी, हर्णेचा दीपस्तंभ, जगबुडी नदी हा प्रदेश साहित्यात कलात्मक सामर्थ्याने उतरवला आहे. त्यांच्या कादंबऱ्यातून आलेला निसर्ग स्वप्नरंजनाला पूरक म्हणून आलेला आहे. 'हद्दपार'मध्ये 'मोडेल पण वाकणार नाही' अशा बंडखोर राजेमास्तरची व्यक्तिरेखा लेखकाने साकार केली आहे. विषमता, जातिभेद, श्रेष्ठकनिष्ठतेच्या कल्पना, कोकणी माणसांचे दारिद्र्य चित्रणातून म्हणजेच सामाजिकतेतून 'हद्दपार'ला प्रादेशिकता प्राप्त झाली आहे. कोकणी माणसांची सण उत्सवप्रियता आणि श्रद्धा, समजुती, गणेशोत्सव, होलिकोत्सव, भैरीची पालखी, शेरणे प्रकरण, एकवीरा देवी, कोयतीबद्दलची श्रद्धा, देवीला स्त्रहाण लावणे यांतून प्रदेश साकार होतो. कोकणी माणसांचा काटकसरी स्वभाव, कोकंबचे पन्हे देऊनच स्वागत करण्याची परंपरा, कुणब्याचा भित्रेपणा - लाचारी आणि देवादिकांशी निगडित मानपानासाठी कोर्टकचेरी करण्याची वृत्ती, तसेच बुरोंडी-दुर्गेश्वर (मुरुड), दापोली हर्णेचा दीपस्तंभ, करवंद्याचा कातळ, बुरोंडीची खाडी, भैरीची फोंडी, कासारखळे या बंदरपट्ट्यालगतचा प्रदेशातील लोकजीवन, कोकणी बोलीतील शब्दवैभव, लकबी, शिव्या, संवादातून 'प्रदेश' सिद्ध होतो. 'गारंबीचा

बापू' ही 'अफाट बापू आणि सुंदर राधाच्या प्रेमाची कोकणच्या पार्श्वभूमीवरील स्वप्नरंजनात्मक कथा आहे. गुरववाडा आणि ब्राह्मणवाडा संघर्षाचा तसेच पारंपरिक लोकजीवनाचा धागा गुंफल्याने समकालीन वास्तव जिवंत झाले आहे. फुटकळ तपशिलातून प्रादेशिकता शोधावी लागते. जसे व्यक्तिरेखाटन, विषमता, जातिभेद, आधुनिकतेचा आणि स्त्रीपुरुष समानतेचा विचार, सरपंच पदाभोवतीची प्रतिष्ठेची वलये, पाटपाण्यासाठी होणाऱ्या मारामाऱ्या, कोर्टात जाण्याची वृत्ती आणि त्यांचे दारिद्र्य, प्रदेश वैशिष्ट्याचे वर्णन, स्थानिक देवदेवता-व्याघ्रेश्वरावरील श्रद्धा, उखाणे आणि कोकणी बोलीतील शब्द, लकबी, शिव्या उपमा-प्रतिमादीतून 'प्रदेश' साकार होतो.

गो. नी. दांडेकरांच्या कादंबऱ्यांमधून आलेला निसर्ग आशय आणि अभिव्यक्तीचा एक अपरिहार्य भाग म्हणून आलेला आहे. त्यांनी उत्तर रत्नागिरी जिल्ह्यातील दाभोळपट्टा साहित्यात रेखाटला. 'पारंपरिक गावगाडा आणि समाजव्यवस्था औद्योगिकीकरणामुळे कोलमडली. खेडी उद्ध्वस्त झाली. समूहभावना नष्ट झाली. वाढत्या आर्थिक गरजा आणि जीवनाकडे भोगवादी दृष्टीने पाहण्याची नवी विचारसरणी हा 'पडघवली' कादंबरीचा विषय आहे. शिवकाल ते स्वातंत्र्यपूर्वकाळापर्यंतच्या केशवभट-राघोभट-महादेवच्या तीन पिढ्यांचे चित्रण त्यांनी केले आहे. समूहभावना, उत्सवप्रियता, सांस्कृतिक विशेष, भूप्रदेश आणि निसर्गवर्णन आणि बोलीभाषेच्या वापरातून कोकण प्रदेश गोचर होतो. जातीयता, आवळीमाता, सर्पांच्या गंडमाळा, गिरोबा-शेवणी किल्लेदाराची सामक्षा, दंतकथा, लोकगीत आणि सणउत्सवांच्या चित्रणातून सामूहिक सांस्कृतिक जीवनाचे दर्शन घडते. कोकणी माणसाची कष्टाळू वृत्ती, घाबरटपणा आणि कोर्टकचेऱ्या करण्याची वृत्ती, पाटपाण्यावरून होणारा वाद यातून 'प्रदेश' साकार होतो. कुंभा, किंजळ, साग, हिरडी, पोफळी हे वृक्ष, तगरीची फुले, आमसुलं, साठं, कडवे वाल, गरे आंब्याची आंबोशी तसेच कोकणी बोलीतील लकबी आणि संवादातून प्रदेश दृग्गोचर होतो.

जयवंत दळवींनी 'सारे प्रवासी घडीचे' कादंबरीतून आजगावजवळील शिरोडा-अरवलीचा प्रदेश चित्रित केला आहे. दक्षिण कोकणातील देवगड बंदराजवळील वेंगुर्ल्याच्या आसपासच्या खेडेगावाची पार्श्वभूमी या कादंबरीला लाभली आहे. सिंधुदुर्ग किल्ला, उशीकडे डोंगर, पायाकडे समुद्र आणि अंगाखाली लालमुरमाड माती असलेल्या प्रदेशातील तऱ्हेवाईक व्यक्तिचित्रांचा एक प्रदीर्घ पट चित्रित करणे हा कादंबरीचा उद्देश आहे. स्वातंत्र्योत्तर परिवर्तनाच्या पार्श्वभूमीवर १९३० ते १९४० मधील

व्यक्तिचित्र रेखाटून लेखकाने कोकणी खेड्यांची पडझड दाखविली आहे. परिवर्तन काळामध्ये या स्वाभाविक जीवनाचा ऱ्हास झाला हे यातून लेखकाने स्पष्ट केले आहे. व्यक्तीच्या कृतीउक्तीतून 'प्रदेश' जिवंत केला आहे. आपुला गावची ओढ आहे. त्याचे वडील आबाखोत, त्यांचे शत्रू बाबुली यांना कोकणी माणसांच्या स्वभावाप्रमाणे कोर्टकचेरीसाठी खर्च करण्याचा नाद आहे. त्यांचा तऱ्हेवाईकपणा, मवाळपणा, अडाणीपणा, उत्सवप्रियता, रवळनाथाला शिमग्याच्या वेळी हिंस्र पशूचा नैवेद्य देणे किंवा श्रावणातील दहिकाला उत्सव, गणेश उत्सव, साध्या गोष्टीत अपूर्वाई बघण्याचा अडाणीपणा, दशावतारी नाटकाचे वेड, कोकणातील भावीण ही सामाजिक संस्था, त्यांचे दारिद्र्य, निरुद्योगी-असमाधानीपणा, स्वभावातील कडवटपणा, इतरांच्या भानगडीत लक्ष घालण्याची सवय इत्यादींतून 'प्रदेश' निवडता येतो. तसेच कोकणी बोलीतील संवाद, शिव्या, म्हणी, वाक्प्रचारादीतून प्रदेश साकार होतो. व्यक्तिचित्रणांच्या अनुषंगाने येथे प्रदेश आला आहे. प्रदेशचित्रण हा उद्देश नाही.

हमीद दलवाई यांच्या 'इंधन'चा 'परिवर्तन काळातील हिंदु-मुस्लिम-नवबौद्धांच्या सूडसंघर्षाचे चित्रण करणे' हा उद्देश आहे. या संघर्षास कुळकायदा निमित्त झाला आणि पारंपरिक गावगाडा मोडकळीस आला. एकोप्याची-विश्वास-प्रेमाची भावना नष्ट झाली. संशय-अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले. मुस्लिम खोत इसाकमास्तर आणि हिंदू सुमती किंवा केपटाऊनवाला इसाक आणि नवबौद्ध लक्ष्मी यांच्या अनैतिक संबंधामुळे गावात सूडभावना वाढीला लागली आणि हिंदूंनी पालखीची सवाद्य मिरवणूक मशिदीजवळून नेल्याने भडका उडतो. मुस्लिम पालखीवर हल्ला करतात. स्त्रियांवर बलात्कार करतात. असे संघर्ष होतील आणि परत लोक एकत्र येतील असा आशावाद लेखक व्यक्त करतो. विषयांतर्गत मर्यादेमुळे प्रादेशिकता धूसर झाली आहे. याचे कारण कादंबरीच्या विषयातच शोधावे लागते. कुळकायद्यामुळे खेड्यात निर्माण झालेली अविश्वासाची भावना किंवा मुस्लिमांचे पाकिस्तान-धार्जिणे वर्तन अन्य प्रदेशातही दिसते. तरीही काही घटना प्रसंगातून 'प्रदेश' निवडता येतो. कोकणातील चिपळूणजवळील खेडे, वाशिष्टी नदी, तिच्यातील विशिष्ट प्रकारचा म्हावरा मासा, मासेमारी, भातशेती, समुद्राची भरती, वीज, रस्ते नसलेला मागासलेला प्रदेश, कुणब्यांचे दारिद्र्य, गवताने शाकारलेली घरे तर मुस्लिम खोतांची मंगलोरी कौलांची घरे, परिट, न्हावी हे बलुतेदार आणि ऋतुचक्र-दिनचक्राप्रमाणे रंग बदलणारा, लोकजीवनावर परिणाम करणाऱ्या निसर्गवर्णनातून तसेच कोकणी बोलीच्या ढंगाने हिंदीतील शब्दाचा केलेला

वापर आणि बोलीतील शब्द, म्हणी, वाक्प्रचारादीतून 'प्रदेश' साकार केला आहे. 'इंधन' सूडभावनेचे प्रतीक आहे. त्या संघर्षास कोकणी प्रदेशाची पार्श्वभूमी लाभली आहे.

मधू मंगेश कर्णिकांनी 'भाकरी आणि फूल'मधून करूळ-कणकवली-सिंधुदुर्ग प्रदेश जिवंत केला आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून पंचवीस वर्षे पूर्ण झाली, तरी दलितांच्या आर्थिक परिस्थितीत परिवर्तन आले नाही. त्यांनी केलेल्या बौद्धधर्मांतराचाही उपयोग झाला नाही. उलट डॉ. आंबेडकरांच्या मृत्यूनंतर शे.का.फ.चे विभाजन करून दलित कार्यकर्त्यांनी समाजविकासाऐवजी स्वार्थाकडे लक्ष दिले. कुळकायद्याने कुळांना जमिनी मिळाल्या, पण दलितांना काहीच लाभ झाला नाही. राखीव जागांचा फायदाही मिळाला नाही. त्यामुळे दलित सुखसमृद्धीपासून वंचित राहिले हा या कादंबरीचा विषय आहे. रक्ताचा संकर आंतरजातीय विवाह आणि शिक्षणशिवाय दलितोद्धार अशक्य आहे हे सांगण्याच्या उद्देशाने लेखन झाले आहे. स्वातंत्र्यानंतरचा जातिभेद, अस्पृश्यता, धनिकांची अरेरावी, राज्यकर्त्यांची ढोंगी वृत्ती, दलित कार्यकर्त्यांची स्वार्थीवृत्ती, दलितांमधील जागृती, धर्मांतर इत्यादी गोष्टींवर लेखकाने शिवनाक कदमाच्या कुटुंबाच्या पंचवीस वर्षांतील स्थित्यंतराचा आलेख काढून प्रकाश टाकला आहे. तेरडे, आघाडे, वशाडी, काशा, आळव ही झुडपे, करांद्याच्या जाळ्या आणि विवासाच्या वेली, साया, उक्षीची उंच उंच झाडे, आंबा-फणस तसेच मासे, भात, नाचणी हे अन्न आणि निसर्गवर्णनातून प्रदेश साकार होते. रामेश्वरावरील श्रद्धा, महाराची 'चाकरी', तळी फिरवणे, गौर-गणपतीच्या वेळची न्हेवऱ्याची परंपरा, सिमग्याचे जाबसाल, कोकणात महारांचा भट कुंभार असतो. देशस्थ आणि कोकणस्थ दलितांच्या स्वभावातील फरकांचे वर्णन, कोकणातला महार गावचा मानकरी असतो, तर देशावरचा महार बलुतेदार असतो, तसेच महारांची केंबळीची घरे, घासलेटचे दिवे, 'कडवे करांदे' हे अन्न या सर्वांतून 'प्रदेश' गोचर होतो. दलितांच्या मागासलेपणाशी तो एकजीव होऊन आला आहे. मालवाणी बोलीचा संवादासाठी केलेला वापर, तेथील लोकांनी उदरनिर्वाहासाठी मुंबई जवळ करणे किंवा कोकणातील लोक
नाल, मृदंग, चकवे ही वाद्य भजनप्रसंगी वाजवितात, उलट देशावर टाळ, मृदंग तर विदर्भात ढोल-पिलमपोवे वाजविले जातात, इत्यादींतून 'प्रदेश' निश्चित करता येतो.

सारांश, आपल्याला या ठिकाणी असे लक्षात येईल की, या प्रकरणामधून उपरोल्लेखित कादंबऱ्यांचे लेखन हे नावीन्यापोटी, ग्रामसुधारणेपोटी, सहानुभूतिपोटी किंवा रंजकतेपोटी जसे केलेले आहे तसेच समाजजागृतीसाठीही केलेले आहे. या

कादंबऱ्यांचा लेखनकाळ आणि मराठीतील मुख्य कादंबरीप्रवाह, लेखनप्रवृत्ती यांच्या मर्यादा कोकणी जीवनचित्रण करणाऱ्या कादंबऱ्यांवरही पडल्या आहेत.

र. वा. दिघे यांच्या लेखनामागील प्रेरणा जशी नावीन्याची, ग्रामसुधारणेची आहे, तसेच रंजकतेपोटी त्यांनी लेखन केले आहे. प्रणयाची पार्श्वभूमी म्हणून निसर्गप्रदेशाचा त्यांनी वापर केला आहे. श्री. ना. पेंडसे यांनी नावीन्यापोटी आणि रंजकतेपोटी लेखन केले आहे. त्यांचा निसर्ग-प्रदेश स्वप्नरंजनाला पूरक आहे. अर्थात हा प्रदेश टूम म्हणून आला नाही. गो. नी. दांडेकरांनी सहानुभूतीपोटी लेखन केले असून प्रदेश-निसर्ग, आशय-अभिव्यक्तीचा अपरिहार्य भाग म्हणून आला आहे. लक्ष्मणराव देसाई आणि बा. भ. बोरकर यांनी गोमंतकीय सामाजिक आणि राजकीय जीवनप्रणयाच्या पार्श्वभूमीवर कणवेपोटी केले आहे. जयवंत दळवींनी कोलमडलेली ग्रामव्यवस्था आणि समाजव्यवस्था कोकणी पार्श्वभूमीवर रेखाटली आहे. हमीद दलवाई यांनी परिवर्तनकाळातील जातीयवादाची समस्या रेखाटली आहे, तर मधू मंगेश कर्णिकांनी दलितांच्या मागासलेपणाचे चित्रण केले आहे, तर वि. वा. हडपांनी समाज जागृतीच्या प्रेरणेतून लेखन केले आहे. मुख्य म्हणजे कादंबरी हा एक ललित लेखन प्रकार आहे आणि म्हणून मानवी भावभावना, जीवन, जीवनदृष्टिकोन, समस्या यांचे या लेखनातून दर्शन घडविणे हाच प्रधान हेतू असतो. अनुषंगाने एखाद्या प्रदेशाचे त्या प्रदेशातील लोकजीवनाचे दर्शन त्यातून घडते हेच उपरोल्लेखित कादंबऱ्यांमधून घडलेले आहे, हे लक्षात घेणे महत्त्वाचे ठरते.

* * *

LIBRARY AKOLE 422601

प्रकरण चार

# मराठवाड्याच्या जीवनातील प्रादेशिकतेचे स्वरूप

**प्रस्तावना :**

या प्रकरणात मराठवाड्याच्या जीवनातील प्रादेशिकतेचे स्वरूप शोधण्यासाठी पुढील कादंबऱ्या आधारभूत मानल्या आहेत.

| | |
|---|---|
| १. आडगावचे चौधरी | बी. रघुनाथ |
| २. पाचोळा | रा. रं. बोराडे |
| ३. गांधारी | ना. धों. महानोर |
| ४. गणगोत | गणेश आवटे |
| ५. विषवृक्षाच्या मुळ्या | वासुदेव मुळाटे |

अर्थात उपरोक्त कादंबऱ्या या कादंबरीकारांनी प्रदेशाचे दर्शन घडविण्यासाठी लिहिल्या आहेत असेच नाही, त्यांना आकलन झालेला जीवनानुभव रेखाटत असताना अनुषंगाने त्यांच्यावर प्रभाव गाजविणारा भूप्रदेश, निसर्ग आणि समाजजीवन पार्श्वभूमी म्हणून येत असते. कारण लेखक हा एक व्यक्ती म्हणून समाजघटक असतो. प्रदेशविशिष्ट समाजाचे संस्कार त्याच्या व्यक्तिमत्त्वावर होत असतात. स्वतःच्या प्रतिभासामर्थ्याने तो कलाकृतीला आकार देतो. हा आकार देत असताना अनुषंगाने प्रदेश चित्रित होतो, कधी तो जीवनानुभवाच्या केंद्रस्थानी असतो, त्या जीवनानुभवावर प्रभाव गाजवीत असतो. उपरोक्त कादंबऱ्यांच्या आधारे मराठवाड्यातील समाजवास्तवाचा शोध घेण्याचा प्रयत्न आहे. अर्थात हा शोध घेत असताना स्वातंत्र्यपूर्व काळातील मराठवाड्यातील निजामी राजवटीच्या प्रभावाने घडलेली मानसिकता, त्यांच्या भाषेवरील उर्दूचा प्रभाव, स्वातंत्र्योत्तर काळातील अपेक्षाभंग, औद्योगिकीकरण आणि शिक्षणाच्या अभावामुळे आलेले मागासलेपण, संतांच्या भूमीतील या लोकांची शांतताप्रिय समाधानी

वृत्ती तसेच धनिकांची सुखवस्तू विलासीवृत्ती, सरंजामदारांचा मुजोरपणा, जनतेची स्थितीप्रिय वृत्ती, त्यांची शेती-संस्कृती, घरांची रचना, जीवनव्यवहार यांच्या कादंबऱ्यांमधून आलेल्या चित्रणाधारे प्रादेशिकता शोधण्याचा प्रयत्न आहे.

**मराठवाड्याच्या जीवनातील प्रादेशिकतेचे स्वरुप :**

चौथ्या प्रकरणामध्ये मराठवाड्यातील प्रादेशिक जीवनाचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्यांचा विचार केलेला आहे. या कादंबऱ्यांचे लेखक हेही सामान्यपणे मराठवाड्यामध्ये राहणारे आहेत. आणि म्हणून त्यांच्या जीवनानुभवांचा प्रदेश त्यांनी लिहिलेल्या कादंबऱ्यांमधून रेखाटलेला आहे असे गृहीत धरले आहे. अर्थातच या कादंबऱ्यांमधून एकूण मराठवाड्याचा प्रदेश दृग्गोचर होत असला तरी तो या प्रदेशातील विविध ठिकाणांचा आहे असेही प्रत्ययाला येते. यासाठी बी. रघुनाथ, रा. रं. बोराडे, ना. धों. महानोर, गणेश आवटे आणि वासुदेव मुलाटे यांच्या अनुक्रमे 'आडगावचे चौधरी' (१९५४), 'पाचोळा' (१९७१), 'गांधारी' (१९७३), 'गणगोत' (१९८४) आणि 'विषवृक्षाच्या मुळ्या' (१९८९) या कादंबऱ्यांचा विचार केलेला आहे. अर्थात या पाच कादंबऱ्यांमधून घडणारे मराठवाड्यातील प्रादेशिक जीवनाचे चित्रण हे प्रातिनिधिक स्वरूपाचे आहे. म्हणजेच या पाच कादंबऱ्यांच्या आधारे मराठवाड्यातील प्रादेशिकतेचे स्वरूप सांगण्याचा प्रयत्न या ठिकाणी करण्यात आलेला आहे. यांपैकी 'आडगावचे चौधरी' ही स्वातंत्र्यपूर्व काळातील लोकजीवन चित्रण करणारी कादंबरी आहे, तर 'गांधारी'मधून स्वातंत्र्यपूर्व रझाकार राजवटीचे आणि स्वातंत्र्योत्तर काळातील सामाजिक-राजकीय जीवनचित्रण येते. अन्य तीन कादंबऱ्यांमधून परिवर्तन काळातील सामाजिक समस्या चित्रित झाल्या आहेत. हे प्रादेशिकतेचे स्वरूप सांगत असताना कादंबरीचा विषय, कादंबरी लेखनाचा काळ, तत्कालीन जीवन, लेखकाच्या आकलनाच्या मर्यादा, लेखकाच्या लेखन निर्मितीच्या मर्यादा आणि विषयांतर्गत मर्यादा इत्यादींचाही विचार गृहीत धरणे क्रमप्राप्त झालेले आहे. प्रत्यक्षातील मराठवाड्याच्या प्रदेशातील जीवनाचे स्वरूप लक्षात घेऊन त्या त्या लेखकाच्या कादंबरीमध्ये ते कसे आले हे सांगण्याचाही प्रयत्न केला आहे.

मराठवाडा म्हणत असताना औरंगाबाद, जालना, परभणी, बीड, नांदेड, लातूर. उस्मानाबाद आणि या प्रदेशाला जोडून असणारा अहिराणी भाषिक पट्ट्यातील प्रादेशिक वैशिष्ट्यांचा विचार या प्रकरणात अभिप्रेत आहे. हा प्रदेश तसा सपाट, काळ्या कसदार जमिनीचा आहे. गोदावरी नदीच्या काठचा सखल प्रदेश आहे. परंतु

सततच्या दुष्काळी परिस्थितीमुळे नगदी पिकांऐवजी त्यांना ज्वारी-बाजरीवरच अवलंबून रहावे लागते. त्यामुळे दारिद्र्य, बकालपणा आणि आळशी वृत्ती येथे दिसते. त्याचप्रमाणे मागासलेपणही दिसते. ही संतांची भूमी आहे. येथील लोक पंढरपूरच्या विठ्ठलाचे वारकरी आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात येथे रझाकारांची जुलमी, अत्याचारी राजवट होती. त्यामुळे येथील लोकांची मनोवृत्ती सोशिक असलेली दिसते. हिंदीचा प्रभावही त्यांच्या बोलीभाषेवर असलेला दिसतो. शैक्षणिकदृष्ट्या हा प्रदेश मागासलेला आहे. सरंजामशाही आणि धनिकांचा मुजोरपणा हाही या प्रदेशामध्ये प्रकर्षाने जाणवणारा भाग आहे. तसेच उपजीविकेसाठी पुरेशी जमीन प्रत्येकाकडे असल्याने शेतमजुरांची संख्या अत्यल्प आहे.

'पूर्वी निजामाच्या राज्यात असलेल्या मराठी भाषिक जनतेने स्वातंत्र्यासाठी दिलेल्या लढ्याच्या काळातच भावीकाळात अन्य मराठी भाषिक प्रदेशात सामील होण्याची आकांक्षा जोपासली होती. त्यामुळे मराठी संतांच्या या भूमीतील जनता कोणतीही अट न घालता संयुक्त महाराष्ट्रात सामील झाली. परंतु गेल्या पंचवीस वर्षांत सिंचन, विद्युतीकरण, रस्ते, रेल्वे, तांत्रिक शिक्षण व उद्योगधंदे या सर्व बाबतींत मराठवाड्यावर पुरेसा खर्च न केल्याने तो मागासलेला राहिला' ४३. असे रायभान जाधव म्हणतात. यादृष्टीने मराठवाड्याचे जीवन- स्वरूप पहावे लागते. कारण सातशे वर्षे या भागात परकीय राज्यकर्त्यांनी जुलूम केला आहे. औद्योगिकीकरणाअभावी केवळ शेतीवरच ही माणसे अवलंबून आहेत. सिंचनक्षमतेचा अभाव आणि सततची अवर्षणग्रस्त परिस्थिती यामुळे अन्य प्रदेशाच्या तुलनेत येथील लोकांच्या समस्या वेगळ्या आहेत. निसर्ग आणि राज्यकर्त्यांची अवकृपा येथे दिसते. वाहतूक-व्यवस्थेत बदल नाही. विद्युतीकरणाचा अभाव, रोजगाराचा अभाव, तांत्रिक शिक्षणाचा अभाव यांमुळे मराठवाड्याचा विकास होऊ शकला नाही. मराठवाड्याच्या जनतेच्या भोळेपणामुळे आणि अल्पसंतुष्ट वृत्तीमुळे ते संघटित होऊ शकले नाहीत. पर्यायाने ते विकासापासून वंचित असलेले दिसतात; तरीही अलीकडे स्वायत्त विकास मंडळाची स्थापना होऊन या मागास भागाचा अनुशेष दूर करण्याचा प्रयत्न होत आहे हे नाकारता येत नाही. यादृष्टीने या ठिकाणी निर्देशित केलेल्या कादंबऱ्यांचा विचार करावा लागतो.

बी. रघुनाथ यांनी 'आडगावचे चौधरी' मधून सत्तेच्या उन्मादामुळे सामान्य जनतेचे शोषण करणाऱ्या सरंजामदार घराण्याचा तीनशे वर्षांचा आणि दहा पिढ्यांचा

विशाल जीवनपट रेखाटला आहे. अस्सल प्रादेशिक वास्तव प्रकट करणारी ही कादंबरी लेखकाच्या निर्मितीमर्यादांमुळे धावत्या आढाव्यासारखी, समालोचनात्मक झाली आहे; तरीही सरंजामी जीवनाइतके प्रत्ययकारी चित्रण मराठी कादंबरीत प्रथमच घडले. सुलतानी अमलातील समाजवास्तवाचे जिवंत दर्शन, जातीयता, विषमता, भ्रष्टाचार, अन्याय, अत्याचार, दारिद्य, लोकांची सोशीकवृत्ती, स्त्रियांचे नगण्य स्थान, भ्रष्ट प्रशासकीय व्यवस्था इत्यादींतून घडविले आहे. मराठवाड्यातील सुलतानी राजवटीची राजधानी दौलताबाद या इलाख्यातील धारपिंपरी, रामदेवळी, झाडगाव, आडगाव, हिवरखेड या खेड्यांची पार्श्वभूमी कथानकास लाभली आहे. महादेव-मारुतीवरील लोकांची श्रद्धा, काळी कसदार जमीन, ज्वारी-हरभरा ही पिके, संवादासाठी वापरलेली बोली, तसेच सुलतानी राजवटीच्या काळाचे चित्रण करण्याचा उद्देश असल्यामुळे अरबी-फारसी-हिंदी शब्दांचा स्वाभाविकपणे केलेला वापर यातून 'प्रदेश' दृग्गोचर होतो. प्रदेश चित्रण करणे हा लेखकाचा उद्देशच नाही, तर सरंजामदारांच्या तीनशे वर्षांतील दहा पिढ्यांचे चित्रण करणे हा उद्देश आहे. तद्नुषंगाने प्रदेश चित्रित झाला आहे.

रा. रं. बोराडे यांनी 'पाचोळा' मधून परिवर्तनकाळात पारंपरिक गावगाडा उद्ध्वस्त होत असल्याची वेदना चित्रित केली आहे. लातूर, बार्शी या मराठवाडा प्रदेशातील एका खेड्यातील शिंपी कुटुंबाची ही शोकांतिका आहे. हेकेखोर, स्वाभिमानी, अर्धकुशल कारागीर गंगाराम आणि त्याची समजदार-सोशिक बायको पार्वती, मुलगा भाना आणि मुलगी तान्ही यांच्या जीवनातील ताण-तणाव लेखकाने समर्थपणे मराठवाडी किंवा लातूर-उस्मानाबादी बोलीतून रेखाटलेले आहेत. स्वभावजन्य शोकान्तिका म्हणून विषयांतर्गत मर्यादेमुळे प्रादेशिकता धूसर झाल्याचे जाणवत असले तरीही जनजातीचे जीवनचित्रण करणारी प्रादेशिक कादंबरी आहे हे लक्षात घेतले पाहिजे. एकच एक पारंपरिक बैठा व्यवसाय करण्याची सवय लागलेल्या अर्धकुशल कारागिरांना अन्य व्यवसाय करणे अशक्य होते. त्यातून आर्थिक कोंडी होऊन ताण-समस्या निर्माण होते. धनिकांशी लढा देण्याचा प्रयत्न करणे त्यांना न परवडणारे असते. परिवर्तन काळात आधुनिकतेला, पैसा आणि उपयोगितावादाला अधिक महत्त्व प्राप्त झाले. प्रेम, जिव्हाळा नष्ट झाला. धंदेवाईक वृत्ती वाढली. त्यातूनही ताण निर्माण झाल्याचे लेखकाने येथे चित्रित केले आहे. अस्मिता जपण्याचा प्रयत्न करणाऱ्या गंगाराम शिंप्याचा 'बळी' जातो. बोलीतील निवेदन-संवादांनी घटनाप्रसंगाना दृश्यरूप लाभते.

तसेच हेल-लकबी-म्हणी, वाक्‌प्रचार, उपमा-प्रतिमादींतून प्रदेश 'साकार' होतो. प्रदेशचित्रण हा लेखकाचा उद्देश नाही. तर आधुनिकीकरणामुळे निर्माण झालेली बलुतेदारांची समस्या चित्रण करणे हा उद्देश आहे. तद्नुषंगाने मराठवाड्याचा प्रदेश चित्रित झाला आहे. केवळ प्रादेशिक म्हणून नव्हे तर मानवी जीवनातील कारुण्याचे दर्शन घडविणारी ही कादंबरी आहे, हे स्पष्ट होते.

ना.धों. महानोरांची 'गांधारी' ही मराठवाड्यातील स्वातंत्र्यपूर्व काळातील रझाकारी उन्मादाची राजवट आणि स्वातंत्र्योत्तर काळातील भ्रष्ट राजकीय पार्श्वभूमीवरील कादंबरी आहे. रझाकारांनी या प्रदेशात अन्याय-अत्याचार केले, त्यांच्या जुलमी शासनव्यवस्थेला कंटाळलेल्या जनतेला स्वातंत्र्यानंतर सुख-समाधान लाभेल असे वाटले, परंतु पुढाऱ्यांच्या स्वार्थी वृत्तीमुळे, गटबाजीच्या राजकारणामुळे जनतेची निराशा झाली. येथे लेखकाने सुष्ट-दुष्टांचा संघर्ष चित्रित करून लोकजीवनदर्शन घडविले आहे. भागवत-लालजींसारखे सुष्ट आणि जगदेव-राजमलसारख्या दुष्टांच्या संघर्षातून सामाजिक-राजकीय वातावरणनिर्मिती केली आहे. जातीयतेच्या-जागृतीच्या प्रश्नावरही प्रकाश टाकला आहे. मुळातील मराठवाड्यातील आळशी माणूस कूळकायद्याने विनासायास जमिनी मिळाल्यामुळे अधिक आळशी झाला. दुष्काळामुळे उत्पन्न घटले. विकासकामासाठी सरकारने दिलेल्या कर्जाच्या रकमेचा योग्य विनियोग न झाल्याने उत्पन्नात वाढ होऊ शकली नाही. जमिनीवर सरकारी कर्जाचा बोजा वाढला. सरकार कर्ज माफ करील या आशेवर लोक विसंबले. कर्जफेड न करण्याची मनोवृत्ती वाढली. स्वार्थी पुढाऱ्यांनी लोकांच्या आळशी स्वभावाचा - दारिद्र्याचा फायदा घेऊन त्यांची आर्थिक कोंडी केली. उदा. जगदेव-राजमल यांनी गांधारीतील लोकांना झुलवत ठेवले. यातून मराठवाड्याचा 'प्रदेश' साकार होतो. कर्जफेड न करण्याची, श्रम न करता बसून खाण्याची आळशी-अज्ञानी वृत्ती अन्य प्रदेशांत दिसत नाही. वशिलेबाजी, लबाडी, गटबाजी, जातीयवाद, स्वार्थ, लाचलुचपत यांतून सामाजिकता स्पष्ट होते आणि त्यातून प्रादेशिकता साकार होते. औरंगाबाद-अजिंठा-जळगाव जिल्ह्यांतील लोकजीवन, लोकांच्या सवयी, समजुती, त्यांच्या श्रद्धा, जीवनपद्धती आणि भाषा यांतूनही 'प्रदेश' दृग्गोचर होतो. खानदेश-मराठवाड्याच्या सीमेवरील गांधारी या गावची पार्श्वभूमी कादंबरीला लाभली आहे. बसकी धाब्या-पत्र्याची घरं, भुईमूग, ज्वारी, कापूस, केळी, मोसंबी, ऊस ही पिके, मारुती-भवानीमातेवरील श्रद्धा, यात्रा-जलसे-तमाशा-कीर्तनाचा नाद यांतूनही 'प्रदेश' सिद्ध होतो. अहिराणी-बोलीतील तसेच मराठवाडा प्रदेशातील

बोलीतील शब्द तसेच परिवर्तनसूचक इंग्रजी शब्दांचे स्थानिक बोलीच्या ढंगाने केलेले उच्चारण आणि उर्दू, हिंदी, इंग्रजी व मराठी शब्दांनी युक्त पात्रानुगामी केलेला बोलीचा वापर, शिव्या, म्हणी, वाक्‌प्रचारादींतून 'प्रदेश' साकार होतो. सुष्ट-दुष्टांचे चित्रण करणारी केवळ 'प्रादेशिक' म्हणून नव्हे तर एक कलात्मक कादंबरी आहे. मानवी भावभावनांचे कलात्मक चित्रण लेखकाने केले आहे.

गणेश आवटे यांची 'गणगोत' ही स्वातंत्र्योत्तर काळातील मराठवाड्यातील एका खेडेगावातील सासुरवाशिणीच्या जीवनातील घटना-प्रसंगांची आणि त्यातून उद्ध्वस्त होत गेलेल्या आंजूच्या भावजीवनाची ही शोकांतिका आहे. मानपान-खोटी प्रतिष्ठा-हुंडा-समस्येवरील समाजवास्तवाचे जिवंत चित्रण लेखकाने केले आहे. हुंड्याच्या ज्वलंत व तापदायक समस्येवर आधारलेली करुण-भयंकर व हृदयद्रावक अशा या भावकथेतील प्रादेशिकता विषयांतर्गत मर्यादेमुळे अस्पष्ट, धूसर झाली आहे. कारण या समस्येने महाराष्ट्राच्या अन्य प्रदेशांतही उग्र रूप धारण केलेले दिसते. तरीही मराठवाड्यातील मागासलेपण, अज्ञानामुळे नवविवाहितांची भावनिकदृष्ट्या अधिक कोंडी होते, हे लक्षात घेतले पाहिजे. जागृतीअभावी हा कोंडमारा झालेला दिसतो. तसेच तुटक घटना-प्रसंगांतून प्रदेश निवडता येतो. हरभरा, जवस, ज्वारी, गहू, कापूस, करडी, साळ, तूर ही मराठवाड्यातील पिके, काळी कसदार सपाट जमीन, सोसाट्याचा वारा, पाऊस, दुष्काळ, रखरखीत उन्हाळा, कर्जबाजारी, दरिद्री लोकजीवन, पात्रांच्या मानसिकतेनुरूप आलेला दृकप्रत्ययी निसर्ग, यातून मराठवाड्याचा 'प्रदेश' गोचर होतो. लोकांची आळशी, निष्काळजी, बेफिकीर वृत्ती, मागासलेपण तसेच शिक्षणामुळे होऊ घातलेली जागृती, स्त्री-पुरुष समानतेचा विचार, स्वार्थी वृत्ती, तसेच श्रद्धासमजुती, उखाणे, लोकगीते, ओव्या या संस्कृतिविशेषातून लोकजीवन संघर्ष चित्रित होतो. त्यातून 'प्रदेश' सिद्ध होतो. शिवाय पात्रमुखी बोलीभाषेतील निवेदन संवाद-स्थानिक बोलीतील शब्दवैभव, म्हणी, वाक्‌प्रचारादींतून प्रदेश साकार होतो. प्रदेश चित्रण करणे हा लेखकाचा उद्देश नाही तर हुंड्याची समस्या चित्रित करणे हाच उद्देश आहे. आंजूच्या जीवनातील ताणतणावांचे चित्रण करताना 'प्रदेश' साकार झाला आहे.

वासुदेव मुलाटे यांनी 'विषवृक्षाच्या मुळ्या' कादंबरीतून 'भ्रष्टाचाराने पोखरलेले सहकार क्षेत्र' साकार केले आहे. त्याला बीड-परभणी जिल्ह्यांची पार्श्वभूमी लाभली आहे. येथे विषयांतर्गत मर्यादेमुळे प्रादेशिकता धूसर झाली आहे. संपूर्ण प्रादेशिकता येथे येऊ शकली नाही. याचे कारण कादंबरीच्या विषयातच शोधावे लागते. कारण

महाराष्ट्राच्या अन्य प्रदेशातील सहकार क्षेत्र भ्रष्टाचाराने पोखरले आहे, याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. तरीही मराठवाड्यातील जनतेच्या मागासलेपणाचा-अज्ञानाचा पुढारी-सरकारी कर्मचारी फायदा घेतात याकडे दुर्लक्ष करून चालत नाही. नव्हे, त्यातूनच प्रादेशिकता दृग्गोचर होते. वशिलेबाजी, मनमानी कारभार, पुढाऱ्यांची अरेरावी, अनिर्बंध वर्तन, नोकरदारांचा मिंधेपणा, लाचारी, प्रवाहात सामील होण्याच्या वृत्तीवर लेखकाने प्रकाशझोत टाकला आहे. सहकारात नोकरी करणाऱ्या संवेदनाक्षम विश्वनाथ तरटयांचा कोंडमारा लेखकाने येथे चित्रित केला आहे. सुट्यासुट्या घटनाप्रसंगांतून माणसांच्या कृतिउक्तीतून प्रदेश टिपता येतो. परभणी जिल्ह्यातील टाकळी, मानवत, सेलू, कलमनुरी; तर बीड जिल्ह्यातील खेर्डा, माजलगाव, खानापूर, गेवराई, पांढरवाडी खेड्यांतील स्वानुभवच लेखकाने चित्रित केला आहे. सपाट उजाड माळरान किंवा काही ठिकाणची काळी जमीन, दाहक जीव घेणारा उन्हाळा, ज्वारी, मिरची, कांदे, लसूण ही पिके आणि पात्रांच्या मानसिकतेनुरूप आलेला निसर्ग, पत्र्या-धाब्याची, मातीच्या कच्च्या विटांची किंवा दगडगोट्यांच्या भिंती असलेली घरे, यातून मागासलेपण स्पष्ट होते. कर्जबाजारी, अगतिक, लाचार, दरिद्री लोकांचे सावकारांकडून होणारे शोषण तसेच सरकारी वसुली- अधिकाऱ्यांकडून गरिबांची होणारी पिळवणूक यातून प्रदेश सिद्ध होतो. निवेदनासाठी जरी प्रमाण भाषेचा वापर केला असला तरी संवादासाठी पात्रानुरूप प्रमाण किंवा बोली भाषेचा वापर केला आहे. तसेच म्हणी, वाक्प्रचारादीतून प्रदेश गोचर होतो. प्रदेश चित्रण करणे हा लेखकाचा उद्देश नाही, केवळ संवेदनाक्षम माणसाचा सहकार क्षेत्रात होणारा कोंडमारा आणि भ्रष्टाचाराने पोखरलेले सहकार क्षेत्र रेखाटणे हाच लेखकाचा उद्देश आहे. तद्नुषंगाने मानवी भावभावनांच्या चित्रणातूनच प्रादेशिकता दृग्गोचर होते.

सारांश, सरंजामदाराच्या तीनशे वर्षांचा आणि दहा पिढ्यांचा जीवनपट बी. रघुनाथांनी रेखाटला, तर रा. रं. बोराडे यांनी बलुतेदार शिंपी समाजाची समस्या चित्रित केली आहे.

ना. धों. महानोरांनी स्वातंत्र्योत्तर भ्रष्ट राजकीय जीवन चित्रण केले, तर हुंड्याची समस्या गणेश आवटे यांनी रेखाटली असून वासुदेव मुलाट्यांनी भ्रष्टाचाराने पोखरलेले सहकारक्षेत्र साकार केले. मानवी भावभावनांच्या चित्रणाबरोबर लोकजीवनातून प्रदेश चित्रित केला आहे.

* * *

प्र
क
र
ण
पाच

# वैदर्भीय जीवनातील प्रादेशिकतेचे स्वरूप

**प्रस्तावना :**

वैदर्भीय जीवनातील प्रादेशिकतेच्या स्वरूपाचा शोध घेण्यासाठी पुढील कादंबऱ्या आधारभूत मानल्या आहेत-

| | |
|---|---|
| १. पूर्णामायची लेकरं | गो. नी. दांडेकर |
| २. धग | उद्धव शेळके |
| ३. हाल्या, हाल्या, दुधू दे ! | बाबाराव मुसळे |
| ४. मेड इन इंडिया | पुरुषोत्तम बोरकर |
| ५. झेलझपाट | मधुकर वाकोडे |

कादंबरी या साहित्यप्रकाराचा अनुभवपट इतर कोणत्याही प्रकारांपेक्षा अधिक व्यापक आणि प्रदीर्घ असू शकतो. या प्रकारातून उमटणारे प्रादेशिक जीवन हे तुलनेने अधिक अंगोपांगानिशी येण्याची शक्यता जास्त असते. या दृष्टीने प्रादेशिक कादंबरीच्या घटकाधारे उपरोल्लेखित कादंबऱ्यांचे चिकित्सक विश्लेषण करून निष्कर्षापर्यंत जाण्याचा माझा प्रयत्न आहे. यासाठी विदर्भाची प्राकृतिक रचना, निसर्ग, औद्योगीकीकरण आणि शिक्षणाच्या अभावामुळे आलेले मागासलेपण, दारिद्र्य, सरंजामदारांचे वर्चस्व, आदिवासींच्या जीवनशैलीचा शासनाच्या कायद्यांमुळे होणारा ऱ्हास यांचे कादंबरीतून चित्रण कसे झाले आहे, प्रादेशिकता अनुषंगाने आली की अंगभूत आहे याचा शोध घेण्याचा प्रयत्न आहे. परंतु प्रदेशचित्रण हा लेखकांचा लेखनहेतू असेलच असे नाही. कादंबरीकार हा एक ललित लेखक असतो आणि तो आपली कलाकृती निर्माण करीत असताना त्याला आकलन झालेल्या जीवनानुभवाचे स्वरूप स्वप्रतिभेच्या सामर्थ्याने तो प्रकट करीत असतो. त्या जीवनानुभवातील सुट्यासुट्या घटनाप्रसंगांतून आणि माणसाच्या कृतिउक्तीतून प्रदेशवैशिष्ट्यांचा शोध घ्यावा लागतो, त्यानुसार उपरोल्लेखित कादंबऱ्यांच्या

आधारे वैदर्भीय जीवनातील प्रादेशिकता आणि समाजवास्तवाचा शोध घेण्याचा प्रयत्न आहे.

**वैदर्भीय जीवनातील प्रादेशिकतेचे स्वरूप :**

पाचव्या प्रकरणामध्ये वैदर्भीय प्रादेशिक जीवनाचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्यांचा विचार केलेला आहे. या कादंबऱ्यांचे लेखक हे सामान्यपणे विदर्भात राहणारे आहेत किंवा त्यांच्या संस्कारक्षम वयावर या प्रदेशाचे संस्कार झालेले आहेत. जसे गो. नी. दांडेकरांनी या संस्कारांमुळेच वऱ्हाडी जीवनचित्रण केले आहे. एकूणच या सर्व लेखकांच्या जीवनानुभवाचा प्रदेश त्यांनी लिहिलेल्या कादंबऱ्यांमधून रेखाटलेला आहे असे गृहीत धरले आहे. अर्थातच या कादंबऱ्यांमधून एकूण वैदर्भीय प्रदेश गोचर होत असला तरी तो या प्रदेशातील विविध ठिकाणांचा आहे असेही प्रत्ययाला आले आहे. म्हणून गो. नी. दांडेकर, उद्धव शेळके, बाबाराव मुसळे, पुरुषोत्तम बोरकर, मधुकर वाकोडे या कादंबरीकारांच्या अनुक्रमे 'पूर्णामायची लेकरं' (१९५८), 'धग' (१९६०), 'हाल्या, हाल्या, दुधू दे' (१९८५), 'मेड इन इंडिया' (१९८७), 'झेलझपाट' (१९८८) या पाच कादंबऱ्यांचा विचार केलेला आहे. यामधून घडणारे वैदर्भीय प्रादेशिक जीवनाचे चित्रण हे प्रातिनिधिक स्वरूपाचे आहे. म्हणजेच या पाच कादंबऱ्यांच्या आधारे वैदर्भीय प्रादेशिकतेचे स्वरूप सांगण्याचा प्रयत्न या ठिकाणी करण्यात आलेला आहे. हे स्वरूप सांगत असताना कादंबरीचा विषय, कादंबरी लेखनाचा काळ आणि तत्कालीन जीवन, लेखकाच्या आकलनाच्या मर्यादा, लेखकाच्या लेखननिर्मितीच्या मर्यादा, विषयाच्या अंगभूत मर्यादा इत्यादींचाही विचार गृहीत धरणे क्रमप्राप्त झालेले आहे. प्रत्यक्षातील या प्रदेशातील जीवनाचे स्वरूप लक्षात घेऊन त्या त्या लेखकाच्या कादंबरीमध्ये ते कसे आले हे सांगण्याचाही प्रयत्न या ठिकाणी आहे.

विदर्भ म्हणत असताना बुलढाणा, अमरावती, अकोला, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली या नऊ जिल्ह्यांतील प्रादेशिक वैशिष्ट्यांचा विचार या प्रकरणात अभिप्रेत आहे. हा प्रदेश तसा डोंगराळ, मागासलेला, औद्योगिकीकरणापासून वंचित असलेला, शैक्षणिक जागृती न झालेला आहे. तसेच यातील काही जिल्हे पूर्णपणे आदिवासी वस्ती असलेले आहेत. 'कापूस' हे या प्रदेशातील मुख्य पीक आहे. तसेच मोसंबी-संत्र्यांच्या बागा या प्रदेशात आहेत. तरीही बहुजन समाज दारिद्र्यरेषेखालील जीवन जगतो. इतर प्रदेशांच्या तुलनेत हा भाग अधिक मागासलेला आहे. सरंजामशाही आणि धनिकांचा मुजोरपणा हाही प्रकर्षाने

जाणवणारा भाग आहे. वैदर्भीय माणूस दिलदार असून तो परिस्थितीमुळे अगतिक झालेला दिसतो. रिकामपणामुळे सण-उत्सवांमध्ये ते अधिक रमतात. सर्व देवांचे भंडारे करून गावभोजन करण्याची त्यांची परंपरा असलेली दिसते. भूप्रदेशाच्या-उन्हाळ्याच्या परिणामांमुळे त्यांना अधिक वेळ सावलीत विश्रांती घ्यावी लागल्याने वेळ घालवण्यासाठी ते जुगार खेळतात. दारिद्र्य, बकालपणामुळे ते व्यसनाधीनही झालेले दिसतात. तसेच आदिवासींच्या अज्ञानाचा फायदा सरकारी अधिकारी आणि व्यापारी घेतात. त्यांचे शोषण करतात. घराणेशाही आजही या प्रदेशात आहे असेही दिसते. संयुक्त महाराष्ट्रात विदर्भाचा समावेश होऊनही या प्रदेशाच्या विकासास गती आली नाही. प्रादेशिक असमतोल दूर होऊ शकला नाही. शेतमालाला योग्य भाव मिळत नसल्यामुळे आधुनिकीकरणाच्या काळातही त्यांचे जीवन समृद्ध होऊ शकले नाही, त्यामुळे संघटित झालेल्या वैदर्भीय जनतेने स्वतंत्र विदर्भाची मागणी केली असली तरी त्यामध्ये केवळ राजकारण आहे. सत्तेसाठी वैदर्भीय पुढाऱ्यांनी खेळलेली चाल आहे. जनतेच्या विकासाची इच्छा किती हा प्रश्नच अनुत्तरीत राहतो. तरीही आज विदर्भात उद्योगधंदे सुरू होऊ लागले आहेत. प्राथमिक आरोग्यकेंद्र, तांत्रिक शिक्षणाची सोय, रस्ते या गोष्टींना प्राधान्य दिलेले दिसते. उत्पन्नात वाढ होऊ लागली आहे. रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. मनोरंजनाची साधने आली आहेत. साम्यवादी विचारवंतांनी शेतमालाच्या किमतीकडे सरकारचे लक्ष वेधले आहे. शेतमालाला भाव मिळाला तर विदर्भ समृद्ध होईल असे वैदर्भीय शेतकरी चळवळीचे स्वरूप असलेले दिसते. तसेच औद्योगिकीकरणामुळे रोजगाराचा प्रश्न सुटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. हे मान्य करूनही शेतमालाला योग्य भाव मिळत नाही. रासायनिक खतांच्या आणि कीटकनाशकांच्या किमती भरमसाठ वाढलेल्या आहेत. कापूस फेडरेशनमध्ये भ्रष्टाचार वाढला. त्याचबरोबर कापसाचे खोटे बी-बियाणे विकणाऱ्यांची संख्याही कमी नाही. याचा अर्थ असा की, महाराष्ट्रातील अन्य प्रदेशांच्या तुलनेत विदर्भ अधिक मागासलेला आहे. जनतेचे शोषण होते. आधुनिकीकरणाने नव्या समस्या निर्माण झाल्या. याद्दष्टीने या ठिकाणी निर्देशित केलेल्या कादंबऱ्यांचा विचार करावा लागतो.

गो. नी. दांडेकरांची 'पूर्णामायची लेकरं' ही 'वऱ्हाड'च्या खेड्यातील मंथर-गतीने ठेचकाळत चालणाऱ्या जीवनाची कथा आहे. पूर्णा खोऱ्यातील साध्याभोळ्या माणसांचे दरिद्री जीवन, त्यांच्याच वऱ्हाडी बोलीत बयिराम ढोमण्याच्या कर्मकहाणीआधारे

रेखाटले आहे. आळंदी-पंढरीचे ते वारकरी आहेत. मोठा महादेव व मारुतीवर त्यांची श्रद्धा आहे. टाळ-मृदंग, ढोल-पिलमपोव्याच्या तालावर वऱ्हाडी लोक भजन करतात. अन्य प्रदेशांत भजनाच्या वेळी पिलमपोवे वाजविले जात नाहीत. विदर्भाचे मागासलेपण बेलोरे ते बहिरमच्या धुळीच्या कच्च्या रस्त्यांधारे स्पष्ट होते. व्यक्तिचित्रणातून प्रदेश साकार होतो. स्वभावातील मोकळेपणा, आळशी वृत्ती, परंपराप्रियता, धार्मिक वृत्ती, दारिद्र्य, तऱ्हेवाईकपणा, बुआबाजीवरील श्रद्धा, समजुती, लोककथांनी त्यांचे सांस्कृतिक जीवन घडलेले दिसते. मुस्लिमांच्या बहिरमबोवा, सदिलबोवावरही त्यांची श्रद्धा आहे. नंगेबाबाच्या दर्शनाला ते धावतात. बेलोरे, बहिरम, देऊळवाडा, परतवाडा, चांदूर, अचलपूर, दर्यापूर हा पूर्णा खोऱ्यातील प्रदेश, मोठ्या महादेवाची डोंगररांग, पूर्णामायेवर श्रद्धा असलेले बावनगाव वऱ्हाड, नदीकाठची सपाट काळी जमीन तसेच भुईमूग, तूर, ज्वारी, कापूस, गहू, हरभरा, डांगर-टरबूजाच्या वाड्या, बाभळी, महारूख, निंब, सिंधी, गोधनी, हिवर, धावडा, आंबे हे वृक्ष, वानरे, जमीनदारांचे वाडे आणि सामान्यांची पांढऱ्या मातीची खपरेली, पऱ्यांनी किंवा तुराट्यांनी झाकलेली घरे, धगधगता उन्हाळा, तसेच वऱ्हाडी बोलीतील संवाद, शब्द, म्हणी, वाक्प्रचारादीतून तसेच त्याबरोबर येणारे हिंदी शब्द मध्यप्रदेशाची जवळीक आणि निजामांच्या राजवटीचा प्रभाव स्पष्ट करणारी आहेत. संस्कारक्षम वयातील आजोळचे स्वानुभव लेखकाने जिव्हाळ्याने रेखाटल्याने कादंबरीतील 'प्रदेश' उपरा वाटत नाही.

उद्धव शेळके यांच्या 'धग' कादंबरीचा वैदर्भीय जीवनाचे स्वरूप समजण्यासाठी आधार घेतला आहे. परंपरागत ग्रामीण व्यावसायिकांची कुचंबणा हा प्रस्तुत कादंबरीचा विषय आहे. शिंपी समाजातील कष्टाळू, जिद्दी कौतिकच्या संसाराची परवड येथे लेखकाने चित्रित केली आहे. पारंपरिक व्यवसायाबद्दलच्या प्रतिष्ठेच्या कल्पनांवर लेखकाने प्रकाशझोत टाकला आहे. या गावगाड्यातील जिव्हाळा - प्रेमळपणा नष्ट होत असल्याची समस्याही लेखकाने चित्रित केली आहे. समान आर्थिक स्तरावरील हिंदु-मुस्लिम ऐक्य, विषमता, जातिभेद, वैदर्भीय माणसाचा दिलदारपणा लेखकाने घटनाप्रसंगांतून आणि सामान्य माणसाच्या कृति-उक्तींतून प्रकट केला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील लोकजीवन प्रस्तुत कादंबरीत चित्रित झाले आहे. महारोग झालेला महादेव मिशनऱ्यांबरोबर निघून जातो. यातून इंग्रजांच्या राजवटीचा काळ सूचित होतो. येथे कादंबरीकाराने निवडलेल्या विषयालाच काही अंगभूत मर्यादा असल्याने संपूर्ण प्रादेशिकता येऊ शकली नाही. प्रादेशिकता धूसर झाली असा आक्षेप घेतला जाऊ शकतो. कारण

शिंपी या पारंपरिक व्यावसायिकाची समस्या अन्य प्रदेशांतही निर्माण झालेली दिसते. परंतु या कादंबरीतील प्रादेशिकता ही जातीजमातीच्या जीवनाशी निगडित आहे, याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. तसेच काही घटना-प्रसंगांतून वैदर्भीय 'प्रदेश' निवडता येतो. म्हणजेच येथे दुहेरी प्रादेशिकता साकार होते. एक - जातीजमातीशी निगडीत प्रादेशिकता, आणि दोन - वैदर्भीय लोकजीवनातील प्रादेशिकता. वर्धा-अमरावती या विदर्भातील जिल्ह्यांची भौगोलिक पार्श्वभूमी कथानकास लाभली आहे. या प्रदेशातील हिंगणघाट, तळेगाव ठाकूर, मोझरी, चांदूर, तळणी, संदुर्जने, तिवसे, शेंदोळे, कौंडण्यपूर आणि सालबर्डी या खेड्यांची पार्श्वभूमी येथे आली आहे. वैदर्भीय माणसांचा दिलदारपणा आणि मागासलेपणा, आर्थिक स्तर लेखकाने चित्रित केले आहे. कुडा-मातीची घरे, जवस, तूर, तीळ, मूग, कापूस, जोंधळा ही पिके, हिवर, बाभळ, गोन्नीचे झुडपं, आंबा, चिंच, कौठ, रणरणता दाहक उन्हाळा, सपाट माळरानाचा प्रदेश, सोसाट्याचा वारा, स्थानिक देवदेवतांवरील महादेव-सादुलबुआवर हिंदू - मुस्लिमांची श्रद्धा, तसेच संवादासाठी वापरलेली वऱ्हाडी बोली, म्हणी, वाक्प्रचार, प्रतिमादीतून प्रदेश साकार होतो. प्रादेशिकतेचा प्रवाह समृद्ध करणारी 'धग' ही वैशिष्ट्यपूर्ण कादंबरी आहे.

बाबाराव मुसळे यांची 'हाल्या हाल्या दुधू हे' ही सामान्य शेतकरी कुटुंबाची म्हणजेच न्यानबा-आनसाच्या संसाराची शोकांतिका आहे. न्यानबा पराभूत सरंजामी मनोवृत्तीचा 'बळी' ठरतो. ऐपत नसताना कर्ज काढून मुलीचे लग्न केल्यामुळे आर्थिक संकटाच्या भोवऱ्यात न्यानबा सापडतो. अवघ्या नऊ-दहा महिन्यांच्या आत संसाराची परवड होऊन न्यानबाचा मृत्यू होतो. सुष्ट-दुष्टाच्या संघर्षातून ही शोकांतिका घडते. न्यानबा सुष्ट तर संतोबा सावकार दुष्ट आहे. कादंबरीकाराने निवडलेल्या विषयाला काही अंगभूत मर्यादा असल्यामुळे संपूर्ण प्रादेशिकता येऊ शकली नाही. असे असले तरीही प्रदेशातील लोकजीवन, लोकांच्या सवयी, समजुती, त्यांची श्रद्धा, जीवनपद्धती आणि भाषा या सर्वांतून प्रदेश दृग्गोचर होतो. वाशिम, अकोला परिसरातील खेड्याची पार्श्वभूमी कादंबरीला लाभली आहे. कापूस, ज्वारी, करडई, उडीद, मूग, तूर ही पिके, पळस, चिल्होरी, हिवर हे वृक्ष, काळी माती, डोंगराळ जंगलाचा प्रदेश, मानसिकतेनुरूप आलेला निसर्ग, उन्हाळा-पावसाळा यांच्या वर्णनातून प्रदेश साकार होतो. लोकगीत, लोककथा, सण-उत्सव, शिमगा, शिरवाळ, पोळा, दसरा, तसेच देवदेवता, जसे आसरा, चंदनशेकमहाराज, महादेव, मारुतीवरील श्रद्धा आणि अन्य

समजुतीतून प्रदेश गोचर होतो. गावातील गटबाजी, भांडवलशाहीकडे तोल गेलेली अर्थव्यवस्था, रिकामपणामुळे दुसऱ्याच्या खाजगी भानगडीत लक्ष घालण्याची वृत्ती, महागाई, विषमता, जातीयता, भ्रष्टाचार, शिक्षणप्रसाराचा अभाव यांतून प्रदेश सिद्ध होतो. नवीन सुधारणांचा, राजकारणाचा ग्रामीण जीवनावर होणारा परिणाम हे बदलत्या खेड्याच्या जीवनाचे वास्तवदर्शन लेखकाने केले आहे. न्यानबा-आनसा-सोबाचे भावजीवन आणि एकूण प्रदेशविशिष्ट लोकजीवनातून - कापूस फेडरेशनच्या उल्लेखातून, पुढाऱ्यांच्या ढोंगीपणातून तसेच वऱ्हाडी बोलीचा लेखकाने समर्थपणे केलेल्या वापरातून प्रदेश साकार होतो.

पुरुषोत्तम बोरकरांनी 'मेड इन इंडिया' ही अस्सल प्रादेशिक कादंबरी पंजाबराव गरसोळीकर या पदवीधराचे भावजीवन टिपणारी जशी आहे तशीच विदर्भातील लोकजीवन दर्शन घडविण्याचे सामर्थ्यही तिच्यात आहे. आधुनिकीकरणाच्या काळात खेड्यातील पारंपरिक जीवनशैली संस्कृतीचा ऱ्हास झाला हा या कादंबरीचा विषय आहे. ग्रामजीवनातील सुधारणांबरोबर नव्या समस्या निर्माण झाल्या. तरुण पिढीचा प्रतिनिधी पंजाबराव गरसोळीकर या समाजव्यवस्थेवर लोकशाही समाजव्यवस्थेतील ऱ्हासपर्वावर भाष्य करतो. वशिलेबाजी, भ्रष्टाचार, राजकारणातील घराणेशाही, भांडवलशाहीकडे तोल गेलेली अर्थव्यवस्था, पैशाला प्राप्त झालेले महत्त्व, हुंड्याची समस्या, महागाई, भेसळ, सामान्य माणसाचे नगण्य जीवन, भ्रष्ट प्रशासन व्यवस्था, बुआबाजी आणि राजकारणाला धंद्याचे स्वरूप प्राप्त होणे, यामुळे जिव्हाळा, प्रेम, इमानीवृत्ती, धार्मिकवृत्ती, खानदानीपणा नष्ट होऊन व्यवहारी वृत्ती, स्वार्थाला महत्त्व प्राप्त झाले. आळशी, छंदीफंदी, व्यसनाधीन, जुगारी, कर्जबाजारी जनता आणि स्वार्थी-ढोंगी भांडवलदार, राजकारणामधील विषमतेवर लेखकाने प्रकाशझोत टाकला आहे. आजच्या नव्या संकरीत धेडगुजरी ग्रामीण संस्कृतीचे चित्रण लेखकाने केले आहे. शहरी संस्कृतीच्या आक्रमणामुळे शिक्षण आणि प्रसारमाध्यमाच्या परिणामातून खेड्यातील लोकजीवन समृद्ध होण्याऐवजी पोखरले गेले. वैदर्भीय माणसांचा श्रद्धाळू, भोळ्या-भाबड्या, आळशी, कर्जबाजारी, कष्ट न करण्याचा स्वभाव, निष्काळजीपणा, अज्ञान, बेकारी, रिकामपणामुळे वाढलेली व्यसनाधिनता, जुगार-मटक्याचे वेड या सर्वांतून प्रदेश दृग्गोचर होतो.

विदर्भातील अकोला जिल्ह्यातील भुली नदीच्या काठावर गरसोई गाव, काळी माती, कापूस, ऊस, मिरच्या, कांदे, ज्वारी, मूग, उडीद, मठ, जव, लाख, तूर, भगर,

जवस ही पिके, पूर्णा नदी, दर्यापूर तालुक्यातील गाडगेमहाराजांचे शेंडगाव, सातपुड्याच्या निळ्या रांगा, अंजनगाव सूर्जी आणि विविध धार्मिक-सांस्कृतिक क्षेत्रांच्या उल्लेखातून ही संतांची भूमी असलेला प्रदेश दृग्गोचर होतो. देवदेवतांचे भंडारे हे जसे श्रद्धेमुळे केले जातात त्याचप्रमाणे रिकामपणामुळे यात्रा-उत्सवात ते रमतात. भू-प्रदेश निसर्गाचा लोकजीवनावर परिणाम होतो. दाहक उन्हाळ्यामुळे लोक सावलीला विश्रांती घेणे पसंत करतात. अर्थातच शेतीचे काम होत नाही. सावलीला बसण्यातून रिकामपण घालविण्यासाठी जुगार-मटका त्यांना सुचतो. मागासलेल्या विदर्भात कारखानदारी आणि सहकारी संस्थांचा अभाव आहे. त्यामुळे तरुणांना नोकऱ्या मिळत नाहीत. सुशिक्षित बेकार पर्यायाने व्यसनाधीन होतात. याप्रमाणेच स्वतंत्र विदर्भाची-विकास मंडळाची मागणी, बॅकलॉग, सापत्नभावाची वागणूक, साखरसम्राट आणि शेतकरी संघटनेला विरोध, सातपुडा हिमालयाच्या मदतीला, सरकारी योजनांचा बभ्रा अधिक काम कमी अशी स्थिती, वऱ्हाडी माणसाचा दिलदारपणा, याशिवाय वऱ्हाडी बोलीतील निवेदन-संवाद, नावीन्यपूर्ण शब्दकळा, शिव्या, म्हणी, वाक्प्रचार, उपमा-प्रतिमादींतून प्रदेश साकार होतो. सरंजामशाही आणि मग्रूर घराणेशाहीचे चित्रण करणारी अस्सल प्रादेशिक कादंबरी आहे.

मधुकर वाकोडे यांनी 'झेलझपाट' मधून तारूबांद्यातील कोरकू आदिवासींच्या जीवनाची परवड रेखाटली आहे. सरकारी अधिकारी कायदे आणि व्यापारी यांच्यामुळे कोरकूची पारंपरिक नैसर्गिक जीवनशैली नष्ट होत आहे. अमरावती - परतवाडा - मेळघाट परिसरातील कोरकू आदिवासी या जनजातीशी निगडित प्रदेश विशिष्ट कादंबरी आहे. कोरकू समाजातील केरू-फुलयच्या असफल प्रीतीची ही जशी शोकांतिका आहे, त्याचप्रमाणे कोरकूंच्या समाजजीवनाचे आणि जीवनपद्धतीचे दर्शनही लेखकाने घडविले आहे. मोहफुले-लाकूडफाटा विकून, मच्छीमार करून उदरनिर्वाह करणाऱ्या, मोहाची दारू पिऊन सण-उत्सवाला नृत्य करणाऱ्या, जातीयतेच्या परंपरांचे पालन करणाऱ्या आदिवासींची पारंपरिक जीवनशैली नष्ट झाली. टायगर प्रोजेक्ट, सहकारी संस्थांमधील भ्रष्टाचार, नारिंगी-मोसंबी दारू, लालपरी यामुळे कोरकू जात नष्ट होण्याची भीती लेखक व्यक्त करतो. शासनाने आदिवासीचे जीवनमान सुधारण्यासाठी आणि त्यांना समाजविकासाच्या प्रवाहात सामील करण्यासाठी नवनवीन योजना जाहीर केल्या, त्यातून नव्या समस्या निर्माण झाल्या. मातृभाषेतून शिक्षण देण्याची व्यवस्था न झाल्यामुळे कोरकूंच्या मुलांना शिक्षण घेता येत नाही. प्राण्यांना अभय

आणि माणसांना भय, कुटुंबनियोजनाची सक्ती, पुनर्वसन यामुळे ताल नसलेले बेताल जीवन असंघटित कोरकू जगतात. कोरकूंचे सांस्कृतिक वेगळेपणाचे दर्शन होलीकोत्सव, फागवा मागणे, नागदेवतांची पूजा, त्यांच्या लोककथा, लोकगीतातून घडते. ते अन्य लोकांप्रमाणे महादेव किंवा देवीची पूजा करीत नाही. याप्रमाणे कोरकू जनजातीच्या लोकजीवनातील प्रादेशिकता येथे दृग्गोचर होते. त्याचप्रमाणे एकझिरा ते सलोन्याला जाणाऱ्या रस्त्यांवरील तारूबांद्याच्या कोरकूठाण्याची पार्श्वभूमी येथे चित्रित झाली आहे. डोंगररांगा, सीपना नदी, लाल माती, कोदो-सवा, कुटकी ही गवती धान्ये, साळी-ज्वारी ही अन्य पिके, अस्वल, डुक्कर, वाघ हे वन्य प्राणी, मोह, पळस, संकेसर, शिंदी, बास, साग, मकई, चारोळी हे वृक्ष, सागाची पान-गवताने शाकारलेल्या कडीकोंड्याकुलपाचा संबंध नसलेल्या झोपड्या, प्राथमिक स्तरावरील जीवन, शिवाय संवादासाठी वापरलेली घटनाप्रसंग जिवंत करणारी कोरकू भाषा, तसेच अन्य लोकांशी बोलताना कोरकूंनी वापरलेली रांगडी हिंदी भाषा, कोरकू लोकगीत आणि प्रतिमा-प्रतीकादींतून प्रदेश दृग्गोचर होतो.

सारांश, गो. नी. दांडेकरांनी 'पूर्णामायची लेकरं'मधून स्वातंत्र्यपूर्वकाळातील मंथर गतीने ठेचकळत चालणारे वैदर्भीय जीवन बयिराम ढोमणेच्या भावजीवनाधारे रेखाटले आहे. ते केवळ जिव्हाळा, नावीन्यापोटी, तर उद्धव शेळक्यांनी 'धग'मधून कौतिकच्या जीवनातील ताणतणाव मोठ्या सामर्थ्याने शब्दांत पकडले आहे. सरंजामदारी भांडवलशाहीचा बळी म्हणून न्यानबा बाबाराव मुसळ्यांनी 'हाल्या हाल्या दुधू दे'मधून रेखाटला आहे. 'मेड इन इंडिया'मधून पुरुषोत्तम बोरकरांनी आधुनिकीकरणामुळे निर्माण झालेल्या समस्यांकडे वाचकांचे लक्ष वेधले तर मधुकर वाकोड्यांनी 'झेलझपाट'मधून कोरकू आदिवासींची समस्या चित्रित केली आहे.

* * *

प्र
क
र
ण
सहा

# उपसंहार

**प्रस्तावना :**

प्रादेशिक जीवनचित्रणामुळे मराठी कादंबरी आशयदृष्ट्या समृद्ध झाली. या कादंबऱ्यांमधून प्रकट झालेली प्रादेशिकता ही त्या त्या लेखकांनी जाणीवपूर्वकच प्रकट केली आहे असे नाही. कादंबरीकार त्याला आकलन झालेल्या जीवनानुभवाचे स्वरूप त्याच्या अंगी असलेल्या कल्पनासामर्थ्यासह कादंबरीत प्रकट करीत असतो. हे करीत असताना वास्तवानुभवापेक्षा कल्पनासामर्थ्य, रंजकता, अतिरंजकता, अद्‌भुतता, चमत्कृतिजन्यता, कल्पनारम्यता, स्वप्नरंजकता या घटकांचाही लेखकाच्या लेखनप्रकृतीनुसार आविष्कार झालेला असू शकतो; तरीही 'प्रादेशिकता' हा संशोधनाचा विषय असल्यामुळे कादंबरीतील घटनाप्रसंग आणि व्यक्तिरेखाटणाच्या अनुषंगाने त्या लेखकाच्या लेखनात प्रकट झालेली प्रादेशिक जीवनाची वैशिष्ट्ये शोधण्याचा प्रयत्न करावा लागतो.

**प्रादेशिक कादंबरी निर्मितीच्या प्रेरणा**

**(अ) १९२५ ते १९५०**

प्रत्येक लेखकाची कादंबरीलेखनामागील प्रेरणा ही वेगवेगळी असते. ग्रामजीवनातील दारिद्र्य, व्यसनाधीनता, अंधश्रद्धा आणि नैसर्गिक आपत्ती यांमुळे ग्रासलेल्या ग्रामीण माणसांचे चित्रण करणे ही या काळातील कादंबरीची प्रेरणा आहे. ना. वि. कुलकर्णी यांच्या 'कसे दिवस जातील' आणि 'शिपाई' या दोन कादंबऱ्यांची ही प्रेरणा आहे. या काळातील कादंबरी लेखनावर साम्यवाद, समाजवाद आणि गांधीवाद यांचा प्रभाव असलेला दिसून येतो. फडके-खांडेकर यांच्या लेखनाचाही प्रभाव असलेला दिसतो. र. वा. दिघे, ग. ल. ठोकळ, म. भा. भोसले या लेखकांनी या प्रभावाखाली लेखन केले आहे. त्यामुळे प्रत्यक्ष जीवनानुभवाला रंजक स्वरूपामध्ये

मांडण्याची त्यांची धडपड प्रत्ययाला येते. प्रत्यक्ष कादंबरीचे विषय आणि त्यातील जीवनानुभव हे ग्रामीण जीवनातील असूनही नागर कथा साहित्यातील रंजकता व कल्पनारम्यता यांचे तंत्र आदर्श मानून आपल्या कादंबऱ्यांमधून ते मांडण्याचा प्रयत्न या लेखकांचा दिसून येतो. त्यामुळे प्रत्यक्ष ग्रामजीवनातील अज्ञान, भयावह दारिद्र्य यांकडे दुर्लक्ष होते. उदा. र. वा. दिघे यांच्या 'सराई'त वास्तवापेक्षा प्रणय प्रसंग आणि कोर्टकज्ज्यांचे प्रसंग चित्रणावरच भर दिसतात. ग. ल. ठोकळांची 'गावगुंड' आणि म. भा भोसले यांची 'उघड्या जगात' या दोन कादंबऱ्यांत प्रणयप्रसंगावरच भर दिसतो. रंजकता आणि कल्पनारम्यता यांचे तंत्र आदर्श मानले असले तरी त्या अनुषंगाने दुष्काळ, दुष्काळामुळे निर्माण झालेली परिस्थिती, निसर्ग, ऋतुमानानुसार असलेली पिके यांचे चित्रण त्यांनी केले आहे. त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्यांमधून प्रकट होणारी प्रादेशिकता लक्ष वेधून घेते. या लेखकांना प्रत्यक्ष ग्रामीण विश्वाचा जीवनानुभव असला तरी त्यांचे आकलन नागर व मध्यमवर्गीय माणसाच्या संवेदनाशीलतेतून झालेले आहे. ते प्रचारकी, बोधवादी व प्रदर्शनात्मक झाल्यामुळे त्यांच्या कादंबऱ्यांमधून आढळणारी प्रादेशिकता डागळली आहे.

१९४७ ते १९५० या काळातील मराठी प्रादेशिक कादंबऱ्यांमधून ध्येयवाद, बोधवाद, जीवनाचे उदात्तीकरण आलेले दिसून येते. लक्ष्मणराव सरदेसाई यांची 'मांडवी ! तू आटलीस ?', विभावरी शिरूरकर यांची 'बळी' आणि बा. भ. बोरकरांची 'भावीण' या कादंबऱ्यांतून ग्रामीण समाजाच्या तळातील कष्टकऱ्यांच्या जीवनाच्या व्यथावेदना व्यक्त करणे आणि त्यांचा उद्धार करणे या हेतूने लेखन केलेले दिसून येते. श्री. ना. पेंडसे मात्र 'हद्दपार'सारख्या कादंबरीतून कोकणातील पारंपरिक लोकजीवनातील ताण-तणाव आणि या संस्कारातून निर्माण झालेले स्वभावविशेष रेखाटण्यावर भर देताना दिसतात.

### (ब) १९५१ ते १९६०

या कालखंडातील कादंबऱ्यांमधील जीवनचित्रण विविध प्रकारचे आहे. श्री. ना. पेंडसे यांची 'गारंबीचा बापू' कोकणातील खोत व गुरव यांच्या संबंधावर प्रकाश टाकते. त्यातून लैंगिक मानसिकतेवरही प्रकाश पडतो. बी. रघुनाथ 'आडगावचे चौधरी' या कादंबरीतून मराठवाड्यातील निजामशाहीच्या आधिपत्याखाली असलेल्या सरंजामशाही वर्गाचे चित्रण करतात. गो. नी. दांडेकर 'पडघवली' आणि 'पवनाकाठचा धोंडी' या कादंबऱ्यांमधून जुन्या संस्कृतीचा व पारंपरिक जीवनाचा होत असलेला

ऱ्हास चित्रित करतात. व्यंकटेश माडगूळकर यांनी 'बनगरवाडी'मधून ग्रामसुधारणा आणि खेड्यातील धनगरांचे उपेक्षित जीवन यावर प्रकाश टाकला आहे. र. वा. दिघे यांनी 'आई आहे शेतात' मधून शेतीचे महत्त्व सांगितले आहे. रणजित देसाई आणि अण्णाभाऊ साठे वेगळ्या वळणाने जात असलेले दिसतात. तळच्यां समाजातील गुन्हेगारी आणि या गुन्हेगारीला कारणीभूत होणारी कारणे सांगून या समाजातील व्यथा-वेदना ते प्रकट करतात. परंतु कल्पनारम्यता आणि भडक नाट्यात्मकता यामुळे 'फकिरा'सारखी कादंबरी वास्तवापासुन दूर जाते. रणजित देसाई यांनी त्यांच्या 'बारी' कादंबरीमध्ये मात्र जंगलतोड, तिच्यातुन तेथील बेरडांसारख्या जमातीवर कोसळणारी आपत्ती यांचे चित्रण करून एका नव्या प्रश्नावर प्रकाशझोत टाकलेला आहे. या सर्वच कादंबऱ्यांमधील जीवनचित्रण विविध प्रकारचे असले तरी फडकेतंत्राचा प्रभाव या कादंबरीकारांच्या लेखनावरही दिसतो. व्यंकटेश माडगूळकरांची 'बनगरवाडी' ही कांदबरी याला अपवाद आहे. रंजकता आणि कल्पनारम्यता यांमुळे या कादंबऱ्यांमधून आढळणारी प्रादेशिकता शबलित झाली आहे.

### (क) १९६१ ते १९७५

ग्रामजीवनामध्ये येऊ लागलेल्या परिवर्तनाची चिन्हे या काळातील कादंबऱ्यांमध्ये प्रकट झालेली दिसतात. उद्धव शेळके यांनी 'धग' कादंबरीत पारंपरिक बलुतेदारी किंवा शिंप्याच्या धंद्यावर आलेल्या आपत्तीचे आणि नियतीच्या फेऱ्यात अडकलेल्या मानवी जीवनाचे चित्रण केले आहे. रणजित देसाई यांची 'माझा गाव' आणि शंकर पाटील यांची 'टारफुला' या दोन कादंबऱ्यांमधून जुना गाव कसा नष्ट होत आहे याचे चित्रण आले आहे. रा. रं. बोराडे यांची 'पाचोळा', आनंद यादवांची 'गोतावळा' आणि जयवंत दळवींची 'सारे प्रवासी घडीचे' या कादंबऱ्या आधुनिकीकरणाच्या काळातील उपयुक्ततावादी विचारसरणीचे आक्रमण रेखाटतात. अण्णाभाऊ साठे यांनी 'माकडीचा माळ' आणि 'वारणेचा वाघ'मधून दलित मांग आणि भटक्या जातीजमातीच्या जीवनाचे चित्रण केले आहे. ना. धों. महानोर यांची 'गांधारी' ही कादंबरी स्वातंत्र्योत्तर काळात सामान्य ग्रामीण माणसांचा झालेला अपेक्षाभंग आणि ग्रामीण जीवनातील बदलते राजकारण यावर प्रकाश टाकते. ग्रामजीवनामध्ये येऊ लागलेल्या परिवर्तनाचे, त्यातून निर्माण झालेल्या समस्यांचे चित्रण करण्याची वास्तववादी प्रेरणा या कादंबरीकारांची दिसते.

### (ड) १९७५ ते १९९०

या काळातील मराठी प्रादेशिक कादंबऱ्यांनी एकदम वेगळे वळण घेतलेले

दिसून येते. या कादंबऱ्यांमधून ग्रामीण जीवनामध्ये नव्याने निर्माण झालेले प्रश्न, बदलते राजकारण, समाजकारण, अर्थकारण आणि यांत होरपळून निघणारा ग्रामीण समाज यांचे वास्तवदर्शी चित्र रेखाटण्याचा प्रयत्न या काळातील लेखकाचा दिसून येतो. या सर्व कादंबऱ्या ग्रामीण वास्तवाच्या विविध अंगोपांगांचा शोध घेत असलेल्या दिसतात. मधु मंगेश कर्णिक यांनी 'भाकरी आणि फूल' या कादंबरीमध्ये कोकणातील नव्या पिढीतील दलितांच्या जागृतीचे चित्रण केले आहे. गणेश आवटे यांची अनुक्रमे 'इंजाळं', 'कुणाच्या खांद्यावर', 'हाल्या हाल्या दुधू दे', 'कागूद आणि सावली' आणि 'विषवृक्षाच्या मुळ्या' या कादंबऱ्यांमधून सामाजिक आणि आर्थिक प्रश्नांवर भर दिलेला आहे. मधुकर वाकोडे यांनी 'झेलझपाट' कादंबरी कोरकू आदिवासी जीवनावर प्रकाश टाकते. रामचंद्र पठारे यांच्या 'पाचर' या कादंबरीमधून नव- जागृत दलित समाज आणि सवर्ण समाज यांचा संघर्ष अभिव्यक्त होतो. या सर्व लेखकांची वैशिष्ट्ये ही की या कादंबऱ्यांमधून त्यांनी प्रकट केलेला जीवनाविष्कार अधिकाधिक वास्तवाच्या पातळीवरून करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे जीवनातील वास्तवदर्शी प्रादेशिकता प्रकट होण्यास मदत झाली आहे.

## प्रादेशिक कादंबरीचे प्रादेशिकतेच्या घटकांधारे मूल्यमापन (पथ्य व्यवस्था)

### (अ) निसर्ग आणि भू-प्रदेश :

प्रादेशिकता दर्शनी स्वरूपात ज्यामुळे लक्षात येते तो महत्त्वाचा घटक म्हणजे निसर्ग होय. निसर्गाचा एकूणच मानवी जीवनावर फार मोठा परिणाम होत असतो. विशिष्ट निसर्गामुळे त्या त्या प्रदेशातील जीवनमान, तेथील व्यवसाय, धंदे यांच्यावर परिणाम होत असतो. अर्थात सर्वच लेखकांचा हेतू निसर्गाचे चित्रण करणे हा असेलच असे नाही. परंतु कादंबरीतील माणसे ज्या प्रदेशातील आहेत, त्या प्रदेशाचे असे निसर्गवर्णन प्रसंगानुरूप येऊ शकते. उदा. ना. वि. कुलकर्णी यांच्या 'कसे दिवस जातील' आणि 'शिपाई' या दोन कादंबऱ्यांमधून पश्चिम महाराष्ट्र प्रदेशात असलेली ऊस व हळद ही पिके शेतातून कशी दिसत होती याचे चित्रण आलेले आहे.

१९२५ ते १९५० या काळातील प्रादेशिक कादंबऱ्यांमधून निसर्गवर्णने फार मोठ्या प्रमाणात आलेली दिसतात. र. वा. दिघे 'पाणकळा'मध्ये काळी जमीन, नदीकाठची चुनखडी, पावसावर अवलंबून असणारी शेती, मोट, संत्री, मोसंबी, बोर, गहू, बाजरी, शाळू, तीळ, कांदे, गाजरे इत्यादी पिके यांची वर्णने करतात. याशिवाय त्या भू-प्रदेशातील सायळी, कळम, मोह, पळस, पांगारा अशा झाडाझुडपांचीही वर्णने

येतात. या प्रदेशातून सायाळ, सांबर, भेकर इत्यादी प्राणी पिकांची कशी नासाडी करतात याचेही वर्णन येते. एकूण काय तर प्रसंगानुरूप कधी निसर्गाचे वर्णन तर कधी वैशिष्ट्यपूर्ण भूप्रदेशाचे वर्णन या कादंबऱ्यांतून आलेले आहे. प्रामुख्याने ना. वि. कुलकर्णी, ग. ल. ठोकळ, म. भा. भोसले यांनी सातारा सांगलीच्या परिसरातील निसर्गाचे व भू-प्रदेशाचे चित्रण केलेले आहे. तर र. वा. दिघे यांनी सह्याद्रीच्या कुशीतील कोकण सीमेवरील मावळ प्रदेशाचे वर्णन केलेले आहे आणि त्यातून त्या प्रदेशातील निसर्ग व भूप्रदेश रेखाटला आहे. अर्थात हे निसर्ग भू-प्रदेशाचे वर्णन प्रणयाची पार्श्वभूमी म्हणून आले आहे. मानवी जीवनावर प्रभाव गाजविणाऱ्या निसर्गाची ही वर्णने नाहीत.

१९५० ते १९६० या दरम्यान विभावरी शिरूरकर, बा. भ. बोरकर, श्री. ना. पेंडसे, बी. रघुनाथ, गो. नी. दांडेकर, व्यंकटेश माडगूळकर, र. वा. दिघे, रणजित देसाई, उद्धव शेळके यांच्या प्रादेशिक कादंबऱ्यांचा विचार या ठिकाणी केलेला अहे. 'बळी' आणि 'धग' या दोन कादंबऱ्या सोडल्या तर बाकीच्या कांदबऱ्यांमधून निसर्ग आणि वैशिष्ट्यपूर्ण भू-प्रदेश यांची वर्णने मोठ्या प्रमाणात आलेली दिसतात. बा. भ. बोरकरांच्या 'भावीण' कादंबरीमध्ये गोव्याचा निसर्ग आणि तेथील वैशिष्ट्यपूर्ण प्रदेश यांची वर्णने येतात. त्याप्रमाणे श्री. ना. पेंडसे आणि गो. नी. दांडेकर यांनीही आपल्या कादंबऱ्यांमधून कोकणातील निसर्गाचे आणि वैशिष्ट्यपूर्ण प्रदेशाचे वर्णन केले आहे. त्यातून कोकणात येणारी पिके आणि छोटेमोठे बंधारे यांची वर्णने येतात व कोकणचा वैशिष्ट्यपूर्ण प्रदेश उभा राहतो. 'बनगरवाडी'सारख्या कादंबरीमधून पावसाचे प्रमाण कमी असलेल्या माणदेशातील उजाड प्रदेशाचे दर्शन घडते. 'आडगावचे चौधरी' या कादंबरीमध्ये निजामाच्या राजवटीखालील मराठवाड्यातील समाजजीवन लेखकाला प्रकट करावयाचे असल्यामुळे तेथील सपाट प्रदेशाचे फारसे वर्णन आलेले नाही. अण्णाभाऊ साठे सातारा-सांगली जिल्ह्यांतील डोंगराळ प्रदेश व त्या प्रदेशातील निसर्ग, पिके यांची वर्णने करतात. अशा प्रकारची वर्णने करण्यामध्ये र. वा. दिघे अग्रेसर आहेत. याचे दर्शन त्यांच्या 'आई आहे शेतात' या कादंबरीमधूनही घडते. रणजित देसाई यांच्या 'बारी' आणि 'माझा गाव' या कादंबऱ्यांमधून बेळगाव-कोल्हापूरकडील निसर्ग व भूप्रदेश आल्त्रा आहे. एकूण या सर्वच कादंबऱ्यांमधून निसर्गवर्णने मोठ्या प्रमाणात आलेली दिसतात.

१९६० ते १९७५ या काळातील प्रादेशिक कादंबऱ्यांमधून निसर्ग-भूप्रदेश

यांची वर्णने आधीच्या कादंबऱ्यांच्या तुलनेत कमी प्रमाणात येतात. दि. बा. मोकाशी यांची 'देव चालले', अण्णाभाऊ साठे यांची 'माकडीचा माळ', शंकर पाटील यांची 'टारफुला' या कादंबऱ्यांमधून पश्चिम महाराष्ट्रातील विविध ठिकाणांचा निसर्ग आलेला आहे. जयवंत दळवी यांची 'सारे प्रवासी घडीचे' आणि हमीद दलवाईंची 'इंधन' या दोन कांदबऱ्यांमधून कोकणातील निसर्ग व भूप्रदेश चित्रित झालेला आहे. रा. रं. बोराडे यांची 'पाचोळा' आणि ना. धो. महानोर यांची 'गांधारी' या कांदबऱ्यांमधून मराठवाड्यातील पठारी प्रदेशाचे चित्रण आलेले आहे. असे असले तरी आधीच्या कादंबऱ्यांच्या तुलनेत या कादंबऱ्यांमधून निसर्ग-भूप्रदेश यांची वर्णने कमी प्रमाणात येतात. आनंद यादव यांची 'गोतावळा' ही कादंबरी याला अपवाद आहे. याचे कारण ही संपूर्ण कादंबरी शेतमळ्यामध्ये घडते. त्यामुळे नारबाच्या मानसिकतेनुरूप आणि वर्षभरात रंग बदलणाऱ्या ऋतुचक्राची वर्णने या कादंबरीत येतात.

१९७५ ते १९९० या काळातील कादंबऱ्यांमधून प्रामुख्याने जागृत होत असलेल्या खेड्याचे, स्वातंत्र्योत्तर काळात निर्माण झालेल्या ग्रामपातळीवरील विविध समस्यांचे चित्रण करणे आणि या समस्यांमुळे निर्माण झालेल्या ताणतणावांचे दर्शन घडविणे हा हेतू दिसून येतो. त्यामुळे या कादंबऱ्यांमधून निसर्ग व भूप्रदेश यांची वर्णने अभावानेच येतात. मधु मंगेश कर्णिक यांची 'भाकरी आणि फूल', गणेश आवटे यांची 'गणगोत, उत्तम बंडू तुपे यांची 'इजाळं', बा. ग. केसकर यांची 'कुणाच्या खांद्यावर', बाबा मुसळे यांची 'हाल्या हाल्या दुधू दे', राजन गवस यांची 'चौंडकं', आनंद पाटील यांची 'कागूद आणि सावली' पुरुषोत्तम बोरकरांची 'मेड इन इंडिया', मधुकर वाकोडे यांची 'झेलझपाट', वासुदेव मुलाटे यांची 'विषवृक्षाच्या मुळ्या' आणि रामचंद्र पठारे यांची 'पाचर' या प्रादेशिक कादंबऱ्यांचा विचार केलेला आहे. या लेखकांनी चित्रित केलेला प्रदेश वेगवेगळ्या प्रकारचा आहे. या सर्वांच लेखकांना मानवी जीवनातील ताण-तणाव आणि समाजजीवनात निर्माण झालेले नवे प्रश्न आणि समस्या हेच महत्त्वाचे वाटतात. त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्यांमधून निसर्ग आणि भू-प्रदेश यांचे प्रत्यक्ष वर्णन अभावानेच येते. याला अपवाद मधुकर वाकोडे यांची 'झेलझपाट' ही कादंबरी सांगता येईल. ही कादंबरी विदर्भातील अमरावती - परतवाडा, मेळघाट प्रदेशांत घडते आणि या प्रदेशातील कोरकू आदिवासींचे जीवन चित्रित करते. वाकोडे यांचा हाच लेखनहेतू आहे.

**(ब) समाज जीवन : आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक आणि शैक्षणिक प्रगती.**

प्रादेशिक कादंबरीतील निसर्ग - भूप्रदेशाच्या वर्णनातून प्रदेश निवडता येतो.

भू-प्रदेश निसर्गाचा लोकजीवनावर परिणाम होतो. समाज विकास आणि शैक्षणिक प्रगती भू-प्रदेश-निसर्गावर अवलंबून असते. आर्थिक जीवनावरही याचा परिणाम होत असतो. आधुनिकता आणि पारंपरिकता यांचे द्वंद्व प्रादेशिक कादंबऱ्यांमधून दिसते. खेड्यांचा भौतिक विकास होऊ लागला तरीही अंधविश्वास, रूढीपरंपरा, जातीयता नष्ट झालेली दिसत नाही. मात्र इमानीवृत्ती, मानवता नष्ट होऊ लागली असून स्वार्थी वृत्ती वाढीला लागलेली दिसते. ध्येयवादी वृत्ती नष्ट होऊन समाजसेवेला धंद्याचे स्वरूप आले आहे. ग्रामजीवनातील परिवर्तन आणि त्यानिमित्ताने निर्माण झालेल्या समस्या यांचे चित्रण प्रादेशिक कादंबरीकारांनी केले आहे.

१९२५ ते १९५० या काळातील कादंबऱ्यांमधून चित्रित झालेले समाजजीवन हे पारतंत्र्यातील आहे. पारतंत्र्यातील समाजाचे प्रश्न, त्यांना सोसावी लागलेली उपेक्षा यांचे चित्रण या कादंबरीमधून आले आहे. ना. वि. कुलकर्णी यांच्या कादंबऱ्यांमधून असे दिसते की ग्रामीण समाज शिक्षणापासुन वंचित राहिलेला आहे. त्यामुळे समाजात अज्ञान आणि दारिद्र्य दिसते. दुष्काळादी कारणांमुळे शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा आणि दारिद्र्याचे ते चित्रण करतात. मार्क्सवादी आणि गांधीवादी विचारसरणीच्या मंडळींचे लक्ष या काळात खेड्यांकडे वेधले गेले. त्या प्रभावामुळे मराठी लेखकांनीसुद्धा शेतकऱ्यांच्या दयनीय अवस्थेकडे लक्ष वेधणाऱ्या साहित्यकृती लिहिल्या. र. वा. दिघे यांच्या 'पाणकळा' कादंबरीमध्ये पावसावर जीवन अवलंबून असणाऱ्या देशावरील शेतकऱ्यांची आर्थिक दुरावस्था चित्रित झाली आहे, तर 'सराई' कादंबरीमध्ये उत्तर कोकणातील ठाकूर, कातोडी यांच्या सांस्कृतिक जीवनचित्रणाबरोबरच प्रत्यक्ष शेती कसणाऱ्या शेतमजुरांची ऐन सुगीमध्ये होणारी अन्नान्न दशा चित्रित झाली आहे. ग. ल. ठोकळांची 'गावगुंड' ही स्वातंत्र्यचळवळीच्या पार्श्वभूमीवरील कादंबरी ब्रिटिशांच्या प्रशासन व्यवस्थेतील दहशत रेखाटते. म. भा. भोसले यांची 'उघड्या जगात' ही कादंबरी सामंतशाहीचे आणि धनिकांच्या मुजोरपणाचे चित्रण करते. वि. वा. हडपांची 'अन्नदाता उपाशी' ही कादंबरी कोकणातील शेतकऱ्यांच्या आत्यंतिक दारिद्र्यावर प्रकाश टाकते. तसेच लक्ष्मणराव सरदेसाई यांची 'मांडवी ! तू आटलीस ?' या कादंबरीमध्येही स्वातंत्र्यपूर्व काळातील गोव्यातील फिरंग्यांची जुलमी सत्ता आणि तेथील शेतकऱ्यांच्या दयनीय स्थितीकडे लक्ष वेधते. एकूणच या काळातील सर्व कादंबऱ्यांमधून पारतंत्र्याच्या काळात ग्रामीण कष्टकरी समाजाच्या समस्या, त्यांचे सांस्कृतिक जीवन, देवधर्म यांविषयीच्या श्रद्धा-समजुती या कादंबऱ्यांमधून रेखाटल्या

गेलेल्या आहेत. विभावरी शिरूरकर यांची 'बळी' कादंबरी मात्र वेगळ्या अंगाने जाते. शासनाच्या दरबारी गुन्हेगार जमात म्हणून उल्लेखलेल्या मांग-गारूडी समाजाच्या जागृतीचे चित्र ही कादंबरी रेखाटते. सवर्ण आणि शहरी समाजाचे लक्ष वेधणारी ही कादंबरी आहे. या काळातील कादंबऱ्या या समस्याप्रधान आहेत. बा. भ. बोरकरांनी 'भावीण' या कादंबरीमध्ये गोव्यातील भाविणीची प्रथा व त्यांचे दयनीय जीवन याकडे लक्ष वेधले आहे. श्री. ना. पेंडसे यांच्या 'हद्दपार'मधून राजेमास्तरांची व्यक्तिरेखा उभी करीत असताना कोकणातील धार्मिक विधीमधील मानपानाच्या कल्पना आणि अंधश्रद्धा यांकडे लक्ष वेधले आहे.

**१९५० ते १९६० :** या सर्व कादंबऱ्यांमधून पारतंत्र्याच्या काळात जागृत होऊ लागलेल्या खेड्याचे दर्शन लेखकांनी घडविले आहे. तसेच एकीकडे हे खेडे जागृत होत असतानाच निर्माण होणाऱ्या नव्या समस्यांकडे लक्ष वेधले आहे. देवदेवता, जत्रा, सणोत्सव, लग्नविधीसारखे प्रसंग या सगळ्यांमधून जी एक प्रकारची वैशिष्ट्यपूर्ण ग्रामीण संस्कृती प्रकट होत होती ती लोप पावत आहे, याच्याविषयीची एकप्रकारची हळहळही या कादंबऱ्यांमधून व्यक्त होते. याला अपवाद बी. रघुनाथांची 'आडगावचे चौधरी' ही कादंबरी आहे. या कादंबरीतून अवतरणारा प्रदेश हा मराठवाड्यातील निजामी राजवटीखालील ग्रामीण परिसराचा आहे. त्या काळातील जुल्मी राजवट आणि यावनी सत्ता यांमध्ये भरडून निघणारा सामान्य दरिद्री शेतकरी कसा लाचार होता व देवदेवतादी विषयींची त्याची श्रद्धा यावर ते प्रकाश टाकतात. घराणेशाहीची पारंपरिक मुजोरी आणि पीळ यांचे दर्शनही यानिमित्ताने येथे घडते. गो. नी. दांडेकरांच्या कादंबऱ्यांमधून काळाच्या ओघात नष्ट होणारा भूतकाळ आणि भूतकाळातील श्रद्धा आणि एक वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक जीवन, नीतिमत्ता यांची पडझड अभिव्यक्त झाली आहे. व्यंकटेश माडगूळकरांच्या 'बनगरवाडी' कादंबरीमध्ये माणदेशातल्या ओसाड प्रदेशातील मेंढीपालन करणाऱ्या, अंधश्रद्धेला कवटाळणाऱ्या व शिक्षणापासून वंचित राहिलेल्या धनगरांचे चित्रण येते. अण्णाभाऊ साठे यांच्या 'फकिरा' कादंबरीतून स्वातंत्र्यपूर्व काळात सनदशीर शिपाई असलेल्या मांगांच्या आर्थिक परिस्थितीचे चित्रण येते. तसेच जुलमी इंग्रज अंमलदार, आणि एकूणच राजकीय वर्चस्वाचे चित्रण झाले आहे. रणजित देसाई यांच्या 'बारी' कादंबरीमध्येसुद्धा तळातील गुन्हेगार समजला जाणारा बेरडांसारखा समाज गुन्हेगारीला का प्रवृत्त होतो हे सांगत असतानाच त्या समाजातील विवाहपद्धतीसारख्या सांस्कृतिक कार्यक्रमांकडे लक्ष वेधले आहे. त्यांनी



28354

'माझा गाव' मधून आधुनिकतेच्या प्रभावाने जुने पारंपरिक जीवन कसे नष्ट होत आहे, मानवता संपुष्टात येत आहे याचे दर्शन घडविले आहे. उद्धव शेळके यांनी 'धग' कादंबरीमधून परिवर्तनशील ग्रामीण जीवनामध्ये शिंप्यासारखा समाज घटक कसा आर्थिक आपत्तीत गुदमरू लागलेला आहे याचे दर्शन घडविले आहे. थोडक्यात, या सर्व कादंबऱ्यांमधून पारतंत्र्याच्या काळात जागृत झालेल्या खेड्याचे दर्शन घडते. एकीकडे हे खेडे जागृत होत असतानाच निर्माण होणाऱ्या नव्या समस्यांकडे या लेखकांनी लक्ष वेधले आहे. ग्रामीण संस्कृतीच्या ऱ्हासाकडेही त्यांनी लक्ष वेधले आहे.

**१९६० ते १९७५** : मराठी प्रादेशिक कादंबरीने या काळात वेगळे वळण घेतले. याची सुरुवात उद्धव शेळके यांच्या 'धग' या कादंबरीपासूनच झालेली दिसून येते. खेड्यामध्ये मोठ्या प्रमाणात भौतिक परिवर्तन आले आणि त्याबरोबरच सामाजिक, सांस्कृतिक परिवर्तनही येऊ लागले. या परिवर्तनाचा जुन्या व नव्या पिढीच्या माणसांच्या मानसिकतेवर होणारा परिणाम टिपणे हा हेतू दिसतो. ग्रामजीवनातील उपेक्षित समाजाच्या समस्येकडेही या लेखकांनी लक्ष वेधले. दि. बा. मोकाशी यांच्या 'देव चालले' या कादंबरीमध्ये जुन्या-नव्या पिढीमध्ये देवाच्या अस्तित्वाविषयी असणाऱ्या समाजावरून निर्माण होणारे ताणतणाव चित्रित झाले आहेत. कुळकायद्यामुळे खेड्यातील धनिकांची झालेली वाताहतही त्यांनी रेखाटली आहे. शंकर पाटील यांनी 'टारफुला' कादंबरीमधून गावगाड्यातील पाटील व पाटीलकी यांचे असणारे महत्त्वाचे स्थान आणि त्यानिमित्ताने निर्माण होणारे सामाजिक ताणतणाव यांवर भर दिला आहे. जयवंत दळवी यांनी 'सारे प्रवासी घडीचे' कादंबरीतून कोकणामध्ये साजरे होणारे सणोत्सव आणि एकूण पारंपरिक विधी इत्यादी कसे नष्ट होत आहेत, याला कारण आधुनिकीकरणाचे आक्रमण आहे हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. हमीद दलवाई यांनी 'इंधन' कादंबरीमधून मराठा-मुस्लिम आणि नवबौद्धांमधील संघर्ष रेखाटला आहे. अण्णाभाऊ साठे यांच्या 'माकडीचा माळ' या कादंबरीमधून भटक्याविमुक्तांच्या जीवनातील समस्या चित्रित झाली आहे. आधुनिकीकरणाच्या प्रभावामुळे खेड्यातील 'खळे' बंद झाले. शेतकऱ्यांच्या उत्पन्नातील वाटेकरी असलेल्या भटक्या विमुक्तांच्या चरितार्थाचाच त्यातून प्रश्न निर्माण झाला.

रा. रं. बोराडे यांची 'पाचोळा' ही कादंबरी आधुनिकतेकडे आकर्षित होणाऱ्या ग्रामीण माणसाच्या मनोवृत्तीचे दर्शन घडविते. त्यानिमित्ताने जुन्या ग्रामव्यवस्थेतील शिंप्यासारख्या बलुतेदार घटकाची होणारी शोकांतिका, त्यांची अकुशलता आणि

त्यामुळे त्यांचे काळाच्या मागे असणे याचे दर्शन घडते. एवढेच नव्हे तर त्यामुळं त्यांच्या वाट्याला येणारे दारिद्र्य आणि समस्या यांचेही दर्शन घडते. आनंद यादव यांच्या 'गोतावळा' या कादंबरीमध्ये ग्रामीण जीवनामध्ये आधुनिकतेच्या मार्गाने उपयुक्ततावादी मनोवृत्तीचे होणारे आक्रमण आणि त्यातून कष्टकरी ग्रामीण माणसाच्या जीवनातील ताणतणाव चित्रित झाले आहेत. आधुनिक काळात शहरांबरोबरच ग्रामीण भागामध्ये आणि कृषिउद्योगांमध्ये यंत्राचे अवतरणे अपरिहार्य आहे. परंतु ग्रामीण माणसांचे एका वेगळ्या मार्गाने होणारे शोषण आणि त्या शोषणातून निर्माण होणारा शोषित समाज याकडे लेखकाने लक्ष वेधले आहे. ना. धो. महानोरांनी 'गांधारी' कादंबरीत स्वातंत्र्योत्तर काळात शासनाने आणलेल्या योजनांचा आणि खेड्यामध्ये आलेल्या पैशाचा विशिष्ट वर्गानेच फायदा घेतला. त्यातून एक नवा श्रीमंत वर्ग आणि सामंतशाही येऊ पाहते आहे. त्यामुळे सामान्य माणूस व त्याला पिळणारा नवा श्रीमंत वर्ग यांचा संघर्ष चित्रित करण्यावर लेखकाने भर दिलेला आहे. थोडक्यात १९६० ते १९७५ या काळातील कादंबऱ्यांमधून स्वातंत्र्योत्तर काळात शासनाच्या विविध योजनांमुळे खेड्यात येणारे परिवर्तन आणि या परिवर्तनाच्या प्रक्रियेत नष्ट होणारी जुनी संस्कृती, माणुसकी यांचे चित्रण तर येतेच, परंतु नागरी मनावृत्तीचे ग्रामीण माणसाकडे शोषणाचेच एक साधन म्हणून बघणेही प्रकट होते. सुधारणेच्या नावाखाली खेड्याचे बदलणारे रूप अंतिमतः कष्टकरी श्रमजीवी माणसाला अधिक क्लेषदायी व दुःख बहाल करणारे आहे हेही या कादंबऱ्यांमधून कमीअधिक प्रमाणात रेखाटण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१९७५ ते १९९० मधील मराठी प्रादेशिक कादंबऱ्यांचा विचार करता या कादंबऱ्यांचे लेखक प्रामुख्याने नव्या पिढीतील लेखक आहेत. बहुतेक प्रमाणात ते त्यांच्या घरातील हाती लेखणी घेतलेले पहिलेच संवेदनशील व्यक्तिमत्त्व आहेत. या दृष्टीने नव्या पिढीला जाणवणारे खेडे, या खेड्यामध्ये निर्माण होणारे नवनवे प्रश्न, या प्रश्नांच्या भोवऱ्यात भरडून निघणारा सामान्य श्रमजीवी, उपेक्षित माणूस आणि त्यानिमित्ताने संपूर्ण ग्रामीण समाजच उभा करणे या लेखकांचा लेखनहेतू दिसतो. हे लेखक वर्तमानकाळातील एक-एक समस्या घेऊन त्याकडे वाचकांचे लक्ष वेधीत असलेले दिसतात. या सर्व लेखकांनी ग्रामीण समाजजीवनातील समस्याच आपल्या कांदबऱ्यांमधून व्यक्त केल्या आहेत.

स्वातंत्र्योत्तर काळात खेड्यापाड्यांतून शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार झाला.

त्यातून जसे संवेदनशील लेखक निर्माण झाले तसाच वाचकवर्गही वाढला. व्यवसायाभिमुख शिक्षणाअभावी ग्रामीण सुशिक्षित तरुण वैफल्यग्रस्त झाले. त्यांच्या दुभंगलेल्या मनोवस्थेचे चित्रण गणेश आवटे, पुरुषोत्तम बोरकर, आनंद पाटील आणि वासुदेव मुलाटे यांनी केले आहे. तसेच या कादंबऱ्यांमधून ग्रामपातळीवरील राजकारण, भ्रष्ट शासकीय यंत्रणा, नवी सुशिक्षित पिढी आणि आधीची अशिक्षित जुनी पिढी यांच्यातील विसंवादाचे दर्शनही घडते. उत्तम बंडू तुपे यांची 'इजाळं' कादंबरी कर्जाच्या आवर्तात सापडलेल्या ग्रामीण माणसाचे दर्शन घडविते. वासुदेव मुलाटे यांनी 'विषवृक्षाच्या मुळ्यां'मधून सहकाराच्या मार्गाने येणाऱ्या कर्जबाजारीपणाचे दर्शन घडविले आहे. या सर्व लेखकांमध्ये समाजजीवनाकडे बघण्याचा एक वैशिष्ट्यपूर्ण सामाजिक दृष्टिकोन दिसून येतो. या लेखकांच्या मनामध्ये पीडित, शोषित समाजाविषयी कणव आहे. त्यांच्या शोषणाला, व्यथा-वेदनेला कारणीभूत ठरणाऱ्या शोषकांवर हल्ला चढवण्याच्या दृष्टीने स्फुल्लिंग पेटवण्याचे सामर्थ्यही दिसून येते. या दृष्टीने बा. ग. केसकरांच्या 'कुणाच्या खांद्यावर' आणि बाबाराव मुसळे यांच्या 'हाल्या, हाल्या दुधू दे' या कादंबऱ्यांचा उल्लेख करता येईल. श्रमिक माणसांचे होणारे शोषण व त्यांना पुनःपुन्हा कर्जाच्या चक्रव्यूहात लोटणारे शोषक यांच्याकडे हे लेखक लक्ष वेधतात. बा. ग. केसकरांच्या कांदबरीमध्ये ऊसतोडणी करणाऱ्या मजुरांची समस्या रेखाटली आहे. साखर कारखान्याच्या निमित्ताने ग्रामीण भागामध्ये येणारे उद्योगधंदे आणि नवश्रीमंती, नवा शोषकवर्ग, माणूस म्हणून माणसाचे जगणे किती निम्न स्तरावर गेले आहे याचे दर्शन येथे घडते. राजन गवस यांच्या 'चौंडकं' कादंबरीमधून 'देवदासी' प्रथेवर व त्यांच्या मानसिकतेवर प्रकाश टाकला आहे; तर मधुकर वाकोडे यांनी 'झेलझपाट' कादंबरीतून कोरकू आदिवासींच्या सांस्कृतिक जीवनाचे आणि त्यांची पारंपरिक जीवनशैली उद्ध्वस्त होणे याचे चित्रण केले आहे. रामचंद्र पठारे यांनी 'पाचर' या कादंबरीमधून ग्रामपातळीवरील पुरोगामीत्वाचा आव आणणाऱ्या प्रतिगामी पुढाऱ्यांच्या दुटप्पी वर्तनाकडे लक्ष वेधले आहे. तसेच नव्याने जागृत झालेला स्वतःला नवबौद्ध म्हणवणारा समाज आणि सवर्णांमधील संघर्ष, बुवाबाजी, ढोंगीपणा यांचे दर्शन घडविले आहे. थोडक्यात, या काळातील सर्वच लेखकांनी प्रत्यक्ष ग्रामजीवनाचा जीवनानुभव घेऊन किंवा तो घेत असताना त्यांना जाणवणारे प्रश्न यांनाच आपला लेखनविषय केलेले आहेत. हे लेखकांच्या कादंबऱ्या, आधीच्या कादंबऱ्यांपेक्षा अधिक वास्तवाभिमुख असल्यामुळे निसर्ग, भौगोलिक परिसराची वैशिष्ट्ये यांकडे लक्ष न वेधता ते सरळ सामाजिक जीवनाचे वास्तवदर्शी

चित्रण घडविण्याचा प्रयत्न करीत असल्यामुळे आधीच्या लेखकांच्या कादंबऱ्यांपेक्षा त्यांचे वेगळेपण लक्षात येते. या कादंबऱ्यांच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या विविध प्रदेशांतून ग्रामजीवनामध्ये होणारे बदल आणि बदलू पाहणारे समाजजीवन, या समाजाची मानसिकता लक्षात येते.

### (क) कथानक आणि व्यक्तिचित्रण

प्रादेशिक कादंबरीच्या कथानकात विस्कळितपणा असलेला दिसतो. ते रेखीव, सुसंगत आणि सुसंबद्ध नसते. असे असले तरी त्यात कथाअंतर्गत सुसंगती लावता येते. अर्थात हे वर्णनात्मक वैशिष्ट्य आहे. काही प्रादेशिक कादंबऱ्यांचे कथानक रेखीव आणि सुसंगत असलेले दिसते. कथानकातून प्रादेशिकता कशी प्रकट होते हेच येथे महत्त्वाचे असते. प्रादेशिक कादंबरी ही समूहाची कथा असते. समूह जीवनचित्रणाला प्रादेशिक कादंबरी अधिक महत्त्व देते. निवेदन-संवाद यांच्या माध्यमातून कादंबरीत व्यक्तिदर्शन घडविले जाते. प्रादेशिक कादंबरीमध्ये पात्रांच्या मानसिकतेवर भर दिला जातो. व्यक्तींच्या कृति-उक्तींतून त्यांची मानसिकता जशी प्रकट होते, त्याचप्रमाणे प्रदेशाचे संस्कारही प्रकट होत असतात. प्रादेशिक कादंबरीत इतर कादंबऱ्यांच्या तुलनेत पात्रसंख्या अधिक असते. एखादे गाव किंवा प्रदेशाचे वेगळेपण आणि सामूहिकता त्यातून प्रकट होते. गौण पात्रांच्या वर्तनातून प्रादेशिकता स्पष्टपणे जाणवते, म्हणून विकसनशील पात्रे कमी असतात. अर्थात विकसनशील पात्रांची निर्मिती प्रादेशिक कादंबरीकार करीतच नाही असे नाही. बहुसंख्य प्रादेशिक प्रातिनिधिक पात्रांमुळे कादंबरीला सामाजिक वास्तवता आणि प्रदेशविशिष्टता प्राप्त होते. कारण त्यांच्यावर प्रदेशाचे संस्कार झालेले असतात. माणसांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये त्या त्या प्रदेशाच्या संस्कारांतून घडतात. म्हणून व्यक्तिविशिष्टतेऐवजी सामूहिकतेवर प्रादेशिक कादंबरी अधिक भर देते. स्थानिक देवदेवता, भू-प्रदेश निसर्गाचाही या माणसांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव असलेला दिसतो.

१९२५ ते १९५० पर्यंतच्या कादंबऱ्यांचा विचार करता असे दिसते की कादंबऱ्या समूहजीवन चित्रणावर भर देणाऱ्या आहेत. ना. वि. कुलकर्णी यांच्या 'कसे दिवस जातील' आणि 'शिपाई' या दोन कादंबऱ्यांचे कथानक रेखीव, सुसंगत आहे. त्यातून रेखाटलेली माणसे ही पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळी प्रदेशातील आहेत. त्यामुळे ती अधिक सोशिक असलेली दिसतात. 'कसे दिवस जातील' या कादंबरीतील आबा-रखमा हे दुष्काळी आपत्तीमुळेच नशीब आजमावण्यासाठी मुंबईला जातात. या



AGASTI COLLEGE, AKOLE
LIBRARY
26354

कादंबऱ्यांमधून सुष्ट आणि दुष्टांच्या संघर्षाचे चित्रणही येते. 'शिपाई' कादंबरीमधील कृष्णाकाकाला विरोध करणारा मल्हारी हा तरुण बंडखोर, अन्यायाविरुद्ध आवाज उठविणाऱ्यांचा प्रतिनिधी आहे. म. भा. भोसले यांच्या 'उघड्या जगात' या कादंबरीतील काकासाहेब सावकार दुष्टांचा प्रतिनिधी आहे; परंतु सखा हा सज्जन सुष्ट प्रवृत्तीचा आहे, तो अन्यायाविरुद्ध आवाज न उठविता परिस्थितीला शरण जातो. ग. ल. ठोकळ यांच्या 'गावगुंड' मधून क्रांतिवीर नाना पाटलांच्या प्रभावाचा प्रदेशच नायक आहे. अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याचा पश्चिम महाराष्ट्रीय माणसाचा स्वभाव गुणाजीच्या व्यक्तिरेखेतून स्पष्ट होतो. जयवंत हा शिक्षणाच्या प्रभावाने कोमल मनोवृत्तीचा, तर कुशाबाबा चव्हाण सज्जन वारकरी आहेत. आवळोजी पाटी साधेभोळे असून पारूचे वडील जिद्दी रेखाटले आहेत. 'पारू' ही खानदानी स्त्रीची प्रतिनिधी आहे, तर पिसाळ फौजदार जुलमी अंमलदारांचे प्रतिनिधी आहेत. र. वा. दिघे यांच्या 'पाणकळा' कादंबरीमधून पावसावलंबी जीवन जगणाऱ्या दुष्काळी अहमदनगर जिल्ह्यातील माणसे सोशिक रेखाटली आहेत. सुष्ट-दुष्टांचा संघर्ष भुजाबा-रंभाजीच्या वर्तनातून रेखाटला आहे. प्रस्तुत कादंबरीत रेखाटलेल्या स्त्रिया सोशिक, धार्मिक, नियतीला मानणाऱ्या, पतीला परमेश्वर रूपात पाहणाऱ्या, कष्टाळू, प्रसंगी धडाडीने पुढे येणाऱ्या आहेत; तर सुगी आणि जंगलावर जीवन अवलंबून असणाऱ्या उत्तर कोकणातील शेतकरी आणि ठाकूर, कातोडी र. वा. दिघे यांनी 'सराई' कांदबरीतून रेखाटले आहेत. या दोन्ही कादंबऱ्यांमध्ये कोणतीही व्यक्ती नायक किंवा खलनायक नाही; तर गाव आणि प्रदेशच नायक आहे. 'सजलपूर' आणि 'रानसई' हे गावचे नायक आहेत. वि. वा. हडपांच्या 'अन्नदाता उपाशी' या कोकणी कादंबरीतून 'काजरोळी' गावच नायकस्थानी आहे. येथील सोशिक समाज मार्क्सवादी प्रेरणेतून जागृत झाल्याचे लेखकाने चित्रित केले आहे. दुष्ट खोत आणि कुणबी संघर्ष येथे केंद्रस्थानी आहे. कोकणी माणसाच्या कोर्टकचेरी करण्याच्या वृत्तीवर येथे प्रकाशझोत टाकला आहे. कोकणी माणूस भांडकुदळ तसाच तो भ्याड आणि भेकडही आहे असेही दिसते. लक्ष्मणराव सरदेसाई यांची 'मांडवी ! तू आटलीस? ' आणि बा. भ. बोरकरांची 'भावीण' या कादंबऱ्यांमधून गोमंतकीय सामाजिक आणि राजकीय पार्श्वभूमी आली आहे. सामान्य शेतकऱ्यांची कुचंबणा, भाटकरांचे सरकारधार्जिणे वर्तन आणि फिरंग्याची राजवट, तसेच शांतादुर्गेवरील श्रद्धा यांतून या लोकांची मानसिकता घडली आहे. ख्रिस्ती धर्मप्रचारकांविषयी हिंदूंची तिरस्काराची भावना 'मांडवी ! तू आटलीस ?' मधून

येते. त्यामुळे येथील हिंदू दडपशाही, जुलमी प्रशासन-व्यवस्थेला विरोध न करणारे असे रेखाटले आहेत. त्यांची हिंदू संस्कृतीवर श्रद्धा आहे. सरकारी नोकरीशिवाय उद्धार नाही ही जुन्या पिढीची धारणा आणि त्याला विरोध करणारी नवी पिढी यांतील विसंवाद येथे व्यक्त होतो. बा. भ. बोरकरांच्या 'भावीण' कादंबरीतून भावीण स्त्रियांची मानसिकता, तिचे गोमंतकीय समाजव्यवस्थेतील नगण्य स्थान आणि शांतादुर्गेवरील श्रद्धा असलेल्या समाजात श्रद्धाळू माणसे येथे जिवंत केली आहेत. विभावरी शिरूरकर 'बळी' कादंबरीतून गुन्हेगार समजला जाणारा मांगगारूडी समाजच्या समाज, त्यांची मानसिकताच नायक रूपात अवतरते. श्री. ना. पेंडशांच्या 'हद्दपार' आणि 'गारंबीचा बापू' मध्ये कोकणी माणसाची दुर्गेश्वर, एकवीरा देवी, व्याघ्रेश्वरावरील श्रद्धा, गणेश उत्सव, होलीकोत्सव, भैरीची पालखी, शेरणे प्रकरण यातून सणउत्सवप्रियता, काटकसरी वृत्ती, त्यांचे दारिद्र्य आणि कोर्टकचेरी करण्याच्या स्वभावावरच भर दिला आहे. राजेमास्तर आणि अफाट बापूपेक्षा येथे दुर्गेश्वर आणि गारंबी नायक आहे. थोडक्यात काळ्या-पांढ्या व्यक्तीचे चित्रण या काळातील कादंबऱ्यांमधून येत असले तरी प्रदेशाचा त्या लोकांच्या जीवनावरील प्रभाव स्पष्ट दिसतो.

१९५० ते १९६० या कालखंडातील कादंबऱ्यांमधून रेखाटलेल्या व्यक्तिरेखा स्वातंत्र्यपूर्वकाळातील राजकीय शक्तीच्या दबावाखाली असलेल्या दिसतात. सामान्य शेतकरी, शेतमजुराप्रमाणे उपेक्षित तळाच्या समाजातील व्यक्तींचे चित्रण या काळातील प्रादेशिक कादंबरीतून झालेले आहे. बी. रघुनाथांच्या 'आडगावचे चौधरी' या कादंबरीत स्वातंत्र्यपूर्व काळातील दहा पिढ्यांमधील निजामी राजवटीतील सरंजामदारांचे चित्रण जसे येते तसेच समकालीन सामान्य, नगण्य सोशिक माणसेही चित्रित झाली आहेत. मराठवाड्यातील माणसे मुळात शांतताप्रिय आणि स्थितिप्रिय आहेत हेही प्रस्तुत कादंबरीतील व्यक्तिचित्रणाधारे स्पष्ट होते.

परंपरा जपणारी, गावगाड्याच्या मोडतोडीने उद्ध्वस्त झालेली श्रद्धाळू, प्रेमळ माणसे गो. नी. दांडेकरांनी रेखाटली आहेत. 'पडघवली'मधून कोकणी माणसाची कष्टाळू वृत्ती, कोर्टकचेरीचे कज्ञे करण्याची सवय आणि पाटपाण्यासाठी संघटित होण्याची वृत्ती, उत्सवप्रियता रेखाटली आहे. प्रामुख्याने अंबू वहिनी अधिक लक्षात राहते, ती निवेदिका म्हणून नव्हे तर ती सज्ञन, खानदानी, सोशिक असूनही संसाराची जबाबदारी खंबीरपणे पेलणारी आहे. ती पती परमेश्वर मानणाऱ्या स्त्रीची जशी

प्रतिनिधी आहे, त्याप्रमाणे प्रसंगी धडाडीने पुढे येणारी आहे. असे असले तरी 'पडघवली' हे गावच कादंबरीच्या नायकस्थानी आहे. 'पवनाकाठचा धोंडी'मधून परंपराप्रिय धोंडी हवालदार जिवंत करीत असताना मावळ प्रदेशातील गावगाड्याच्या पडझडीकडे लेखकाने लक्ष वेधले आहे. धोंडीच्या विरोधात त्याचा भाऊ कोंडी उभा केला आहे. त्यांच्या आर्थिक समस्येच्या चित्रणाबरोबरच गावातील मानवता, प्रेम यांचे दर्शन घडविले आहे. त्यातून मावळपठारी प्रदेशाला नायकपदी ठेवण्यात लेखक यशस्वी झाला आहे. 'माचीवरला बुधा' मधून निसर्गवेडा बुधा चऱ्हाटे जिवंत केला आहे. त्यानिमित्ताने पठारी प्रदेशावरील लोकांच्या जीवनावर या प्रदेशाचा प्रभाव असलेला दिसतो. नेहमीच्या दुष्काळामुळे त्यांना उपजीविकेसाठी मुंबईसारख्या शहराकडे जाण्याशिवाय गत्यंतर नसते. 'पूर्णामायची लेकरं'मधून वैदर्भीय लोकांची सादिलबुआ आणि महादेवावरील श्रद्धेचे चित्रण येते. त्यांचा शांतताप्रिय स्वभाव, दिलदारपणा, साधेपणा आणि आळशी, बेफिकीर वृत्ती लेखकाने चित्रित केली आहे. बयिराम ढोमणे, अलोकाबुढी हे पारंपरिक जीवन जगणारे रेखाटले असले तरी बयिरामचा मुलगा रूपराव नव्या जागृत पिढीचा प्रतिनिधी रेखाटला आहे. शोषक सावकाराला तो विरोध करतो. संपूर्ण बावनगाव वऱ्हाड आणि तेथील सामान्य लोकच केंद्रस्थानी आहेत. नंगेबाबांच्या दर्शनासाठी सर्व गावकरी जमा होतात, भजन करतात आणि गावभोजनही होते, यातून संपूर्ण गावच जिवंत होते. थोडक्यात गो. नी. दांडेकरांनी प्रदेशच केंद्रस्थानी ठेवल्याचे स्पष्ट होते.

व्यंकटेश माडगूळकरांनी 'बनगरवाडी'तून माणदेशातील अतिसामान्य सोशिक, श्रद्धाळू, शहरी संपर्कापासून दूर असलेली, निसर्गाला शरण जाणारी माणसे रेखाटली आहेत. सततच्या अवर्षणग्रस्त परिस्थितीने त्यांचा जीवन-व्यवहार नियत केला आहे. ते निसर्गावलंबी आणि मेंढरावलंबी जीवन जगतात. म्हणून दुष्काळात मेंढरांनी काय खावे? हा पहिला प्रश्न पडतो, तर आम्ही कसे जगावे ? हा दुसरा प्रश्न सतावतो. सर्वजण साधे-भोळे, सरळ आहेत. येथे माणदेशच नायक आहे. अण्णाभाऊ साठे यांनी 'फकिरा' कादंबरीतून जोगतिणीच्या यात्रेला महत्त्व देणारा 'वाटेगाव'चा समाज उभा केला आहे. फकिराची व्यक्तिरेखा पश्चिम महाराष्ट्राच्या माणसांच्या बंडखोर वृत्तीवरच प्रकाश टाकते. सामान्य तळच्या समाजातील माणूस किंवा संपूर्ण समाजच कादंबरीच्या केंद्रस्थानी असलेला दिसतो. रणजित देसाई यांनी 'बारी'तून तेग्या-नागी चित्रित केले असले तरी येथे बेरड समाज नायकस्थानी आहे. त्यांच्या 'माझा गाव'

मध्येही अप्पासाहेब इनामदार आणि तत्त्वनिष्ठ तात्या ब्राह्मणांचे ठसठशीत चित्रण झाले असले तरी बेळगाव-कोल्हापूरच्या सीमेवरील संपूर्ण खेडेच केंद्रस्थानी आहे. उलट उद्धव शेळके यांच्या 'धग' कादंबरीत कष्टाळू, जिद्दी कौतिक रेखाटली आहे. ती पतिपरमेश्वर मानणारी, मुलांवर उत्कट प्रेम करणारी, सर्वांना कामाला लावणारी आणि नियतीला मानणारी, प्रसंगी धडाडीने पुढे येणारी आहे. तिचा नवरा महादेव अहंकारी, हेकट आणि आळशी वऱ्हाडी माणसांचा प्रतिनिधी आहे. वाटसरूचा पाहुणचार करणारी माणसे जशी येथे दिसतात, त्याचप्रमाणे सकीना - बानो यांच्या रूपाने समान आर्थिक स्तरावरील एकमेकांवर प्रेम करणारी माणसेही रेखाटली आहेत. धनिकांचा मुजोरपणा, सरंजामी वृत्ती येथे दिसते. एकूण १९५० ते १९६० या काळातील प्रादेशिक कादंबऱ्यांमधील व्यक्तिरेखा आणि कथानकाचा विचार करता असे लक्षात येते की 'आडगावचे चौधरी', 'पडघवली', 'बनगरवाडी', 'बारी', 'माझा गाव' या कादंबऱ्यांचे कथानक विस्कळीत असले तरी कथाअंतर्गत सुसंगती लावता येते. 'पवनाकाठचा धोंडी', 'माचीवरला बुधा', 'पूर्णामायची लेकरं', 'फकिरा' आणि 'धग' या कादंबऱ्यांचे कथानक सुसंगत, रेखीव आहे. या सर्वच कादंबऱ्यांचा नायक व्यापक अर्थाने प्रदेशच आहे. प्रदेशाचा मानवी जीवनावरील प्रभाव या कादंबऱ्यांमधून स्पष्ट दिसतो. शिवाय सामान्य माणसांच्या जीवनातील ताणतणाव चित्रित करण्यावरच सर्व कादंबरीकारांनी लक्ष केंद्रित केलेले दिसते.

१९६० ते १९७५ या काळातील कादंबऱ्यांमधून परिवर्तनामुळे निर्माण झालेल्या समस्या चित्रित झाल्या आहेत. त्यानिमित्ताने ग्रामीण माणसांची मानसिकता चित्रित झाली आहे. दि. बा. मोकाशी यांच्या 'देव चालले' या कादंबरीमधून मावळ प्रदेशातील जोशी कुटुंबातील भांवडाची मानसिकता टिपताना या प्रदेशातील 'पळसगाव' उभे केले आहे. नरसिंहाची मूर्ती हलविण्याच्या निमित्ताने ग्रामस्थांची मानसिकता टिपणे हा लेखकाचा उद्देश असल्यामुळे ठळक अशी व्यक्ती उभी करण्यापेक्षा लेखकाचा भर प्रामुख्याने खेडे जिवंत करण्यावरच आहे. अण्णाभाऊ साठ्यांनी 'माकडीचा माळ'मधून भटक्या विमुक्त समाजाची दयनीय परिस्थिती रेखाटली आहे. त्यामुळे यंकू माकडवाला किंवा त्याची मुलगी दुर्गा केंद्रस्थानी नाही तर विविध जातीधर्माचे भटके विमुक्तच केंद्रस्थानी आहेत. अण्णाभाऊ साठे यांनी 'वारणेचा वाघ'मध्ये सत्तूबा भोसले या लोकनायकाचे जिवंत चित्र रेखाटले आहे. त्याच्यावर प्रेम करणाऱ्या वारणेच्या खोऱ्यातील लोकांची मानसिकता टिपली आहे. अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याची

या प्रदेशातील लोकांची वृत्तीच येथे दिसते. सावकारांचा कर्दनकाळ, इंग्रज सरकारचा शत्रू, अभागी स्त्रियांचा भाऊ आणि इमानी वृत्तीचा सत्तूबा भोसले लेखकाने जिवंत केला असला तरी या प्रदेशातील अज्ञान, दारिद्र्य याकडेही लक्ष वेधले आहे. नव्या पिढीतील दलितांनी ख्रिस्ती होण्यामुळे जुनी आणि नवी पिढी यांच्यामधील विसंवाद राजा ऊर्फ दनियल फौजदाराच्या व्यक्तिरेखाटनातून दिसतो. शंकर पाटील यांनी 'टारफुला'मधून कोल्हापूरकडील एक खेडे उभे केले आहे. येथेही एक व्यक्ती केंद्रस्थानी नाही तर पश्चिम महाराष्ट्रीय बंडखोर लोकच केंद्रस्थानी आहेत.

जयवंत दळवी यांनी 'सारे प्रवासी घडीचे' या कादंबरीतून कोकणी लोकजीवनदर्शन घडविले आहे. कोकणी माणसाची कलहप्रियवृत्ती, त्यांचा संघर्ष, कोर्टकचेरी करण्याचा स्वभाव आणि रवळनाथावरील श्रद्धेतून घडलेली मानसिकता यांचे चित्रण केले आहे. हमीद दलवाई 'इंधन' कादंबरीतून हिंदु-मुस्लिम आणि नवबौद्ध यांच्यातील संघर्ष चित्रित करतात. त्यामुळे निवेदक 'मी' किंवा अन्य व्यक्तीला येथे नायकत्व लाभलेले नाही, तर संपूर्ण समूहच कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे.

ना. धों. महानोरांच्या 'गांधारी' कादंबरीत 'गांधारी' हे मराठवाड्यातील गावच केंद्रस्थानी आहे. स्वातंत्र्योत्तर काळात शांतता, सुरक्षिततेची अपेक्षा करणाऱ्या माणसांचा भ्रमनिरास येथे चित्रित झाला आहे. त्यानिमित्ताने मराठवाड्यातील माणसाचे अज्ञान, निरक्षरता, दारिद्र्य, सोशिक, शांतताप्रियवृत्ती आणि नव्या नेतृत्वाची स्वार्थीवृत्ती येथे केंद्रस्थानी आहे. भागवतसारख्या प्रयोगशील शेतकऱ्याचे मार्गदर्शन घेण्यापेक्षा जगदेवसारख्या गावठी पुढाऱ्याच्या मागे पळण्याची समाजाची सवय, नवजागृत दलितवर्ग यांच्या चित्रणावरच भर दिलेला असला तरी या कादंबरीतील प्रत्येक व्यक्तीला स्वतःचे खास व्यक्तित्व लाभले आहे. रा. रं. बोराडे यांची 'पाचोळा' आणि आनंद यादवांची 'गोतावळा' या व्यक्तिप्रधान कादंबऱ्या आहेत. शिंपी समाजातील पार्वतीची शोकांतिका स्वातंत्र्योत्तर काळातील बलुतेदार शिंपी समाजाचीच शोकांतिका आहे, तर उपयुक्ततावादी यंत्र संस्कृतीच्या आक्रमणामुळे शेतमजुरांचे भावविश्व उद्ध्वस्त झाले, हे चित्रित करताना सोशिक, कष्टाळू, श्रद्धाळू, प्राणिमात्रांवर प्रेम करणारा 'नारबा' शेतमजुरांचा प्रतिनिधी म्हणून जिवंत केला आहे. 'पाचोळा'तील गंगाराम हा हेकेखोर, जिद्दी आहे. त्याला पारंपरिक शिंपी धंद्याची सवय लागलेली असल्यामुळे तो अन्य व्यवसाय करू शकत नाही म्हणूनच तो शिंपी व्यवसायातील नवे तंत्र (फॅशन) शिकण्यासाठी

धडपडतो. मुलाने अद्ययावत पद्धतीने कपडे शिवण्याचे काम शिकावे म्हणून प्रयत्न करतो. 'गोतावळा'मधील रामू सोनवडे आणि 'पाचोळा'मधील गरड हे स्वार्थी सरंजामदार आहेत, तर ड्रायव्हर, पाव्हणा आणि लातूरचा मशीनवाला हे कुशल नोकरवर्गाचे प्रतिनिधी आहेत. थोडक्यात, या काळातील सर्व कादंबऱ्यांचे कथानक हे रेखीव, सुसंगत आहे. व्यक्तिरेखाटनाचा विचार करता समूहजीवनचित्रणाची किंवा प्रदेश - गाव जिवंत करण्याची प्रेरणा आहे. पार्वती, नारबा, सत्तू भोसले या व्यक्तिरेखाही अधिक ठसठशीत रेखाटलेल्या आहेत. त्यांना स्वतःचे असे स्वतंत्र व्यक्तित्व आहे.

१९७५ ते १९९० मधील प्रादेशिक कादंबरी समस्याप्रधान आहे. 'कुणाच्या खांद्यावर', 'चौंडकं', 'कागूद आणि सावली', 'पाचर' या पश्चिम महाराष्ट्रातील जीवनानुभव रेखाटणाऱ्या कादंबऱ्या आहेत. परिवर्तन काळात नवीन समस्या निर्माण झाल्या. त्यामुळे सामान्य माणसांच्या जीवनात अधिक ताणतणाव निर्माण झाले. निसर्गनिर्मित संकटांप्रमाणेच मानव, समाज आणि शासननिर्मित संकटांची भर या लोकजीवन व्यवहारात पडली. दुष्काळी परिस्थितीमुळे येथील लोक मुंबईकडे धावताना दिसतात किंवा उपजीविकेसाठी सहकारी साखर कारखान्यांवर मजूर म्हणून जातात. सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या धोरणामुळे काही समस्या निर्माण झाल्या. त्याचप्रमाणे शासनाच्या कायद्यामुळेही समस्या निर्माण झाल्या. याचे चित्रण लेखकांनी पात्रांच्या कृतिउक्तींतून घडविले आहे. उत्तम बंडू तुपे यांनी 'इजाळं'मधून अल्पभूधारक शेतकऱ्यांची दयनीय स्थिती चित्रित केली आहे. प्रशासकीय यंत्रणेच्या भ्रष्टाचारी वृत्तीमुळे 'शामा' कर्जबाजारी होतो. कर्जाच्या जाळ्यात अडकलेला शामा अल्पभूधारक शेतकऱ्यांचा प्रतिनिधी आहे. बा. ग. केसकरांनी 'कुणाच्या खांद्यावर'मधून ऊस-तोडणी करणाऱ्या सोशिक, कष्टाळू मजुरांची मानसिकता टिपली आहे. चिटबॉय, मुकादम, पुढारी हे सर्व शोषणकर्त्या नवश्रीमंतवर्गाचे प्रतिनिधी रेखाटले आहेत. आनंद पाटील यांच्या 'कागूद आणि सावली' या दोन कादंबऱ्या व्यक्तिप्रधान असल्या तरी आबा जाधव किंवा धोंडीबा भोरपेक्षा निमकोकणातील खेडेगावांनाच लेखकाने केंद्रस्थानी ठेवले आहे. 'कागूद' मध्ये आबाच्या विरोधात त्याचाच मुलगा बाबू रेखाटला आहे. कर्मवीर भाऊराव पाटलांच्या विचाराने प्रभावित झाल्यामुळे बाबूला उच्च शिक्षणात रस आहे, जमीन-खरेदीच्या भानगडीत त्याला रस नाही. व्यवसायाभिमुख शिक्षणाच्या अभावामुळे त्याला सेक्रेटरी, ड्रायव्हर फसवितात. 'सावली'मधील संरक्षण खात्यात नोकरी करणारा नामा स्वार्थी - भांडखोर आहे, तर गिरणीकामगार असलेला धोंडीबा भोर हा

प्रतिष्ठेच्या कल्पनेला बळी पडणारा, थोडासा अव्यवहारी आहे. त्याची बायको व्यवहारी पण अगतिक आहे. सावकार, मारवाडी, सरपंच, पंचायतीचे मेंबर, फॉरेस्ट अधिकारी, तलाठी हे नव्या शोषणकर्त्यांचे प्रतिनिधी आहेत. रामचंद्र पठारे यांच्या 'पाचर'मधूनही जागृत नवबौद्ध समाज आणि प्रतिगामी राजकारण्यांचा ढोंगीपणा केंद्रस्थानी आहे. राजन गवस यांच्या 'चौंडकं' कादंबरीत यल्लमावर श्रद्धा असलेला समाजच केंद्रस्थानी आहे. मधु मंगेश कर्णिकांच्या 'भाकरी आणि फूल' कादंबरीत कोकणी दलित समाजच केंद्रस्थानी आहे.

गणेश आवटे यांची 'गणगोत' आणि वासुदेव मुलाटे यांची 'विषवृक्षाच्या मुळ्या' या कादंबऱ्यांमधून मराठवाड्यातील लोकजीवनचित्रण झाले आहे. दारिद्र्य, मागासलेपण, अज्ञान आणि मानपानप्रतिष्ठेच्या कल्पना यामुळे येथे निर्माण झालेल्या समस्या पात्रांच्या कृतिउक्तींतून दिसतात. 'गणगोत'मधील अंजू, तिची सासू, सासरा आणि तिचे वडील हे मुळात शांतताप्रियच आहेत. परंतु मानपानाच्या कल्पनेमुळे सासू-सासरे तिला सासुरवास करतात. त्याला कंटाळून ती आत्महत्येचा प्रयत्न करते. अंजू सोशिक, विचारी, पती परमेश्वर मानणाऱ्या नवविवाहितांची प्रतिनिधीच वाटते. 'विषवृक्षाच्या मुळ्या'मधील विश्वनाथ तरटे हा संवेदनाक्षम तरुण कादंबरीच्या केंद्रस्थानी असला तरी सहकारातील भ्रष्टाचारामुळे शोषण होणारा सामान्य माणूसच येथे केंद्रस्थानी असल्याचे जाणवते. दुष्काळामुळे कर्ज भरू न शकणाऱ्या, सावकार आणि वसुली अधिकाऱ्यांनी शोषण केलेल्या समाजाचे चित्र लेखकाने रेखाटले आहे.

बाबाराव मुसळे यांनी 'हाल्या, हाल्या, दुधू दे'मध्ये न्यानबा हा सामान्य शेतकरी जिवंत केला आहे. प्रतिकूल परिस्थितीत सुखाची अपेक्षा करणारा, कर्ज काढून मुलीचे लग्न करणारा न्यानबा कर्जात गुरफटून मरतो. पुरुषोत्तम बोरकरांनी 'मेड इन इंडिया'मधून विदर्भातील पारंपरिक लोकजीवनाचा ऱ्हास चित्रित केला आहे. सुशिक्षित बेकारांचा प्रतिनिधी म्हणून पंजाबराव गरसोळीकर जिवंत केला आहे. तो खिळखिळी झालेली समाजव्यवस्था, क्षुल्लक गोष्टीसाठी एकत्र जमण्याची वऱ्हाडी माणसाची वृत्ती, आळशी वृत्ती, व्यसनाधीनता आणि जुगारी वृत्ती यांवर भाष्य करतो. मधुकर वाकोडे यांनी 'झेलझपाट' कादंबरीत कोरकू आदिवासींची समस्या रेखाटली आहे. शासनाच्या कायद्यांमुळे, व्यापाऱ्यांकडून होणाऱ्या शोषणामुळे त्यांच्या पारंपरिक जीवनशैलीचा ऱ्हास लेखकाने रेखाटला आहे. त्यामुळे केरू किंवा फुलय केंद्रस्थानी नाही तर कोरकू समाजच केंद्रस्थानी आहे. विलक्षण साधी, नागदेवतांची

पूजा करणारी, शिड्डू पिऊन ढोलाच्या तालावर नाचणारी, परंपरा जपणारी माणसे वाकोड्यांनी जिवंत केली आहेत. १९७५ ते १९९० या काळातील उपरोल्लेखित कादंबऱ्यांचे कथानक रेखीव आहे. पण 'मेड इन इंडिया' कादंबरी याला अपवाद आहे. तिचे कथानक हे धावत्या समालोचनासारखे आहे. निवेदक स्वानुभव तिरसटपणाने सांगतो; तरीही या विस्कळीत घटना-प्रसंगांतून कथा अंतर्गत सुसंगती लावता येते. परिवर्तन काळात निर्माण झालेल्या समस्यांचे, लोकजीवनातील ताण-तणावांचे चित्रण करणे हा या लेखकांचा हेतू आहे. या कादंबऱ्यांमध्ये कोणी एक नायक असला तरीही खरे नायकत्व त्यातील चिंतनशील सामाजिक मनाला आहे. या कादंबरीत खलनायकाच्या स्वरूपात एखाद्या व्यक्तीऐवजी परिस्थिती, प्रवृत्ती किंवा नियती असलेली दिसते. सुष्ट-दुष्टांचा संघर्ष येथे रेखाटलेला दिसत नाही. व्यक्तींच्या कृतिउक्तींतून, स्वभाववैशिष्ट्यांतून प्रादेशिकता दृग्गोचर होते.

कोकण, प. महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यातील माणसांची काही स्वभाववैशिष्ट्ये आणि एकूणच प्रदेश-वैशिष्ट्ये कथानक व्यक्तिचित्रणातून दिसतात. प्रदेशाचा आणि निसर्गाचा या लोकजीवनावर परिणाम झालेला स्पष्ट जाणवतो. मराठवाड्यातील लोक हे अधिक श्रद्धाळू - अंधश्रद्ध, आळशी तितकेच दिलदार, प्रेमळ आहेत. निजामी राजवटीच्या प्रभावाखाली त्यांची मानसिकता घडलेली दिसते. शिक्षणाच्या अभावामुळे मागासलेपण या प्रदेशात दिसते. हे लोक निजामी राजवटीमुळे दबलेले दिसतात. सुबत्तेमुळे ते सुखवस्तू, चैनी असल्याचेही दिसते. जलसे, दौलतजादा यांमध्ये ते रमतात. याचे कारण निजामी राजवटीतील विलासी वृत्ती हेही स्पष्ट आहे. प्रत्येकाला उपजीविकेइतकी शेती असल्याने शेतमजुरांची संख्या कमी आहे. त्याचप्रमाणे धनिक सरंजामदारांचा मुजोरपणाही दिसतो. असे असले तरी हे लोक स्थितिप्रिय आहेत. ते सहजासहजी घर-गाव सोडत नाहीत. उपजीविकेसाठी शहराकडे धावत नाहीत. मिळेल त्याच्यात समाधान मानतात. गावांमध्ये ते एकत्र राहतात; शेतावर राहत नाहीत. याचे कारण निजामी राजवटीची दहशत हे सांगता येईल. त्यांची घरे ही दगड- मातीची, धाब्याची असलेली दिसतात; तर धनिक सरंजामदारांचे वाडे असल्याचे दिसते. या प्रदेशातील लोकांच्या भाषेवर उर्दूचा प्रभाव अधिक दिसतो.

वऱ्हाडी प्रदेशातील लोकजीवनावर निजामी राजवटीचा प्रभाव असलेला दिसतो. हे लोकही श्रद्धाळू-अंधश्रद्ध, आळशी तसेच दिलदार, प्रेमळ आहेत. मागासलेपण आणि शिक्षणाचा अभाव यामुळे त्यांचे अधिक शोषण झाले आहे. सरंजामदारांचा

मुजोरपणा जसा येथे दिसतो तसेच आदिवासींचे दारिद्र्यही दिसते. विदर्भातील लोकांची सादिलबुवा, महादेव, बहिरम आणि अन्य स्थानिक देवता तसेच नागदेवतांवर आदिवासींची श्रद्धा असलेली दिसते. हे लोकही स्थितिप्रिय आहेत. ते सहजासहजी घर-गाव सोडत नाहीत. उपजीविकेसाठी शहराकडे धावत नाहीत. मिळेल त्याच्यात समाधानी दिसतात. प्रत्येकाला पोटापुरती जमीन असल्यामुळे ते व्यसनाधीन - जुगारी असलेले दिसतात. गाव-वाडीवस्तीवर हे एकत्र राहतात. आदिवासी समाज येथे अधिक असून त्यांची स्वतंत्र जीवनशैली असली तरी शासनाच्या धोरणामुळे ती जीवनशैली उद्ध्वस्त होऊ लागल्याचे स्पष्ट जाणवते. विदर्भातला माणूस सफाईदार हिंदी बोलतो. याचे कारण निजामाची राजधानी, हिंदी त्यांची राजभाषा होती. त्यामुळे वऱ्हाडी माणसांच्या बोलण्यात हिंदी शब्द अधिक येतात.

पश्चिम महाराष्ट्रातील प्राकृतिक वैशिष्ट्यांचा परिणाम या लोकजीवनावर निश्चितच झालेला आहे. हा माणूस भाविक तसाच रांगडा, कष्टाळू, शूर, लढवय्या आहे. तो पंढरीच्या विठ्ठलाचा भक्त आहे. तसाच खंडोबा, जोतीबा, यल्लमा, अंबाबाई, भैरोबाचा भक्त आहे. नेहमीच्या दुष्काळसदृश परिस्थितीमुळे देशावरील माणूस उपजीविकेसाठी मुंबईसारख्या महानगरात जातो किंवा साखर कारखान्यांवर ऊसतोडणीसाठी नागरी माणूस स्थलांतर करतो. देशावरचा शेतकरी शेतावर घर करून राहतो. याचे कारण तो अल्पभूधारक, भूमिहीन शेतमजूर आहे. त्यामुळे शेतीतून अधिक उत्पन्न मिळविण्यासाठी त्याला शेतावर राहवे लागते. या प्रदेशातील घरांची रचना कमी पावसामुळे साधारणपणे पत्रे-सिमेंट किंवा उसाच्या पाचटाने शाकारलेली छपरे किंवा विटामातीची-धाब्याची अशी दिसतात. येथे आदिवासी समाज फारसा नाही. कोल्हापूरच्या बाजूला आदिवासी बेरड आहेत. देवदासी ही सामाजिक संस्था येथे आहे. येथील लोक लढवय्ये, शूर, पराक्रमी असल्याने आणि प्रतिकूल निसर्गामुळे त्यांचे सैन्यात भरती होण्याचे प्रमाण अन्य प्रदेशांच्या तुलनेत सर्वाधिक आहे. देशावरचा दलित महार हा बलुतेदार असतो, परंतु मांग हा सनदशीर शिपाई असतो. देशावरचा माणूस झटपट परिवर्तनाला सामोरा जातो. इंग्रजांच्या राजवटीत देशावरील दलितांनी झटपट ख्रिस्ती धर्म स्वीकारल्याचे दिसते. या लोकांची स्वतंत्र बोली आहे. ती कोल्हापुरी, सातारी, पुणेरी, मावळी आणि नगरी अशी वैशिष्ट्यपूर्ण आहे. भजनाच्या वेळी देशावर टाळ, मृदंग वाजविले जातात. मुंबई-पुण्याच्या प्रभावामुळे आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्यामुळे शिक्षणप्रसार आणि जागृतीस येथे

अगोदर सुरुवात झाली; त्याचा परिणाम म्हणून आधुनिकीकरणाचे विचार येथे लवकर आले. इंग्रज सरकारच्या विरोधात प्रथम या प्रदेशातील जनतेनेच आवाज उठविला, तसेच साहित्यनिर्मितीही मोठ्या प्रमाणात झाली असे दिसते.

कोकणी निसर्ग प्रदेशाचा लोकजीवनावर निश्चितच परिणाम झालेला दिसतो. डोंगराळ प्रदेशातला हा मानवसमाज कष्टाळू, काटक, काटकसरी, मवाळ, श्रद्धाळू आणि कोर्टकज्ज्यात रमणारा, पाटपाण्यासाठी भांडणारा, भ्याड भित्रा आहे. रवळनाथ, रामेश्वर, परशुराम, दुर्गेश्वर, व्याघ्रेश्वर, मंगेश, एकवीरा देवी, शांतादुर्गा, शाळीग्रामावर कोकणी आणि गोमंतकीय माणसांची श्रद्धा आहे. अतिवृष्टी होऊनही अल्पशा शेतीवर उपजीविका होत नाही. तसेच उन्हाळ्यात पाण्याचा अभाव असतो. त्यामुळे या लोकांचे मुंबईसारख्या महानगरात जाण्याचे प्रमाण अधिक आहे. पुरुषवर्ग शहरात जाण्याचे प्रमाण अधिक असल्याने आणि जंगली श्वापदांपासून संरक्षण व्हावे म्हणून येथील लोक संघटितपणे गावात किंवा वाडीत एकत्र राहतात. पूर्वीच्या काळातील चाच्यांपासून संरक्षण करण्यासाठीही एका गावातच राहत होते असे दिसते. अतिवृष्टी होत असल्यामुळे येथे उतरत्या छपराची कौलारू किंवा खापरी घरे आढळतात. कोकण-गोवा प्रदेशात भावीण ही सामाजिक संस्था आहे. ती अन्य प्रदेशात दिसत नाही. आदिवासी समाज येथे मोठ्या प्रमाणावर असून त्यांची जीवनशैली वैशिष्ट्यपूर्ण आहे. दलित महार समाज कोकणातला मानकरी असतो. तो परिवर्तनाला सामोरा जाण्याचे टाळतो असे दिसते. अन्यायाविरुद्ध आवाज उठविला जाण्यासाठी बौद्धधर्म स्वीकारण्यास कोकणी दलितांनी टाळाटाळ केलेली दिसते. भजनाच्या वेळी हे लोक टाळ, मृदंग, चकवे ही वाद्ये वाजवितात असेही वेगळेपण दृष्टीस पडते. मुंबईशी असलेल्या संपर्कामुळे, शिक्षणप्रसार आणि जागृतीचे प्रमाण अधिक दिसते. नोकरी-धंद्याच्या निमित्ताने त्यांनी गाव सोडल्यामुळे खेडी ओस पडली असेही दिसते. थोडक्यात, महाराष्ट्रीय माणूस श्रद्धाळू, सोशिक, कष्टाळू, संस्कृती जपणारा तसाच अन्यायाविरुद्ध आवाज उठविणारा आहे. पुरुष बेफिकीर, भाबडे, तापट, मवाळ, मुजोर, नशिबावर हवाला ठेवणारे, रागीट अशा विविध स्वभावप्रवृत्तींचे दिसतात; तर स्त्री-व्यक्तिमत्त्व नियतीला मानणारे, सोशिक, धार्मिक, सांस्कृतिक ठेवा जतन करणारे, पतीला परमेश्वर रूपात पाहणारे, कष्टाळू, मुलांवर प्रेम करणारे, प्रसंगी धडाडीने पुढे येणारे असे चित्रित झाले आहे.

**(ड) भाषाविशेष**

प्रादेशिक कादंबरीच्या निसर्ग, भूप्रदेश, समाजजीवन, कथानक आणि व्यक्तिचित्रण

या घटकांप्रमाणे भाषा-विशेष हा घटकही अत्यंत महत्त्वाचा आहे. त्या त्या प्रदेशाचे वेगळेपण बोली आणि भाषाविशेषांधारे टिपता येते. वास्तवता आणि वातावरणनिर्मितीसाठी प्रादेशिक कादंबऱ्यांमधून निवेदन आणि संवादासाठी बोलीभाषा वापरली जाते. प्रदेश विशिष्ट बोलीतील लकबी, म्हणी, वाक्प्रचार, नावीन्यपूर्ण शब्द, लोकगीत आणि लोककथादींतून प्रादेशिकता स्पष्ट होते.

१९२५ ते १९५० पर्यंतच्या प्रादेशिक कादंबऱ्यांमधून निवेदनासाठी प्रमाण भाषा तर संवादासाठी बोलीभाषेचा वापर केलेला दिसतो. या काळातील कादंबरीचा वाचकवर्ग हा प्रामुख्याने शहरी मध्यमवर्गीय होता. त्यामुळे ग्रामजीवनातील जीवनानुभव त्या त्या प्रदेशातील बोलीत रेखाटलेला नाही. वाचकांवर लक्ष केंद्रित करून लेखन झालेले दिसते. ना. वि. कुलकर्णी यांच्या 'कसे दिवस जातील' आणि 'शिपाई' या कादंबऱ्यांचे निवेदन प्रमाण मराठी भाषेत आले असून संवादाची भाषा मात्र सातारा-कऱ्हाड परिसरातील बोलीभाषा आहे. र. वा. दिघे यांच्या कादंबऱ्यांचे निवेदन प्रमाण भाषेत असले तरी संवाद, लोकगीत, म्हणी आदिवासींच्या बोलीतून आले आहेत. शिवाय सामान्य लोक स्थानिक बोलीतच बोलतात. ग. ल. ठोकळांनी 'गावगुंड'चे निवेदन प्रमाण भाषेत आणि संवाद बोलीभाषेत लिहिले आहेत. परंतु पारूच्या लोकगीतातून तिचे वेगळेपण दिसते. वि. वा. हडपांची 'अन्नदाता उपाशी' आणि म. भा. भोसले यांची 'उघड्या जगात' या कादंबऱ्या याला अपवाद नाहीत.

लक्ष्मणराव सरदेसाई यांची 'मांडवी ! तू आटलीस ?' आणि बा. भ. बोरकरांची 'भावीण' या गोमंतकीय जीवनदर्शन घडविणाऱ्या कादंबऱ्यांचे निवेदन प्रमाण मराठी भाषेत असून संवाद आणि तेथील रेंदऱ्यांचे लोकगीत बोली भाषेतीलच आहेत. विभावरी शिरूरकरांच्या 'बळी' कादंबरीचे निवेदन प्रमाण भाषेत तर संवाद मात्र लेखिकेला परिचित असलेल्या ग्रामीण मराठी बोलीतील आहेत. ती बोली मांगगारूडी समाजाची नाही.

१९५० ते १९६० या कालखंडातील प्रादेशिक कादंबरीची भाषा जीवनानुभवाचा अपरिहार्य भाग म्हणून आली आहे. निवेदन प्रमाण भाषेत तर संवाद स्थानिक बोलीतील असे या कादंबऱ्यांमधून दिसते. श्री. ना. पेंडसे यांच्या कादंबऱ्यांचे निवेदन प्रमाण भाषेत असले तरी कोकणी बोलीतील लकबी, संवाद लेखकाने मोठ्या ताकदीने जिवंत केले आहेत. कथानकाला गती देणारे, व्यक्ती जिवंत करण्याचे सामर्थ्य या संवादामध्ये आहे. बी. रघुनाथांच्या 'आडगावचे चौधरी' या कादंबरीतून हिंदी,

अरबी, फारशी शब्दांचा भरणा अधिक आहे. यातून निजामी राजवटीच्या प्रभावाखाली असलेला प्रदेश निश्चित करता येतो.

गो. नी. दांडेकरांनी कोकणी, मावळी आणि वऱ्हाडी बोलीतील लकबींचा सहजपणे वापर केला आहे. व्यंकटेश माडगूळकरांच्या 'बनगरवाडी'चे निवेदन आणि संवाद माणदेशातील बोलतच आहे. साधी, सरळ, सोपी अशी ती बोली मेंढपाळांच्या दैनंदिन वापरातीलच आहे. अण्णाभाऊ साठे यांच्या 'फकिरा'ची भाषा बखरसदृश आहे. त्यांनी संवादासाठी बोलीभाषाच वापरली आहे. रणजित देसाई यांच्या कादंबऱ्यांचे संवाद कोल्हापूर-बेळगाव सीमेवरील लोकांच्या बोलीत आहेत. काही कानडी लकबी आणि कानडी वळणाचे शब्दही या कादंबऱ्यांमधून येतात. उद्धव शेळके यांच्या 'धग'मधून निवेदनासाठी प्रमाण भाषा आली असली तरी संवाद मात्र वऱ्हाडी बोलीत आहेत. अनेक हिंदी, अरबी, फारशी शब्द येथे येतात. यातून पूर्वीच्या निजामी राजवटीचा प्रभाव जसा दिसतो, त्याप्रमाणे मध्यप्रदेशाशी जवळीक यातून स्पष्ट होते. व्यक्तींच्या स्वभावातील तऱ्हेवाईकपणा, आळशीवृत्ती किंवा दिलदारपणा संवादातून दिसतो. कथानकाला गती देण्याचे, मानवी जीवनातील ताणतणाव चित्रित करण्याचे सामर्थ्य त्यांच्या भाषेत असलेले दिसते. एकूणच मराठी प्रादेशिक कादंबरी बोलीतील संवादामुळे अधिक जिवंत आणि वास्तवदर्शी झाली.

१९६० ते १९७५ या काळातील प्रादेशिक कादंबरीचे निवेदन प्रमाणभाषेत आणि संवाद बोलीभाषेत आहेत; परंतु रा. रं. बोराडे यांची 'पाचोळा' आणि आनंद यादव यांची 'गोतावळा' या कादंबऱ्यांचे निवेदन संवाद यासाठी प्रदेशविशिष्ट बोलीच वापरली आहे. पात्रमुखी निवेदन पद्धतीनेच दोन्ही कादंबऱ्यांचे निवेदन झाले आहे. या दोन कादंबऱ्यांच्या निवेदनात फरक आहे. 'पाचोळा'तील पार्वती आपली व्यथा इतरांना सांगते, अशी पद्धती स्वीकारली आहे, तर 'गोतावळा'तील नारबा स्वतःशी संवाद साधतो. दि. बा. मोकाशी यांच्या 'देव चालले' या कादंबरीचे निवेदन संवाद प्रमाणभाषेकडे झुकलेले आहेत. अण्णाभाऊ साठे यांनी 'माकडीचा माळ' आणि 'वारणेचा वाघ' या दोन कादंबऱ्यांचे निवेदन प्रमाणभाषेत केले आहे. संवाद मात्र प्रदेशविशिष्ट बोलीतच आहेत.

जयवंत दळवी यांच्या 'सारे प्रवासी घडीचे' या कादंबरीत कोकणी बोली संवादासाठी वापरली असली तरी निवेदन प्रमाण भाषेत आहे. त्याचप्रमाणे कोकणी जीवनदर्शन घडविणारी हमीद हलवाई यांची 'इंधन' ही कादंबरी भाषेच्या दृष्टीने

खास वैशिष्ट्यपूर्ण आहे. निवेदन प्रमाणभाषेत असले तरी कोकणी बोलीच्या ढंगाने उच्चारले जाणारे हिंदी-अरबी-फारशी शब्द हे वैशिष्ट्यच आहे. ना. धों. महानोरांच्या 'गांधारी'चे निवेदन प्रमाणभाषेत असले तरी परिवर्तनसूचक अनेक इंग्रजी शब्द बोलीच्या ढंगाने उच्चारण्याची लकब लेखकाने नीट पकडली आहे. शिवाय निजामी राजवटीच्या प्रभावामुळे येथील लोकभाषेवरही हिंदी, उर्दू, अरबी, फारशीचा प्रभाव असल्याचे स्पष्ट जाणवते. संवाद हे खास अहिरणी, हिंदी, इंग्रजी शब्दांच्या मिश्रणातून आलेले आहेत. तरीही एक गोष्ट स्पष्ट होते की, या प्रदेशातील भाषा ही प्रमाणभाषेला अधिक जवळची आहे. या काळातील कादंबऱ्या अनुभवाच्या मागणीप्रमाणे भाषेचा वापर केल्यामुळे अधिक वास्तवदर्शी उतरल्या आहेत. शिवाय रा. रं. बोराडे आणि आनंद यादव यांनी केलेला बोलीचा वापर हे खास वैशिष्ट्य आहे.

१९७५ ते १९९० या कालखंडातील कादंबऱ्या या प्रामुख्याने संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतर किंवा सत्तेचे विकेंद्रीकरणाचे धोरण् जाहीर झाल्याने आणि आधुनिकीकरणाच्या प्रभावाने निर्माण झालेल्या समस्या रेखाटतात. ग्रामीण जनतेचा शहरांशी संपर्क वाढला. नवनवीन शब्द लोक बोलीच्या ढंगाने उच्चारू लागले. अशी भाषा या कालखंडातील लेखकांनी आपल्या कादंबऱ्यांमधून वापरली आहे. उदा.-मधु मंगेश कर्णिकांची 'भाकरी आणि फूल' ही कोकणी दलित जीवन रेखाटणारी कादंबरी आहे. त्यामुळे कोकणातील सवर्ण आणि दलितांचे संवाद मालवणी बोलीत असून साक्षर नवबौद्धांचे संवाद हे प्रमाण मराठीत आहेत. गणेश आवटे यांच्या 'गणगोत'चे निवेदन संवाद बोलीतच आहे; तर वासुदेव मुलाटे यांची 'विषवृक्षाच्या मुळ्या' या कादंबरीचे निवेदन प्रमाण भाषेत तर संवाद बोलीत आहेत. या दोन्ही कादंबऱ्यांच्या भाषेचा विचार करता मराठवाड्यातील भाषा ही प्रमाण भाषेला अधिक जवळची असल्याचे दिसते.

उत्तम बंडू तुपे यांच्या 'इजाळं'तून साताऱ्याकडील प्रदेशातील बोली तर आनंद पाटील यांच्या 'कागूद आणि सावली'तून निमकोकणातील बोलीभाषेचे दर्शन घडते. रामचंद्र पठारे यांची 'पाचर' आणि बा. ग. केसकर यांची 'कुणाच्या खांद्यावर' नगरी बोलीतील आहेत. राजन गवस यांची 'चौंडकं' कादंबरी कोल्हापूरकडील बोलीभाषेची ओळख पटविणारी आहे. 'दर्शन', 'जोगवा', चौंडकं' हे शब्द खास देवदासी जीवनातील आहेत.

बाबाराव मुसळे यांची 'हाल्या, हाल्या, दुधू दे' आणि पुरुषोत्तम बोरकरांची 'मेड इन इंडिया' या कादंबऱ्या वऱ्हाडी बोलीतील आहेत. बाबाराव मुसळे यांनी

निवेदन - संवादासाठी वऱ्हाडी बोली वापरली असून पुरुषोत्तम बोरकरांनी 'मेड इन इंडिया' धावत्या समालोचनासारखी वऱ्हाडी बोलीतच लिहिली आहे. एक सुशिक्षित बेकार निवेदन करीत असल्यामुळे स्वाभाविकपणे इंग्रजी शब्दही आले आहेत. मधुकर वाकोडे यांनी 'झेलझपाट' प्रमाणभाषेत असली तरी संवादासाठी कोरकू आदिवासींची बोली किंवा हिंदी वळणाची वऱ्हाडी बोली वापरली आहे. बोलीभाषेच्या वापरामुळे त्या त्या प्रदेशातील जीवनदर्शन अधिक स्वाभाविक झाले असून त्या भाषेच्या माध्यमातूनच प्रदेश टिपता येतो. बोलीतील लकबी, शिव्या, नावीन्यपूर्ण शब्दकळा, लोककथा - लोकगीत - लोकोक्ती, म्हणी, वाक्प्रचारादींच्या वापरामुळे प्रादेशिकता टिपता येते. जातीजमातींच्या खास वेगळेपणाचेही दर्शन त्या बोलीमुळे घडते. भिल्ल, ठाकूर, कातोडी, कोरकू, बेरड, मांगगारूडी आणि उपेक्षित भटक्या विमुक्तांच्या स्वतंत्र बोलीचे आणि सणोत्सव, धार्मिक विधींचे त्यांच्याच बोलीतून किंवा शब्दांमधून दर्शन घडते. त्यामुळे प्रादेशिक कादंबरी अधिक जिवंत आणि वास्तवदर्शी झाली आहे.

**(३) वाङ्मयीन मूल्यमापन**

**१) विषय - हाताळणी :** काळाला समान्तर असे मराठी प्रादेशिक कादंबरीचे विषय व आशय हे बदलत गेलेले दिसतात. वास्तव जीवनाचे भान अधिकाधिक येत चालले आहे. वास्तवजीवन चित्रण ही तिची प्रेरणा आहे. ग्रामीण जीवनात आलेल्या परिवर्तनाबरोबर आणि झालेल्या स्थित्यंतराबरोबर तिचे आशयविश्व बदलत गेले. अभिव्यक्तीमध्येही बदल झाला आहे. १९२५ ते १९५० पर्यंतची प्रादेशिक कादंबरी ग्रामजीवन चित्रणाच्या प्रेरणेतून लिहिली गेली असली तरी, ती मनोरंजनवादी, प्रचारकी आणि बोधवादी झालेली आहे. मार्क्सवादी प्रेरणेतून झालेली निर्मितीदेखील फडके रचना तंत्राच्या प्रभावाखाली असलेली दिसते. १९५० ते १९६० या दशकातील प्रादेशिक कादंबरी अधिक वास्तवस्पर्शी आहे. पण मध्यमवर्गीय दृष्टिकोनातून ग्रामानुभवांचे अवलोकन करून अभिव्यक्ती झाली आहे. १९६० ते १९७५ या काळातील प्रादेशिक कादंबरी मध्यमवर्गीय दृष्टिकोणातून बाहेर पडली आणि आधुनिकीकरणाच्या आक्रमणाचा प्रभाव तीमधून समर्थपणे रेखाटला गेला. १९७५ ते १९९० मधील प्रादेशिक कादंबरीकारांनी सामाजिक समस्यांचे चित्रण वास्तववादी प्रेरणेतून केले आहे. जनसामान्य, पददलित आणि उपेक्षितांच्या जीवनचित्रणामुळे ती अधिक वास्तववादी आणि सामाजिक झाली. या काळाबरोबर बदलणाऱ्या प्रादेशिक कादंबरीतून चित्रित झालेल्या विषयांचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल. अर्थात

कादंबरीचे कथानक म्हणजे कादंबरीचा विषय नव्हे. कादंबरीचा विषय गुंतागुंतीचा असतो. त्यामुळे कादंबरीच्या विषयाचे केवळ एका विषयवर्गात वर्गीकरण करणे अशक्य असले तरी प्रमुख विषयांनुसार हे वर्गीकरण केले आहे. कादंबरीतून पूर्णतः आणि अंशतः आलेल्या विषयांचा विचार केल्यामुळे काही कादंबऱ्या एकापेक्षा अधिक विषय गटांमध्ये समाविष्ट केल्या आहेत. विषय-हाताळणीची कारणेही स्पष्ट केली आहेत. कारण विषयाचा तात्कालीन समाजव्यवस्थेशी संबंध बहुतेक असतो.

**(१) उपेक्षितांचे जीवनचित्रण :** दलित वाङ्मयाची चळवळ ही विशेषतः १९६०च्या पुढे प्रभावी ठरली. त्यामुळे उपेक्षितांच्या जीवनसंघर्षाकडे लक्ष वेधले. शिक्षणप्रसारामुळे ग्रामीण पिढीत जाणीवजागृती झाल्याने हे विषय हाताळलेले दिसतात. या विषयहाताळणीत विविधता आहे.

**अ) आदिवासींचे जीवनचित्रण**

पूर्णतः अंशतः

'बारी', 'झेलझपाट' : 'पाणकळा', 'सराई', 'आई आहे शेतात'

ब) भटके विमुक्तांचे जीवनचित्रण : 'माकडीचा माळ'

क) दलित जीवन चित्रण : 'वारणेचा वाघ', 'बळी', 'फकिरा', 'भाकरी आणि फूल'

ड) मेंढपाळाचे आणि शेतमजुरांचे जीवनचित्रण : 'बनगरवाडी', 'गोतावळा'

इ) बलुतेदारांचे जीवनचित्रण : १) पूर्णतः 'धग', 'पाचोळा'

२) अंशतः 'गोतावळा', 'टारफुला', 'इजाळं', 'पवनाकाठचा धोंडी'

**(२) सामान्य शेतकऱ्यांच्या जीवनातील दैन्य आणि दारिद्र्य :** मार्क्सवादी विचारसरणीच्या प्रभावातून या विषयाकडे लेखकांनी सहानुभूतिपूर्वक पाहिले आणि लेखन केले. 'अन्नदाता उपाशी', 'मांडवी ! तू आटलीस ?', 'कसे दिवस जातील', 'शिपाई, 'उघड्या जगात'.

**(३) पारंपरिक गावगाड्याची पडझड :** आधुनिकीकरण, यंत्रयुग, शिक्षणप्रसार यांमुळे खेडी ओस पडली. पारंपरिक संस्कृतीची पडझड झाली. 'पडघवली', 'पवनाकाठचा धोंडी', 'टारफुला', 'माझा गाव', 'सारे प्रवासी घडीचे'.

**(४) मुजोर सरंजामदारांची अरेरावी :** मोगलाई, पोर्तुगीज आणि इंग्रज राजवटीच्या पार्श्वभूमीवर लोकशाही जाणिवा यामुळे हा विषय हाताळला गेला. 'आडगावचे चौधरी',

'उघड्या जगात', 'मांडवी ! तू आटलीस ?'.

(५) **भ्रष्ट प्रशासन-व्यवस्थेत सामान्यांचे गुदमरणे :** स्वातंत्र्याचे महत्त्व जनतेला पटले. त्यामधून प्रशासकीय अरेरावी आणि भ्रष्टाचार संवेदनशील आणि जागृत मनाला जाणवला. त्यामुळे त्याचे चित्रण होणे स्वाभाविक आहे. 'गावगुंड', 'कागुद आणि सावली', 'मेड इन इंडिया', 'हाल्या हाल्या दुधू दे'.

(६) **जातीयता :** सत्यशोधक समाज, मुस्लिम सत्यशोधक समाज, शे.का.फे. आणि दलित चळवळ आणि भारताची फाळणी यांतून प्रेरणा घेऊन हा विषय हाताळला गेला. 'पाचर', 'इंधन', 'भाकरी आणि फूल', 'बळी'.

(७) **ग्रामसुधारणा :** गांधीवादाचा प्रभाव आणि त्यांचा 'खेड्याकडे चला' हा मंत्र तसेच लेखकांचा विधायक दृष्टिकोन यातून हा विषय हाताळलेला दिसतो. 'पाणकळा', 'सराई', 'आई आहे शेतात', 'कसे दिवस जातील'.

(८) **कुळकायद्यामुळे निर्माण झालेल्या समस्या :** कुळकायद्याचे अनुकूल आणि प्रतिकूल परिणाम रेखाटण्याची भावना विषय हाताळणीमागे दिसते. 'अन्नदाता उपाशी', 'आई आहे शेतात', 'देव चालले', 'गांधारी', 'इंधन'.

(९) **स्त्री जीवनातील सामाजिक समस्या :** स्त्री-पुरुष समानतेची जाणीव, उपेक्षित स्त्रीच्या भावनांचे चित्रण करण्याची ऊर्मी आणि स्त्रीवरील अन्यायाला वाचा फोडणे यातून हा विषय हाताळला गेला. 'चौंडकं', 'भावीण'.

(१०) **आधुनिकीकरणाच्या आक्रमणामुळे आलेले परिवर्तन आणि समस्या तसेच वर्तमान ग्रामीण जीवनातील बदलती वास्तवता :** साहित्याच्या चळवळी, शिक्षणप्रसार, जाणीव-जागृती, पंचवार्षिक योजना, सत्तेचे विकेंद्रीकरण, संयुक्त महाराष्ट्राची स्थापना, सहकार या सर्वांच्या परिणामातून या विषयांना लेखकांनी स्पर्श केला. १९६० चा काळ हा भ्रमनिरासाचा आहे. स्वातंत्र्य मिळून एक तप झाले तरी नागरी सुविधा उपलब्ध होऊ शकल्या नाहीत. ग्रामीण भागातील संवेदनक्षम तरुण लेखक जीवनासंबंधी नव्याने विचार करू लागले. हे स्वातंत्र्य खरेखुरे स्वातंत्र्य नव्हे. ज्या स्वातंत्र्याला मुक्ती नाही म्हणून विचार होऊ लागला आणि त्यातून लेखन झाले. जीवनासंबंधी नवे भान आले. व्यवस्थेसंबंधीचा निषेध यातून दिसतो. जीवनाचा अन्वयार्थ लावण्याची दृष्टी आली. नवे आत्मभान आल्याने हे विषय हाताळलेले दिसतात. 'धग', 'पाचोळा', 'गोतावळा', 'सारे प्रवासी घडीचे', 'गांधारी', 'भाकरी आणि फूल', 'गणगोत', 'मेड इन इंडिया', 'इजाळं', 'कुणाच्या खांद्यावर', 'हाल्या

हाल्या दुधू दे', 'कागूद आणि सावली', 'झेलझपाट', 'विषवृक्षाच्या मुळ्या'. उपरोल्लेखित विषय प्रादेशिक कादंबरीकारांनी हाताळले आहेत. यामध्ये मोठ्या प्रमाणावर दलित उपेक्षितांचे जीवनचित्रण करणारे विषय येतात. त्याचबरोबर ग्रामीण – प्रादेशिक जीवनातील वर्तमान समस्यांकडे चिंतनशील मनोवृत्तीने पाहण्याचा दृष्टिकोणही या विषयहाताळणीमधून प्रामुख्याने दिसतो.

**२) यामागची जीवनमूल्य व्यवस्था**

(१) सुशिक्षित तरुणांनी गांधीवादाचा स्वीकार करून खेड्यातील लोकांचे जीवनमान उन्नत करावे. ('कसे दिवस जातील', 'पाणकळा', 'आई आहे शेतात').

(२) ग्रामीण स्त्रीचे शोषण थांबावे म्हणून तिला सहकार्य करणे. (शिपाई).

(३) जुने नष्ट होत आहे, तरीही जुन्यातील चांगल्याचा स्वीकार करावा. ('देव चालले', 'बारी', 'पाणकळा', 'पडघवली', 'झेलझपाट', 'माझा गाव', 'टारफुला', 'पूर्णामायची लेकरं')

(४) शेतीचे बदलत्या काळात वाढते महत्त्व लक्षात घेणे. ('आई आहे शेतात', 'पाणकळा', 'सराई', 'कसे दिवस जातील')

(५) देशभक्ती आणि त्याग. ('गावगुंड')

(६) सामान्य माणसाबद्दल कणव. ('बनगरवाडी', 'आडगावचे चौधरी', 'उघड्या जगात', 'अन्नदाता उपाशी')

(७) भटके विमुक्त, उपेक्षित व पददलित समाजाबद्दल सहानुभूती आणि त्यांना माणूस म्हणून मानसन्मानाने जगण्याची संधी मिळाली पाहिजे, ही नवीन जाणीव. ('बळी', 'फकिरा', 'झेलझपाट', 'बारी', 'माकडीचा माळ', 'चौंडकं', 'भावीण')

(८) आदर्श शिक्षकाबद्दल ऋणनिर्देश करणे. ('हद्दपार')

(९) उद्योगाचे महत्त्व सांगणे. ('गारंबीचा बापू')

(१०) मानव आणि निसर्ग यांच्यातील अतूट नात्यांची जाणीव करून देणे. ('माचीवरला बुधा')

(११) आधुनिकीकरणाच्या आक्रमणाची जाणीव करून देणे. ('धग', 'पाचोळा', 'गोतावळा', 'गणगोत', 'देव चालले', 'सारे प्रवासी घडीचे')

(१२) शोषणमुक्त समाजव्यवस्था निर्माण व्हावी म्हणून प्रयत्न करणे. ('झेलझपाट', 'गांधारी', 'कागूद आणि सावली', 'मेड इन इंडिया', 'हाल्या हाल्या दुधू दे', 'विषवृक्षाच्या मुळ्या', 'इजाळं', 'कुणाच्या खांद्यावर')

(१३) जातीयतेचे प्रखर दर्शन घडवून सामाजिक समतेबद्दल प्रेम व्यक्त करणे. ('इंधन', 'भाकरी आणि फूल', 'पाचर', 'बळी')

### ३) वाङ्मयीन मूल्यांच्या आधारे साहित्यकृती म्हणून प्रादेशिक कादंबरीचे मूल्यमापन

प्रादेशिक कादंबरी हीदेखील 'कादंबरी' आहे. ती प्रादेशिकतेची पथ्ये सांभाळते म्हणून ती 'प्रादेशिक' म्हणून संबोधली जात असली तरी तिला कादंबरीच्या मूल्यव्यवस्थेचे वावडे नाही. व्यक्ती, घटना, प्रसंग आणि निसर्ग वातावरणादी घटक एकजीव झाल्याशिवाय खरी 'प्रादेशिकता' प्रकट होत नाही. त्याचप्रमाणे ती 'कादंबरी' म्हणूनही सामान्यच राहते. या घटकांमध्ये सुसंगती असेल तर जीवनानुभव चैतन्यमय होतो. भावना आणि विचार यांतून ती जीवनसत्याचा आविष्कार स्वाभाविकपणे घडविते. मानवी भावभावना चित्रणास साहित्यात विशेष महत्त्व आहे. ते पुढीलप्रमाणे जीवनानुभवातून दृग्गोचर होणे अत्यावश्यक आहे. १) व्यक्ती आणि समाज, २) व्यक्ती आणि परमेश्वर, ३) व्यक्ती आणि निसर्ग, ४) व्यक्ती आणि व्यक्तीचा आत्मा, यांचे दर्शन प्रादेशिक कादंबरीकारांनी घडविले आहे. त्याबरोबर प्रेम, दया, क्षमा, ईर्षा, सूड, मत्सर, द्वेषादी मानवी भावनांचे दर्शनही प्रादेशिक कादंबरीतून घडते. ते भावाभावांतील प्रेम, द्वेष विसंवादातून घडते. मालक आणि मजूर यांच्यातील संघर्ष, प्रेम आणि निष्ठेतूनही घडते. धनिकांची मुजोरी, बदलत्या काळाचे आव्हान समजून न घेण्याची परंपरावादी वृत्ती, बदलत्या सरकारकडून झालेला भ्रमनिरास, अपेक्षाभंग, उपेक्षितांच्या मानव म्हणून जगण्याच्या अपेक्षा आणि स्त्री ही भोग्य वस्तू नाही, तर ती एक स्वतंत्र व्यक्ती आहे याची अभिव्यक्ती प्रादेशिक कादंबरीकारांनी केली आहे. हे मानवी मूल्य या प्रादेशिक कादंबरीतून आल्यामुळे ती कादंबरी उत्कृष्ट साहित्य म्हणून स्वीकारायला मुळीच हरकत नाही. यावरून असे लक्षात येते की, रंगभूमी, कलाकार बदलले, परंतु नाटक मानवतेचेच आहे. भौगोलिक प्रदेश कोणतेही असले, तेथील परंपरा कोणत्याही असल्या, स्त्री-पुरुषांची नावे काहीही असली तरी त्यांचे वर्तन हे मानवी वर्तन असल्याचेही कादंबरी दाखविते, म्हणून ही उत्कृष्ट साहित्यकृती आहे. वाचकांचे मनोरंजन हे प्राधान्याने ही कादंबरी करते. तसेच यांपैकी अनेक कादंबऱ्यांची स्वैर रूपांतरे विविध भाषांमध्येच झालेली आहेत. त्यावरून त्यांची योग्यता सिद्ध होते. अनेकांनी फडके तंत्राचा वापर करून उपऱ्या प्रादेशिक कादंबऱ्या लिहिल्या. त्यामध्ये प्रादेशिकता ही केवळ रंग भरण्यासाठी आलेली आहे.

सुरुवातीच्या कादंबऱ्यामधील निवेदन हे प्रमाण भाषेत आहे आणि संवाद स्थानिक बोलीत आहेत. नंतर हे स्वरूप लेखकाच्या प्रकृतीनुसार बदलले. याचा अर्थ असा की, प्रादेशिकता हा त्यांनी अलंकार म्हणून मान्य केला आहे. ती त्यांच्या लेखनाची प्रवृत्ती किंवा प्रकृती नाही; तरी परंतु प्रदेशाचे चित्रण महत्त्वाचे जाणवते, कारण ते त्या कादंबरीमध्ये संबंधित प्रदेशातील सण, उत्सव, रूढीपरंपरा, निसर्ग-भू-भागादी हे जिवंत केलेले आहेत. र. वा. दिघे, श्री. ना. पेंडसे आणि गो. नी. दांडेकरांच्या कादंबऱ्यातील निसर्गवर्णने पसरट आणि अनावश्यक वाटतात. तसेच ना. वि. कुलकर्णी, ग. ल. ठोकळ, म. भा. भोसले यांच्या कादंबऱ्यांमधील घटना-प्रसंग योगायोगावर आधारलेले आहेत हा त्यांचा दोषच आहे. भडक, शृंगारिक, इरसाल, रांगडे ग्रामजीवन ग. ल. ठोकळ यांनी अद्‌भुतरम्यपणे रेखाटले. 'खेड्याकडे चला' या गांधीजींच्या मंत्रामुळे केलेले चित्रण ग्रामीण वास्तव सुधारणा-वादामुळे कृत्रिम, वरवरचे, बटबटीत झाले आहेत. मांडणीतील भडकपणा 'पाणकळा'मध्ये दिसतो. वाचकांवर लक्ष केंद्रित केल्यामुळे ही निर्मिती कृत्रिम झाली आहे. पाल्हाळिकता, कृत्रिमता आणि नकलीपणा प्रारंभीच्या प्रादेशिक कादंबरीतून स्पष्ट जाणवतो, तर अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबऱ्यांमध्ये घटनाचित्रणास विशेष महत्त्व दिलेले दिसते. त्यामुळे प्रादेशिकता शबलित झाली आहे. तसेच 'पाचोळा' आणि 'टारफुला' या दोन कादंबऱ्यांमध्ये कच्चे दुवे दिसतात. जसे, 'पाचोळा'तील गरड आणि रघुनाथ शिंपी संघर्ष पाहता सरंजामदार असलेल्या 'गरडा'ने दंड घातलेले धोतर वापरणे न पटण्यासारखे आहे; तर 'टारफुला'मध्ये बदली पाटलाची कल्पना मांडली आहे. पाटील आणि पाटीलकीला विशेष महत्त्व दिले जात असलेल्या काळात परका बदली पाटील गावकऱ्यांनी स्वीकारणे न पटणारे आहे. तसेच बांधेसूद कथानकाचा अभाव येथे दिसतो. 'मेड इन इंडिया' कादंबरीतील धावत्या समालोचनाप्रमाणे घटना-प्रसंगाच्या निवेदनामुळे कथांतर्गत सुसंगती शोधणे अशक्य होते. निवेदनातील तिरसटपणा जाणवतो.

### ४) मराठी कादंबरीतील प्रादेशिकतेचे स्थान

प्रादेशिक जीवनचित्रणामुळे मराठी कादंबरी समृद्ध झाली. विषयांत विविधता आली. अभिव्यक्तीची नवी वळणे तिच्यात आहेत. जसे निवेदन प्रमाणभाषेत आणि संवाद बोलीत किंवा मित्र भाषेत लेखन, तसेच पात्रमुखी निवेदन आणि स्वागत अशी ही नवी वळणे आहेत. विविध वर्गांतील आणि स्तरातील समस्यांची अभिव्यक्ती झाली. तिने मानवी वर्तन तीव्रतेने आणि रंगीत पद्धतीने दाखविल्याने एकूण मराठी कादंबरी

समृद्ध झाली. काळ (Time), देश (स्थळ- Place), सामाजिक परिस्थिती (Milien) यांच्या चित्रणसामर्थ्यामुळे ती साहित्यकृती म्हणूनही उत्कृष्ट ठरते. आजची प्रादेशिक कादंबरी हीच खरी कादंबरी आहे असे विधान करणे धाडसाचे होईल. परंतु वास्तववादी जीवनशोधाची प्रेरणा आणि विषय - आशय तसेच अभिव्यक्ती यांच्या नवेपणामुळे ती चैतन्यमय झाली. विविधतेमुळे वैशिष्ट्यपूर्ण झाली आहे.

प्रादेशिक कादंबरी मनाला भिडते. अस्वस्थ करते. ती मानवी भावभावनांचे, दर्शन घडविते. वास्तववाद, आत्माविष्कार आणि जीवनशोधाची प्रेरणा असलेल्या या कादंबरीची रहस्यमयता, नाट्यात्मकता, गूढता, सूचकता, जिवंत घटना-प्रसंग आणि व्यक्तिचित्रण ही वैशिष्ट्ये आहेत. प्रदेश विशिष्ट जीवनातील सुखदुःख, समस्या, संस्कृती, निसर्गावलंबी जीवनाचे दर्शन तिच्यातून घडते. एक प्रकारे हा जीवनशोधच आहे. वेगळ्या समस्या, निसर्गवर्णने, जीवनानुभवाचा अपरिहार्य भाग म्हणून बोलीचा केलेला वापर, नावीन्य यामुळे प्रदेशाने नियत केलेल्या लोकजीवनाचे, त्यांच्या भावभावनांचे दर्शन घडते. प्रामुख्याने सामान्य माणसाला - समाजाला केंद्रस्थानी ठेवून त्याच्या सुखदुःखाचे, भावभावनांचे, ताणतणावांचे चित्रण प्रादेशिक कादंबरीत येते. तळच्या उपेक्षित, अस्पर्शितांच्या समस्या काही कादंबऱ्यांमधून चित्रित होतात. या सर्वच समस्यांमध्ये विविधता आहे. त्यातून जीवनसत्याचे दर्शन घडते. जीवनसत्याच्या दर्शनामागे जीवनमूल्य व्यवस्था कार्यरत असते. सत्याच्या आविष्कारामुळेच तिला कलात्मकताही लाभते. या दृष्टीने विचार करता १९७० नंतरच्या कादंबऱ्यांमधून पूर्वसुरींच्या कादंबरीपेक्षा अधिक समाजाभिमुखता, अधिक वास्तवाभिमुखता दिसून येते. तसेच या कादंबरीमध्ये कोणी एक नायक असला तरीही खरे नायकत्व त्यातील चिंतनशील सामाजिक मनाला असते. या कादंबरीत खलनायकाच्या स्वरूपात एखादी व्यक्ती नसते तर काही एक परिस्थिती, प्रवृत्ती किंवा नियती असते आणि त्यासाठी लेखकाने कादंबरीत संघर्ष उभा केलेला असतो. प्रादेशिक जीवनाची ओळख पटविणारी ही कादंबरी वैशिष्ट्यपूर्ण आहे. कारण काळ आणि जीवनाचा विशालपट तिच्यातून येतो. मराठी कादंबरीचे दालन समृद्ध करणारी तरीही स्वतःचे वेगळेपण सांभाळणारी ही कादंबरी वैशिष्ट्यपूर्ण आहे. मराठी कादंबरीत तिचे स्थान अनन्यसाधारण आणि समीक्षकाचे लक्ष वेधून घेणारे आहे.

* * *

# परिशिष्ट – १

१) अभ्यासासाठी निवडलेल्या प्रादेशिक कादंबऱ्यांची कालक्रमानुसार सूची

| अ. क्र. | कादंबरीचे नाव | कादंबरीकाराचे नाव | प्रकाशक | प्रकाशनवर्ष/ आवृत्ती |
|---|---|---|---|---|
| १. | कसे दिवस जातील | ना. वि. कुलकर्णी | विठ्ठल रामचंद्र खाडिलकर, पुणे | १९२५ |
| २. | शिपाई | ना. वि. कुलकर्णी | – " – | १९२५ |
| ३. | पाणकळा | र. वा. दिघे | श्री लेखन / वाचन भांडार, पुणे | १९३९ (पाचवी आ. ल१९७५) |
| ४. | पाणकळा | – " – | – " – | १९४३, (सहावी आ. १९८०) |
| ५. | गावगुंड | ग. ल. ठोकळ | ठोकळ प्रकाशन, पुणे | १९४६, (चौथी आ. १९५९) |
| ६. | उघड्या जगात | म. भा. भोसले | ग्रामीण प्रकाशन, धनगाव, भिलवडी, जि.सातारा | १९४७, (द्वि.आ.१९६०) |
| ७. | अन्नदाता उपाशी | वि. वा. हडप | आदर्श वाङ्मय प्रकाशन, पुणे | १९४७ |
| ८. | मांडवी ! तू आटलीस ? | लक्ष्मणराव सरदेसाई | देशमुख आणि कंपनी, पुणे | १९४७ |
| ९. | बळी | विभावरी शिरूरकर | – " – | १९५० (सहावी आ. १९८०) |
| १०. | भावीण | बा. भ. बोरकर | बांदोडकर पब्लिशिंग हाऊस, गोवा | १९५० |
| ११. | हद्दपार | श्री. ना. पेंडसे | मौज प्रकाशन गृह. मुंबई | १९५० (तृतीय आ. १९७१) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२. | गारंबीचा बापू | - " - | कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे | १९५२, (पुनर्मुद्रण १९८९) |
| १३. | आडगावचे चौधरी | बी. रघुनाथ | कुलकर्णी ग्रंथागार, पुणे | १९५४ |
| १४. | पडघवली | गो. नी. दांडेकर | मौज प्रकाशन, मुंबई | १९५५, (चौथी आ. १९८१) |
| १५. | पवनाकाठचा धोंडी | - " - | कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे | १९५५, (सातवी आ. १९८१) |
| १६. | बनगरवाडी | व्यंकटेश माडगूळकर | मौज प्रकाशन, मुंबई | १९५५, (सातवी आ. १९७४ |
| १७. | आई आहे शेतात | र. वा. दिघे | श्री लेखन वाचन भांडार, पुणे | १९५६, (तृतीय आ. १९८०) |
| १८. | माचीवरला बुधा | गो. नी. दांडेकर | मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई | १९५८, (सहावी आ. १९९०) |
| १९. | पूर्णामायची लेकरं | - " - | महाराष्ट्र प्रकाशन, अमरावती | १९५८, (द्वितीय आ. १९५८) |
| २०. | फकिरा | अण्णाभाऊ साठे | नवमहाराष्ट्र प्रकाशन | १९५९ |
| २१. | बारी | रणजित देसाई | मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे | १९५९, (तृतीय आ. १९८८) |
| २२. | धग | उद्धव शेळके | पॉप्युलर प्रकाशन, मुंबई | १९६०, (तृतीय आ. १९८३) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २३. | माझा गाव | रणजित देसाई | अजब पुस्तकालय, कोल्हापूर | १९६०, (द्वितीय आ. १९८४) |
| २४. | देव चालले | दि. बा. मोकाशी | मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई | १९६१, (द्वितीय आ. १९८१) |
| २५. | माकडीचा माळ | अण्णाभाऊ साठे | मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई | १९६३, (चौथी आ. १९८४) |
| २६. | टारफुला | शंकर पाटील | सुवर्ण प्रकाशन, पुणे | १९६४, (द्वितीय आ. १९८४) |
| २७. | सारे प्रवासी घडीचे | जयवंत दळवी | मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई | १९६४, (तृतीय आ. १९७४) |
| २८. | इंधन | हमीद दलवाई | मौज प्रकाशन गृह, मुंबई | १९६५, (द्वितीय आ. १९८१) |
| २९. | वारणेचा वाघ | अण्णाभाऊ साठे | मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई | १९६८, (चौथी आ. १९८७) |
| ३०. | पाचोळा | रा. रं. बोराडे | मौज प्रकाशन, मुंबई | १९७१, (चौथी आ. १९८६) |
| ३१. | गोतावळा | आनंद यादव | मौज प्रकाशन, मुंबई | १९७१, (द्वितीय आ. १९७४) |
| ३२. | गांधारी | ना. धों. महानोर | पॉप्युलर प्रकाशन, मुंबई | १९७३, (द्वि.आ. १९८२) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३३. | भाकरी आणि फूल | मधु मंगेश कर्णिक | मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई | १९८२, (द्वि. आ. १९९०) |
| ३४. | गणगोत | गणेश आवटे | साकेत प्रकाशन, औरंगाबाद | १९८४. |
| ३५. | कुणाच्या खांद्यावर | बा. ग. बोरकर | मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे | १९८४. |
| ३६. | इजाळं | उत्तम बंडू तुपे | सॅक पब्लिकेशन, पुणे | १९८४. |
| ३७. | हाल्या हाल्या दुधू दे | बाबाराव मुसळे | मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे | १९८५. |
| ३८. | चौंडकं | राजन गवस | - " - | १९८५. |
| ३९. | कागूद आणि सावली | आनंद पाटील | मौज प्रकाशन, मुंबई | १९८६. |
| ४०. | मेड इन इंडिया | पुरुषोत्तम बोरकर | श्रीविद्या प्रकाशन, पुणे | १९८७. |
| ४१. | झेलझपाट | मधुकर वाकोडे | देशमुख आणि कंपनी, पुणे | १९८८. |
| ४२. | विषवृक्षाच्या मुळ्या | बासुदेव मुलाटे | मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे | १९८९. |
| ४३. | पाचर | रामचंद्र पाठारे | - " - | १९८९. |

* * *

# परिशिष्ट - २

## संदर्भग्रंथ आणि नियतकालिक लेखसूची

अ.क्र. ग्रंथनाम ग्रंथकार/संपादक प्रकाशक आवृत्ती

(अ) मराठी ग्रंथ-सूची


१. अनुभव आणि आकार – प्रल्हाद वडेर – मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे – १९७९

२. अक्षरवाटा – म. सु. पाटील – अनमोल प्रकाशन, पुणे – १९८२

३. आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग २ – डॉ. अ. ना. देशपांडे – व्हीनस प्रकाशन, पुणे पुनर्मुद्रण, – १९७९

४. आनंद यादव : व्यक्ती आणि वाङ्मय – डॉ. रवींद्र ठाकूर – मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे - १९७३

५. आनंद यादव यांची गोतावळा : साद आणि प्रतिसाद – संपा.कीर्ती यादव – प्रतिमा प्रकाशन, पुणे – १९९१

६. आवडनिवड – डॉ. स. ग. मालशे – सुपर्ण प्रकाशन, पुणे – द्वि.आ. १९७७

७. आस्वाद – प्रभाकर पाध्ये – मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई – १९७७

८. कादंबरी समीक्षा – श्री. मा. कुलकर्णी – उन्मेष प्रकाशन, नागपूर – १९७२

९. कादंबरी आणि मराठी कादंबरी : समीक्षा लेख – उषा हस्तक – साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद – १९९३

१०. कादंबरीकार गो. नी. दांडेकर– संपा.वीणा देव – मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई – १९८४

११. खडक आणि पाणी – गंगाधर गाडगीळ – पॉप्युलर प्रकाशन, मुंबई – द्वि.आ. १९६६

१२. गावगाडा – रचनाकार-त्रिंबक ना. आत्रे – 'वरदा' सेनापती बापट मार्ग, पुणे १६ तृ.आ. १९८९

१३. गोनीदांच्या प्रादेशिक कादंबऱ्या – डॉ. दादा गोरे – पैठणी प्रकाशन, औरंगाबाद – १९९१

१४. ग्रंथविशेष – शंकर सारडा – मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे – १९९१

१५. ग्रामीण साहित्य : एक चिंतन – द. ता. भोसले - " - १९८८

१६. ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध – डॉ. नागनाथ कोत्तापल्ले - " - १९८५

१७. ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या – आनंद यादव - " - द्वि.आ. १९८४

१८. ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव – आनंद यादव - " - १९८१

१९. चंदन – अण्णाभाऊ साठे – चंद्रकांत शेटे प्रकाशन – चौ.आ. १९७६ (प्रस्तावना)
२०. तिसऱ्यांदा रणांगण – डॉ. द. भि. कुलकर्णी – विजय प्रकाशन, नागपूर – १९७६
२१. दलित साहित्य : प्रेरणा आणि स्वरूप – डॉ.वसंत डोळस –दिलीपराज प्रकाशन,प्रा.लि., पुणे १९९२
२२. दलित साहित्य : वेदना व विद्रोह – भालचंद्र फडके – श्रीविद्या प्रकाशन, पुणे द्वि.आ. १९८९
२३. धार आणि काठ – नरहर कुरुंदकर – देशमुख आणि कं., पुणे – १९७१
२४. नवकथाकार शंकर पाटील – डॉ.नागनाथ कोत्तापल्ले – इंद्रायणी साहित्य, पुणे – १९८६ पाटील यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास.
२५. पाचोळा आणि दहा समीक्षक – सं.नागनाथ कोत्तापल्ले – साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद १९८९
२६. प्रदक्षिणा (खंड एक) – भालचंद्र फडके – सार्वजनिक वाचनालय, नाशिक
२७. प्रदक्षिणा (खंड दुसरा) – अविनाश सप्रे – कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे
२८. मराठी कादंबरी (तंत्र आणि विकास) – प्र. वा. बापट / ना. वा. गोडबोले – व्हीनस प्रकाशन, पुणे – तृ.आ. १९७३
२९. मराठी कादंबरी : पहिले शतक, १८५०-१९५० कुसुमावती देशपांडे - मुंबई मराठी साहित्य संघ प्रकाशन, - द्वि आ. १९७५
३०. मराठी कादंबरी : चिंतन आणि समीक्षा – डॉ.चंद्रकांत बांदिवडेकर – मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे– १९८३
३१. मराठी कादंबरीचा इतिहास (१९२० ते १९४७) - " - - " - १९८९
३२. मराठी ग्रामीण कादंबरी – डॉ. रवींद्र ठाकूर – मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे –
१९९३
३३. मराठी प्रादेशिक कादंबरी : तंत्र आणि स्वरूप – डॉ.मदन कुलकर्णी – मंगेश प्रकाशन, नागपूर – १९८४
३४. मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड पाचवा, भाग दोन – संपा. रा. श्री. जोग – महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे – १९७३
३५. मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड सहावा भाग एक – संपा. गो. म. कुलकर्णी / व. दि. कुलकर्णी - महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे –१९८८
३६. मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरूप ––संपा. गो. मा. पवार / म. द. हातकणंगलेकर – पॉप्युलर प्रकाशन, मुंबई – १९८६
३७. मराठी साहित्य : समाज आणि संस्कृती – आनंद यादव - मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे – १९८५

३८. मराठी साहित्याचे अंतःप्रवाह : कादंबरी – ल. ग. जोग – चिरंजीव ग्रंथ प्रकाशन, पुणे – १९६३
३९. लेखक आणि माणूस एक मित्र – श्री. ना. पेंडसे – मौज प्रकाशनगृह, मुंबई – १९७४
४०. साहित्याचे मानदंड – गंगाधर गाडगीळ – पॉप्युलर प्रकाशन, मुंबई – १९६२
४१. साहित्याची निर्मितिप्रक्रिया - आनंद यादव – मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे – १९८९
४२. साहित्यिक गप्पा : दहा साहित्यिकांशी – जयवंत दळवी – सन पब्लिकेशन्स, पुणे – १९८५
४३. स्मरणिका - मराठी कादंबरीची वाटचाल – कुलकर्णी – ग्रंथागार, पुणे – १५ जानेवारी - १९७२

१) - " - १९४५ ते १९६० (परिसंवाद) डॉ. भालचंद्र फडके

२) - " - १९६० ते १९७० (परिसंवाद) व. दि. कुलकर्णी

**(ब) हिंदी ग्रंथ**

१. स्वातंत्र्योत्तर हिंदी उपन्यास और ग्रामचेतना – डॉ. ज्ञानचंद्र गुप्ता – अभिनव प्रकाशन, दिल्ली - १९७४
२. हिंदी उपन्यास – संपा. सुषमा प्रियदर्शिनी – राधाकृष्ण प्रकाशन, दिल्ली - १९७२
३. हिंदी उपन्यास : सिद्धांत और समीक्षा – डॉ. मखनलाल शर्मा – प्रभात प्रकाशन, दिल्ली – १९७०
४. हिंदी उपन्यास का प्रारम्भिक विकास – शैलबाला – सत्यसदन, बाराबाकी – १९७३
५. हिंदी साहित्य की प्रवृत्तिया – खंडेलवाल जयकिसन – विनोद पुस्तक मंदिर, आग्रा, बारवाँ संस्करण - १९८५
६. हिंदी साहित्य युग और प्रवृत्तिया – शिवकुमार शर्मा – अशोक प्रकाशन, दिल्ली-दशम संस्करण, १९८९

**(क) पीएच्.डी. आणि एम्.फिल्. प्रबंध सूची (कालक्रमानुसार)**

**क्रम : अ.नं. - प्रबंधाचा विषय - मार्गदर्शक - अभ्यासक - विद्यापीठ - सादर/मान्यता वर्ष**

**पीएच्.डी.**

१. आधुनिक मराठी ललित वाङ्मयातील प्रादेशिकता, उद्गम आणि विकास - प्रा. भगवंत देशमुख - अ. रा. तोरो. - शिवाजी विद्यापीठ - मे १९७३.
२. र. वा. दिघे यांच्या कादंबरी वाङ्मयाचा चिकित्सक अभ्यास - डॉ. आनंद यादव - रवींद्र ठाकूर - पुणे विद्यापीठ - डिसेंबर १९८८.
३. रणजित देसाई यांच्या साहित्याचा अभ्यास - डॉ. कन्हैय्या कुंदप - भास्कर खांडगे

- पुणे विद्यापीठ - जानेवारी १९९४.

**एम्.फिल्.**

१. " श्री. म. भा. भोसले यांच्या ग्रामीण कथा व कादंबऱ्या " - डॉ. मु. श्री. कानडे - रामदास रसाळ - पुणे विद्यापीठ - १९८४.

२. " ग. ल. ठोकळ यांच्या ग्रामीण साहित्याचा अभ्यास " - डॉ. आनंद यादव - श्रीकृष्ण अडसूळ - पुणे विद्यापीठ - १९८५.

३. " ग्रामीण कादंबरीतील खेडे " (पिराजी पाटील, उघड्या जगात, हद्दपार, बनगरवाडी, पडघवली, माझा गाव)- डॉ. श. रा. राणे - बळीराम पाटील - पुणे विद्यापीठ - १९८६.

४. " समस्यात्मक वास्तवाचे चित्रण करणाऱ्या काही ग्रामीण कादंबऱ्या " (बळी, आई आहे शेतात, बारी, गोतावळा) - डॉ. आनंद यादव - विद्या पाटील - पुणे विद्यापीठ - १९८६.

५. " काही प्रादेशिक कादंबऱ्यांचा तुलनात्मक अभ्यास " (पडघवली, गारंबीचा बापू, चानी, सारे प्रवासी घडीचे) - डॉ. चंद्रशेखर बर्वे - कु. शामला भुंजे - पुणे विद्यापीठ - १९८८.

६. " हमीद दलवाई यांच्या 'इंधन' कादंबरीचा अभ्यास " - डॉ. र. बा. मंचरकर - चंद्रकांत जोशी - पुणे विद्यापीठ - १९९०.

७. " विभावरी शिरूरकर यांच्या कादंबऱ्यातील पुरुषपात्रांचे चित्रण " - डॉ. प्र. अ. राजगुरु - प्रा. यादव वाघ - पुणे विद्यापीठ - १९९१.

८. " रथचक्र आणि धग तुलनात्मक अभ्यास " - डॉ. सु. रा. चुनेकर - सौ. स्मिता नाटेकर - पुणे विद्यापीठ - १९९२.

९. " 'गोतावळा' 'पाचोळा' आणि 'हाल्या हाल्या दुधू दे' या कलाकृतीतील ग्रामीण वास्तव : एक अभ्यास " - डॉ. हरिश्चंद्र निर्मळे - विठ्ठल लामखडे - पुणे विद्यापीठ - १९९२.

## (ड) १) नियतकालिक - लेख सूची

**अनुष्टुभ -**

१. ग्रामीण कादंबरी : एकोणिसशे साठ ते ऐंशी आणि नंतर, (लेखांक पहिला), डॉ. र. बा. मंचरकर, जाने. / फेब्रु. १९९४.

**अक्षरवैदर्भी** -

२. पुस्तक परीक्षण - 'हाल्या हाल्या दुधू दे', जयंतकुमार बंड, जानेवारी १९८६.

३. परीक्षण - 'मेड इन इंडिया' काही प्रश्न, जयंतकुमार बंड, एप्रिल-मे १९८९.

४. 'धग' आकलन आस्वाद, प्रा. कुळी स. त्र्यं., ऑगस्ट १९९०.

**अस्मितादर्श** -

५. 'हाल्या हाल्या दुधू दे' - दे. शि. दुधलकर, एप्रिल-मे-जून, १९८६.

आदर्श - (हिंगोली - परभणी - वार्षिक)

६. 'तिसऱ्या पिढीतील ग्रामीण वास्तवाचा वेध' - हाल्या हाल्या दुधू दे, कालपे भ. पू., १९९०-९१

**आलोचना** -

७. 'सारे प्रवासी घडीचे', दळवी जयवंत, ओझरती ओळख, वर्ष ३ रे, अंक ४, डिसेंबर १९६४.

८. 'इंधन' हमीद दलवाई, मार्च १९६६

९. 'स्वातंत्र्योत्तर ग्रामीण साहित्यातील सामाजिक व कलात्मक जाणीवा' डॉ. र. बा. मंचरकर, जुलै १९८२.

१०. 'कागूद आणि सावली' आनंद पाटील, जून १९८८.

**अंकुर (अनियतकालिक)** -

११. 'शेतकरी जीवनाचे यथार्थ चित्रण करणारी कादंबरी - हाल्या हाल्या दुधू दे', सोपान हाळमकर, बीड, १९८५

**किर्लोस्कर** -

१२. 'आज हे शहीद : कलके पैगंबर - दलवाई, यदुनाथ थत्ते, जाने. १९७६.

**नवभारत** -

१३. 'बनगरवाडी'चे समीक्षण, 'कथावाङ्मयातील एक उच्चांक', त्र्यं. शं. शेजवळकर, डिसेंबर १९५५.

**नवयुग** -

१४. 'धग आणि पाथेर पांचाली', पुष्पा त्रिलोकेकर, ६ ऑगस्ट १९६१.

**प्रतिष्ठान** -

१५. 'मराठी कादंबरीतील निसर्ग' उषा हस्तक, ऑक्टोबर १९६१.

१६. आजचे कादंबरीकार : रणजित देसाई', डॉ. एस्. एस्. भोसले, डिसेंबर १९६२ - जानेवारी १९६३.

१७. 'आजचे कादंबरीकार : दि. बा. मोकाशी', डॉ. एस्. एस्. भोसले, एप्रिल - मे, १९६३.
१८. 'कादंबरीकार पेंडसे, प्रा. स. रा. गाडगीळ, फेब्रुवारी ते एप्रिल १९६४.
१९. 'इंधन' - हमीद दलवाई', उषा हस्तक, जुलै १९६६.
२०. 'धग आणि पाचोळा', प्रभा गणोरकर, फेब्रुवारी १९७३.
२१. गांधारी : ना. धों. महानोर, - अरुण प्रभुणे - सप्टेंबर ते ऑक्टोबर १९७६.
२२. 'शाङ्कर भाष्य', डॉ. यू. म. पठाण, सप्टेंबर ते डिसेंबर १९७८.
२३. 'फकिरा' (अण्णाभाऊ साठे), डॉ. मधुकर वाकोडे, 'धग' (उद्धव शेळके), - म. सु. पाटील, 'बनगरवाडी' (व्यंकटेश माडगूळकर) मा.ना. कागणे, 'गारंबीचा बापू' (श्री. ना. पेंडसे) डॉ. गो. मा. पवार - कादंबरी समीक्षा विशेषांक, संपादक. नागनाथ कोत्तापल्ले, जानेवारी १९८१.
२४. हमीद दलवाईंची 'इंधन' - एक विश्लेषण, कृष्णचंद्र ज्ञाते, जुलै - ऑगस्ट १९८३.

महाराष्ट्र साहित्य पत्रिका -

२५. परीक्षणे 'गावगुंड' (ग. ल. ठोकळ), ग. रा. प्रधान, एप्रिल, मे, जून १९४७.
२६. परीक्षणे 'अन्नदाता उपाशी' (वि. वा. हडप), म. ना. अदवंत, ऑक्टोबर ते डिसेंबर १९४८.
२७. 'भावीण' (बा. भ. बोरकर) आचार्य काकासाहेब कालेलकर - एप्रिल मे जून १९५०.
२८. साहित्य समीक्षा : बनगरवाडी, अरविंद मंगरूळकर, मार्च १९५६.
२९. साहित्य समीक्षा : 'आई आहे शेतात', ग. प्र. प्रधान, जुलै-सप्टेंबर १९५६.
३०. '१९५९ मधील कादंबरी', श्री. मा. कुलकर्णी, जाने. ते मार्च १९६०.
३१. साहित्य समीक्षा : 'धग' - शंकर पाटील, एप्रिल, मे, जून १९६१.
३२. 'टारफुला' (शंकर पाटील), ल. ग. जोग, जुलै-सप्टेंबर १९७४.
३३. 'ग्रंथ परीक्षण : धग कादंबरी' डॉ. सुधाकर भोसले, जुलै ते सप्टेंबर १९७४.
३४. मराठी कांदबरी आणि उपेक्षितांचे जीवनचित्रण, ल. रा. नसिराबादकर, जानेवारी ते जून १९७८.
३५. 'एकोणिसशे साठ नंतरची ग्रामीण कादंबरी', डॉ. र. बा. मंचरकर आणि 'आठवणीच्या ओघातील एक कहाणी', र. वा. दिघे, जुलै ते डिसेंबर १९८०

३६. 'मेड इन इंडिया' (पुरुषोत्तम बोरकर), आशा मुंडले, जानेवारी ते मार्च १९८९.

३७. 'वैदर्भीय कादंबरीची तीन दशके'. डॉ. रवींद्र शोभणे, जुलै ते सप्टेंबर १९९०.

३८. 'धग' प्रादेशिक आणि प्रतिनिधिक कादंबरी', डॉ. रवींद्र शोभणे, मे. १९९१.

३९. 'टारफुला' (शंकर पाटील), प्र. ना. परांजपे, ऑगस्ट १९६६.

माणूस -

४०. 'कुणाच्या खांद्यावर' (बा. ग. केसकर), मेधा सिधये, १६ फेब्रुवारी १९८५.

युगवाणी -

४१. 'पाचोळा' (रा. रं. बोराडे), सुधाकर जयवंत, मे, जून १९७१.

४२. 'गांधारी' (ना. धों. महानोर), शकुंतला जोग, ऑगस्ट - सप्टेंबर १९७३.

४३. 'हाल्या हाल्या दुधू दे' (बाबाराव मुसळे), इंदुमती ल्हाणे, जानेवारी ते मार्च १९८६.

४४. 'मेड इन इंडिया' (पुरुषोत्तम बोरकर), वसंत वाहोकार, जानेवारी ते मार्च१९८९.

रजधुळ -

४५. 'हाल्या हाल्या दुधू दे - एक मैलाचा दगड', डॉ. मधुकर वाकोडे, ऑगस्ट १९८६.

रहस्यरंजन -

४६. 'विदर्भाचे माडगूळकर - उद्धव शेळके', डॉ. एस्. एस्. भोसले, जून १९६२.

राष्ट्रतेज -

४७. 'इंधन' - दलवाई, सुरेश घाटे, मे १९८०.

ललित -

४८. 'अण्णाभाऊ साठे', रामभट, ऑगस्ट १९६९.

४९. 'माची व बुधा' - गो. नी. दांडेकर, दिवाळी १९७३.

५०. '१९७३ मधील कादंबरी', डॉ. भालचंद्र फडके, मे. १९७४.

५१. 'सारे प्रवासी घडीचे', (जयवंत दळवी), डॉ. सु. रा. चुनेकर, मार्च १९७५.

५२. हमीद दलवाई, ज्ञानेश्वर नाडकर्णी, ऑगस्ट १९७५.

५३. '१९७४ सालातील कादंबरी', डॉ. भालचंद्र फडके, ऑक्टोबर १९७५.

५४. 'गोनीदांशी मनमोकळ्या गप्पा', स. शि. भावे, जुलै १९७६.

५५. 'ग्रामीण मातीत रुजलेली नाळ', उत्तम बंडू तुपे, मार्च १९८६.

५६. 'रोमँटिक कलंदर कथाकार : लक्ष्मणराव सरदेसाई', सुभाष भेंडे, मार्च १९८६.

५७. 'ललित शिफारस' 'कागूद आणि सावली' - नीलिमा भावे, मे, जून १९८७.

५८. '१९८६ मधील कादंबरी', वसंत आबाजी डहाके, मे जून १९८७.

५९. 'कादंबरी १९६० ते १९८५', वि. शं. चौघुले, एप्रिल १९८८.

६०. '१९८७ मधील कादंबरी', दीपक घारे, एप्रिल १९८८.

६१. 'वस्तीवरचा दादा होता होता कादंबरीकार झाला' (उत्तम बंडू तुपे), बळेल अनिल, एप्रिल १९८८.

६२. श्री. ना. पेंडसे : माणसाचा शोध (मुलाखत), नारायण बांदेकर, एप्रिल १९८८.

**लोकप्रभा**

६३. 'ग्रामीण जीवनाचं हृद्य चित्रण - हाल्या हाल्या दुधू दे' (बाबाराव मुसळे), मनोरमा बापट, १० मे १९८६.

**वसंत**

६४. 'दोन समकालीन आदिवासी कादंबऱ्या : एक दृष्टिक्षेप', डॉ. श्रीकांत तिडके, फेब्रुवारी १९९३.

**विशाखा**

६५. शब्दांचीच रत्ने - हाल्या हाल्या दुधू दे, डॉ. एस्. एम्. कानडजे, जानेवारी १९८७.

**वैखरी**

६६. 'गोतावळा : काही विचार' एस्. एस्. भोसले, जानेवारी ते मार्च १९७३.

**सत्यकथा**

६७. 'कहाणीची कहाणी', र. वा. दिघे (सराई) बा. भ. बोरकर (भावीण), व्यंकटेश माडगूळकर (बनगरवाडी) ऑगस्ट १९५९.

६८. 'माझ्या कादंबऱ्या आणि मी', श्री. ना. पेंडसे, एप्रिल १९६०.

६९. तीन कादंबऱ्या : 'बारी', 'माझा गाव' आणि 'धग', विद्याधर पुंडलीक, सप्टेंबर १९६२.

७०. परीक्षणे, 'दोन कादंबऱ्या : गांधारी आणि पळस', वसंत आबाजी डहाके, मे १९७४.

**सह्याद्री**

७१. 'पाणकळा' व 'सराई', न. चिं. केळकर, मे १९४४.

**साधना**

७२. हिरवी मने : दलवाई, स्नेहवर्धन, १६ मे १९७०.

७३. 'मराठवाड्याच्या दृष्टीतून संयुक्त महाराष्ट्र : स्वप्न आणि वास्तव', रायभान जाधव, १ मे १९८५.

**साहित्य सहकार**

७४. 'टारफुला : प्रामर्श' लीला गोविलकर, नोव्हेंबर १९६४.

**साहित्यसूची**

७५. 'मी हा असा - स्वतःच्या लेखनात रंगलेला साहित्यिक' डॉ. आनंद यादव (मुलाखत),
रा. अ. कुंभोजकर, दिवाळी १९८२.

७६. 'धग'मधील व्यक्तिरेखा', कमल आहेर (कुंवर), एप्रिल १९८९.

७७. 'म. भा. भोसले : व्रतस्थ ग्रामीण साहित्यिक' व. बा. बोधे, जून १९९२.

७८. 'पाणकळा' एक चिकित्सक अभ्यास', व. बा. बोधे, मे १९९३.

**सोबत**

७९. 'उद्धव शेळके यांच्याशी बातचीत', भास्कर नंदनवार, ११ एप्रिल १९७६.

**(ड) २) वर्तमानपत्र / हस्तलिखित लेखसूची**

१. नवी प्रकाशने, 'मुसळे यांची कादंबरी, हाल्या हाल्या दुधू दे', श्री. भ. पाटील, दै. तरुणभारत,नागपूर, २२/१२/१९८५.

२. नवी प्रकाशने, 'गणगोत : एक दृष्टिक्षेप' - डॉ. एस्. एम्. कानडजे, दै. तरुणभारत, नागपूर, ६/७/१९८६.

३. 'ग्रामीण जीवनाचे वास्तवदर्शन घडविणारी कादंबरी : हाल्या हाल्या दुधू दे', प्रशांत मानक, दै. शिवशक्ती, १०/७/१९८६.

४. 'नवे साहित्य : समीक्षा - "हाल्या हाल्या दुधू दे", प्रा. चिंचाळकर मृणाल यांचे आकाशवाणी नागपूर केंद्रावरील भाषण, ३/७/१९८६, सकाळी ७.४५ (हस्तलिखित)

५. 'एका खिन्न करणाऱ्या कादंबरीवरील तीन अभिप्राय' (वि. भि. कोलते, कमलाकर दीक्षित, पु. ल. देशपांडे)
संकलन - पुरुषोत्तम पाटील, दै. राष्ट्रतेज, पुणे ३/१२/१९८६.

६. 'गोतावळा' या कादंबरीची समाजशास्त्रीय समीक्षा, डॉ. वासुदेव मुलाटे, समीक्षा विचार चर्चासत्र, एच्.पी.टी. कॉलेज, नाशिक, मार्च १९९१ (टंकलिखित)

७. 'निवडक बी. रघुनाथ' संपा. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, (प्रस्तावना - टंकलिखित)

८. "विषवृक्षाच्या मुळ्या" : डॉ. वासुदेव मुलाटे, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, (हस्तलिखित)

९. 'हाल्या हाल्या दुधू दे', श्रीराम गुंदेकर, ग्यानबा (मनोरंजन) मुंबई

* * *

## स्नेहवर्धन प्रकाशनाची दर्जेदार पुस्तके

मराठीतील कथारूपे : प्रा. रा. ग. जाधव ✪ चरित्र-आत्मचरित्र (आ.२): अ. म. जोशी ✪ज्ञानेश्वरांचे निवडक अभंग: डॉ. प्र. न. जोशी ✪ तुकारामांचे निवडक अभंग:डॉ. प्र. न. जोशी ✪दासबोध : वाङ्मयीन समीक्षा :डॉ. उमेश तेंडुलकर ✪ज्ञानेश्वरी चिंतन: डॉ. उषा मा. देशमुख ✪मधुराभक्ती: संत ज्ञानेश्वर व संत मीराबाई यांची :डॉ. दीपा क्षीरसागर ✪आस्वादक ज्ञानेश्वरी: डॉ. मधुकर मोकाशी ✪कादंबरी : विवेचन आणि विश्लेषण : बालशंकर देशपांडे ✪नामदेवकृत ज्ञानेश्वरपंचक : डॉ. प्र. न. जोशी✪अर्वाचीन मराठी वाङ्मयाचाइतिहास १८०० ते १९६० :डॉ. प्र. न. जोशी ✪मराठी समीक्षेची वाटचाल:प्रा. गो. म. कुलकर्णी ✪ब्रह्मविद्याशास्त्र:डॉ. अण्णासाहेब अडसोड✪पर्यावरणीय प्रबोधन आणि साहित्य :प्रा. रा. ग. जाधव ✪मराठी वाङ्मयाची सद्य:स्थिती: डॉ. द. दि. पुंडे विद्यागौरी टिळक ✪क्रांतिजागर : महात्मा फुले यांची समग्र कविता:डॉ. रवींद्र ठाकूर ✪लोकसाहित्य मीमांसा (भाग १) :डॉ. विश्वनाथ शिंदे ✪मराठी कादंबरीतील प्रादेशिकता :डॉ. भास्कर शेळके ✪मराठी कादंबरीतील प्रादेशिकता :डॉ. भास्कर शेळके ✪ श्रीगोविंदप्रभु - चरित्र (आ. २) :(सं) डॉ. वि. भि. कोलते ✪दृष्टांतपाठ:(सं) डॉ. रा. शं. नगरकर ✪वछाहरण :डॉ. कल्याण काळे :डॉ. दत्तात्रय पुंडे ✪महदंबेचे धवळे(आ. २) :(सं) डॉ. सुहासिनी इर्लेकर ✪संतसाहित्य : संदर्भ कोश(खंड १) : डॉ. मु. श्री. कानडे ✪मराठी संतांच्या विराण्या :(सं) डॉ. प्र. न. जोशी ✪ज्ञानेश्वरी अध्याय बारावा :डॉ. कल्याण काळे, डॉ. दत्तात्रय पुंडे ✪संतसाहित्य दर्शन :डॉ. उषा मा. देशमुख ✪संतसाहित्य : अभ्यासाच्या काही दिशा :डॉ. कल्याण काळे, डॉ. रा. शं. नगरकर ✪ संतांची हे भेटी :डॉ. मु. श्री. कानडे ✪ज्ञानेश्वरांचे काव्यशास्त्र :(सं) डॉ. व. दि. कुलकर्णी ✪ज्ञानेश्वरी व विसावे शतक (आ. २): (सं) डॉ. स्नेहल तावरे ✪ डॉ. आनंद यादव : साहित्य व जीवन :डॉ. एस. एम कानडजे ✪भाऊसाहेबांची बखर: (सं)डॉ. मु. श्री. कानडे ✪एकोणिसाव्या शतकातील प्रबोधनकार :विष्णु मोरेश्वर महाजनि :डॉ.पुष्पा लिमये ✪मराठी वाङ्मयाचा अभिनव इतिहास १८०० ते १९२० :(सं) डॉ. गं. ना. जोगळेकर ✪ मराठी वाङ्मयाचा अभिनव :(सं) डॉ. गं. ना. जोगळेकर ✪मराठी संशोधन विद्या :डॉ. उषा मा. देशमुख ✪वाङ्मयाच्या कालखंडाचा अभ्यास : (सं) डॉ. उषा मा. देशमुख ✪मराठी नियतकालिकांचा वाङ्मयीन

9 MAY 2018

अगदी निर्मितीक्षणापासूनच प्रादेशिक साहित्याने रसिक मनाला आणि चिकित्सक अभ्यासकांना भुरळ घातलेली असली तरी या साहित्य प्रवाहासंबंधी फारसे मूलगामी असे लिहिले गेले नाही ही वस्तुस्थिती आहे. मराठी समीक्षेतील ही उणीव मोठ्या समर्थपणे डॉ. भास्कर शेळके यांनी भरून काढली आहे.

साधारणतः कोकणाशी संबंधित तेवढेच वाङ्मय प्रादेशिक म्हटले जाते. परंतु कोकणाबरोबरच मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भाची स्वतःची स्वतंत्र अशी प्रादेशिक वैशिष्ट्ये आहेत आणि ती साहित्यातून व्यक्त होतात ही जाणीव प्रथमतःच डॉ. भास्कर शेळके यांनी व्यक्त केली आहे. म्हणूनच त्या त्या प्रदेशाचा स्वतंत्र गंध व्यक्त होण्यासाठी त्यांना प्रचलित संकल्पना अपुऱ्या वाटल्या. त्यासाठी निसर्ग, समूहसंस्कृती आणि भूवैशिष्ट्यांबरोबरच तेथील बोली, परंपरा, संस्कृती, अर्थकारण, राजकारण, शैक्षणिक प्रगती इ. अनेक घटक त्यांना महत्त्वाचे वाटतात. एका प्रकारे प्रादेशिकतेची संकल्पना त्यांनी विस्तारित आणि व्यापक केली आहे.

आणि हे सगळे करण्यासाठी त्यांना अभ्यासाचा फार मोठा पट मांडावा लागला आहे. कादंबरीसारख्या वाङ्मय प्रकारातून प्रादेशिकतेचा सघन आविष्कार होऊ शकतो हे लक्षात घेवून त्यांनी असंख्य कादंबऱ्या नजरेखालून घातलेल्या असल्या तरी पन्नासेक कादंबऱ्यांचा सूक्ष्म अभ्यास केला आहे. सूक्ष्मतेबरोबरच वाङ्मयाची आणि जीवनाची सखोल जाण हेही या अभ्यासाचे ठळक वैशिष्ट्य होय.

डॉ. भास्कर शेळके यांच्या अभ्यासपूर्ण ग्रंथाचे रसिक आणि अभ्यासक स्वागत करतील असा विश्वास वाटतो.

डॉ. नागनाथ कोत्तापल्ले
(मराठी विभाग प्रमुख, पुणे विद्यापीठ)

स्नेहवर्धन
पब्लिशिंग हाऊस